१७०

म. ग्रं. सं. ठाणें

सन

विषय

लेखक राजे रामचंद्र आबाजी

...य क्रमांक

पुस्तकाचें नांव निकोलिनी



তা/১১২

১১২

D. B. Jaywant

EXI

This book is presented to D. B. Jaiwant,

1894 EXI

Sitaram Govind

Thana.

22^ND June 1888

This b[illegible]

D. B. Jaywant

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं०
ठाणे सन १८

# VILASINI.

A NOVEL

BY

RAMCHANDARA ABAJI RAJE.

BOMBAY:

PRINTED AT THE "NATIONAL PRESS."

*(All rights reserved.)*

1871.

Price 1¼ Ruppee.

# विलासिनी.

( मराठी कादंबरी. )

रामचंद्र आबाजी राजे,

यांणीं करून

मुंबईंत

"न्याशनल" छापखान्यांत छापविली.

( मालकीचे सर्व हक्क राखले आहेत. )

सन १८७१.

किंमत १८४.

TO

RAO SAHEB ABAJI BABURAO RAJE ESQUIRE,

SUBORDINATE JUDGE, TANNA, THIS HUMBLE WORK

IS DEDICATED AS A TOKEN OF AFFECTION

BY HIS MOST OBEDIENT AND

AFFECTIONATE

SON.

THE AUTHOR.

तीर्थरूप रावसाहेब आबाजी बाबूराव

सबॉर्डीनेट जज्ज ठाणें, यांच्या

चरणीं पुत्र प्रीतिदर्शनार्थ

कर्त्यानें

हें लहानसें पुस्तक नम्रतापूर्वक परम

आदरानें समर्पण केलें आहे.

# प्रस्तावना.

मराठी भाषेचा उत्कर्ष होण्यास तिजमध्यें अनेक विषयांवर अनेक प्रकारचे ग्रंथ तयार झाले पाहिजेत, हें जें विद्वज्जनांचें सिद्धांत वाक्य, त्याच्या आश्रयानें मनांत हा हेतु उत्पन्न झाला; तथापि विषयाची माहिती, विचारांची परिपूर्णता, सरस, वेधक व प्रगल्भ भाषा लिहिण्याची शक्ति, इत्यादि गोष्टींच्या अभावामुळें बरेच दिवस भीतींत घालविले, पण माझ्या कित्येक मित्रांनीं व विद्वज्जनांनीं मला उत्तेजन दिल्यामुळें त्यांच्या सेवेस हा लहानसा ग्रंथ मी सादर केला आहे. माझ्या अल्पमतीप्रमाणें मी, वाईट कृत्याचा वाईट व चांगल्या कृत्याचा चांगला परिणाम, सुशिक्षित स्त्रियांची नीति, गंभीर पुरुषाचें धैर्य, संकटकालीं बुद्धीचें स्थैर्य, स्त्रीसक्त पुरुषाचें साहस व दुष्टत्व आणि ईश्वर सत्याचा अभिमानी, इतक्या गोष्टी सिद्ध करण्याचा यत्न केला आहे; आतां त्याला सिद्धि पोंचली किंवा नाहीं, याची सिद्धता करणें रसज्ञ व मर्मज्ञ वाचणारांकडे आहे. विद्वज्जनांनीं या माझ्या लहानशा सेवेचा स्वीकार केल्यास त्यांचे आभार मानून कृतार्थताही मानीन.

या पुस्तकाबद्दल ( रा० रा० ) वामनआपाजी गुप्ते, हरि शिवराम शृंगारपुरे व सीताराम अनंत गुप्ते, यानीं योग्य मदत दिल्याबद्दल कर्ता त्यांचा आभारी आहे.

☞ या पुस्तकाविषयीं चार विद्वानांनीं आपापले अभिप्राय दिले आहेत, ते.—

## सरटीफिकेटें.

राजश्री रामचंद्र आबाजी राजे यांसीं. विनंती विशेष. तुह्मी नवीन रचलेली विलासिनी नामें गोष्ट आह्मीं साद्यंत ऐकिली. सदरहू गोष्ट एकंदरीनें पहातां बरीच मनोरंजक आहे. भाषा प्रायः निर्दोष आहे व कित्येक ठिकाणीं वर्णन फार सुरस आहे. कळावें हे विनंती.

**वामन आबाजी मोडक.**

**(बि. ए. वा० प्रिन्० एल्फिन्स्टन हैस्कुल.)**

रा० रा० रामचंद्र आबाजी राजे. विनंती विशेष. तुह्मी नवीन केलेलें "विलासिनी" नावाचें पुस्तक आह्मास दाखविलें हें पुस्तक आह्मीं समग्र वाचून पाहिलें. आमच्या दृष्टीनें या पुस्तकांत सदाचाराचा उत्कर्ष व दुराचाराचा अपकर्ष करून दाखविण्याचा प्रयत्न चांगला साधला आहे. भाषा बरीच सोपी व रसाळ आहे. तसेंच मुख्य उद्देशाच्या अंतर्गत करुण व शृंगार हे दोन रस बऱ्याच प्रतीनें साधले आहेत. यांत पुष्कळ ठिकाणीं उपमालंकार आला आहे व तो साधारण रीतीनें बराच सिद्ध झाला असें आह्मास वाटतें. ही गोष्ट संविधानकानें चांगली नटविण्यांत कर्ता बराच कृतार्थ झाला आहे. एकंदरींत हें पुस्तक जगापुढें येणें मोठ्या आनंदाची गोष्ट आहे असें आह्मीं अंतःकरणपूर्वक इच्छितों. कळावें लोभ असावा हे विनंती. आपला मित्र,

**रघुनाथशास्त्री अभ्यंकर.**

BOMBAY 29th February 1871.

My dear Mr. Ramchunder Abajee

I have read with much pleasure your "Vilasini," which you sent me for my opinion. I have read it all through & I am glad to inform you that I find many passages in it which create much effect upon the mind, I am glad to say that you have not fallen into the mistake, which many of our young writers on fiction have fallen into viz., that of supposing that the public can be amused with improbable stories only. Your story is such as one might conceive to have come to pass with much stretch on his imagination.

I am of opinion on the whole that the book will attract many readers.

I am your faithfully
Mahadeo Chimnaji Apte. B.A.L.L.B.,
(H. M. "JUGGUNNATH SHUNKER SHETT." English School.)

---

Bombay February 19th 1871

DEAR SIR,

I am very thankful to you for having read to me your Romance entitled "Vilasini." The tale is ingeniously planned and the various incidents in it are so arranged as to raise and duly satisfy the curiosity and thus afford pleasure to the mind of the reader. Moral reflexions are very well expressed but I must say there are a few passages, some of which I have already pointed out, where improvement is possible and you will do well to recast such passages and express them in a style more simple and more congenial to the genius of the Marathi language. On the whole I consider your work a very decent production and a respectable addition to the stock of reading books of readers of the both the sexes.

Your very sincerely
Abaji Vishnoo Kathavate B.A.
Sans. T. Elphinstone H. School

# विलासिनी.

## भाग १ ला.

मित्रहो, जी गोष्ट तुह्मीं आतां वाचणार त्या गोष्टीस मूळ प्रारंभ, **रत्नपूर** ह्मणून पुरातन काळीं **यमुना** नदीच्या तीरीं एक सुंदर नगरी होती, तेथें झाला. त्या वेळीं तेथें **वीरसेन** नामक राजा राज्य करीत असे. **वीरसेन** हा मोठा सुरूप पुरुष होता. ह्याचा चेहरा मोठा भव्य असून कांति फार मनोवेधक होती, हा मोठा तेजस्वी पुरुष दिसत असे. ह्याचा चेहरा पाहिल्याबरोबर पाहणाराच्या मनांत एकदम असें येत असे कीं, राजाचा जो खरा धर्म तो ह्याच्या हातून खचीत शेवटास जात असेल. परंतु हें पाहणाऱ्याच्या मनांत येई इतकेंच नाहीं, तर हें त्याच्या हातून खरोखरच घडत असे. असा राजा राज्य करीत असतां त्याच्या नगरीची शोभा कशी असेल ह्याविषयीं मनांत संशय देखील आणावयास नको. जेथील लोक सुखी, तेथील सर्व व्यापार व देखावे हेही सुखदायकच असतात. त्या नगरीचे सभोंवतीं तीन बाजूंनीं एकसारखी दाट अंबराई होती व चवथे बाजूनें **यमुना** नदी वहात होती. वसंत ऋतूमध्यें, तिच्या कांठच्या बागांतील पुष्पवृक्ष पुष्पांनीं भरून जात व सायंकाळच्या मंद वाऱ्याची झुळूक सुटली ह्मणजे मनास जो कांहीं आल्हाद होई तो लिहूं लागलें असतां लहानसें पुस्तकच होईल. तेथील वाडे

ही फारच सुंदर व टोलेजंग असून त्यांची धाटणीही फार चांगली होती. त्या सर्वांमध्यें **वीरसेनाचा** वाडा उंच होता आणि त्यावर ज्या गच्च्या होत्या त्यांवर उभें राहिलें असतां सर्व रत्नपुर नगरी दृष्टीं पडे. त्याच्या पाठीमागें जो बाग होता, याच्या मध्यभागीं एक मोठा हौद होता व त्याचे सभों-वतीं दुसरे त्याच्यापेक्षां लहान असे पांच हौद होते. त्यांतील कारंजास हजारी तोट्या लावीत त्यामुळें तेथें जो जलाचा वर्षाव होई त्यावरून असें वाटे कीं, हे पर्जन्यकाळचेच दिवस आहेत कीं काय. त्या बागेतील मोठमोठ्या गगन-चुंबित वृक्षांमुळें इतकी गर्द छाया झाली असे कीं, हीं आकाशांत ढगेच आलीं आहेत कीं काय असा भास होई. जाई, जुई, चमेली, पाच, मोगरा, गुलाब, गुलछबु ह्यांचा एकसारखा सुगंध सुटत असे. सारांश कोणी दुःखी प्राणी त्या नगरींत केव्हांही गेला असतां त्यास चार घटका आनंद झाल्यावांचून रहात नसे. त्या नगरींतील लोकही तसेच सुखी होते, कारण राजा चांगला असला ह्मणजे न्याय वगैरे चांगला होत असल्या कारणानें देशांतील झोटींग पादशाही अगदीं मोडून जाये. व्यापारास व दु-सऱ्या कित्येक धंद्यांस अडथळा न आल्याकारणानें अर्थां-तच लोकांची भरभराट होते. आणि ह्याच कारणानें सर्व लोक सुखी होतात. देशांत विद्येचाही बराच प्रसार होत जातो व त्या कारणानें राजकारभारास चांगले नीतिसंपन्न कारभारी मिळून न्याय वगैरे सर्व कामें चांगलीं चालतात आणि तींच प्रजेच्या सुखास कारण होतात. सारांश त्या नगरींत रहाणें मनुष्य मात्रास सुखावह वाटूं लागलें होतें.

**वीरसेनास** **कुमित्र** नामें एक सापत्न बंधु होता.

त्याचे सर्व गुण **वीरसेनाच्या** अगदीं उलट होते. लोकांस दुःख देणें, दुसऱ्याची संपत्ति हरण करणें, परस्त्रिया भोगणें, ह्यांत त्याला फारच आनंद वाटत असे. परंतु वडील बंधु जोंपर्यंत शिरावर होता तोंपर्यंत त्यास आपल्या मनाप्रमाणें वागण्यास सांपडत नसे. ज्येष्ठ बंधूमागें आपल्या हातीं कधीं राज्य येईल, व आपल्यास पाहिजे तसें कधीं वागावयास सांपडेल असें त्यास होऊन गेलें होतें. **वीरसेनास** व **कुमित्रास** **वीरकांत** व **दुर्मति** असे दोन पुत्र होते. त्यांतील राजपुत्राचें नांव **वीरकांत** व **कुमित्राच्या** पुत्राचें नांव **दुर्मति**. त्यांत **वीरकांत** हा **दुर्मती**पेक्षां पांच सहा वर्षांनीं वडील होता. ह्या दोघांस लहानपणापासून फार चांगली शिक्षा होती, परंतु **दुर्मति** हा आपल्या पित्याच्या वळणावर गेला. **वीरकांत** सर्व गुणसंपन्न होत्साता प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष देत असे. परधन हें त्यास विषतुल्य व परस्त्री मातसमान वाटत असे. तो आपल्या पित्यास कितीएक औदार्याचे कामांत उत्तेजन देऊन लोकांचें होईल तितकें कल्याण करण्याचा यत्न करीत असे. ह्याप्रमाणें पितापुत्र राज्य करीत असतां जसें चंद्रप्रकाशानें कमल प्रफुल्लित होतें त्याप्रमाणें सर्व प्रजा आनंदमय होत्साती प्रफुल्लित झाली होती. परंतु ह्या सृष्टींत कोणतीही गोष्ट सुरळीत चालणें कठीण. **वीरसेन** कांहीं दिवस अजारी असतां त्याचा एके दिवशीं काळ झाला. त्या दिवशीं **रत्नपुर** नगरींतील लोकांचें दुःख काय सांगावें ! ! जिकडे जावें तिकडे शोक व उदासीनता ह्याशिवाय दुसरें कांहींच दिसेनासें झालें. शरीरांतून प्राण निघून गेला असतां ज्याप्रमाणें

प्रेत अथवा ज्याप्रमाणें पतीवीण अबला त्याप्रमाणें ती नगरी होऊन गेली. सर्व लोकांचे तोंडावर प्रेतकळा चढली. त्यांत राजाच्या प्रीतीचा **सोमकांत** ह्मणून एक सरदार होता. तो सर्व गुणसंपन्न असल्या कारणानेंच राजाच्या प्रीतीस पात्र झाला होता हे उघडच आहे. मग त्याचें व राजपुत्र **वीरकांत** ह्याचें काय दुःख विचारावें !! सारांश त्या नगरींत मनुष्य मात्रही सुखी नाहींसा झाला. परंतु **कुमित्र** व **दुर्मति** ह्या दोन पुरुषांस त्याचें कांहीं देखील वाटलें नाहीं. त्यांस उलटा जो कांहीं हर्ष झाला त्याचें वर्णन करणेंही कठीण. **वीरसेनानें** आपल्या सापत्न मातोश्रीच्या समाधानासाठीं असा लेख लिहून ठेविला होता कीं, आपल्या पाठीमागें आपल्या बंधूनें राज्य करावें. आणि त्याच्या पाठीमागें आपल्या पुत्रास गादी मिळावी. ह्या लेखाप्रमाणें दुःखाचे कांहीं दिवस गेल्या-वर **कुमित्रास** राज्याभिषेक झाला. मग काय विचारा-वयास पाहिजे. पिशाचाच्या हातीं कोलीत दिल्याप्रमाणें झालें. तो राजा होतांच त्यानें कर वाढविले, सैन्य कमी केलें, व त्यापासून जो पैसा शिलक राही व कर वाढविल्यानें जो पैसा अधिक येई, तो नाच, तमाशा, ह्यांमध्यें खर्च करी. सुधारणुकेचा तर पायाच मोडत चालला. ह्यानें पूर्वीचे सर्व कारभारी कांहींना कांहीं कार-णावरून काढून टाकिले. आणि सर्व नवे, तरुण व दुराचारी कामगार ठेविले. बहुतेक पैसा निरर्थक मोठे मोठे वाडे बांधण्यांत घालविला. तिजोरींत पैशाची खूट आली ह्मणजे त्यानें लोकांवर अधिकाधिक कर बसवावे. मोठमोठ्या सावकार लोकांस राजाच्या समाधानार्थ आपले

खजिने रिकामे करावे लागत. ह्याप्रमाणें आपल्या खुशीनें जो राजाचें समाधान करीत नसे त्यावर बहुधा मार हाणीची पाळी येत असे. ह्याप्रमाणें सपाटा उडाला असतां तेथील लोकांची दशा काय विचारावी ! कित्येक गरीब थोर मनाचे होते ते नगर सोडून दुसरे गांवीं गेले व कित्येक ह्या दुष्ट, जुलमी राजापासून राज्य हिसकावून घेऊन तें **वीरकांतास** देण्याचा उद्योग करूं लागले. परंतु आपल्यास गादी प्राप्त व्हावी असें **वीरकांताच्या** मनांत कधींही आलें नाहीं. तो लोकांचे दुर्दशेविषयीं मात्र फार दुःखी असे. सारांश त्या शहरांत सर्व गोंधळ होऊन गेला. तेथें रहाणें कोणासही सुखानें वाटत नाहींसें झालें.

**कुमित्रास** राज्य प्राप्त होऊन कांहीं दिवस गेल्यावर ज्या राजवाड्याचें पूर्वी वर्णन केलें त्या वाड्याचे गच्चीवर **दुर्मति** उभा राहून आपला जो जिवलग मित्र **दुर्वीर्य** त्यास ह्मणतो, मित्रा, काय रे करूं, माझी आतां बरी स्थिति दिसत नाहीं, पहा, ह्या सोमकांताच्या वाड्यावर नजर गेली ह्मणजे माझें देहभानच जातें. काय करूं, आपला हेतु साधावा ह्मणून इतके दिवस मनांत झुरत होतों. काकाच्या कानावर गेलें तर भलतेंच होईल अशी मोठी भीति होती. आज त्यांचा काळ होऊन बरेच दिवस झाले, पाहिजे तें करणें आज माझ्या हातीं आहे. परंतु आतां कोणता उपाय करूं हे अगदीं सुचत नाहीं. बरें झालें सर्व जुन्या कारभाऱ्यांस काढून टाकिलें त्यावेळीं **सोमकांतासही** काढून टाकणार होते परंतु बाबाजवळ त्याची शिफारस करून मी त्यास ठेवून घेतलें. तो नगरींतून

गेला असतां ह्मणजे कशाचें साधतें. मित्रा, काय त्या **सोमकांताचें** भाग्य! ज्यास अशी स्त्री प्राप्त झाली आहे तोच खरा भाग्यवान. काय त्या स्त्रीचें वर्णन करूं! तिच्या तारुण्यास कशाची तरी उपमा देऊं! पंधरा सोळा वर्षांचें जिचें वय, पिकल्या लिंबाप्रमाणें जिची कांति, ठंगणी असून शरीराचा बांधा गोंडस. मित्रा, काय एकेक अवयवांचें वर्णन करूं! तिची कटी इतकी बारीक कीं, ती पाहून सिंहीणीनें देखील खालीं मान घालावी. नेत्र भ्यालेल्या मृगाप्रमाणें चंचल, तिच्या भौंवया काळ्या भोर असून इतक्या कमाणदार दिसतात कीं, हीं धनुष्येंच कीं काय असा भास व्हावा. त्यापासून नेत्र कटाक्षरूप सुटणारे जे तीव्र बाण ते तरूणांचें हृदय भेदल्याशिवाय कसे रहातील? तिचें कपाळ हें शुभ्र आकाशच विस्तारलें आहे कीं काय! व त्यावर तिचें लाल कुंकू एखादी रक्तवर्णाची चांदणीच चमकत आहे कीं काय! असा भास होतो. तिच्या कुरळ केसांच्या वेणीवर जें केतकीपत्र घातलेलें असतें त्याच्या सुगंधास लुब्ध होत्साता गुंफलेली वेणी हाच कृष्ण सर्प, तिचे मस्तकास चिकटला आहे कीं काय असें वाटतें. सूर्याच्या प्रकाशानें जशा कमलिनी प्रफुल्लित होतात त्याप्रमाणें **सोमकांताची** मूर्ति पाहून सदोदित जें तिचें प्रफुल्लित मुखकमल त्याचें काय वर्णन करूं. अहः हः! त्या मुखास तिचें चांफेकळीसारखें सरळ नाक कसें साजतें! आणि त्या नाकास, पोपटाचे चंचूपुढें ठेवलेल्या पिकल्या तोंडल्या प्रमाणें तिचा आरक्त अधरोष्ठ कसा शोभतो, ती विडा खाऊन, रत्नालंकार लेवून, जरतारीचें

पातळ नेसून, शुभ्र रुमाल हातांत घेऊन, जेव्हां आपले अंगावरील पदर वारंवार सांवरीत इकडून तिकडे जाते तेव्हां जशी विद्युल्लताच चमकत आहे असें वाटतें. आहः हः! हे परमेश्वरा, सर्व लोकांनीं, नेत्रावलोकनानें आपलें समाधान करून घ्यावें तर तूं अशा स्त्रिया फारच थोड्या उत्पन्न केल्या आहेस. परंतु भाषेच्या आंगीं तरी चांगली वर्णन शक्ति ठेवावयाची होतीस. ह्मणजे कित्येक ग्रंथकर्त्यांनीं आपल्या भाषारूप कौशल्यानें अशा सुंदर स्त्रियांचे पुतळे सर्व लोकांपुढें उभे केले असते; मित्रा, तिचें नांव ठेवणारीं मनुष्यें तरी किती हुशार होतीं ह्मणून सांगूं! आहः हः! तिच्या स्वरूपास "विलासिनी" हेंच नांव शोभतें. मित्रा, विलासिनीसारखी स्त्री मजसारख्या दुर्भाग्यास कशाची प्राप्त होय्ये, मित्रा, आतां कायरे करूं. कांहींच सुचत नाहीं. प्राण जाईल ह्मणतों तर तोही तिच्यासाठींच अडकून राहिला आहे. आतां उपाय तरी कायरे करूं? सोमकांताच्या पश्चात् जाऊन एकदां तिच्याजवळ आपली गोष्ट काढूं काय! पण ती काय ह्मणेल, मला वश होईल किंवा नाहीं. काय करूं, सर्वच विचार मनांत एकदम कसे येतात! हें ऐकून दुर्वीर्य ह्मणतो, सरकार, आपण इतके अधीर होऊं नका. कांहीं तरी उपायाची योजना करितां येईल. आपण ह्मणालां त्याप्रमाणें जरी एकदां तिच्याजवळ आपली गोष्ट काढाल तरी ती आपल्यासारख्या पुरुषास सहज वश होईल. विलासिनीचें काम कां अवघड आहे? यत्किंचित मनुष्याची ती स्त्री तिच्या प्राप्तीची कां काळजी आहे? आपण अधीर होऊं नका, आपल्यास जोडीदार विरही हत-

भाग्य प्राणी आहेत ते आपल्यास माहितच आहेत. त्यां- च्याच कार्याची मारामारी दिसते. हें ऐकून **दुर्मति** ह्मण- तो, मित्रा, तुझ्याविषयीं अगदीं काळजी नाहीं. तुझें कार्य हवें तेव्हां साधून देईन. तें माझ्या हातचें आहे. माझीच काय ती काळजी आहे. तुझा सल्ला असेल तर मी एकदां संधी पाहून **विलासिनी**कडे जाऊन तर पहातों, मग होणें असेल तसें होईल. हें ऐकून **दुर्मतीनें** उत्तर दिलें कीं सरकार, आपण खुशाल जावें. त्यांत कांहीं वाईट होण्यासारखें तर दिसत नाहीं. ह्याप्रमाणें बोलणें होऊन **दुर्वीर्य** आपल्या घरीं गेला. **दुर्मति, विलासिनी** कशी प्राप्त होईल ह्या विचारांत निमग्न होऊन तिच्याकडे जाण्याची कधीं संधी सांपडेल ह्या विवंचनेंत दिवस लोटूं लागला.

**वीरसेनाच्या** मरणानें **वीरकांतास** किती दुःख झालें असेल तें सांगावयास देखील नको. ज्या पुत्राची पित्यावर खरी ममता असते त्यासच त्या दुःखाची कल्पना करितां येईल. तशांत **रत्नपुरींत** सर्व प्रजेवर जो कहार चालला होता तो पाहून **वीरकांतास** जें दुःख झालें असेल त्याचें वर्णन करणें फारच कठीण आहे. गाय गरिबांस यथाशक्ति मदत करून त्यांचें दुःख परिहार करावें तर त्याचें कांहींच चालत नाहींसें झालें होतें; ह्यामुळें कोठें तरी देशपर्यटनास जाऊन तीर्थयात्रा वगैरे केली अस- तां प्रवासांत अनेक देशाचे निरनिराळे चमत्कारही दृष्टीस पडतील. आणि तेणेंकरून मनास जरा समाधान होईल असें वाटून **वीरकांतानें** देशपर्यटनास जाण्याचा विचार केला, ह्या कामांत आपला परम मित्र जो **सोमकांत** त्याचा

सल्ला घ्यावा असा विचार मनांत येऊन तो एके दिवशीं **सोमकांताच्या** घरीं गेला. **सोमकांतानें** जेव्हां राजपुत्रास पाहिलें तेव्हां तो दचकून उठून सामोरा आला आणि ह्मणाला, "यावें **वीरकांत** महाराज, यावें. आपली स्वारी आज कोणीकडे वाट चुकली ! आज तर आमचे घराचें भाग्य उदयास आलें, कां तर, आपल्यासारख्या स्वाऱ्यांची पायधूळ आमचे घराकडे कशास उडून यावयाची आहे. तशांत आज प्रत्यक्ष पायच लागले. मग त्या घराचें भाग्य काय सांगावें ?"

**वीरकांत.**—कां मी आपल्याकडे कधीं येत नाहीं काय? बरें तर, नेहमीं येतों ह्मणून बरें आहे, नाहीं तर किती दोष दिला असतात कोण जाणें.

**सोमकांत.**—आपलें येणें कारणा निमित्तें. आपल्यासारख्या स्वाऱ्या उगीच कशास यावयाच्या आहेत.

**वीर०**— तें आतां असो, मी आपल्याकडे कांहीं कारणास्तव आलों होतों.

**सोम०**— काय, तें काय, माझ्याकडे तें कसलें काम.

**वीर०**—काम ह्मणावया जोगें नाहीं. परंतु आपला मला एका कामांत सल्ला घ्यावयाचा होता.

**सोम०**— असलें तें कसलें काम ? सल्ला देण्यास मी आपल्यापेक्षां शाहणा आहें कीं काय ? परंतु आपली मर्जी असल्यास काय तें मला कळवावें, मग दोन गोष्टी सुचल्यास सांगेन.

**वीर०**— वडिलांस देवाज्ञा झाल्यापासून माझें मन अगदीं उदास झालें आहे. मला जें दुःख होत आहे तें खचीत सांगितल्यानें समजावयाचें नाहीं. तें एक

माझ्या मनासच माहित आहे. तशांत आतांशीं लोकांचे हाल होत आहेत. ते माझ्या दुःखावर डाग दिल्याप्रमाणें मला वाटतात. आपण जर राजास ह्या प्रकरणीं दोन गोष्टी सांगाव्या तर तें त्यास अगदीं रुचत नाहीं. उलटी आपली मात्र हेळणा होते, ह्याकरितां चार दिवस मनसमाधानार्थ तीर्थयात्रेस वगैरे फिरावयास जावें असें माझ्या मनांत आहे. तर यांत तुमचें कसें काय मत पडतें.

**साम०**— माझें मत काय पडावयाचें आहे. आपले मनांत जे विचार आले आहेत ते खरे आहेत. परंतु आपण ह्या नगरींतून गेलां ह्मणजे जो कांहीं आकांत उडून जाईल, त्याचा मात्र विचार करावा. आह्मांस संरक्षण करिता कोणीच रहाणार नाहीं. जिकडे तिकडे हाहाकार उडून जाईल. जरी आतां आपलें फारसें चालत नाहीं, तरी कोणतेंही अघोर कृत्य करण्यास आपले चुलत भावास अथवा चुलत्यास आपला कांहींसा दरारा आहे. आणि तो नाहींसा झाल्यावर काय विचारावयास पाहिजे ! ! ह्यास्तव प्रवासास जाण्याचा विचार चार दिवस रहित करावा.

**वीर०**— मी असून तरी लोकांस काय सुख व्हावयाचें आहे. माझें आतां काय चालतें आहे. आपण ह्मणतां कीं, आमचे चुलत्यास व चुलत भावास माझा दरारा आहे. परंतु कोणतेंही कृत्य करण्यास ते मला कशास भितील. त्यांचें माझ्या हातून काय व्हावयाचें आहे. सांप्रत मी कोठच्या झाडाचा पाला असें होऊन गेलों आहे. परंतु मला त्याचें अगदीं दुःख नाहीं. माय भगिनींस हल्लीं जें

दुःख भोगावें लागतें त्याचें मात्र मला मरणापेक्षां अधिक दुःख वाटत आहे. सांप्रत गरीब लोकांस जो कर द्यावा लागतो, त्यांत त्यांची बहुतेक प्राप्ती जाते. मग त्यांहीं आपला उदर निर्वाह तरी कसा करावा. न्याय तर आतां राहिलाच नाहीं. खुनाचा कैदी रुपये दिले ह्मणजे सुटून जातो. बरें व भलताच अनाथ फांशीं जातो. काम काजांत तरी माझें काय चालतें. तर तुमच्यासारख्या कामगाराचें आह्मी संरक्षण करावें. वडिलांनीं कित्येक नीतिसंपन्न कामगार ठेविले होते, ते कांहींना कांहीं कारणावरून काकानीं काढून टाकिले, हें पाहून मला तर फारच दुःख होतें. परंतु दुःखांत सुख एवढेंच कीं तुह्मीं तरी आह्माला अशा दिवसांत सोडिलें नाहीं. आतां मला जावयास आपला सल्ला असावा.

**सोम०**—आपला जर एवढा आग्रह आहे तर फिरावयास जावें परंतु मला बरोबर येण्याची परवानगी असावी मला तरी येथें राहून काय करावयाचें आहे! त्यांतून आपल्याजवळ कोणी विश्वासू मनुष्य पाहिजेच.

**वीर०**—आपण जर येण्याचें ह्मणाल तर आपले हातीं ईश्वरकृपेनें दोन दिवस कारभार आहे, त्यामुळें जें कांहीं थोडेंसें गाय गरीबांस सुख होत आहे. तेंही नाहींसें होईल. याकरितां आपण येण्याचा बेत करूंनये. मी आतां सुमारें पंधरा दिवसांनीं जाण्याचा बेत करितो, तयारीस तितके दिवस हावेतच, असें ह्मणून तो उठून गेला.

## भाग २.

पूर्वी सांगितलेंच आहे कीं दुर्मति ह्यास विलासिनीचें फार वेड लागलें होतें. ती कशी प्राप्त होईल ह्या विचारांत तो अगदीं निमग्न झाला होता. त्याच्या मनांत नेहेमी अनेक युक्तींचे तरंग उठत व ते पाण्याच्या बुडबुड्या-प्रमाणें नाहींसे होत. एक युक्ति त्यास एकदां बरी वाटावी, ती पुन्हां ठीक नाहीं ह्मणून त्यानें सोडून द्यावी. ह्याप्रमाणें त्याच्या मनाची विलक्षण स्थिति होऊन गेली. दुसरा धंदा त्यास अगदीं गोड लागेनासा झाला. मिष्टान्न हें त्यास विषतुल्य वाटूं लागलें. बागेत किंवा कोठें नदीच्या तिरीं तो फिरावयास गेला असतां त्यास समाधान न वाटतां उलटें विरह दुःख होत असे. कारण चांगला बाग, रमणीय रंगमहाल, रांगोळी सारखें चांदणें, सुगंधी तेल व उत्तम सुवासिक टवटवीत पुष्पें, इत्यादि पदार्थ विरही जनांस सुखदायक न होतां उलटे दुःखास्पद होतात. जो पुरुष विरहदुःखानें पिडित असतो त्यास शानदार पुष्पांची टवटवी ही स्त्रीच्या तारुण्याची सूचक होते आणि त्याच्या मनास अगदीं वेडें करून सोडत्ये. त्या बिचाऱ्यास निद्रा ही तर किती एक दिवस माहीतच नव्हती. विलासिनीची मूर्ति नेहेमीं त्याच्या नेत्रासमोर उभी राहून त्यास अगदीं वेड लागून गेलें. ती कशी प्राप्त होईल ह्या विचारांत तो दिवस क्रमीत असतां त्याच्या मनांत आलें कीं आपण दुर्विर्याचा पूर्वी सल्ला घेतल्या प्रमाणें तिच्याकडे एकदां जाऊन तर पहावें, मग काय होईल तें होवो. ती काय बोलत्ये तें तर प्रथम पहावें.

असा मनाचा निर्णय करून एके दिवशीं **सोमकांत** कचेरींत बसलेला पाहून तो त्याच्या घरीं गेला. तेथें त्यानें "**सोमकांत**, अहो **सोमकांत**" ह्मणून हाका मारिल्या. तेव्हां **सोमकांताचा** जो विश्वासू सेवक **रणधीरसिंग** होता त्यानें पुढें येऊन उत्तर दिलें कीं, स्वारी अद्यापि घरीं आली नाहीं. लवकरच येतील, सरकारानें वर येऊन बसावें.

जें **दुर्मतीच्या** मनांत होतें तेंच झाल्यावर त्याचा आनंद काय सांगावा! तो मोठ्या हुरूपीनें वर जाऊन बसला. **विलासिनीकडे** जाऊन आपली गोष्ट काढणार परंतु तेथें **रणधीरसिंग** होता, आणि त्याच्यानें ही गोष्ट एक-दम काढवेना; कारण कोणत्याही पतिव्रतेकडे पाहणें किंवा तिच्याशीं मुद्दाम बोलणें अथवा तिजवर बलात्कार करणें हें धडेल छातीच्या पुरुषाच्यानेंही होत नाहीं; मग असें कृत्य **दुर्मतीच्या** हातून कशाचें होतें.!! एखादा पुरुष एखा-द्यो पतिव्रतेवर जुलूम करण्याविषयीं आपल्या ठिकाणीं मोठा निर्धार करून ह्मणतो कीं, आपण आपली गोष्ट तिच्याजवळ काढली असतां काय हरकत आहे? व ती आपल्या बेतास जर अनकूळ नच होईल तर तिच्या-वर बलात्कार केला असतां त्या अबलेच्यानें आपलें काय होणार आहे? परंतु त्या साध्वीस पाहिलें ह्मणजे त्याची कांहीं चमत्कारिक स्थिति होऊन जात्ये; त्याचे आधीं हात पायच मोडून जातात, तोंडांतून एक शब्दही निघत नाहींसा होतो, हा एक ईश्वरीच चमत्कार होय. ह्या-साठीं सर्व स्त्रियांनीं जर आपल्या पातिव्रत्याचें कवच धारण केलें तर कोणाच्याही उद्धटपणाचा त्यांच्या शरीरास वारा लागणें नाहीं. **दुर्मतीनें** आपली गोष्ट काढण्या विषः

यीं होईल तितका यत्न केला, परंतु त्याच्यानें एक शब्दही बोलवेना.

मग आपल्यास कांहीं जरुरीचें काम आहे असें ढोंग करून हिरमुसल्या तोंडानें तो घरीं गेला, परंतु अशा स्थितींत त्यास चैन कशाचें पडतें? रात्र ही सर्व श्रमाची व दुःखाची विश्रांती होय. कोणी कसाही कष्टी असला तरी त्याचें दुःख विसरण्याची वेळ रात्र होय. त्या वेळीं एखादा सार्वभौम राजा आणि यःकश्चित रंक हे सारखेच असतात परंतु जे कामानळानें पीडित असतात त्यांस रात्रिपासून उलटें विलक्षण दुःख होतें. ह्याप्रमाणें **दुर्मतीस** रात्रीस किंवा दिवसा अगदीं चैन पडेनासें झालें. रात्र ही त्यास वैऱ्याप्रमाणें वाटूं लागली.

ह्याप्रमाणें कित्येक दिवस गेल्यावर त्यास पुन्हां वाटलें कीं, आपण आणखीं एकदा जाऊन **विलासिनी**जवळ आपली गोष्ट काढावी. मग काय होईल तें होवो. असा त्याच्या मनाचा निर्धार झाल्यावर **सोमकांत** कचेरींत कामांत गुंतलेला पाहून तो त्याच्या घरीं गेला. त्यावेळीं त्याचें नशीब थोर ह्मणून **रणधीरसिंग**ही घरांत नव्हता. मग त्यानें एकदम घरांत जाऊन **विलासिनीस** प्रश्न केला कीं, **सोमकांत** घरांत आहेत कां बाहेर गेले? परंतु **विलासिनीस** ह्याच्याशीं बोलण्याचा पूर्वी कधीं प्रसंग न आल्या कारणानें ती आपल्या अंगावरील पदर सांवरीत सांवरीत व कांहींशी लाजत झपकन विद्युल्लतेप्रमाणें घरांत निघून गेली. तथापि **दुर्मति** आणखी पुढें सरसावून तीस ह्मणाला, "मजजवळ, इतका संकोच धरण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं; **सोमकांता**शीं माझा अगदीं द्वैत

भाव नाहीं व आह्मा दोघांत आपणहि इतका परकेपणा पाळण्याची जरूर नाहीं. **सोमकांत** आणि आह्मी एकच आहों.

हें **दुर्मती**चें कपटी बोलणें लक्षांत न येऊन **विलासिनीस** वाटलें कीं, हा जर आपल्या पतीशीं एवढा स्नेहानें वागून परकेपणा बाळगीत नाहीं तर आपण तरी संकोच कशास धरावा? असें मनांत येऊन ती बोलूं लागली, "ही वेळ कां घरांत असण्याची? बरें तर काम आपलेंच आहे ह्मणून बरें आहे."

**दुर्मति**— त्याला काय उपाय? मोठे हुद्देदारांची तशीच दशा असते. त्यांच्यावर जोखमीचें काम फार आणि **सोमकांतास** तर कोणतेंही काम फार लक्ष देऊन व बारकाईनें करावें लागतें; त्यांचा स्वभाव फारच चिकित्सखोर आहे. बरें पण, आपण आज अशीं उदास कां दिसतां? कांहीं तरीं कमी जास्त असेल. चला बुवा **सोमकांत** केव्हां येतील ते येवोत. ( दुःखाचा सुस्कारा टाकून ) कठीण हें, एकंदरींत फार कठीण.

हें बोलणें ऐकून **विलासिनीस** वाटलें कीं आपले प्राणप्रिय तर कांहीं संकटांत नाहींतना? त्यांवर कांहीं तोहोमत आल्यामुळें त्यांच्या मित्रास इतकें दुःख होत नाहींना? तशांत मला कांहीं बातमी कळली असावी अशी कल्पना मनांत येऊन "तुह्मीं आज उदास कां दिसतां" ह्मणून तर त्यानें मला विचारलें नसावेंना? बरें, त्यासच आपण विचारून पहावें, असें मनांत येऊन ती ह्मणाली, "मला तर कांहीं झालें नाहीं, परंतु सरकारची स्वारी आज जरा चिंताक्रांत कां दिसते आहे"?

दुर्मति.— जरा चिंताक्रांत कां ह्मणतां ? चिंतेनें अगदीं ग्रस्त होऊन गेलों आहें असें कां ह्मणाना ? (दुःखाचा सुस्कारा टाकतो.)

हें ऐकून विलासिनीच्या मनांत धस्स झालें. आपल्या पतीवर काय संकट आलें आहे कोण जाणें असें तिला वाटूं लागलें. परंतु पुन्हां मोठा हिय्या करून तिनें विचारिलें, "कां इतकी चिंता कशाची; इतक्या दुःखाच्या शब्दाचें काय कारण ?"

दुर्मति.— (पुन्हां सुस्कारा टाकून) आह्मीं सदा असेंच दुःखी असावें असें जर आपल्याच मनांत असेल तर मग त्यास आमचा काय उपाय ? सदा असेंच दुःखी राहिलें पाहिजे. माझ्या दुःखाचें कारण तुह्मींच आहां. जर तुमच्या मनांत आलें तर तुह्मी एका क्षणांत मला आनंदपर्वताच्या शिखरावर बसवाल आणि तुह्मी त्याहीपेक्षां उंच स्थानाप्रत पावाल.

विला०— आपल्या दुःखाचें कारण मी आहें ? माझ्याकडून आपल्यास कसें सुख होणार ? माझ्या तर बाई अगदीं ध्यानांत येत नाहीं.

दुर्म०— मला तर आतां नाहीं उत्तर देववत.

विला०— तर मग असें कोणतें कारण आहे?

दुर्म०— आतां मला पुन्हां पुन्हां कां विचारितां ? ह्यापेक्षां उघड मी काय सांगूं ?

विला०— सरकार आपलें बोलणें खरोखरीच माझ्या लक्षांत आलें नाहीं. काय तें मला उघड कळवावें.

दुर्म०— काय सांगूं सखे ? ह्या वेळीं "कामातुराणां नभयंनलज्जा" ह्याप्रमाणें मला होऊन गेलें आहे.

दुर्मति असे शब्द बोलतांच विलासिनीच्या अंगाची एकदम आग होऊन गेली. पुढें काय बोलावें हें-ही तिला सुचेना. ती मोठ्या संतापानें त्यास ह्मणाली, "अरे चांडाळा, दुष्टा, हे शब्द बोलण्यास तुला लाज तरी कशी नाहीं वाटली? किंवा तुझी जिव्हा तरी कशी दुभागली नाहीं? अरे, इतके दिवस जो मोठा स्नेह ठेवून चाकरी राहूं दिलीस ती एवढ्यासाठींच कायरे? आतां ऊठ येथून, जा, लवकर काळें कर; मला तुझें मुख देखील पाहवेंसें वाटत नाहीं. अरे मूर्खा, असे शब्द तोंडानें उच्चारितोस ह्मणून तुझ्या मातेनें तुला जन्म देऊन ती वांझ असल्याप्रमाणें आहे. तिच्या उदरीं तूं पाषाण झाला असतास तरी बरें झालें असतें. अरे, तुजसारख्या पुरुषास परस्त्रियांकडे पहाणें देखील योग्य नाहीं, तर तुला असे शब्द कसे उच्चारविले? चल, आतां ऊठ पाहूं येथून कसा तो. तुझा आतां एक शब्द देखील ऐकावासा वाटत नाहीं.

दुर्म०—सखे, तूं इतकी रागावतेस कां? सर्व तरुण स्त्रीपुरुषांनीं आपले दिवस व्यर्थ कां घालवावे? जशी मनांत येईल तशी मजा मारावी. हे तारुण्याचे दिवस नेहेमींच कोठें रहावयाचे आहेत? तारुण्य हें केवळ काळांतील वसंत ऋतुच होय. ह्या ऋतूचे दिवस फार लवकर निघून जातात असें नेहेमीं वाटतें. ह्यासाठीं त्या काळांत जीं सुवासिक पुष्पें येतात त्यांचा सुगंध घ्यावा, व त्या काळांतील सर्व सुखदायक पदार्थांचा यथेच्छ उपभोग घ्यावा. हे दिवस मजा मारल्याशिवाय व्यर्थ घालवावे हें योग्य नाहीं. तूं मला वश होशील तर मी तुला ह्या सर्व

देशाची स्वामीण करून ठेवीन. तुला कोणत्याही गोष्टीची वाण पडूं देणार नाहीं; तर ह्या गोष्टीचा राग न येऊं देतां ती मान्य कर व पुढें परस्परांस जें सुख होईल त्याचा विचार कर. येणेंकरून तूं खरोखरीच मला आनंदपर्वताच्या शिखरावर पोहोंचविशील.

**त्रिला०**— दुष्टा, तुला बोलूं नको ह्मणून सांगितलें तरी पुन्हां नरकांत रवरव झाल्याप्रमाणें तोंडानें शब्द उच्चारितोस? मूर्खा, तूं तारुण्यास जी वसंत ऋतूची उपमा दिलीस ती अक्षरशः खरी आहे. ह्या उपमेचा उत्तम अर्थ असतां तुझ्या पापी मनामुळें तुला अगदीं भिन्न वाटला. वसंत ऋतूचे दिवस फार लवकर जातात असें वाटतें, त्याचप्रमाणें तारुण्यही लवकर जातें. ह्यासाठीं त्या ऋतूंतील सुगंधिक पुष्पांचा सुगंध घेणें, ह्मणजे आपण सत्कर्मेंकरून त्यांबद्दल आपल्या सत्कीर्तीचा उपभोग घेणें होय. परंतु हा उत्तम अर्थ दुष्टा, तुझी **दुर्मति** तुला कसा समजूं देईल?

**दुर्म०**—(ही युक्ति सफळ होत नाहीं व हिजपासून भलताच अनर्थ होईल आणि आपलें कार्य सफळ होणार नाहीं एवढ्यासाठीं दुसरी युक्ति शोधून काढावी असें मनांत येऊन) हे पतिव्रते, तुला ह्या गोष्टीपासून अगदीं राग येऊं देऊं नको, मी ज्याप्रमाणें बोललों त्याप्रमाणें माझ्या मनांत अगदीं वागत नाहीं. **सोमकांत** हे सर्वगुणसंपन्न आहेत व सर्व प्रकारें सुखी आहेत, परंतु सर्वांच्या स्त्रिया ह्या फार कपटी असतात. त्या आपल्या पतीस एक प्रकारचें सोंग दाखवून खेळ निराळेच करितात. ही स्थिति बहुधा सर्वांचीच आहे. परंतु जो सदा सर्वकाळ सुखी **सोमकांत** त्याची स्त्री कोणत्या प्रकारची, तिचा

मासल्याही सर्वांसारखाच आहे कीं काय, ह्याची परीक्षा पहाण्याकरितां मी आपल्यास असें बोललों. एवढ्यासाठीं ह्या गोष्टीचा आपल्यास अगदीं राग येऊं नये. मला सर्व प्रकारें क्षमा करावी. मी साध्वीचा उगाच छळ केला त्याचा आतां मला पश्चात्ताप होत आहे.

**विला०**—सरकार, असेंच जर खरोखरी आपल्या मनांत असेल तर त्याचा मला अगदीं राग नाहीं व रागाच्या झपाट्यांत मी आपल्यास जे शब्द बोलले असेन त्याची-ही मला क्षमा असावी.

**दुर्म०**—आपण जे मला अपशब्द बोललां त्याविषयीं माझ्या मनांत कांहीं एक नाहीं; कारण कोणत्याही पति-व्रतेस असी छळली असतां ती फारच रागावेल ह्यांत कांहीं संशय नाहीं. बरें, मला आतां कांहीं जरूरीचें काम आहे ह्यासाठीं मी जातों, परंतु **सोमकांत** घरीं आले ह्मणजे "मी आलों होतों" ह्मणून त्यांस सांगा. नको बरें, नाहीं तर मीच चिठ्ठी लिहून ठेवितों. त्यांचें कलमदान व दफ्तर बहुधा दिवाणखान्यांत असेल तिकडेच मी जातों.

असें ह्मणून मोठ्या दिवाणखान्यांत जाऊन त्यानें **सोमकांताचें** तें दफ्तर सोडिलें आणि कागदांची कांहीं चाळवाचाळव करून एक कागद मुकाट्यानें खिशांत घातला आणि मोठ्या त्वेषानें फार जळफळत तीवर दांत ओंठ खात तो घरीं गेला आणि जातांना ह्मणूं लागला कीं, नांवाचा जर मी **दुर्मति** असेन तर हरयुक्तीनें हरतऱ्हेनें ह्या स्त्रीचा अभिलाष घेईन. ह्याप्रमाणें **दुर्मति** दुसरी एखादी युक्ति शोधून काढण्याच्या विचारांत निमग्न झाला.

# भाग ३.

वरच्या भागांत सांगितलें आहे कीं **दुर्मति** आपल्यास **विलासिनी** कशी प्राप्त होईल ह्या विचारांत अगदीं निमग्न झाला होता, त्यास अगदीं चैन पडेनासें झालें. रात्रंदिवस **विलासिनीची** मूर्त्ति नेत्रांसमोर उभी राहूं लागली. तिच्या शरीराचे प्रत्येक अवयव त्याच्या मनांत मूर्तिमंत येऊं लागले. तिची टवटवीत कांति, पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें तेजस्वी, व चंद्राच्या प्रकाशानें जसें कमल प्रफुल्लित होतें त्याप्रमाणें तिचें प्रफुल्लित मुख हीं त्याच्या डोळ्यांसमोर दिसूं लागलीं. मी तिच्याकडे गेलों तेव्हां मला पाहून ती कशी लाजली! आपल्या अंगावरील पदर सांवरीत सांवरीत विद्युल्लतेप्रमाणें ती झपकन कशी घरांत गेली! त्यावेळीं तिची मुद्रा कशी दिसत होती! नेत्र किती चंचल होते! आपल्याशीं ती प्रथम कशी लाजत लाजत मंजूळ वाणीनें बोलत होती! तिचें तें मधुर भाषण माझ्या, कामानें दग्ध झालेल्या अंत:करणास कसें अमृताप्रमाणेंच वाटत होतें! प्रथम ती जे नम्रतेनें शब्द बोलली तेच शब्द माझी सखी होऊन बोलती तर ते मला किती सुखदायक झाले असते! तें मधुर भाषण तर काय परंतु ती रागानें जे कठोर शब्द बोलली ते देखील ती सखी होऊन बोलती तर मला किती गोड वाटले असते! माझी प्राणप्रियाच तिच्या मर्जीविरुद्ध मी वागलों ह्मणून जसे मला प्रेमानें टोलेच देत आहे असें नाहीं कां वाटतें! अह: ह:!! क्रोधानें जरी संतप्त झाली होती तरी तिची ती मुद्रा कशी दिसत होती! संतापानें

कांहीं व्यंग कां दिसूं लागलें होतें ! उलटा तिच्या तारुण्याच्या भरास तिचा संताप मदत करितो आहे असें कां दिसत नव्हतें ! तिच्या त्या सुकुमार शरीरास स्फुरण आल्यामुळें प्रत्येक अवयवाची काय शोभा दिसत होती! मुखाच्या पिंवळस गौर वर्णास क्रोधाच्या सपाट्यानें आरक्तवर्ण प्राप्त होऊन त्याची काय अलौकिक शोभा दिसत होती! बाहूंस व उरस्थलास स्फुरण आल्यामुळें तीं तिच्या तारुण्यास किती शोभा देऊं लागलीं होतीं! संतापानें सर्वांगास चलन उत्पन्न झाल्यामुळें तिचा अंगावरील पदर वारंवार सरकून तारुण्यराजाच्या द्वारपालाची काय शोभा दिसत होती ! संतापानें सर्वांग तप्त होऊन तिच्या त्या चापेकळीसारख्या नाकावर व गुलाबाच्या फुलाप्रमाणें टवटवीत गालांवर घर्मबिंदु आले होते ते तरी किती शोभायमान दिसत होते ! रागानें ती जेव्हां मोठ्यानें शब्द उच्चारण्याचा यत्न करी तेव्हां तिच्या त्या सुकुमार कंठाची काय शोभा दिसत होती ! सर्व स्फुरण पावून तटाटलेल्या शिरांमधून ती ज्या वेळीं रागानें शब्द बोले त्याबरोबर अंगांतील रक्त वरच्या भागाकडे गमन करतें आहे कीं काय असें वाटे. अहः हः ! ! किती ह्मणून तरी तिचें वर्णन करूं ! समाधानवृत्ति असतांही तिचें तें अप्रतिम शरीर वर्णनास पात्र, क्रोधानें जरी बेफाम झाली तरी तिची विलक्षण शोभा. अहः हः ! ! तिच्या मुखास उपमा तरी कशाची देऊं ! चंद्र जर ह्मणूं तर तें मुख अवलोकन केलें असतां मजसारख्या कामी जनाच्या अंत:करणास अधिकच तप्त करतें. परंतु हा चंद्राचा गुण नव्हे ; तेव्हां त्या मुखास चंद्राची तर उपमा साजत

नाहीं. त्या सुकुमार गालांस जर गुलाबाचीं फुलें ह्मणूं तर गुलाबाचें फूल भोक्त्यानें भोगिलें ह्मणजे अगदीं सुकून जाऊन निस्तेज होतें. परंतु ह्या गालांचा भोक्ता जसजसा उपभोग घेतो तसतसे ते अधिकच टवटवीत दिसतात. अधरास जर बिंबफळाची उपमा देऊं तर बिंबफळाचें शुकादिभोक्ते विदारण करितात. तसें त्या अनुपम अधराचें होत नाहीं. नाकास जर चापेकळीचीच उपमा देऊं तर चापेकळीस सज्ञान मनुष्यावांचून कोणी भुललेलें ऐकिलें नाहीं. परंतु त्या नाकास लुब्ध होऊन अज्ञान मौक्तिकांनीं सुद्धां सागराचा त्याग करून त्याचा अंगिकार केला. किंवा तीं चुंबनार्थ सर्वकाळ लुटपुटत असतात ह्मणून तिच्या त्या गालास तर भुललीं नसतीलना ! नाहीं नाहीं, नाकाची कां कमी शोभा आहे तर तसें ह्मणावें ! तिच्या भोंवयास जर धनुष्यें ह्मणूं तर फारच बाध येतो. धनुष्यापासून सुटणाऱ्या तीव्र बाणांनीं शरीरास स्पर्श न करतां कधीं कोणास दुखविलें आहे काय? परंतु ते नेत्रबाण तर अंतरावरूनच हृदय विदारण करून टाकतात. दुसरें, धनुष्यापासून सुटणाऱ्या बाणांनीं अशक्तापेक्षां सशक्तास कधीं अधिक इजा केली आहे काय ? परंतु हे बाण वृद्ध व बालकां सारख्या अशक्तास इजा न करितां तरूणासारख्याच सशक्तास पिडतात. तद्वतच तिच्या त्या वेणीस जर भुजंगाची उपमा देऊं तर भुजंगाच्यानें अंतरावरून कधीं डंश करवला आहे काय ? परंतु त्या वेणीस दुरून पाहिल्या बरोबरच अंतःकरणास एकदम दंश होतो. तेव्हां आतां ह्या अवयवास उपमा तरी कशाची देऊं! दुर्वांपाशीं बोलत असतां तिच्या

अवयवास ज्या ज्या ह्मणून उपमा दिल्या त्या सर्व आतां मला अगदीं अयोग्य वाटूं लागल्या आहेत. **दुर्वीर्याच्या** लक्षांत येऊन तो मला मूर्ख तर ह्मणत नसेलना? अह: ह: ! ! प्रिये, किती ह्मणून तुझें वर्णन करूं. हें सर्व तुझें एकटीचें वर्णन केलें परंतु तूं ज्या वेळीं मजसारख्याच्या शेजारीं बसशील तेव्हां तुझी काय विलक्षण शोभा दिसेल? तुझीच काय, माझी तरी काय शोभा दिसेल? लोकांस शोभा दिसण्याचें असो, परंतु माझ्या मनास तरी किती आनंद होईल? व: त्या आनंदानेंच नाहीं कां मी लोकांस विलक्षण सुंदर दिसणार? अरे रे, पण काय मी मूर्ख आहें? पहा, मनोराज्यांत कसा वेडा होऊन गेलों तो. ती कशाची मला प्राप्त होत्ये आणि हें आतांचें स्वप्नवत् सुख मला कशाचें मिळतें?

ह्याप्रमाणें कांहीं वेळ विचार करीत आहे तों त्याच्या मनांत आलें कीं आपण योजना केल्याप्रमाणें **सोमकांता**ची व तिची तुटातूट केली तर ती आपल्यास सहज वश होईल. हें कार्य साधण्याजोगें आपण साधनही साधून ठेविलें आहे, हेंही बरेंच केलें आहे. आपला बेत आजच शेवटास नेला पाहिजे; नाहीं तर आज झालेला सर्व मजकूर ती आपल्या पतीजवळ बोलेल, आणि पाठीमागून आणलेलें सर्व सोंग उघाडीस येईल. आपलें सोंग **विलासिनीस** जरी खरें वाटलें आहे तथापि सर्व मजकूर **सोमकांतास** समजतांच तो पुढील सर्व तजवीज करील. मग आपला बेत कशाचा साधतो? एवढ्यासाठीं आपला योजलेला बेत आजच शेवटास नेला पाहिजे. असें मनांत आणून आपला पिता एकटा बसलेला आहे असें पाहून

तो त्याच्या महालांत गेला आणि घराप्रकरणीं कांहीं गो- ष्टी बोलूं लागला. बोलतां बोलतां तो आपल्या पित्यास ह्मणाला. "बाबा, माझ्याकडून एक मोठी चूक झाली आहे; परंतु ती आतां नीट करावी हें योग्य आहे; कारण कोणतीही चूक आपल्याकडून झाली व ती आपल्याक- डून नीट होत असेल तर तसें करणें योग्य आहे. ती मी वडिलांस कळवितों, परंतु तिची मला क्षमा असावी."

**कुमि०**— असी ती कसली चूक कीं ती तूं आतां नीट करणार. सांग पाहूं, मला तिचा अगदीं राग नाहीं; त्यांतून तूं ह्मणतोस कीं ती अद्यापि नीट होण्यासारखी आहे, मग राग तो कशाला? सांग पाहूं कोणती ती.

**दुर्म०**— बाबा, तुह्मीं ज्यावेळीं सर्व जुने कारभारी काढि- ले, त्या वेळीं **सोमकांतास**ही काढण्याचा बेत केला असतां माझ्या सांगण्यावरून ठेवून घेतलें परंतु—

**कुमि०**— हो मग, त्यास ठेवलाच आहे.

**दुर्म०**— त्यांतच माझी चूक झाली आहे. त्यास ठेविला आहे खरा, परंतु तो इतका कपटी आहे असें मला माहि- त नव्हतें.

**कुमि०**— त्यानें कसलें कपट केलें?

**दुर्म०**— बाबा, तें आतां तोंडानें सांगवत सुद्धां नाहीं. काय बोलून? आपल्या कुळास आपणच काय बट्टा द्यावा? नको, तें ऐकण्याच्या भरीं पडूं नये. **सोमकांतास** काढून टाकून हद्दीपार करावा ह्मणजे झालें. अथवा कडक शिक्षा देणें असेल तर कांहीं दिवस कैदेंत ठेवावा.

**कुमि०**— अरे, पण काय झालें आहे तें सांग तर खरें. आपल्या कुळास बट्टा कशाचा लागतो? आणि **सोमकां-**

तानें केलें आहे काय? त्याच्या अपराधाचा आणि आपल्या कुळाचा काय संबंध?

दुर्म०— तसेंच आहे तें. खरोखरीच तें, बाबा, मला तोंडानें सांगवत नाहीं. त्याच्याशीं काय करावयाचें आहे?

कुमि०— अरे, पण तुला काय? सांग ह्मटलें सांगावें. काय झालें आहे तें कळूंदे तर खरें.

दुर्म०— वडिलांचा एवढा आग्रहच आहे ह्मणून सांगतों. **सोमकांताचा** आणि **वीरकांताचा** फार स्नेह आहे तो वडिलांस ठाउकच असेल.

कुमि०—होय, तें मला माहीत आहे. तो नेहमीं **वीरकांता**कडे पडलेलाच असतो. तुझा त्याचा देखील स्नेह आहेच.

दुर्म०—होय, त्याचा माझा स्नेह होता खरा, परंतु त्याचा हा प्रकार कळल्यापासून मी त्याचें नांव घेत नाहीं.

कुमि०— कसला त्याचा प्रकार?

दुर्म०— तो नेहमीं **वीरकांता**कडे येतो त्यांत त्याचा हेतु फार निराळा आहे. **वीरकांतास** एवढा स्नेहभाव दाखवून त्याच्याकडे नेहमीं येणें जाणें ठेवून तो **वहिनी**ची भेट घेत असतो.

कुमि०— काय **वीरकांताच्या** बायकोची भेट घेत असतो! कशासाठीं तो तिजकडे येतो?

दुर्म०— नाहीं, पुढचें मला आतां सांगवत नाहीं. काय असेल तें असो. वाईट पोरी, कुळाला बट्टा लावण्यास जन्म घेतात.

कुमि०— हं, समजलों, तूं काय आणखीं सांगशील! बरें पण, तुला हें कसें समजलें?

**दुर्म०**—बरेच दिवस मी ह्या गोष्टीची गुणगूण ऐकत होतों, परंतु पक्का शोध लागण्यापूर्वीं वडिलांजवळ कांहीं सांगवेना. आज मी त्याच्या हातची तिला आलेली प्रत्यक्ष चिठ्ठीच धरली. त्याणें ती चिठी **रणधीरसिंग** त्याचा जो विश्वासू सेवक त्याच्या बरोबर त्याचा कारकून जो **दुर्वीर्य** त्याकडे तिला देण्या साठीं धाडली होती.

**कुमि०**—काय? **दुर्वीर्य** सुद्धां ह्या खटपटींत असतो काय?

**दुर्म०**—नाहीं नाहीं बाबा, तो वास्तवीक त्यांच्यांत बिलकूल नाहीं. मीच त्यास खरा तथ्यांश काढण्याकरितां त्यांच्या बेतांत मिळण्यास सांगितलें होतें. त्याच्यावर **सोमकांताचा** मोठा विश्वास बसला आहे. सर्व हकीगत त्याला कळून बरेच दिवस झाले, परंतु चांगला मुद्दा ज्या दिवशीं त्याच्या हातीं लागला तेव्हांच त्यानें मला सर्व कळविलें. वडिलांस खोटें वाटत असेल तर ही पहावी प्रत्यक्ष चिठ्ठी.

असें ह्मणून त्यानें एक लहानशी चिठी त्याच्या पुढ्यां-त टाकिली, तींतील मजकूर येणेंप्रमाणें.

"प्राणप्रिया रूप."

"आज कांहीं कारणामुळें यावयास फावणार नाहीं. उद्यां होईल तितकी जलदी करून संधी पाहून येईन, कळावें."

( चिठीच्या पाठीवर सही "**सोमकांत**")

ती चिठी **कुमित्रानें** वाचून पाहिली आणि ह्मणूं लागला "अरे, रे, कायही पोर! नांव बुडविलें हिनें आज घराचें. आज पर्यंत अशी कोणी घरांत निपजली नव्हती;

हीच कोठून अशी उत्पन्न झाली कांहीं समजत नाहीं. वरी तर, चांगली कूळशीळ पाहून केली होती. बापाचा केवढा लौकिक ! ! विचारा मांडलीक राजा आहे पण कसा नांव संपादून आहे? पण हीच आकाबाई त्याच्या पोटीं कोठें जन्म घ्यावयास गेली ! नवराही आपला भोळवट वेडसर आहे. लागेल त्यांच्याच नादीं लागेल. कोठले सर्व जुने कारभारी आहेत, त्यांच्याच विचारानें वागतो. ते कसले ? एकापेक्षां एक भोळवट म्हातारडीं. अशांच्या संगतीं लागून अशींच फळें. कांहीं आंगांत करामत तर आली पाहिजे. ह्या मूर्खांची हींच कपाळें. अशाच कैदासणी निपजायच्या त्यांच्या बायका. असा संताप आला आहे कीं ह्या वेळीं उभीच चिरावी सटवीला. पण कायरे, आपल्या हातीं आपली अब्रू घालवावी. दुर्मति, कसेंरे करावें. हें वर्तमान **वीरकांतास** कळलें तर तो आपल्या जिवाचें काय करील आणि तिच्या जिवाचें काय करील ह्याचा नेम नाहीं. हें त्याला कळवून उपयोग नाहीं असें वाटतें. एक **सोमकांत** आणि त्याचा सेवक **रणधीरसिंग** ह्यांस योग्य शासन करावें ह्मणजे झालें.

**दुर्म०**—तसें करून काय उपयोग ? त्यांना तर शासन केलेंच पाहिजे; परंतु अशा पोरीचाही योग्य बंदोबस्त केला पाहिजे. अशांना फार जपलें पाहिजे. एखाद्या कोटडींत कोंडून ठेवावी, किंवा गांवाबाहेर एखाद्या खोपटांत नीट बंदोबस्तानें ठेवून **दुर्वीर्या**सारख्यास तिची व्यवस्था पहावयास सांगावी. तो भला वस्ताद आहे ह्या कामांत.

**कुमि०**—छीरे, तसें करून काय उपयोग ? तशानें

दुर्म०—बरेच दिवस मी ह्या गोष्टीची गुणगूण ऐकत होतों, परंतु पक्का शोध लागण्यापूर्वीं वडिलांजवळ कांहीं सांगवेना. आज मी त्याच्या हातची तिला आलेली प्रत्यक्ष चिठ्ठीच धरली. त्याणें ती चिठी **रणधीरसिंग** याचा जो विश्वासू सेवक त्याच्या बरोबर त्याचा कारकून जो **दुर्वीर्य** त्याकडे तिला देण्या साठीं धाडली होती.

**कुमि**०—काय? **दुर्वीर्य** सुद्धां ह्या खटपटींत असतो काय?

**दुर्म**०—नाहीं नाहीं बाबा, तो वास्तवीक त्यांच्यांत बिलकूल नाहीं. मीच त्यास खरा तथ्यांश काढण्याकरितां त्यांच्या बेतांत मिळण्यास सांगितलें होतें. त्याच्यावर **सोमकांताचा** मोठा विश्वास बसला आहे. सर्व हकीगत त्याला कळून बरेच दिवस झाले, परंतु चांगला मुद्दा ज्या दिवशीं त्याच्या हातीं लागला तेंव्हांच त्यानें मला सर्व कळविलें. वडिलांस खोटें वाटत असेल तर ही पहावी प्रत्यक्ष चिठ्ठी.

असें ह्मणून त्यानें एक लहानशी चिठी त्याच्या पुढ्यां-त टाकिली, तींतील मजकूर येणेंप्रमाणें.

"प्राणप्रिया रूप."

"आज कांहीं कारणामुळें यावयास फावणार नाहीं. उद्यां होईल तितकी जलदी करून संधी पाहून येईन, कळावें."

(चिठीच्या पाठीवर सही "**सोमकांत**")

ती चिठी **कुमित्रानें** वाचून पाहिली आणि ह्मणूं लागला "अरे, रे, कायही पोर! नांव बुडविलें हिनें आज घराचें. आज पर्यंत अशी कोणी घरांत निपजली नव्हती;

हीच कोठून अशी उत्पन्न झाली कांहीं समजत नाहीं. वरी तर, चांगली कूळशीळ पाहून केली होती. बापाचा केवढा लौकिक ! ! बिचारा मांडलीक राजा आहे पण कसा नांव संपादून आहे? पण हीच आकाबाई त्याच्या पोटीं कोठें जन्म घ्यावयास गेली ! नवराही आपला भोळवट वेडसर आहे. लागेल ह्यांच्याच नादीं लागेल. कोठले सर्व जुने कारभारी आहेत, त्यांच्याच विचारानें वागतो. ते कसले ? एकापेक्षां एक भोळवट म्हातारडीं. अशांच्या संगतीं लागून अशींच फळें. कांहीं आंगांत करामत तर आली पाहिजे. ह्या मूर्खांची हींच कपाळें. अशाच कैदा-सणी निपजायच्या त्यांच्या बायका. असा संताप आला आहे कीं ह्या वेळीं उभीच चिरावी सटवीला. पण कायरे, आपल्या हातीं आपली अब्रू घालवावी. **दुर्मति,** कसेंरे करावें. हें वर्तमान **वीरकांतास** कळलें तर तो आपल्या जिवाचें काय करील आणि तिच्या जिवाचें काय करील ह्याचा नेम नाहीं. हें त्याला कळवून उपयोग नाहीं असें वाटतें. एक **सोमकांत** आणि त्याचा सेवक **रणधीरसिंग** ह्यांस योग्य शासन करावें म्हणजे झालें.

**दुर्म०**—तसें करून काय उपयोग ? त्यांना तर शासन केलेंच पाहिजे; परंतु अशा पोरीचाही योग्य बंदोबस्त केला पाहिजे. अशांना फार जपलें पाहिजे. एखाद्या कोट-डींत कोंडून ठेवावी, किंवा गांवाबाहेर एखाद्या खोपटांत नीट बंदोबस्तानें ठेवून **दुर्बीर्या**सारख्यास तिची व्यव-स्था पहावयास सांगावी. तो भला वस्ताद आहे ह्या कामांत.

**कुमि०**—छीरे, तसें करून काय उपयोग? तशानें

…लौकिक जातो. लौकिकासाठीं एवढें भिणें, नाहीं तर आतां उभीच चिरली असती पोरीस.

दुर्म०—त्यांत कशाचा लौकिक जातो आहे ? नगरी बाहेर ठेवावी एकीकडे ह्मणजे लोकांस काय कळतें आहे ?

**कुमि०**—छी : तुला समजत नाहीं. **वीरकांतास** तर तें कळलेंच पाहिजे. मग काय; तो काय करील आणि कांहीं नाहीं.

**दुर्म०**—बरें, वडलांची मर्जी. **वीरकांतास** देखील कळवावयाचें नाहीं तर मग हें सर्व ?

**कुमि०**—त्यास कळविलें मग काय राहिलें ? त्यास हें कळल्यावर तो आपल्या जिवाची अथवा तिच्या जिवाची हानि केल्या शिवाय राहतो काय ? आणि मग लोक काय ह्मणतील ? आपणच त्या पोरीस करड्या नजरेंत ठेविली पाहिजे. जरा इकडे किंवा तिकडे तिला विसंबून उपयोग नाहीं. जा पाहूं, **सुभेदारास** बोलवावयास पाठीव. **सोमकांत** व त्याचा तो लुच्चा चाकर ह्यांस आतांच **कैद** केले पाहिजे. बाईट, हे जुने करभारी सारे फारच वाईट चालीचे आहेत. बरें झालें, सर्वांस काढून टाकलें ह्मणून. एकाचा सांगतोस तो हा प्रकार; मग सारेच असते तर काय करते कोण जाणे. बरें, त्याला ह्मणावें कीं आपल्या कर्माचीं भोगा आतां फळें. काय रे, अशा लोकांस त्यांचें बरें त्यांनाच पहावत नाहीं काय ? त्याला आपला काय उपाय ! जा, **सुभेदारास** कोणास बोलवावयास पाठीव पाहूं. बरें झालें, हें तूं मला लवकरच कळविलेंस, नाहीं तर पोर हात धरून जाती.

**दुर्म०**—मला समजल्यावर कां मी कळविणार नाहीं? परंतु आतां अपरात्र झाली आहे, **सोमकांत** उद्यां कचेरींत आला ह्मणजे मग त्यास पकडावा.

**कुमि०**—नाहीं, आतां घटकाभर देखील थांबून उपयोग नाहीं. अशा मनुष्यांचा घटकेचा देखील विश्वास येत नाहीं; ते एकाक्षणांत इकडील पर्वत तिकडे करतील, ह्यासाठीं अशा मनुष्यास फार जपलें पाहिजे. मी त्यास मागेंच सर्वांप्रमाणें काढला असता परंतु तुझ्या भिडेसाठीं ठेवला, व त्याला बराच अधिकारही दिला होता, परंतु त्याच्या नशीबींच कैद त्यास दुसऱ्यानें काय करावें ? जा आतां **सुभेदारास** लवकर बोलावून आण; नको बरें, तूंच कशास हवास, मीच कोणास धाडितों.

**दुर्म०**—नको बाबा, आपण कशास उठतां ? मीच कोणाला तरी धाडतों.

असें ह्मणून **दुर्मति** तेथून उठून गेला आणि **सुभेदारास** बोलाविण्याकरितां एक त्यानें जासूद तावडतोब पाठविला.

**सुभेदार** कधीं येतो व **सोमकांतास** कधीं पकडून नेतो असें **दुर्मतीस** होऊन गेलें. त्यास आपलें कार्य साधलें ह्मणून जो कांहीं आनंद झाला असेल त्याविषयीं आतां वाचकांनींच कल्पना करावी. तो आपल्या रंगमहालांत जाऊन वेड्यासारखा नाचूं उडूं लागला, आणि अनेक तऱ्हेचे चाळे करूं लागला. ते कोणाच्या दृष्टोत्पत्तीस आले असते तर त्यास हसूं आल्या शिवाय रहातेंचना. परंतु त्यावेळीं मध्यरात्रीचा सुमार अ.

सत्या कारणानें सर्व लोक इहलोकींच्या सुख दुःखावि-षयीं चांगल्या अथवा वाईट कल्पनेचा त्याग करून निद्रि-स्थ झाले होते. कित्येक निद्रा येण्याची वाट पहात होते. पक्षी ह्या दुष्ट राजाचे व राजमंडळीचे दुर्गुण गाऊन गाऊन थकून आपल्या विश्रांतीच्या कोठ्यांत स्वस्थ पडले होते. परंतु अशा वेळींही कित्येक दुष्ट अथवा क्षुद्र प्राण्यांचे व्यापार सुरू असतात. चोरटे-अनेक तऱ्हेचीं सोंगें घेऊन गांवांत फिरत असतात. त्या-प्रमाणेंच कित्येक जारकर्मी अथवा जारिणी चोरवाटेनें एकमेकाकडे जात येत असतात. दुष्ट संकल्पासाठीं अनेक ठिकाणीं दुष्ट लोकांचे मेळे जमलेले असतात. विलासी लोकांचें गाणें बजावणें चाललें असतें. बेडूक वगैरे क्षुद्र प्राणी कंटाळवाणे शब्द करीत असतात. रात्र चोंहोंकडे किर्र करूं लागते. ह्याप्रमाणें व्यापार चालत असतां **दुर्मति** वेड्यासारखा नाचत उडत होता व त्याचा पिता **सुभेदाराची** वाट पहात होता. इत-क्यांत चार पांच असामी येऊन **कुमित्राच्या** महालांत गेले. त्यांस पहातांच **कुमित्र** ह्मणाला, "**सुभेदार**, जा, तुह्मीं आतां जाऊन **सोमकांत** व त्याचा सेवक **रणधीरसिंग** ह्यास कैद करा."

**दुर्मतीचा** महाल जवळच असल्यामुळें हे शब्द त्याच्या कानीं आले. मग त्याचा आनंद काय विचारावा ! ! तो आपल्या पित्याचें व **सुभेदाराचें** काय बोलणें होतें तें ऐकण्या साठीं मोठ्या झपाट्यानें राजमहालांत गेला. **सुभेदारानें** मोठ्या नम्रतेनें विचारलें, "सरकार, अपरात्रीं त्यास एकदम कैद करण्याचा हुकूम झाला आहे; तेव्हां

त्याजकडून असा कसला अपराध झाला ? " हे ऐकून **कुमित्रानें** मोठ्या रागानें उत्तर दिलें, "तुह्माला काय, सांगितलें तें करावें, त्याच्या अपराधाशीं तुह्माला काय कर्तव्य आहे, लवकर जाऊन आतांच त्यास कैद करा, उठा पाहूं कसे तें. **कुमित्र** असें ह्मणाल्यावर "आज्ञा सरकार" ह्मणून **सुभेदार** उठून गेला. बरोबर दोन चार मशाली व रखवालीकडील सात आठ शिपायी घेऊन तो **सोमकांताच्या** महालाकडे जावयास निघाला. त्या वेळीं **दुर्मतीच्या** आनंदाचें काय वर्णन करावें ? त्यास वाटलें कीं आतां आपलें अर्धे कार्य तर साधलें. **सोमकांता**विषयीं वाबांच्या मनांत भरवून आपलें कार्य साधणें ह्मणजे फारच दुर्घट होतें, परंतु तेंही साधलें; त्या अर्थीं मुहूर्त तर बरा दिसतो आहे. बहुधा कार्य शेवटास जाईल असें वाटतें. **सोमकांतास** कैद केल्यावर व कांहीं दिवस त्याची व **विलासिनीची** तुटातुट झाल्यावर ती मजसारख्या पुरुषास सहज वश होईल. स्त्रियांना काय, कोणी तरी चांगला असला ह्मणजे झालें. एक चांगला असला तर त्या त्याच्या जिवावर पातिव्रत्याचे तोरे मिरवितात खरें, तथापि तो नाहींसा झाल्यावर त्यांचा तोच निश्चय टिकेल असें वाटत नाहीं. तशांत ती वश नच होईल तर हरयुक्तीनें तिजवर बलात्कार करण्यास अडचण होईल असेंही नाहीं. ह्याप्रमाणें अनेक विचार मनांत येऊन तो मनोराज्यांत निमग्न झाला.

## भाग ४.

रात्रीचे सुमारें अकरा वाजून गेले होते. चांदणे जिकडे तिकडे शुभ्र पिठासारखें पडलें होतें. लोक आपआपलीं कामें अटोपून निद्रिस्थ झाले होते. नगरांत शिपाई घस्ती घालीत फिरत होते. वायु मंद वाहूं लागल्यामुळें झाडें पानें स्थिर झालीं होतीं. यमुना नदीचें पाणी मंद वाहून त्याचा फार हलकें शब्द होत होता; त्यांत सर्व आकाशाचें प्रतिबिंब पडून चंद्र व दुसरे अनेक तारे चमकत होते. वरून व पाण्यांतून विस्तीर्ण आकाशाची पोकळी एकदम दृष्टीस पडल्यामुळें असें वाटे कीं हा पृथ्वीस आच्छादणारा एक नील वर्णाचा डबाच आहे व त्यावर चंद्र व इतर तारे हीं कोंदणेंच बसविलीं आहेत. ईश्वरानें मनुष्यास समाधान होण्यासाठीं सर्व वेळा सारख्याच करून ठेविल्या आहेत. प्रत्येक काळीं व सर्व वेळीं कसलीना कसली शोभा करून ठेविलीच आहे.

अशा वेळीं तिसऱ्या मजल्यावर **सोमकांताचा** जो रंगमहाल होता यांतील दीप मंद जळूं लागले होते. रंग महालाच्या चारी बाजूंनीं चार गच्च्या होत्या. खिडक्या मोकळ्या टाकल्यामुळें रंगमहालांत मंद व शीतल वायूची झुळूक येऊन ती शरीरास फारच आनंद देई. गच्च्यांवर रांगोळीसारखें शुभ्र चांदणें पडलें होतें. खिडक्यांतून चंद्राच्या कोमल किरणांनीं आंत निजलेला सुंदर स्त्रीपुरुषांचा जोडा अवलोकन करण्यासाठीं रंगमहालांत प्रवेश केला होता. या महालाच्या वरच्या बाजूस भरजरी किनखापाचें छत दिलें होतें. दीपांच्या त्यावर उजेड

पडून किनखापाचे भरजरी बुट लखलख चमकूं लागल्यामुळे असें वाटे कीं हे हिरेच बसविले आहेत कीं काय. खालीं सतरंज्या पसरून त्यावर मखमालीचे मृदु गालिचे टाकले होते. त्या महालाच्या मध्यभागीं उंच असा एक उत्तम शिसवी मंचक होता. त्याच्या चारी पायांस सिंह कोरले होते. कोरणाऱ्या कारागिराच्या कुशलपणामुळें ते हुबेहूब सिंहच आहेत कीं काय असा भास होई. व ते आपला स्वामी व स्वामीण मंचकावर शयन करीत असतां कोणा दुष्ट घातक्यानें येऊन त्यांस उपद्रव न द्यावा ह्मणून चोंहोंकडून केवळ पहारा करीत आहेत कीं असें वाटे. त्या मंचकावर उत्तम परांच्या अति मृदु अशा गाद्यांचा तीन हात उंच बिछाना असून त्यावर शुभ्र पलंगपोस अंथरला होता. त्या मंचकावर **विलासिनी** प्रिय पतीच्या अंगावर आपला सुकुमार हात टाकून पडली होती, **सोमकांतानें** आपल्या प्राणप्रियेस गाढ अलिंगन दिलें होतें. रंगमहालाच्या भिंतींस सर्व भर आरसे लावल्यामुळें त्यांत बाजूंनीं अनेक रंगमहाल दृष्टी पडत. मंचक मध्यस्थानीं असल्यामुळें सर्व रंगमहालांत त्याची फार चांगली मजा दिसत होती. तशांत ह्या स्त्रीपुरुषांच्या जोड्यानें तर फारच विलक्षण शोभा आली होती. यमुना नदीचें पाणीं झुळझुळ वाहून त्याचा मंजूळ शब्द त्या उभयतांच्या कानीं येत होता. तीं एकमेकाशीं मोठ्या प्रेमानें गोष्टी सांगत होतीं. इतक्यांत त्यांच्या कानीं मोठा गोंगाट आला, आणि मोठा उजेड दृष्टी पडला. हा उजेड व गोंगाट कशाचा हें पहावयाकरितां **सोमकांत** दचकून उठून गच्चीवर

जाण्याकरितां खिडकीकडे गेला. **विलासिनी** फार भयभीत होत्साती मंचकावर उठून बसली. **सोमकांत** खिडकींतून गच्चीवर जाऊन जों पहातो, तों त्याच्या दृष्टी सात आठ पुरुष पडले. त्यांतील एकानें **सोमकांतास** खालीं बोलाविलें. हे एवढ्या रात्रीं कशाकरितां आले असावेत ह्मणून त्यास मोठा विचार पडला. इतक्यांत **विलासिनीनें** प्रश्न केला, " काय आहे तें, गोंगाट कशाचा ? तेव्हां **सोमकांतानें** उत्तर दिलें, "कांहीं नाहीं, स्वस्थ निजा, **सुभेदार** आले आहेत, कां कोण जाणे. मी खाली जाऊन येतों."——

**विला०**—सारा वेळ कोणी नाहीं कोणी येतंच, घटका भर तर मेली विश्रांती खरी. आज संध्याकाळपासून कोणी नाहीं तर हे मध्यानरात्रीं आहेतच. माणसानीं बोलावं केव्हां चालावं केव्हां, सारा वेळ कांहींना कांहीं आहेच आपलं.

**सोम०**—काय करावें ? पोटासाठीं एवढें.

**विला०**—काय, पोटाला अगदीं तोटाच पडला असल सारा वेळ खपलं पाहिजे वाटतं ? पोटाला तें काय, लागणार ?

**सोम०**—संसार आहेना पाठीं. एक पोटाची कोण पर्वा करीत होतें.

**विला०**—काय, साऱ्यांच्या पाठीं नसतील संवसार ? स्वभावच पडला चिकीशीखोर. सारं काम स्वत: पाहिलं पाहिजे. मीच ह्मणत्ये अस नाहीं. हो, विसरले सांगायला, आज दुर्मति—

हे शब्द **विलासिनी** बोलते आहे इतक्यांत **सुभेदार** सर्व माणसांसहित सेवकाकडून दारें उघडवून वर आला.

त्यास पाहून **सोमकांत** ह्मणाला, "यावें सुभेदार साहेब, आज एवढ्या रात्रीं कोणीकडे स्वारी ?"

**सुभे०**—चलावें, आतां आपली स्वारी कारागृहाच्या ठायीं वास करण्याकरितां जावयाची आहे, या समारंभास आलों आहें.

**सोम०**—काय ? काय बोललेत ? कारागृहांत जावयाची आहे ? असें एकदां पुन्हां बोला पाहूं. मी आपला काय अपराध केला आहे ? आपण मला कशासाठीं कारागृहांत नेणार ?

**सुभे०**—चला, चला, जास्ती बडबड करण्याचें कारण नाहीं.

**सोम०**—अहो, पण अपराध काय तो तर कळूं द्या.

**सुभे०**—तुह्मीं बऱ्या बोलानें ऐकणार नाहीं, मला ठाऊक आहे, **हवलदार**, पकडा पाहूं यास.

ह्याप्रमाणें **सुभेदाराची** आज्ञा होतांच **सोमकांत** व त्याचा विश्वासू सेवक **रणधीरसिंग** ह्यांस **विलासिनीस**-मोर एकदम चतुर्भुज करून शिपाई घेऊन चालले, तेव्हां त्याची स्थिति काय झाली असेल ह्याचा विचार वाचकांनींच करावा. पाण्यांत ढेकूळ टाकल्याप्रमाणें तो खरकन विरघळून गेला. त्यावेळीं मरण बरें असें त्यास वाटूं लागलें, परंतु बापडा करतो काय ? भोगणें तें कोठून चुकते? प्रारब्धाची सदी कांहीं विलक्षण आहे. महान महान योद्धे व पुण्यशील ऋषि यांनाही ह्यापुढें लवावें लागलें आहे. फार लांब कशाला ! ज्या **सोमकांताच्या** हातीं शेंकडों लोकांवर अम्मल होता त्याचीच एका क्षणांत काय दशा झाली पहा. ! !

**सोमकांतास** नेतांच **विलासिनीची** काय दशा झाली असेल ती सांगावयास देखील नको. ती एकदम मूर्छा येऊन धाडकन खालीं पडली. घरांत गोंगाट झाल्यामुळें सर्व चाकर माणसें व दासी जाग्या होऊन **सोमकांताच्या** महालांत आल्या; तों **सोमकांतास सुभेदारानें** धरून नेलें, **विलासिनी** मूर्छा येऊन पडली आहे असें त्यांच्या दृष्टी पडलें. दासींनीं **विलासिनीच्या** नेत्रांस पाणीं लावून तिला सावध केलें, परंतु तिचें अगदीं देहभानच गेलें. तीस कांहींच सुचेनासें झालें. आपल्या पतीस त्या दुष्टांनीं कसें पकडून नेलें, त्या पूर्वी आपल्यास कोणत्या प्रकारचें सुख होत होतें, हें सर्व तिच्या नेत्रांपुढें उभें राहूं लागलें. ती मोठयानें हंबरडा फोडून ह्मणूं लागली, " अहो **सुभेदार**, आह्मां दिनांची अशी तुटातूट करूं नका, तुह्मांस आमची दया येऊं द्या, आणाहो परत आणा; अहो, तुह्मी परत आणीत नाहीं तर मला बरोबर तरी घेऊन चला, ह्मणजे कोणत्याही ठिकाणीं आह्मीं सुखानं राहूं. हे **परमेश्वरा**, हे **दीनवत्सला**, मी पूर्व जन्मीं तुझा असा कोणता अपराध केला कीं त्यामुळं तूं इतका कोपायमान होऊन आह्मां दिनांवर आज हा प्रसंग आणला आहेस. अरे, किती नीतीनं व मेहनतीनं इतके दिवस कारभार करावयाचा झाला; विश्रांती काय ती रात्रीचीच, त्यावेळीं, **भक्तपालका**, आह्मीं आपला वेळ किती सुखानं घालवीत होतों ! हें तुला आह्मीं कोणाच्या कशांत नसतां आवडेनासं झालं काय ! अरे, आमचा असा काय अपराध झाला ! आतां तिकडे काय रे दशा होईल ? मी मेली

काम फार पडतं ह्मणून आतांच काय ह्मणत होतें, आणि मला उत्तर दिलं काय आणि हा प्रकार झाला तरी काय! कांहीं काम काजांत तोहोत्रत आली किंवा कोणी मेल्या दुष्टानं खोटं नाटं जाऊन राजास सांगितलं आणि काय झालं आणि काय नाहीं! सकाळपासून आज मेलं मला कायसंच वाटत होतं. **दुर्मति** आला त्या वेळीं कोणाच्या कांहीं ध्यानीं मनीं नसतां मला भलतंच वाटून वेड्यासारखी त्याच्या जवळ चौकशी करूं लागल्यें. त्या वेळेसच मेला जीव कसा धासधूस करीत होता. पण **देवा**, त्या वेळीं समाधान करून चार घटकेंत आज हा प्रसंग आणलासना! **ईश्वरा**, आतां तिकडे कायरे वाट होईल! जिथे नेऊन टाकलं असशील तिथ मला तरी नेऊन टाक ह्मणजे आह्मीं तेथें सुखानें काळ-क्षेप करूं." ह्याप्रमाणें ह्मणून ती पुनः हंबरडा फोडूं लाग-ली, तेव्हां तिच्या दासींनीं तिचें बरेंच समाधान केलें, परंतु ती कशाची एकत्य.!! ती ह्मणूं लागली, अग, तुह्मीं सर्व माझी समजावणी करता खऱ्या; परंतु आतां तिकडे कसंग होईल? ते दुष्ट आतांच्या काळांत कर-तील ते खरं आहे. आतां न्याय कशाचा आणि काय कशाचें? जरी निरपराधी असायचं आहे, तरी त्या दुष्टांच्या मनांत जसं येईल तसं ते करतील. हर हर, हे **देवा**, असा प्रसंग जी सात जन्मींची वादीण असेल तिजवर देखील आणूं नको. आतां माझी कायरे दशा होईल? मी आतां कायरे करावं?" ह्याप्रमाणें ती अत्यंत शोक करूं लागली.

इकडे **सोमकांतास** त्या दुष्टांनीं निर्दयपणें तुरंगाच्या

एका अंधार कोठडींत कोंडून ठेविलें, आणि सर्व निघून चालते झाले. त्यास तेथें अंथरावयास अथवा पांघरावयास एक चिरगूट देखील ठेविलें नाहीं, त्याच्या जवळचें सर्व हिसकून घेतलें. त्यानें जें अंगावर अंगवस्त्र घेतलें होतें तेवढेंच काय तें अंथरावयास अथवा पांघरावयास. त्यास डांस व पिसा एकसारख्या चावूं लागल्या. हा प्रसंग टाळण्यास पूर्वीच मरण येतें तरी बरें असें त्यास वाटूं लागलें. ह्याप्रमाणें शारीर दुःखाचें सैन्य सुखाच्या सैन्याशीं निकरानें लढत असतां त्यास मानसिक दुःखाचें अफाट आणि वेगवान सैन्य मदत आलें. मग काय पहावयास पाहिजे? अनेक वर्षें लढाया चालून देशास ज्याप्रमाणें दैन्य येतें त्याप्रमाणें त्याच्या शरीराची व मनाची स्थिति होऊन गेली. अनेक महत्कृयांविषयीं मनांत आलेल्या नवीन कल्पनांच्या अंकुराचा नाश होऊन गेला. सुखाच्या सैन्याची जेव्हां अशी दशा उडाली, तेव्हां दैवानेंच प्रतिकूळ होऊन प्रतिपक्षास हात दिला नाहीं असें कसें ह्मणावें! मानसिक दुःखास वाटूं लागलें कीं आपण ज्या दैवाचे ताबेदार, त्याची मर्जी संपादन करण्याचा असा चांगला प्रसंग आला आहे तो फुकट कां घालवावा! ह्याप्रमाणें सुखाच्या प्रतिपक्षास मानसिक दुःखाचीही मदत आली; मग त्या लढाईचें काय वर्णन करावें!! बापड्या सुखाच्या सैन्याची अगदीं दाणादाण उडून गेली. परंतु अशी निकराची लढाई पहाणारे क्षुद्र असे प्राणी डांस, पिसा, ढेकूण हीं होतीं. मनुष्याच्यानें तर तो प्रसंग क्षणभरसुद्धां पहावतांना. कारण सर्व प्राण्यांमध्यें मनाचा कोमळ मनुष्य होय. जें

संकट मनुष्य. ह्यानें पहावतेंना ह्मणून सांगितलें तें संकट **सोमकांता**सारखा कोमल आणि सद्गुणी पुरुष भोगीत असतां त्याची काय दशा झाली असेल हें सांगावयास देखील नको. वर सांगितलेले प्रकार शरीराचें होत असतां त्यास आपल्या सुंदर रमणीय रंगमहालाची आठवण झाली. त्या महालांत जी क्रीडा करणारी तिच्या वियोगानें तर त्यास अगदींच चैन पडेनासें झालें. तीस एकटीला आपण टाकून आलों तेव्हां, आतां तिची काय दशा होईल? ती आपल्यासाठीं आकांत करीत असेल, किंवा प्राणत्याग करावयास निघाली असेल, किंवा काय करीत असेल आणि काय नाहीं? असें त्याच्या मनांत येऊं लागलें. ती कोणा दुष्टांच्या तर तडाक्यांत सांपडली नसेलना? ज्याप्रमाणें आपणास इकडे आणलें त्याप्रमाणें तर तिला कोणी घेऊन गेले नसतीलना? जर असाच प्रसंग तिजवर आला असेल तर ती आपल्यास आठवून काय बोलली असेल? आपल्याविषयीं तिच्या मनांत काय आलें असेल? ह्याप्रमाणें शेंकडों कल्पना त्याच्या मनास एकसारख्या गांजूं लागल्या. पुनः तो ह्मणूं लागला, "असो, **ईश्वराची** मर्जी, आपण काय तिला सुखानें टाकून आलों आहों? जें आपल्या नशीबीं **ईश्वरानें** लिहिलें आहे तें भोगल्यावांचून सुटत नाहीं." ह्याप्रमाणें ह्मणत असतां त्याच्या डोळ्यांतून टपटप टिपें आलीं. आपल्यास कोणत्या अपराधाबद्दल ही शिक्षा झाली आहे? राजाची मर्जी एकदम नाखूष कां झाली असावी? हें त्याच्या अगदीं लक्षांत येईना. तो ह्मणूं लागला, "**परमेश्वरा,** मी कोणाच्या कशांत नसतां आज हा प्रसंग आणलास, आज-

एका अंधार कोठडींत कोंडून ठेविलें, आणि सर्व निघून चालते झाले. त्यास तेथें अंथरावयास अथवा पांघरावयास एक चिरगूट देखील ठेविलें नाहीं, त्याच्या जवळचें सर्व हिसकून घेतलें. त्यानें जें अंगावर अंगवस्त्र घेतलें होतें तेवढेंच काय तें अंथरावयास अथवा पांघरावयास. त्यास डांस व पिसा एकसारख्या चावूं लागल्या. हा प्रसंग टाळण्यास पूर्वींच मरण येतें तरी बरें असें त्यास वाटूं लागलें. ह्याप्रमाणें शारीर दुःखाचें सैन्य सुखाच्या सैन्याशीं निकरानें लढत असतां त्यास मानसिक दुःखाचें अफाट आणि वेगवान सैन्य मदत आलें. मग काय पहावयास पाहिजे? अनेक वर्षें लढाया चालून देशास ज्याप्रमाणें दैन्य येतें त्याप्रमाणें त्याच्या शरीराची व मनाची स्थिति होऊन गेली. अनेक महत्कृत्यांविषयीं मनांत आलेल्या नवीन कल्पनांच्या अंकुराचा नाश होऊन गेला. सुखाच्या सैन्याची जेव्हां अशी दशा झाली, तेव्हां दैवानेंच प्रतिकूळ होऊन प्रतिपक्षास हात दिला नाहीं असें कसें ह्मणावें! मानसिक दुःखास वाटूं लागलें कीं आपण ज्या दैवाचे ताबेदार, त्याची मर्जी संपादन करण्याचा असा चांगला प्रसंग आला आहे तो फुकट कां घालवावा! ह्याप्रमाणें सुखाच्या प्रतिपक्षास मानसिक दुःखाचीही मदत आली; मग त्या लढाईचें काय वर्णन करावें!! बापड्या सुखाच्या सैन्याची अगदीं दाणादाण उडून गेली. परंतु अशी निकराची लढाई पहाणार क्षुद्र असे प्राणी डांस, पिसा, ढेंकूण हीं होतीं. मनुष्याच्यानें तर तो प्रसंग क्षणभरसुद्धां पहावतांना. कारण सर्व प्राण्यांमध्यें मनाचा कोमळ मनुष्य होय. जें

संकट मनुष्य। ह्यानें पहावतेंना ह्मणून सांगितलें तें संकट **सोमकांना**सारखा कोमल आणि सद्गुणी पुरुष भोगीत असतां त्याची काय दशा झाली असेल हें सांगावयास देखील नको. वर सांगितलेले प्रकार शरीराचें होत असतां त्यास आपल्या सुंदर रमणीय रंगमहालाची आठवण झाली. त्या महालांत जी क्रीडा करणारी तिच्या वियोगानें तर त्यास अगदींच चैन पडेनासें झालें. तीस एकटीच आपण टाकून आलों तेव्हां, आतां तिची काय दशा होईल? ती आपल्यासाठीं आकांत करीत असेल, किंवा प्राणत्याग करावयास निघाली असेल, किंवा काय करीत असेल आणि काय नाहीं! असें त्याच्या मनांत येऊं लागलें. ती कोणा दुष्टांच्या तर तडाक्यांत सांपडली नसेलना? ज्याप्रमाणें आपणास इकडे आणलें त्याप्रमाणें तर तिला कोणी घेऊन गेले नसतीलना? जर असाच प्रसंग तिजवर आला असेल तर ती आपल्यास आठवून काय बोलली असेल? आपल्याविषयीं तिच्या मनांत काय आले असेल? ह्याप्रमाणें शेंकडों कल्पना त्याच्या मनास एकसारख्या गांजूं लागल्या. पुनः तो ह्मणूं लागला, “ असो, **ईश्वराची** मर्जी, आपण काय तिला सुखानें टाकून आलों आहों ? जें आपल्या नशीबीं **ईश्वरानें** लिहिलें आहे तें भोगल्यावांचून सुटत नाहीं.” ह्याप्रमाणें ह्मणत असतां त्याच्या डोळ्यांतून टपटप टिपें आलीं. आपल्यास कोणत्या अपराधाबद्दल ही शिक्षा झाली आहे? राजाची मर्जी एकदम नाखूष कां झाली असावी? हें त्याच्या अगदीं लक्षांत येईना. तो ह्मणूं लागला, “**परमेश्वरा**, मी कोणाच्या कशांत नसतां आज हा प्रसंग आणलास, आज-

पर्यंत कोणाचें वाईट करावें हा स्वप्नांत सुद्धां बुद्धि झाली नाहीं, दुसऱ्याचें कल्याण होण्यासाठीं तिळतीळ जीव तोडीत होतों; परंतु शेवटीं सत्यास जय नाहीं असें ह्मणण्याचा प्रसंग आणलास. **ईश्वरा,** सत्यानें जो वागेल त्याचाच जय होतो, सत्यासाठीं तूं हवें तें करतोस, अशी जी आमची समजूत आहे ती खोटी ठरविलीसना? असो, **ईश्वरास** काय दोष देऊन? आपल्याच जन्मांतरींचा गुण, त्यास कोण काय करणार? ज्यावेळीं सर्व जुने कारभारी काढून टाकले त्यावेळीं मीही आपण होऊन निघतों तर आज हा प्रसंग कां आला असता? सुखानें आपला घरीं कां जाऊन राहिलों नाहीं? सर्वांपेक्षां अधिक विपत्ति भोगावी लागत आहे, त्यांत आतां दुःख मानून काय उपयोग? माझें एक असो, परंतु आतां बापड्या गायगरिबांचें काय होईल? त्यांस मी आपल्याकडून होईल तितकें सुख देत होतों; परंतु बापड्यांस आतां कोण तारता आहे? ज्याच्या सपाट्यांत सांपडतील तो बापड्यांचा चुराडा करून टाकील. बरें असो, **ईश्वरा,** तुझी मर्जी, जें तुझ्या मनांत येईल तें कोणाच्यानें चुकणार आहे? निरपराध्यास तूं व्यर्थ गांजणार नाहींस हे खचीत आहे. माझा कांहीं तरी पूर्व जन्मीचा अपराध असावा त्याबद्दल मला हें भोगावें लागत आहे हें खचीत." अहा हा! अशा सद्गुणी मनुष्याची अशी दशा पाहून पाषाणास देखील द्रव फुटल्या शिवाय खचीत रहाणार नाहीं. ही सर्व दशा एक रात्रीचीच झाली. त्याची रोजची स्थिति लिहिणें, ह्मणजे लिहिणारानें लिहिणें व वाचणारानीं वाचणें हें त्यांचें खरोखरीच दुर्भाग्य

होय. वर सांगितलेलीं दुःखें त्यास रोज रात्रीं भोगावीं लागत; नंतर अशा पुरुषाची ह्या सर्व दुःखापासून रात्रींत काय दशा झाली असावी ती प्रातःकाळीं सूर्य आपल्या कोमल किरणांनीं त्या बंदीखान्याच्या कोठडीस ज्या फटी होत्या त्यांमधून चोरदृष्टीनें पहात असे. अशावेळीं मात्र **सोमकांतास** कांहीं समाधान होई. ह्याचें कारण काय असावें ह्याविषयीं बराच वेळ विचार केला असतां एक कल्पना मनांत येत्ये. सर्व रात्रींत त्याच्या मनांत एकेक विचार पुनः पुनः येत; कारण मनुष्याचे विचार बहुधा जे पदार्थ दृष्टोत्पत्तीस येतात त्यांवर चाललेले असतात. परंतु **सोमकांतास** सर्व रात्रींत आंधारामुळें काय दिसावयाचें होतें? प्रातःकाळ झाल्यानंतर सूर्याचीं किरणें वर सांगितल्याप्रमाणें त्या अंधार कोठडींत प्रवेश करीत आणि त्यांच्या प्रकाशाविषयीं ह्याच्या मनावर अनेक विचारांचे तरंग उठत. एके दिवशीं प्रातःकाळीं सूर्याचीं कोमल किरणें दिसूं लागल्या बरोबर त्याच्या मनांत असें आलें कीं, सर्व गोष्टींस फेर हा आहेच. एक गोष्ट ह्या जगांत एकसारखी सुरळीत चालण्याचा संभव नाहीं. मनुष्यास सर्व प्रकारच्या अवस्था प्राप्त होत असतातच. पहा, ह्या वेळेस देखील अनुकूळ प्रतिकूळ अशा दशा आहेतच. ह्या दिवसाचा उजेड पडण्यापूर्वी रात्रीनें आपला कडक अम्मल चालवून नुकताच गेलेल्या वेळेस किती भयंकर केलें होतें!! त्याच वेळेवर दिवसाचा जरा अम्मल पडूं लागला नाहीं इतक्यांत ती वेळ किती मंजूळ मन रमविणारी अशी झाली आहे!! मला जरी ही दशा आज प्राप्त झाली आहे तरी मी

आपल्या नीतीच्या बळानें एक दिवशीं आपला भाग्योदय पाहिल्यावांचून खचीत रहाणार नाहीं. जी गोष्ट सुखा-स एकदां कारण होते तीच गोष्ट पुन्हां दृष्टीसमोर आली ह्मणजे तिच्यापासून मनुष्यास विलक्षण आनंद झाल्या-वांचून रहात नाहीं. ह्याच नियमाप्रमाणें दररोज प्रातः-काळीं सूर्यकिरणें दृष्टी पडलीं ह्मणजे सोमकांतास फार आनंद होत असे. परंतु तोही क्षणभंगुरच. नऊ दहा वाजले ह्मणजे क्षुधा मोठ्या क्रूर दृष्टीनें त्याजकडे टवकारून पाही. दोनप्रहर होईपर्यंत त्यास तळमळत पडावें लागे. ज्या पुरुषास एक प्रहर दिवस आला नाहीं तों सुंदर माजघरांत चंदनाच्या पाटावर बसून सु-वर्णाच्या ताटांत पंच पक्वान्नांच्या भोजनाची संवय त्यास माध्यान्ह काळ होईपर्यंत क्षुधेनें तडफडावें लागलें ह्मणजे त्याची काय दशा होत असेल बरें? ह्यानंतर तरी त्यास जें भोजन मिळणार तेंही त्या संवयीच्या सर्व-र्था उलट. बारा वाजून गेले ह्मणजे एखादा पुरुष एक ल्हानशा खापरांत दोन तीन दिवसांचे शिळे भाकरीचे तुकडे आणि एखाद्या मडक्यांत दोन पंचपात्र्या पाणी आणून देई. आणखी कांहीं मागणें ह्मटलें ह्मणजे तें त्याच्या अधि-कच हृदाखीस कारण होई; परंतु असे पदार्थही क्षुधेच्या स-पाट्यांत त्यास गोड वाटत; न वाटून बापडा करतो काय? अशा प्रकारचें भोजन झाल्यानंतर कांहीं वेळ समाधान होऊन इकडे तिकडे तळमळ करतो आहे तों भयंकर रात्रीचा झेंडा पुढें आलेला त्याच्या दृष्टीस पडे. नंतर रात्री विषयीं अनेक तरंग मनावर उठत आहेत, तोंच ती सर्व सैन्य व सामग्री ह्यानिशीं येऊन ठाणें देई

मग बापड्याची काय दशा विचारावी ?? अरे रे, याच्या दुःखाची पुन्हा आवृत्ति करण्यासही आह्मांस हृदय फाटल्या सारखें वाटतें. मग त्या बापड्या भोगणाराची काय दशा होत असेल? अरे, यजमानाची ही दशा. मग याचा सेवक जो **रणधीरसिंग** यास कोणत्या प्रकारची विपत्ति भोगावी लागत असेल हें लिहावयास देखील नको. हे दोन असामी ह्या प्रकारची विपत्ति भोगीत असतां ईश्वरानें यांस एवढेंच सुख ठेविलें होतें कीं त्या कारागृहावर **काशीराम** ह्मणून एक दुय्यम कारभारी होता तवढांच कायतो **वीरसेन** राजाच्या वेळचा कारभारी कारागृहावर राहिला होता. त्यास ह्या निरपराधी प्राण्यांची फार दया येत असे; परंतु मुख्य अधिकाऱ्याचा ज्यांवर राग त्यांवर हा किती दया करणार? तथापि तो आपल्या कडून होईल तितका यांच्या सुखार्थ यत्न करीत असे.

---

## भाग ५.

पूर्वी सांगितलेंच आहे कीं **वीरकांतानें** देशपर्यटणास जाण्याविषयीं **सोमकांताचा** सल्ला घेतला होता. नंतर वाटेनें लागणाऱ्या निरनिराळ्या सामग्रीची तयारी करण्यांत व माणसाकाणसांची निवड करण्यांत यानें सुमारे बारा चौदा दिवस घालविले. सर्व तयारी झाल्यानंतर त्याच्या मनांत असें आलें कीं, आपली निम्मे अधिक तयारी तर झालीच आहे, परंतु काकांची परवानगी व प्राणप्रियेची सम्मति घेणें ही एक अद्यापि मोठीच नड उरली आहे. काकांची परवानगी मिळण्यास विशेषसे श्रम

लागतील असें नाहीं. कारण माझें जाणें त्यांच्या कोणत्याही प्रकारें तोस्यास कारण होईल असें नाहीं. उलटा कांहीं कामांत माझा मोडा असतो तो दूर झाल्यामुळें त्यांस फार आनंद होईल. प्राणसखीची परवानगी मात्र मोठ्या युक्तीनें घेतली पाहिजे. कारण "जा" असा शब्द सुखानें तिच्या तोंडांतून कधीं यावयाचा नाहीं. ती हजार अडचणी मध्यें आणील; तथापि तिचें होईल तसें शांतवन करून एकदां रुकार घेतला पाहिजे. असा विचार करून तो लागलाच एक दोन दिवसांनीं **कुमित्राच्या** महालांत गेला. तेथें राजाची स्वारी गादीवर विराजमान झालेली होती. **वीरकांतास** पाहून त्याच्या मनांत आलें कीं आज ह्या बुवांची स्वारी कधीं यावयाची नाहीं, ती आज काय हेतूनें आली आहे कोण जाणे. असें मनांत येऊन तो त्याजकडे मोठ्या विचारी दृष्टीनें पाहूं लागला, परंतु **वीरकांत** अगदीं जवळ आल्यावर त्याच्याविषयीं हा ग्रह मोठ्या सोंगानें झाकून त्याच्याशीं ओढीव ताणीव गोड शब्दांनीं बोलूं लागला; तो त्यास ह्मणाला, "वा **वीरकांता,** आज फारा दिवसांनीं इकडे आलास. तुझी आतांशीं प्रकृति असी क्षीण कां होत चालली आहे? वडिलांची तर धास्ती घेतली नाहींसना? त्याचें स्मरण नव्हावें ह्मणून मी आपल्याकडून होईल तितका जपत असतों, मग तुमच्या मनांत काय येत असेल तें येवो.

**वीरकांत**—नाहीं, वडिलांकडून का मला अंतर पडतें आहे? परंतु आतांशीं मला चैनच पडत नाहीं. माझ्या मनाची आणि प्रकृतीची कांहीं चमत्कारिक स्थिति झाली आहे.

**कुमित्र.**—हो, दिसतें खरें तसेंच, पण कांहीं औषध वगैरे घेतोस कीं नाहीं? आपले वैद्यबुवा नेहमीं येत असतातना? मला तर आतांशीं कामाच्या निकडीमुळें तुमचें मुलांचें कांहीं पहावयास सांपडत नाहीं.

**वीर०**—मनास चैन पडत नाहीं त्यास वैद्य काय करतो आणि औषध काय करतें? कसें तरी मनाला समाधान वाटलें पाहिजे.

**कुमि०**—अरे, तें सतत मनांत आणून काय उपयोग? सर्वांवर तो प्रसंग आहेच. दोन दिवसांनीं सारें विसरलें पाहिजे. तूं आतां असें वारंवार मनांत आणून खती वाटूं देत जाऊं नको.

**वीर०**—नाहीं काका, आतां वडिलांविषयीं मी कांहीं वाटूं देत नाहीं. त्यांचा काय वाईट परिणाम झाला आहे? राज्य भोगिलें, संपत्ति भोगिली, पुत्र आहे, बंधु आहेतच, त्यांच्यासारखा भाग्यवान् कोण होता? त्यांच्याविषयीं मी मनांत कशास आणूं? परंतु काय झालें आहे कोण जाणें, मनासच बरें वाटत नाहीं. एवढ्यासाठीं कांहीं दिवस तीर्थयात्रेस व देशपर्यटणास जावें असें माझ्या मनांत आलें आहे. परंतु ह्या गोष्टीस वडिलांची परवानगी असावी ह्मणून विचारावयास आलों होतों.

**कुमि०**—छी; हें भलतेंच काय मनांत आणतोस? प्रवासांतील दुःख तुला काय माहीत आहे? दुरून डोंगर साजरे आहेत ते बरे आहेत. तुझी प्रकृति तर अगदीं क्षीण झाली आहे, वाटेनें श्रम होऊन किंवा हवा पाणी बदलून जर प्रकृति अधिक बिघडली तर उगीच पंचाईत होईल.

वीर०—नाहीं काका, तसें बहुधा होणार नाहीं. हवा पाणी बदलूनच माझ्या प्रकृतीस कांहीं फेर पडेल, व चार दिवस मनाचें समाधान होईल. एवढ्यासाठीं मला वडिलांची परवानगी असावीच.

कुमि०—जा बापडा, मग नाहीं ह्मणून तरी काय उपयोग? तुह्मीं आतांचीं मुलें काय सांगून ऐकणारीं आहां?

वीर०—आह्माला वडिलांच्या बाहेर कां जातां येतें? परंतु माझ्या जें प्रकृतीस ठीक पडेल तें वडिलांस कळविलें. मग जशी वडिलांची मर्जी असेल तसें करणें भाग आहे.

कुमि०—(जसें व्हावें तसें झालें ह्मणून मोठा आनंद होऊन परंतु तो मोठ्या युक्तीनें छपवून] जा, मग काय करणार? प्रकृतीपुढें मनुष्याचा काय इलाज आहे? बरें, परत किती दिवसांनीं येशील? लवकरच ये ह्मणजे बरें. वडील बंधूच्या वियोगामुळें जें दुःख होत आहे तें काय सांगूं? परंतु तुझ्या व दुर्मतीच्या मुखाकडे पाहून कांहीं समाधान होत होतें, त्यांत आज तूंही जाऊं लागलास; बरें असो, (दुःखाचा बळेंच मोठ्यानें सुस्कारा टाकून) त्यास काय करावयाचें? ती कोणाच्या हातची गोष्ट आहे? ईश्वर कोणाचेंही सुरळीत चालूं देत नाहीं. त्यांचें कांहीं एवढ्यांत वय झालें नव्हतें, किंवा प्रकृति अशक्त नव्हती; पण होणार तें काय चुकतें? आतां आह्मीं रडलों, पाहिजे तें केलें ह्मणून काय होणार आहे? ईश्वरानें आयुष्याची तरी वाटणी करण्यास मार्ग ठेवायाचा होता? ह्मणजे आह्मीं सर्वांनीं त्यांना दहा दहा वर्षें दिलीं असतीं. बरें तें असो, आतां विनाकारण वाईट वाटून काय उपयोग? ते चांगली कीर्ति संपादन करून

गेले ह्यांतच आनंद मानावा ह्मणजे झालें. तूं तरी आपला सुखानें परत ये ह्मणजे झालें.

इतकें भाषण झाल्यानंतर वीरकांत तेथून उठून गेला. आपल्या चुलत्याचें बोलणें जरी सर्व दांभिक आहे हें त्यास पक्कें माहीत होतें; तथापि त्यापासून त्याला गहिंवर आल्यावांचून अगदीं राहिला नाहीं. त्याचा कंठ अगदीं दाटून गेला, पित्याची मूर्ति डोळ्यांसमोर दिसूं लागली, त्याच्या सर्व गुणांची त्यास एकदम आठवण झाली. तो आपल्यावर किती प्रीति करीत असे? आपल्याशीं किती गोड ममतेच्या शब्दांनीं बोलत असे? परस्परांच्या वियोगानें परस्परांस किती दुःख होत असे?. हें त्याच्या नेत्रांसमोर जसें कांहीं मूर्तिमंतच येऊन उभें राहूं लागलें. परंतु इतकेंही दुःख मोठ्या कष्टानें सांवरून कांहीं वेळ इकडे तिकडे केल्यावर त्यास आपल्या प्राणसखीची परवानगी घेण्याची आठवण झाली. त्यास वाटलें कीं प्रियेजवळून तिच्या खुशीनें परवानगी घेणें व तिचें मन रमविणें ह्मणजे अद्यापि मोठेंच कार्य उरलें आहे. कोणतेंही मोठेंसें कार्य करणें ह्मटलें ह्मणजे त्यास अनकूळ गोष्टीपेक्षां प्रतिकूळ गोष्टीच फार असतात. तथापि कार्यसिद्धीसाठीं त्याशीं झटलें पाहिजे. प्रिया परवानगी देतांना मोठीच मारामारी आहे. जर कबूल झालीच तर ती तरी बरोबर येण्यास निघेल. परंतु प्रवासांत बायकांची कोठें सोय आहे? ऊन्ह, तान्ह, त्यांना कसें सोसवेल? तशांत सर्व नडी सोसून घेतलीच बरोबर व सर्व सोयी तिजकरितां ठेविल्या, तरी घरांतलीं मनुष्यें काय ह्मणतील? तीं तर सर्व माझ्या वऱ्यावरच आहेत.

ह्मणतील घेतली आपल्या बायकोला आणि झाला चालता. अथवा प्रियेलाच दोष देतील. तिनेंच ह्यास नेला ह्मणून ह्मणतील. पहा, चोहोंकडून अडचणी आहेतच. तिला बरोबर न घ्यावें हेंच बरें. कशी तरी तिची समजूत काढिली पाहिजे. असें मनांत येऊन भोजनादि विधी आटोपून रात्रीचे सुमारें दहा वाजतां आपल्या सुंदर रंगमहालांत तो जाण्यास निघाला. माडीवर जाण्यासाठीं जिन्याच्या पायऱ्या जों चढतो आहे तों त्याच्या मनांत अनेक कल्पना येऊं लागल्या. आपल्या प्राणप्रियेस आपल्यास परवानगी देण्यास किती संकट पडेल? तिचें मन कोणत्याही प्रकारें दुःखविणें ह्मणजे हें आपल्यास तरी केवढें संकट आहे? ह्याप्रमाणें अनेक विचारांनीं त्याचें मन अगदी व्याप्त होऊन गेलें. दुसऱ्या मजल्यावर जों मोठ्या दालनांत गेला, तों आपल्या रंगमहालाविषयीं व त्यामध्यें क्रीडा करणारीविषयीं त्याच्या मनांत एकदम इतके विचार आले कीं, त्यास वाटूं लागलें, मी आपल्या मनोरंजन करणारीजवळच उभा आहें, तीस मंचकावर गाढ निद्रा लागली आहे. आतां तीस जागी करून आपण तिच्याच शेजारीं शयन करावें ह्मणून तिला उठवावयास जातो आहे, तों तेथें त्याच्या मनांत आलेल्या गोष्टींपैकीं कांहींच नाहीं असें पाहून तो आपल्या मनांत फार ओशाळा पडला व आपल्यास कोणीं पाहिलें काय ह्मणून मागें पुढें पाहूं लागला; परंतु येथें कोणी नाहीं असें पाहून तो पुढ गेला. तिसऱ्या मजल्यावर जाऊन आपल्या रंगमहालांत प्रवेश करून मध्यस्थानीं त्यानें जेव्हां मोठा उंच, ज्याच्या तीन

बाजूंनीं जाळ्या झालरी सोडल्या होत्या व चवथ्या बाजूची झालर एका रेशमी दोरीनें वर बांधून ठेविली होती. असा सुंदर मंचक पाहिला व त्यावर परांच्या गाद्या पसरून वर शुभ्र पलंगपोस अंथरला आहे. आपली तरूण पंधरा सोळा वर्षांची प्राणप्रिया जिचें नांव **रूपवती**, तिनें मध्यस्थानीं शयन केलें आहे; दीपाच्या मंद उजेडामुळें व झालरीच्या अडोश्यानें बिछान्यावर किंचित्सा कडोसा पडला आहे. **रूपवतीच्या** हेमालंकारांची प्रभा फांकून तीं जणू आकाशींचीं सुंदर नक्षत्रेंच शोभत आहेत, तिच्या अंगावरील पदर जरा विगलित झाल्यामुळें तिची सर्व शरीरकांति पिकल्या लिंबाप्रमाणें टवटवीत दिसत आहे, तिच्या कृष्णवर्ण केशांवर व तोंडाच्या पिंवळस गौरवर्णा- वर नाकांतील नथीच्या मौक्तिकांची चकाकी मारून तिची फारच विलक्षण शोभा दिसत आहे, तिच्या पायां- च्या पिंवळस पोटऱ्या, तोडे पयंजणादि अलंकारांनीं मं- डित होत्सात्या कर्दळीच्या गाभ्याप्रमाणें शोभत आहेत, व आपल्या मनाच्या उल्हासानें रंगमहालास व सर्व पदा- र्थांस विलक्षण शोभा आली आहे असें जेव्हां त्यानें पा- हिलें, तेव्हां मी पुन्हां भ्रमांत तर नाहींना? असा संशय येऊं लागला. परंतु मनाचा संशय फिटावा ह्मणून त्यानें मंचकावर जों थाप मारून पाहिली तों **रूपवती** एकदम दचकून अंगावरील पदर सांवरीत सांवरीत उठून पलंगा- खालीं उभी राहिली. आणि **वीरकांतास** पाहून ज्याप्रमाणें सूर्याच्या प्रकाशानें कमलिनी विकसित होतात त्याप्रमाणें हास्य करून ह्मणूं लागली, "केव्हां यावयाचं झालं हें कळ- लंच नाहीं. आज बरीच रात्र झाली."

हे मंजूळ शब्द ऐकून **वीरकांताच्या** मनावरील संशयाभ्र दूर होऊन तो मोठ्या उल्हासानें मंचकावर विराजमान झाला आणि **रूपवतीस** ह्मणूं लागला कीं, "या आतां बसा, नको लाजावयास, बायकांना आयते वेळेस एवढी लाज कोठून आणतां येते कोण जाणे?"

नंतर **रूपवतीनें** आपलें सुवर्णाचें तबक पेटीतून काढून आणिलें व त्यांतील ज्यावर एक सुंदर मोर **रूपवतीच्या** हातांतील कंकणावर बसविलेलीं पोंवळीं डाळिंबाचे दाणेच आहेत कीं काय असें मनांत येऊन ते भक्षण करण्याकरितां बसलें होतें असा हिरेजडित चौफुला हातांत घेतला आणि त्यांत केशर, वेलदोडे, जायपत्री, बदाम, कातगोळी, वगैरे पदार्थ काढून एक त्रयोदशगुणी बत्तीस सुपक्क पानांचा विडा करून **वीरकांतानें** घ्यावा ह्मणून हात पुढें केला; परंतु विनोद वाढवावा ह्या हेतूनें न घेतां **वीरकांत** ह्मणाला कीं, "मग इतके दिवस विडा हातांत घेण्याची सवय लावावी होती."

रूप०—मनांतच असेल तर हात जरा वर करण्यास मला काय लागणार आहे.

**वीर०**—मग आधींच कां नाहीं केला?

हे विनोदपर शब्द ऐकून **रूपवतीनें** किंचित्सें हास्य मुख करून आपल्या नाजूक गोंडस हातानें तो विडा **वीरकांताच्या** मुखांत दिला, आणि त्याच्या शेजारीं बसून ह्मणाली, "पण अर्ध्याची वांटदारीण मी आहेंच."

**वीर०**—स्त्रिया सर्व गोष्टींत पुरून उरल्याच आहेत. कोणत्या गोष्टींत त्या अर्ध्याच्या वांटेदारिणी नाहींत? पुरुषांस त्यांनीं कोणत्या गोष्टींत सोडलें आहे.?



रूप०—पुरुषांनीं आपल्याच सुखा साठीं सर्व गोष्टींत त्यांना अर्ध्याच्या वांटेदारिणी करून ठेविल्या आहेत आणि आपल्या पाठीं बंधन लावून घेतलें आहे. सर्व कांहीं आपल्याच सुखाकरितां.

वीर०—त्यांत पुरुषांनां सुख तें कशाचें ? आपल्या पाठीं आपण कैद लावून घेऊन कोणास सुख कां वाटेल ?

रूप०—खरंच, कसं सुख वाटत असेल तें असो. मग रात्रीं येथें येणं कां होतं कोण जाणे. न येऊन चैन पडत असलें तर कोण जाणें.

वीर०—आजच्या बोलण्याचा रोंख तर तुवा फारच चमत्कारिक दिसतो आहे. आज कांहीं मनांत विषेशसें दिसतें आहे.

रूप०—चांगलं, आपल्या मनांत कांहीं असलं ह्मणजे दुसऱ्यावर लोटावं; मग त्यास इतकं आळया पिळयाचं बोलणं कशास हवं ? शायकांना तर कांहीं नाहींना ह्मणून ह्मणतां येत नाहीं. ? मग उघडच मनोदय कळविण्यास काय हरकत आहे ?

हे मंजूळ शब्द ऐकून **वीरकांतास** कांहीं विलक्षण उल्हास झाला. त्यानें **रूपवतीचा** कमलाप्रमाणें मृदु हस्त आपल्या हातांत धरून मंचकावर शयन केलें, नंतर **रूपवतीनेंही** आपल्या कोमल हस्तानें **वीरकांतास** एखाद्या वल्लीप्रमाणें मिठी मारून सर्व मृदु आंगाचें गाढ आलिंगन दिलें.

खरोखरच, वाचणारहो, स्त्री पुरुषांस वल्ली वृक्षाची उपमा अक्षरशः शोभत्ये. जी वल्ली एखाद्या वृक्षास वेष्टून असते ती, तो वृक्ष जसजसा वाढत जातो, तसतसी

मोठ्या तोऱ्यानें वर चढत जाये. ती वृक्षावर चढून ह्मणजे त्यावर अवलंबून राहून सूर्याच्या प्रकाशाचा उपभोग घेत असते. परंतु एखादे वेळीं वादळ सुटून त्याच वृक्षास विपत्तिकाळ आला तरी ती वल्ली त्यास न सोडितां आपल्या कडून होईल तितकें करून त्याचें आपल्या कोमल ताण्यानें संरक्षण करीत असते. आतां तिच्या निर्बळपणामुळें त्या वृक्षाचें व्हावें तसें संरक्षण जरी तिच्या हातून न होईल तरी तिनें खऱ्या ममतेनें जें काम करावें तें ती करिये.

तद्वतच पुरुषास जोंपर्यंत अनुकूळता असते तोंपर्यंत स्त्री त्यावर अवलंबून राहून त्याच्या जिवावर अनेक तऱ्हांनीं तोरे मिरवित्ये व सर्व प्रकारें सुखोपभोग घेत्ये. परंतु त्यास जर प्रतिकूळ दिवस आले तर ती आपल्या अवलंबनरूप दृढालिंगनानें त्याचें त्या वादळापासून समाधानरूप संरक्षण करिये. अशाच वेळीं ती आपल्या प्राण प्रियावर त्याच्या संपत्ती साठीं अथवा अनेक अनुकूळ गोष्टींसाठीं प्रीति करीत नाहीं, परंतु त्या पुरुषाविषयींच तिच्या ठायीं विलक्षण प्रीति वसत्ये आहे असें दाखविण्याची तिला संधी सांपडून आपल्या खऱ्या हृदयाची स्थिति आपल्या तारकास कळविल्यामुळें विलक्षण आनंद होतो. खरोखरीच, ज्या उत्तम स्त्रिया आहेत त्यांच्या हृदयस्थानीं प्रीतिची कांहीं विलक्षण ईश्वरी ज्वालाच असत्ये. तिचा, पुरुषाच्या सानकूळतेच्या प्रभेत लोप होत असतो. परंतु प्रतिकूळतेचा जरा अंधार पडूं लागला तर ती एकदम चमकूं लागत्ये, आणि तिच्या खऱ्या तेजाची परीक्षा पहाण्याची वेळ प्रतिकूळताच होय.

वाचणार हो, आपली गोष्ट पाठीमागें राहून मध्येंच हे विचार आले, ह्यामुळें तुह्मांस कांहींसा कंटाळा आला असेल खरा, तथापि अशा सद्गुणी स्त्री पुरुषांच्या प्रीति-पासून जे विचार सुचतात त्यांचीं उदाहरणें देऊन जी हल्लीं जनांची चाल आहे कीं आपल्यास कोणत्या प्रकार-चीहि विपत्ति प्राप्त झाली तरी ती मुख्यत्वें आपल्या स्त्रि-यांस कळवूं नये, मग ती छपून रहावी एवढ्यासाठीं आणखीं कितीही दुःखें भोगावीं लागलीं तरी तीं सोसण्यास सुखानें कबूल असावें आणि ह्या प्रकारानें दिवसेंदिवस पूर्ण नाशाप्रत पावावें, ती मोडून टाक-ण्यासाठीं शक्त्यनुसार यत्न केल्या वांचून रहावत नाहीं. अहः हः ! काय ह्या स्त्रीपुरुषांची प्रीति ! ! ह्याप्रमाणें जर स्त्रीपुरुषांचीं मनें असतात तर वर सांगितलेल्या चालीचा प्रघात असण्याचें काय बरें कारण असावें ?

वर सांगितल्याप्रमाणें **वीरकांताचें** व **रूपवतीचें** भाषण झाल्यावर **वीरकांतास** वाटूं लागलें कीं, जी ही आपल्या-शीं आतां इतक्या प्रेमानें क्रीडा करीत आहे, तिचीच दोन घटकांनीं आपण आपल्या जाण्याची गोष्ट काढली ह्मणजे काय अवस्था होईल ? सर्वप्रकारच्या सुखाची वेळ जाऊन आतां दुःखाचीच पाळी आली आहे कीं काय असें तीस वाटूं लागेल. ती जर हट्ट घेऊन आप-ल्यास नाहीं ह्मणेल तर आपण जरा धमकीनें तीची कशी समजूत घालावी ? अथवा करुणायुक्त स्वरानें जर ती आपली विनवणी करूं लागली तर त्या मंजूळ शब्दा-नीं कंठ दाटल्यावर आपण पुढें तिच्याशीं बोलावें तरी कसें ? तिची समजूत कोणत्या तरी रीतीनें घालावी ?

मोठ्या तोऱ्यानें वर चढत जात्ये. ती वृक्षावर चढून ह्मणजे त्यावर अवलंबून राहून सूर्याच्या प्रकाशाचा उपभोग घेत असते. परंतु एखादे वेळीं वादळ सुटून त्याच वृक्षास विपत्तिकाळ आला तरी ती वल्ली त्यास न सोडितां आपल्या कडून होईल तितकें करून त्याचें आपल्या कोमल ताण्यानें संरक्षण करीत असते. आतां तिच्या निर्बळपणामुळें त्या वृक्षाचें व्हावें तसें संरक्षण जरी तिच्या हातून न होईल तरी तिनें खऱ्या ममतेनें जें काम करावें तें ती करित्ये.

तद्वतच पुरुषास जोंपर्यंत अनुकूळता असते तोंपर्यंत स्त्री त्यावर अवलंबून राहून त्याच्या जिवावर अनेक तऱ्हांनीं तोरे मिरवित्ये व सर्व प्रकारें सुखोपभोग घेत्ये. परंतु त्यास जर प्रतिकूळ दिवस आले तर ती आपल्या अवलंबनरूप दृढालिंगनानें त्याचें त्या वादळापासून समाधानरूप संरक्षण करित्ये. अशाच वेळीं ती आपल्या प्राण प्रियावर त्याच्या संपत्ती साठीं अथवा अनेक अनुकूळ गोष्टींसाठीं प्रीति करीत नाहीं, परंतु त्या पुरुषाविषयींच तिच्या ठायीं विलक्षण प्रीति वसत्ये आहे असें दाखविण्याची तिला संधी सांपडून आपल्या खऱ्या हृदयाची स्थिति आपल्या तारकास कळविल्यामुळें विलक्षण आनंद होतो. खरोखरीच, ज्या उत्तम स्त्रिया आहेत त्यांच्या हृदयस्थानीं प्रीतिची कांहीं विलक्षण ईश्वरी ज्वालाच असत्ये. तिचा, पुरुषाच्या सानकूळतेच्या प्रभेंत लोप होत असतो. परंतु प्रतिकूळतेचा जरा अंधार पडूं लागला तर ती एकदम चमकूं लागत्ये, आणि तिच्या खऱ्या तेजाची परीक्षा पहाण्याची वेळ प्रतिकूळताच होय.

वाचणार हो, आपली गोष्ट पाठीमागें राहून मध्येंच हे विचार आले, ह्यामुळें तुह्मांस कांहींसा कंटाळा आला असेल खरा, तथापि अशा सद्गुणी स्त्री पुरुषांच्या प्रीति-पासून जे विचार सुचतात त्यांचीं उदाहरणें देऊन जी हल्लीं जनांची चाल आहे कीं आपल्यास कोणत्या प्रकार-चीही विपत्ति प्राप्त झाली तरी ती मुख्यत्वें आपल्या स्त्रि-यांस कळवूं नये, मग ती छपून रहावी एवढ्यासाठीं आपणांस कितीही दुःखें भोगावीं लागलीं तरी तीं सोसण्यास सुखानें कबूल असावें आणि ह्या प्रकारानें दिवसेंदिवस पूर्ण नाशाप्रत पावावें, ती मोडून टाक-ण्यासाठीं शक्यनुसार यत्न केल्या वांचून रहावत नाहीं. अहः हः ! काय ह्या स्त्रीपुरुषांची प्रीति ! ! ह्याप्रमाणें जर स्त्रीपुरुषांचीं मनें असतात तर वर सांगितलेल्या चालीचा प्रघात असण्याचें काय बरें कारण असावें ?

वर सांगितल्यामाणें **वीरकांताचें** व **रूपवतीचें** भाषण झाल्यावर **वीरकांतास** वाटूं लागलें कीं, जी ही आपल्या-शीं आतां इतक्या प्रेमानें क्रीडा करीत आहे, तिचीच दोन घटकांनीं आपण आपल्या जाण्याची गोष्ट काढली ह्मणजे काय अवस्था होईल ? सर्वप्रकारच्या सुखाची वेळ जाऊन आतां दुःखाचीच पाळी आली आहे कीं काय असें तीस वाटूं लागेल. ती जर हट्ट घेऊन आप-ल्यास नाहीं ह्मणेल तर आपण जरा धमकीनें तीची कशी समजूत घालावी ? अथवा करुणायुक्त स्वरानें जर ती आपली विनवणी करूं लागली तर त्या मंजूळ शब्दा-नीं कंठ दाटल्यावर आपण पुढें तिच्याशीं बोलावें तरी कसें ? तिची समजूत कोणत्या तरी रीतीनें घालावी ?

अरे, इतकेंही करून ती बरोबर येण्याचें ह्मणू लागली तर मग तिला काय सांगावें? तिला नाहीं ह्मणून तरी कसें ह्मणावें! कोणत्या नडी तिला दाखवाव्या! ज्या नडींची वास्तवीक आपल्यास अडचण आहे त्या तिला बरोबर येण्याच्या उल्हासानें केवळ क्षुल्लक वाटूं लागतील. असे अनेक विचार मनांत येऊन त्यास आपली गोष्ट रुपवती जवळ एकदम काढवेना. परंतु बरोबरीच्या सर्व सामग्रीची व मंडळीची तयारी झाल्यामुळें आतां फार विलंब लावून उपयोग नाहीं, उद्याच आपल्यास निघणें आहे, तेव्हां आजच प्रियेस विचारिलें पाहिजे, असें मनांत येऊन त्यानें मोठा हिय्या केला आणि रूपवती जवळ आपल्या जाण्याची गोष्ट काढिली. तो तीस ह्मणाला, "मला एक गोष्ट विचारायाची आहे परंतु तीस "कबुलायत" अरे चुकलों, "आज्ञा" मिळेल कीं नाहीं कोण जाणें. मला बुवा भय वाटतें विचारावयास.

रूप०—अहः हः! मोठे मोठे शब्द खर्च करण्यास बापडं काय जातं? स्त्रिया मनासारख्या बोलल्या तर बरंच, नाहीं तर आपलं मनच देऊं नये ह्मणजे झालं. आणि आतांशीं अशी प्रकृति अजारी दिसये ती माझ्याच धाकानं.

वीर०—काय? "मनच देऊं नये?" कां कोणतें आजपर्यंत तुझ्या मर्जी विरुद्ध केलें? आजपर्यंत कांहीं करणें झालें तर तें तुला विचारल्या शिवाय केलें होतें कां?

रूप०—नाहीं, विचारायास बापडं काय जातं? जें नाहीं ह्मणून ह्मटलं तें मात्र करायचं, नाही झालं असं कधीं झालं आहे काय?

वीर०—कां ? काय तुझें ऐकलें नाहीं ? स्त्रियांची जातच अशी, कांहीं केलें तरी तें त्यांच्या मनाजोगें कधींच व्हायचें नाहीं.

रूप०—बरं, आतां पुरे, विचारायचं काय होतं ? रोजची तोंडपुसणी आणि मन समजवणी आतां पुरे.

वीर०—नाहीं बुवा, स्त्रियांचे आळेपिळे कांहीं केल्यानें पुरे व्हायचेच नाहींत. जातिस्वभावच, त्यास काय उपाय ! ठोसरे दिल्या शिवाय एक शब्दही नाहीं.

रूप०—आतां काय झालं ? बरं, तर काय तें मी विचारलं ?

वीर०—बरें तें असो, प्रिये, तुला विचारणें आहे तें इतकेंच कीं, वडिलांच्या वियोगानें मला आतांशीं अगदीं चैन पडत नाहींसें झालें आहे; त्यांत काकांच्या करड्या अमलामुळें हल्लीं जे गोरगरीबांचे हाल होत आहेत ते तर मला अगदींच पहावत नाहींत. एवढ्यासाठीं कांहीं दिवस मनाच्या समाधानार्थ तीर्थयात्रेस जाऊन अनायासें निरनिराळ्या देशाचे निरनिराळे चमत्कार पहावेत असें माझ्या मनांत आलें आहे. ह्याकरितां प्राणप्रिये, तुझा वियोग सोसणें कांहीं दिवस भाग आलें आहे; तर ह्या गोष्टीविषयीं फारसें वाईट न वाटूं देतां मला तूं परवानगी द्यावीस.

रूप०—(सर्व विनोद वाटून) पुरे, किती माणसाचं मन पहावं ? वियोगाची गोष्ट काढावी, मी काय ह्मणतें तें ऐकावं, वाईट वाटलं तर त्याची मौज पहावी, इतकंच ना ? वाईट वाटेल ह्यांत येवढं नवल तें काय ? स्त्रियांना दुसरं सुख तें कसलं ? त्यांच्या मनाला त्रास करण्यास

ठिकाण कायतें एकच न? ह्याच ठिकाणाचा वियोग यांना कसा सोसेल? पाण्यावांचून कधीं मासा राहिलेला ऐकला आहे का?

आपला विचार **रूपवतीस** अद्यापि खरा वाटत नाहीं व त्याविषयीं तिच्या मनांत पुढील कांहींच कल्पना येत नाहीं हें पाहून **वीरकांतास** फारच वाईट वाटलें. **रूपवती** बोललेले शब्द आपण तिची जी समजावणी करणार तीस किती प्रतिकूळ आहेत हें मनांत येऊन त्याची फारच चमत्कारिक स्थिति होऊन गेली. पुढें तिच्याशीं काय बोलावें हेंहि त्याला सुचेना. परंतु आणखीं जरासा मनाचा हिय्या करून तो तीस ह्मणाला, प्रिये, तुझ्या आतां मी खरोखरीच विनोद करीत नाहीं; माझी सर्व सामग्री तयार आहे; मी उद्यांच येथून निघणार, कारण उद्यांचा योग फार चांगला आहे. उद्यां पुण्यनक्षत्र, अमृतसिद्धि योग असून मला अकरावा चंद्र आहे, एवढ्यासाठीं कसें-हीं करून निघालेंच पाहिजे.

हे शब्द ऐकून बापड्या **रूपवतीची** काय दशा झाली असेल हें सांगावयास देखील नको. आपला पति जें बोलला तें सर्व खरें, विनोद नव्हे असें तिला वाटतांच मरणाची पाळी आल्याप्रमाणें होऊन गेलें. पतीचा बेत कसा रहित होईल, त्यास आपण काय उत्तर द्यावें, हें तिला अगदीं सुचेनासें झालें. पतीपाठीं आपल्यास दिवस किती दुःखानें कंठावे लागतील? त्या दिवसांत आपली काय अवस्था होईल? हें तिच्या मनांत येऊन तिला अगदीं नेड्यासारखें होऊन गेलें. हे सर्व विचार तिच्या स्वतः विषयींच झाले, परंतु आपल्या प्रिय पतीस प्रवासांत कोण-

तीं संकटें भोगावीं लागतील? त्याचे कशाप्रकारें हाल होतील? त्याचा आपल्यास कसा समाचार कळत जाईल? पुन्हा तो परत येऊन आपल्यास केव्हां भेटेल? अशा अनेक विचारांनीं तिला अगदीं वेडें करून सोडलें. पुढें काय बोलावें हेंहि तिला सुचेना. ती अगदीं वेड्यासारखी होऊन स्तब्ध राहिली. हें पाहून **वीरकांत** तीस ह्मणाला, "प्रिये, तुला एवढें संकट कशाचें पडलें? ह्यांत इतकें वाईट वाटण्याचें काय कारण आहे? तूं अशी अगदीं स्तब्ध कां झाली आहेस?"

**वीरकांत** असें ह्मणाला तरी तिच्यानें एक शब्दहि बोलवेना. उलटा कंठ दाटून अगदीं गहिंवर आला आणि ती स्फुंदून स्फुंदून रुदन करूं लागली. हें पाहून **वीरकांत** ह्मणतो, "प्रिये, मी इतका लाडीगोडीनें बोलत असतां माझ्याशीं एक शब्दही बोलत नाहींसना? ह्यांत तुला इतकें वाईट तें काय वाटतें आहे कोणजाणे. मी फार दिवस का लावणार आहें? लवकरच परत येईन. एकदा गोडीनें "बरें" ह्मणून बोल पाहूं. प्रिये, बोल तर खरी, अशीं स्तब्ध कां?"

**रूप०**—(मोठा दुःखाचा सुस्कारा टाकून) बोलून तरी काय होतं आहे? प्रवासास जायचं झालं, मग पाठी मागं माझी काय अवस्था होईल? मी कोणाच्या जिवावर काळ क्रमण करावा? बोलावं चालवं कोणाशीं? कोणाच्या मुखाकडे पहावं? आज मी दिवस कसे काढीत आहें तें एक माझं मला माहित. बापड्या सासूबाई आजपर्यंत एक चकार शब्दहि बोलल्या नाहींत, कीं आईची आठवण येऊं दिली नाहीं. पण पहा, ईश्वरानं त्याना कसे दिवस

आणले. ? ? देव कोणाचंय आपलं वरं चालूं द्यायाचा नाहीं, वरं पण त्यांनीं आपलं सार्थक केलं. आतांच्या काळांत सती जाणाऱ्या आहेत कोण ? खरीच, माऊली केवळ लक्ष्मी ; नाहीं तर चुलत सासूबाई. " कारटी " शिवाय तर बोलतच नाहींत. उठतां लाथ आणि बसतां बुक्की असें करून ठेविलं आहे. परंतु त्याविषयीं आजपर्यंत मी एक चकार शब्दहि जवळ बोललं नाहीं. पण आज आपला प्रसंगच आला ह्मणून सांगणं भाग आलं. सासरे तर सारावेळ "नांव बुडवावयास निघाली आहे पोर, नांव बुडवणार पोर" असं ह्मणून ह्मणून बेजार. काय मी नांव बुडविलें? काय मी करत्यें आहें कोण जाणं. वरं तें सारं एक मुख पाहिलें ह्मणजे विसरत होत्यें, मनांत ह्मणत असें कीं जाऊं द्या, साऱ्यांच्या बोलण्याशीं मला काय करायचं आहे ? असा एक जिवावर मी काळ कंठीत होत्यें. मग माझी पाठीमागें काय दशा होईल ? जाण्यास मी " हो " ह्मणून तरी कशी ह्मणूं ?

**वीर०**—बोलूं देग, वडील माणसें बोलतात तीं आपल्या बऱ्यासाठींच बोलत असतात. रागाच्या वेळीं एखादे वेळेस त्यांच्या तोंडांतून दोन शब्द अधिक आले तरी तीं वडीलच आहेत. त्यांचें बोलणें कोठें मनावर धरावें ?

**रूप०**—मग मी तरी कधीं त्याविषयीं कांहीं बोललें होत्यें ? आज आपलं ओघास आलं ह्मणून दोन शब्द तोंडांतून निघाले.

**वीर०**—बरें पण सखे, मी खरोखरी तुझीच शपथ वाहून सांगतों कीं, मी आपल्या कडून होईल तितकें

करून फार लवकर परत येईन. तूं अगदीं काळजी करूं नको. दिवस पहा कसे भराभर जात आहेत ते? थोडे दिवस कसेंही करून दुःखरहित रहा. मी परत आल्यावर आपल्यास पुढें होणाऱ्या सौख्यावर सर्व आशा ठेव, आशा जर ठेवशील तर दिवस पहा कसे लवकर जातील ते. "आशा" ही फार तर काय परंतु केवळ प्राणाचीहि रक्षक आहे असें एका ग्रंथकाराचें ह्मणणें आहे. तो ह्मणतो कीं, "मनुष्यास आशा जर नसती तर त्याचा प्राणच न रहाता." पहा, तूं दिवस किती उत्सुकतेनें मोजशील? आज एक दिवस गेला, उद्यां दोन गेले, ह्याप्रमाणें जो विचार चालले आहेत तो मी परत येईन. तू अगदीं काळजी करूं नको.

रूप०—मला ती कशाला ग्रंथकारांची ह्मणणी न् बिणणी. आम्हा नायकांना काय समजतं आहे? आम्हाला एक पाय ठाऊक. वियोग झालेल्या दिवसांत जर प्राण ह्या शरीरास सोडणार नाहीं तर पुढील सुखाविषयीं कल्पना. येथून जाणं झाल्यावर तर खरोखरी माझा एक दिवस देखील प्राण रहाणार नाहीं. मग माझ्या जिवाचीच आशा नसली तर हवं ते करावं. मग मला तरी विचारावयास कशास पाहिजे होतं.

वीर०— प्रिये, तूं असा हट्ट धरूं नको. खरोखरीच माझ्या दुःखी अंतःकरणास तुझे हे हृदयभेदक शब्द तीव्र बाणाप्रमाणें टोंचितात. तूं जर हट्ट धरून बसशील तर माझें तुझ्यापुढें कांहीं चालणार आहे असें नाहीं; परंतु ज्या गोष्टीनें मला सुख होईल त्याच गोष्टींत वास्तविक पाहतां तुला आनंद असावा. ज्या गोष्टीनें मला सुख

होईल ती करण्याविषयीं तूं तर मला उत्तेजन देत असावेंस, परंतु पहा, तू उलटाच कसा हट्ट धरितेस तो.

रूप०— बरं, असंच जर आहे तर मला बरोबर न्यावं ह्मणजे पाठीमागं माझी कुरकूर राहिलीच नाहीं. मला तर एकटीला फार लागतं असं तर नाहीं ना? एवढं तर होईल का नाहीं? का त्यालाय् पण हरकत आहेच?

वीर०— सखे, तुला कांहीं लागतें आणि त्याची मी पर्वा करितों असें नाहीं. परंतु स्त्रियांची जात आधींच सुकुमार, त्यांतून तुजसारख्या राजस्त्रियांविषयीं तर सांगण्यासच नको; आणि अशा स्त्रियांनां प्रवासांतील हाल भोगण्यास न्यावें ह्मणजे हें केवढें अनुचित? प्रवासांत वेळीं अवेळीं भोजन, सांपडेल त्या स्थळीं निद्रा, मिळेल तसें अन्न, इत्यादि अनेक प्रकारचीं सुखदु:खें आहेत. तुला तर एक प्रहर नाहीं झाला तों मिष्टान्नाच्या भोजनाची, दोन प्रहरचें उन्ह जरा तीव्र नाहीं झालें तों बागांतील गार बंगल्यांत बसून सुंदर दासीकडून वारा घेण्याची, जरा रात्र नाहीं झाली तों रमणीय रंगमहालांत सुंदर मंचकावर शयन करण्याची संवय; अशा सुकुमार स्त्रीस प्रवासांतील अनेक दु:खें भोगावीं लागलीं ह्मणजे तिची काय बरें दशा होईल? एवढ्याकरितां ह्मणून. नाहीं तर आधींच नाहीं कां मी तुला बरोबर घेण्याचा बेत करतों? तूं येथें रहावेंस, मी प्रवासास जावें, तुझ्या मनानें माझ्याकडे धांव घ्यावी, माझ्या मनास तरी रिकामी ओढ, असें कशास हवें होतें? पण सारासार विचार पाहिला पाहिजेना?

रूप०— हो, ह्यांतील कोणती तरी सवय असायची आहे काय? सर्व सवया मलाच बऱ्या लावल्या आहेत.

एखाद्या दिवशीं कांहीं कारण असलं आणि जेवणास जरा वेळ झाला तर तोंड कधीं सुकतं काय? बरं तर मुक्कामाच्यानं फराळास मलाच आणून द्यावं लागतं. प्रवासांतील साऱ्या दुःखांपासून इकडं कांहीं होणार आहे काय? तीं सारीं मलाच बरीं बाधतील.

**वीर.**—नकोगे असा हट्ट धरून बसूं, पुरुषाची गोष्ट कांहीं झाली तरी निराळी. त्यांची आणि अबलांची बरोबरी होईल काय! पुरुष ते कांहीं झाले तरी पुरुषच.

**रूप.**—ह्मणून मी आधींच ह्मणाल्यें होतें कीं काय तें मला विचारावं कशास? मनांत होतं तें आपलं करायचं होतं. बायकांनीं कांहीं सांगितलं तरी त्यास आपल्या हरकती आहेतच.

**वीर.**—खरोखर, ह्या दिवसांतील दोन प्रहरचें जरा उन्ह लागलें ह्मणजे हें तुझें कोमळ वदन कसें म्लान होऊन जाईल? मुक्कामास जरा वेळ झाला तर तूं क्षुधेनें कशी पीडित होशील? तहान लागून एखाद्या ठिकाणीं जर पाणीं लवकर न मिळालें तर तृषाक्रांत होऊन तुझी काय दशा होईल? हें सर्व माझ्या मनांत येतें आणि एवढ्याच साठीं तूं बरोबर न यावेंस असें मला वाटतें. परंतु आपला तर आतां उपायच हरला. स्वभावच दुराग्रही त्यास कोण काय करणार?

हे शब्द ऐकून **रूपवतीस** जरासा धीर आला व आपला हट्ट बहुधा शेवटास जाईल असें तिला वाटून ती ह्मणाली, मी तर कांहीं केल्यानं ऐकणार नाहीं. हीं सर्व दुःखें मलाच अधिक बाधतील असं नाहीं. पंचपात्रीभर पाणी पियाला मिळालं तर मला त्यातलं घोट-

भर तरी द्यायचं होईल कां नाहीं? नाहींच मिळालं किंवा मिळून नच द्यायचं झालं तर दृष्टीसमोर प्राण गेलेला मला आपला पुरवला, पण मी येथें कधीं रहणार नाहीं.

वीर०—पहा, मी आणखी एकदां सांगतों कीं, दुरून डोंगर साजरे आहेत ते खरे आहेत. आपला तर आतां उपाय चालत नाहीं. जें कोणी ऐकेल त्याला सांगावें, नाहीं तर काय उगाच तोंड दुखवून! पहा, मग जसें मनांत असेल तसें.

रूप०—हां, सारं चाललं आहे तें माझ्याच मनाप्रमाणं. माझ्या मर्जीबाहेर कधीं जायचं झालं आहे काय? मी घोटभर सांगितलं तर कधीं थेंबभर तरी अधिक पाणी प्यायचं झालं आहे? सारं चाललं आहे तें माझ्याच मर्जीप्रमाणें. मग आतांच एवढा विचार कोठून आला कोण जाणं? मी काय ऐकायची नाहीं. कांहीं असो, मी आपली बरोबर येणार.

ह्या **रूपवतीच्या** मार्मिक भाषणापुढें **वीरकांतास** कांहींच बोलवेनासें झालें. त्यास वाटलें, कीं हिला जर आपण एकटीला ठेवून गेलों तर हिचा एक दिवस देखील सुखांत जाणार नाहीं. बरोबर नेण्यास नडी आहेत खऱ्या, परंतु त्या कशा तरी सोसल्या पाहिजेत. आपल्या मागें हिनें कोणाच्या सुसंगांत आपला काळ क्रमण करावा? चुलत सासरे व सासूबाई ह्या प्रकारचीं, त्यांच्याविषयीं ही सांगते आहे तेंही कांहीं खोटें नाहीं. आपल्यासमक्ष जें कांहीं चाललें आहे तें ठीक आहे. पाठीमागें काय होईल आणि काय नाहीं; ह्याकरितां आपण आपल्या हृदयंगमेस न्यावी हेंच बरें; आपल्या जिवास

गोड, तिला शोक असे तरी कशास पाहिजे? असा मनाचा निश्चय करून तो **रूपवतीस** ह्मणाला कीं, खरें आहे, आपण काय करावें? मग होईल तसें होईल, चला, स्त्रिया आपलें खरें केल्या शिवाय काय रहाणार आहेत?

हे अमृततुल्य शब्द कर्णीं पडतांच **रूपवतीस** जो कांहीं आनंद झाला तो काय सांगावा? पुढें होणाऱ्या दुःखाविषयीं तिच्या मनांत ज्या अनेक कल्पना आल्या होत्या त्यांचा ह्या सुशब्दांनीं एकदम नाश झाला. खरोखरी कोणतेंही सौख्य जरी अल्प असलें तरी त्याचा ठसा एखाद्या मनुष्याचें दुःख परिहार होऊन त्यावर बसला ह्मणजे त्या मनुष्यास त्याच अल्प सौख्याची विलक्षण मातबरी वाटत्ये. **रूपवतीस** वाटूं लागलें कीं आपल्या निर्बलावस्थेचीच **परमेश्वरास** दया येऊन त्यानें **वीरकांतास** ही बुद्धि दिली. प्रियकांतानें आपलें बोलणें मान्य केलें हें पाहून तीस कांहीं विलक्षण आनंद झाला; आणि मनुष्याची जी कांहीं नेहेमीची स्थिति आहे कीं आपल्यावर जर कोणी एखाद्या प्रसंगीं अतिशयित उपकार केला अथवा आपल्या मनासारखें जर काम केलें तर त्याचा उपकार आपल्यास पुढें फेडणें आहेच तो विशेषसा लक्षांत न रहातां त्या आपल्या सुखदात्यास गोड शब्दांनींच प्रथम सुखी करावें असें मनांत येत असतें, त्याप्रमाणें **वीरकांता**विषयीं **रूपवतीच्या** मनांत नेहेमीपेक्षां कांहीं विलक्षण प्रेम उत्पन्न झालें. तिचें मन इतकें आनंदमय होऊन गेलें कीं तें प्रेम आपण आपल्या पतीस कोणत्या-रीतीनें उघड करून दाखवावें हें देखील तिला सुचेनासें झालें. तथापि पूर्वीं सांगितल्या मनुष्याच्या स्थितीप्रमाणें

तिला आपल्या पतीस सुख होई असें कांहीं तरी बोलल्या-वांचून अगदीं रहावेना. ती मोठ्या उल्हासानें वीरकांतास ह्मणाली, "मनांत तर होतंच, मग आधीच मला बरोबर नेण्याचा बेत झाला असता तर? पण नाहीं, नायकांच्या मनाची परीक्षा पाहिल्यावांचून कसें रहावेल.

वीर०—आपल्या हट्टानें आपलें शेवटास न्यावें आणि तें दुसऱ्याच्या मनावर लोटावें, हें फार चांगलें. आजपर्यंत तुह्मी आपलें कोणत्या कामांत खरें नाहीं केलेंत? कठीण, हा स्त्रीपाश फार कठीण आहे. केव्हां पुरुष त्यांच्या पाशांत सांपडेल आणि केव्हां नाहीं याचा अगदीं नेम नाहीं.

रूप०—नायकांसारखा मेला वाईट जन्मच नाहीं. त्याहीं आपला तीळ तीळ जीव तोडला तरीं पुरुषांच्या लक्षांत यायचंच नाहीं. पुरुषांना काय आपलं "परदुःख शितळ" एकटीचं, काय होईल न काय नाहीं, पुरुषावांचून दिवस तिला किती दुःखानें लोटावे लागतात हें कुठं यांच्या लक्षांत येत असतं.? तीर्थयात्रेस आणि देशपर्यटनानें एक आपल्या मनाचं समाधान झालं ह्मणजे झालं.

वीर०—बरें, आतां किती टोले देणार? आंगमास दुखे पर्यंत? अपलें तर शेवटास नेलेंत आणि आतां कां रिकामें पांडित्य?

रूप०—हो, अर्धा जीव केला तेव्हां गेलं एकदाचं शेवटास, तें कुठं लक्षांत आलं असल?

वीर०—हो, कळला, तुमचा अर्धाजीव राहिला आहे तो. बरें तें असूंद्या सर्व, आतां अपरात्र झाली, जिकडे

तिकडे सामसूम झाली आहे. चार घटका तरी आतां स्वस्थ निद्रा घेतली पाहिजे. त्यांतून उद्यां तर अपल्यास निघणें आहे; मग दोन प्रहरचा बागांतील गार बंगला व रात्रीचा रंगमहाल मात्र विसरावा लागेल हो.

रूप०—हो, मला एकटीलाच विसरावा लागेल वाटतें?

वीर०— बरें आतां पुरें झालें, रात्र फार झाली ह्मणून सांगितलें ना? नाहीं कां अद्यापि झोंप येऊं द्यावयाची.

रूप०—हो, उचलून कुरापती मीच काढीत असेन, मी नेहेमीं पहाल्यें झोंप येत नाहींशी झाली ह्मणजे वेळ कशी तरी मौजेनें घालवावी आणि आपेश आपलें दुसऱ्यावर.

वीर०—मी एकटाच असतों तर केंव्हांच निजलों नसतों काय?

रूप०—मग दुसऱ्या एकाद्या खोलींत कां निजायाचं झालं नाहीं? दुसऱ्या थोड्या कां खोल्या पडल्या आहेत!

हे विनोदपर शब्द ऐकून **वीरकांतास** फार आनंद झाला आणि त्यास वाटलें कीं आपण आतां मुके राहिल्या शिवाय हें कांहीं केल्यानें पुरें होणार नाहीं. एवढ्या साठीं आतां आपण बोलणेंच बंद केलें पाहिजे. असें मनांत आणून **रूपवतीच्या** सुकुमार अंगावर आपला हात ठेवून **वीरकांतानें** शयन केलें व **रूपवतीनेंही** आपल्या सर्व अंगाचें **वीरकांतास** जशी एखादी अबला एखाद्या शूराचें आपल्या संरक्षणार्थ सहायच मागते आहे कीं असें सुखपर आलिंगन दिलें आणि दोघेंही निद्रिस्थ झालीं.

---

## भाग ६.

वाचकहो, रूपवतीचा आणि वीरकांताचा विनोद तुम्ही बराच ऐकिला. आतां बिचाऱ्या विलासिनीची काय दशा झाली आहे ती पाहूं चला. सोमकांतास त्या दुष्टांनी पकडून नेल्यापासून तिचें अन्न अगदीं तुटलें. कोणताही रमणीय पदार्थ पाहिला असतां त्याचा तिला फारच तिरस्कार येऊं लागला. कोणत्याही प्रकारें तिला चैन पडेनासें झालें. सर्वकाळ सोमकांताची मूर्ति तिच्या नेत्रांसमोर उभी राहूं लागली आहे. त्याला कोणत्या प्रकारें दुःख भोगावें लागत असेल? त्याचे काय हाल होत असतील? ह्या विचारानीं तिचें मन सदोदित व्याप्त झालेलें असे. तिनें वारंवार म्हणावें, "आतां प्रातःकाळ झाला, ह्यावेळीं रोज निजून उठायाचं होतं असं, आतां कुठं असायाचं असेल आणि कुठं नाहीं; आतां दोन प्रहर झाले, ह्यावेळीं रोज जेवण अटोपत असे आणि मी मोठ्या हौसीनें विडा देत असें, अजून अन्न पाणी तरी मिळालं असेल का नाहीं कोण जाणं, का भूकेनें जिव व्याकुळ झाला असेल? जरा उशीर सोसत नव्हता पण आतां काय वाट होत असेल कोण जाणं; आतां तिसरा प्रहर झाला, रोज ह्यावेळीं जरा अंग टाकून उठायाचं होत असं, पण आतां कशाची झोप येत असेल? रोज एवढ्या वेळीं गुळण्या भरून टाकण्यासाठीं प्याल्यांत माझ्या जवळ पाणी मागायाचं होत असे, पण पहा, मी पापीण कशी घरीं सुखाची निसूर बसल्ये आहें; आतां संध्याकाळ झाला, रोज एवढ्या वेळीं कचेरींतून यायचं होत असं,

एखाद्या दिवशीं वेळ लागलाच तर मी कशी एकसारखी वाट पहात असें, पण आतां केव्हां यायचं होईल आणि आतां किती वाटपाहूं? आतां रात्र झाली, एवढ्या वेळीं रोज निजायसाठीं रंगमहालांत यायचं होत असे, माझ्याशीं त्यावेळीं काय गोडगोड गोष्टी बोलायच्या होत असत, पण आतां अंथरायाऽपांघरायला तरी मिळालं असल का नाहीं कोण जाणं, एकादे दिवशीं लिहितां लिहितां जरा गालिच्यावर डोळा लागला तर पाठ एकसारखी दुखायला लागत्ये, पण आतां धोतर तरी जवळ असल का नाहीं कोण जाणं, आतां पहांट झाली, रोज एवढ्या वेळीं मी उठून अंगावर दुलई नीट घालीत असे, पण आतां पहा, पापीण कशी घटका दिवस येई पर्यंत रडतच पडत असत्ये." ह्याप्रमाणें तिनें अनेक सुखाच्या गोष्टी आठवून सर्वकाळ शोक करीत असावा.

अशा अवस्थेंत काळ क्रमण करीत असतां तिनें सर्व हकीगतीचें घरीं श्वशुरास पत्र पाठविलें. तें घरीं पोहोंचतांच सोमकांताच्या वृद्ध माता पित्यांची काय अवस्था झाली असेल हें तर लिहावयास देखील नको. त्यांच्या आशेचें घरच कोसळलें, मग काय पहावयास पाहिजे! मातेनें मोठ्यानें हंबरडा फोडला आणि ह्मणूं लागली, "अरे बा वत्सा, तुझी ही कायरे दशा झाली? तुला हें संकट, बा कारे प्राप्त व्हावें? तूं ज्यावेळेस येथून गेलास त्यावेळीं आह्मीं निर्दयांनीं तुला जाऊं दिलेंच नसतें तर तुझी आज ही दशा कां झाली असती? अरे कर्मा, ह्या पापिणीनें काय अपराध केला होता? हें आकाशच आज हिजवर कां कोसळलें? परमेश्वरा, तूं कोणत्या अपराधाबद्दल कारंगी

पाडसाची तुटातुट केलीस? पहा, आह्मा वृद्धांस आतां काय तो त्याचाच अधार होता. तो तरी कसा बिचारा आमच्याशीं वागत होता? कधीं काडी इतका आमच्या शब्दाबाहेर गेला नाहीं, पण बिचाऱ्याची काय दशा झाली आज! देवा, धांव आतां आणि आह्मां वृद्धांस ह्या संकटांतून सोडीव." ह्याप्रमाणें तीं अत्यंत शोक करूं लागलीं, परंतु शेजारी पाजारी जमून त्यांनीं त्या वृद्ध स्त्री पुरुषांचें समाधान केलें. नंतर **विलासिनीच्या** श्वशुरानें तीस खालीं लिहिलेलें पत्र लिहिलें.

**"श्रीगजानन प्रसन्न.**

"चिरंजीव वज्रचुडेमंडित सौभाग्यवती **विलासिनी**"
"मुक्काम रत्नपुरी, अशीर्वाद विशेष.
"तागाईत वैशाख शुद्ध ९ पावेतों सर्व सुखरूप असों"
"विशेष. तुझ्याकडून आलेलें पत्र वाचून आमची जी कांहीं"
"दशा झाली आहे व मनाच्याठायीं दुःखाचे जे उद्गार"
"उठत आहेत ते पत्रीं काय लिहावेत? तरी परमेश्वर"
"जशा स्थितींत ठेवील त्या स्थितींत रहाणें भाग आहे,"
"असें मानून फार शोक न करतां ईश्वराकडेच लक्ष"
"ठेवावें. कल्याण करणार तोच समर्थ आहे. दोन तीन"
"दिवसांनीं येथून एक रथ धाडून देतों त्यांत बसून"
"तावडतोब इकडे निघून यावें. बहुत काय लिहिणें"
"झाल्या गोष्टीचा ईश्वरावर भार ठेवून फार शोक न"
"करावा, हे आशीर्वाद.

("सही.")

हें पत्र वाचून आपल्या गावीं जाण्याची **विलासिनीनें** सर्व तयारी केली व रथ कधीं येतो ह्मणून दररोज वाट पाहूं लागली. दारावरून कोणाचाही रथ जाऊं लाग-

ला ह्मणजे तिनें खिडकींत जाऊन मोठ्या आशेने डोकावून पहावें व तो पुढें गेला ह्मणजे निराशेनें हिडमुसलेलें तोंड करून परत यावें. ह्याप्रमाणें दोन तीन दिवस गेल्यानंतर एक दिवशीं तिसऱ्या प्रहरीं ती एकांत स्थानीं आपल्या पतीविषयीं विचार करीत बसली आहे, त्याविषयीं अनेक कल्पना मनांत येत आहेत इतक्यांत एक दासी येऊन तीस ह्मणाली, "बाईसाहेब, एक सेवक रथ घेऊन आला आहे." हें ऐकून ती दासीस ह्मणाली, "त्यास वर कां बोलाविलें नाहींस ? जा, त्यास वर हाक मारून आण जा." हें ऐकून दासीनें त्यास वर बोलावून आणलें.

तो मनुष्य **विलासिनीच्या** ओळखीचा नव्हता, तथापि तो आपल्याच घरून आला आहे असें जाणून **विलासिनीनें** त्यास विचारिलें, "तूं केव्हां आलास ? निघाला होतास केव्हां ?"

**सेवक**—आज मला निघून दोन दिवस झाले, बाईसाहेब, मी हाच आलों. आतां निघण्याचें मात्र लवकर करावें, कारण आज कांहीं तरी पल्ला आला पाहिजे.

**विला०**—ही मी तयारच आहें, इतक्या दिवस दोन दोन डोळ्यांनीं रथाची वाट पहात होतें.

**सेव०**—निघावें तर आतां, सामान सुमान कोठें आहे तें रथांत मी नीट लावितों.

**विला०**—अरे, जरा संध्याकाळ होऊंदे, भर दिवसाचीं रथांत बसून ह्या तोंडानें आतां गावांत मी कशी मिरवूं ?

असें ह्मणते आहे तों तिच्या नेत्रांतून अश्रुधारा ढळढळा वाहूं लागल्या. परंतु सेवकानें तिचें बरेंच समाधान

केलें आणि तीस ह्मणाला, "बाईसाहेब, हें सातदा मनांत आणून काय उपयोग? आतां आपल्या पुढच्या सोई गैर सोईवर लक्ष दिलें पाहिजे. फार सायंकाळ झाला तर वाटेनें फार अंधार पडेल, आपल्यास आज निदान पांच सहा कोस गेलेंच पाहिजे. येथून पांच साडे पांच कोसांवर एक बाग आहे त्यास हिराबाग असें ह्मणतात. त्यांत उत्तम धर्मशाळाही आहे, तेथें आज आपण मुक्कामास जाऊं.

**विला०**—बरं, चला, निघा, निघून निघायचं, मग रात्र तरी कशाला करा; हें (सामानाकडे बोट दाखवून, बरोबरचं सामान इकडं ठेविलं आहे, तें रथांत घाला.

**विलासिनीने**—असें ह्मटल्यावर सेवकानें तें सर्व सामान रथांत नीट लाविलें आणि तीस ह्मणाला, "बाईसाहेब, आतां निघावें, सर्व तयारी झाली आहे."

हें ऐकून आपली विश्वासू **कमलिनी** दासी बरोबर घेऊन **विलासिनी** रथांत बसावयास निघाली, आणि आतां रथांत बसणार तों एक मांजर आडवें गेलें. तें पाहून तिच्या मनानें जरा कच खाल्ली. ती मनांत ह्मणू लागली, "इकडे देखील मेलं काय आहे कोण जाणं. घरून निघालें तेव्हांच कशी वेळ लागली होती!" असें मनांत ह्मणून ती चार पावलें पाठीमागें गेली आणि परत जाऊन रथांत बसली. रथ वगैरे भरून सर्व तयारी झाली तों अगदीं सायंकाळ होत आला, सुमारें एक घटका दिवस राहिला. सूर्य दिवसभर फिरल्यामुळें फार श्रम पावून सर्वांचा निरोप घेऊन विश्रांतिस्थानीं गमन करीत होता. लोक आपआपलीं कामें अटोपून इकडून तिकडे, तिकडू-

न इकडे जात येत होते. कित्येक कारखान्यावरील लोक दिवसभर श्रम करून नुकतेच मोकळे होऊन आपल्या उदरनिर्वाहाच्या निरनिराळ्या जिनसा दुकानांतून घेण्यास गुंतले होते. किती एक गाड्यांत बसून, कितीएक घोड्यांवर बसून, कित्येक हातांत काठ्या घेऊन पायांनीच नगरीबाहेर हवा खाण्यास निघाले होते. देवालयांतील पुराणें, कीर्तनें, भजनें आटोपल्यानंतर देवदर्शन घेऊन कित्येक वृद्ध पुरुष काठ्या टेंकीत टेंकीत, कित्येक हातांत रुमालानें देवालयांतील गर्दीमुळें व उष्णकाळामुळें आलेला तोंडाचा घाम पुसीत पुसीत, कित्येक वृद्ध व तरुण स्त्रिया हातांत तांदुळाचे प्याले व हरिद्राकुंकूमाची पंचपाळीं घेऊन देवालयाच्या बाहेर पडत होते. कित्येक तरुणांच्या टोळ्या त्यांतील तरुण स्त्रियांकडे पाहून आपआपल्या मंडळींत चेष्टा करीत निर्लज्जपणें रस्त्यांनीं फिरत होत्या. ह्याप्रमाणें त्या सायंकाळच्या गुजरीच्या वेळेस एकच गर्दी उडून गेली होती. अशा वेळीं त्या सेवकानें रथ मोठ्या त्वरेनें हांकून नगरीबाहेर आणला; तों सूर्य अगदीं अस्तास गेला; नगरींत ज्याप्रमाणें मनुष्यांची गर्दी होऊन गेली होती त्याप्रमाणें नगरीबाहेर पक्ष्यांची गर्दी उडाली होती. कित्येक पक्षी आपलें अन्न संपादण्यासाठीं सर्व दिवसभर श्रम करून निरनिराळ्या सुवासिक पुष्पवृक्षांवर व मधुर फळवृक्षांवर गायन करून आपले श्रम परिहार करीत बसले होते. अनेक निरनिराळ्या पक्ष्यांचे जमाव जणूं कांहीं राज्य कारभाराविषयींच विचार करण्यास अनेक वृक्षांवर आणि कुंपणावर बसले आहेत असें भासे. त्यांतील कित्येक बाकीच्यां पेक्षां उंचस्थानीं बसल्यामुळें त्यांनीं अध्यक्ष

स्थानच स्वीकारिलें आहे कीं काय असें वाटे. ह्याप्रमाणें तर मोठ्या महत्वाच्या कामांत गुंतले असतां कित्येक मांद्या घर कामाची व्यवस्था करण्यास, कित्येक आपल्या अज्ञान पिलांस चारा देण्यास मोठ्या सपाट्यानें कोठ्यां-कडे उडून जात होत्या. ह्याप्रमाणें पक्ष्यांचा चिवचिवाट, त्यांचे मधुर शब्द व त्यांचा त्या मैदानांत झालेला प्रति-ध्वनि ह्यांनीं ती शीतळ वेळ फारच रमणीय झाली होती. तशांत कित्येक गुराख्यांचीं मुलें नगरीबाहेर चरायास आणलेल्या गाया व गुरें नगरीकडे परत घेऊन जात होते. त्यांत कित्येक तोंडानीं पोंवरी वाजवीत, व कित्येक तोंडांनीं आपल्या आपल्या आवडत्या गुरांवरून गाणी गात. ह्याप्रमाणें त्या वेळेला फारच शोभा आली होती. परंतु ह्या गोष्टींनीं आपल्या **विलासिनीस** को-ठून सुख होणार? तिला वाटूं लागलें कीं, ह्या वेळीं आपले प्राणप्रिय जर आपल्या जवळ असते तर परस्प-राच्या विनोदपर भाषणानें परस्परांस किती सुख झालें असतें? मग ह्या पक्ष्यांची शोभा अवलोकन करून व त्यांतील नरमादीची क्रीडा पाहून मला समाधान करून घेण्याचें काय कारण असतें? ह्याप्रमाणें सर्वच सुखदा-यक पदार्थ त्या वियोगी स्त्रीस उलटे दुःखकारक वाटूं लागले. ह्याप्रमाणें दोन चार घटका गेल्यानंतर जिक-डे तिकडे स्तब्धता झाली, पक्षी आपआपल्या कोठ्यांत निद्रिस्थ झाले. चांदणें शुभ्र पिठासारखें पडलें. त्यांत अनेक गगनचुंबित वृक्षांच्या भयंकर पडछाया जिकडे तिकडे दिसूं लागल्या. त्यांतील एखादा वृक्ष हालला-ह्मणजे त्याचे छायेस चलन उत्पन्न होऊन कोणी भयंकर

पुरुषच आपल्याकडे येत आहे कीं काय असें **विलासिनीस** वाटावें. त्यांतून कांहीं झाडपान खडबडलें ह्मणजे तिच्या मनांत धसका बसून तिनें एकदम दचकावें. ह्याप्रमाणें सुमारें दहा घटका रात्र झाली. रात्र जिकडे तिकडे किर्र करूं लागली. **विलासिनीस** क्षुधा व तृषा ह्याही पिडूं लागल्या, तेव्हां तिनें त्या सेवकास विचारिलें, "अरे, ती धर्मशाळा किती लांब आहे, रात्र तर बरीच झाली.

**सेवक**—बाईसाहेब, धर्मशाळा आतां सुमारें एका हाकेवर आहे. आपण आतां तेथें लवकर पोहोंचूं. तेथें पाण्याची मात्र कधीं कधीं टंचाई असते, एवढ्यासाठीं रात्री पुरतें दोन तांब्े पाणी एथून जवळच पायऱ्यांची विहिर आहे तेथून आणण्यास दासीस सांगावें. नाहीं तर उगीच अडचण पडेल.

असें ऐकून स्वामिणीच्या सेवेंत सदा तत्पर अशी **विलासिनीची** दासी तीस ह्मणाली कीं, बाईसाहेब, मी दोन तांबे भरले घेऊन येतें.

**विला०**—आतां येवढ्या रात्रीं कुठग् जाशील?

**सेव०**—बाईसाहेब, ती विहिर फार लांब नाहीं. एथून जें डाव्या हातास आंब्याचें झाड दिसतें आहे त्याचखालीं आहे.

**क० दा०**—बाई साहेब, मी येतें हो घेऊन, कांहीं हरकत नाहीं.

**विला०**—बरें तर जा. पण जपून जा काळोखाची.

**विलासिनी** असें ह्मणाल्यावर **कमलिनी** दासीनें दोन तांब्े काढून घेतले आणि पाण्यास जाण्यास निघा-

ली, तेव्हां सारथी तीस ह्मणाला, "मी रथ पुढें हलके हलके नेतों, पाणी रथांत हिसक्यानीं सांडून जाईल, तूं हलकें हलकें ह्या रस्त्यानेंच पाठीमागून ये. ही समोर बाग दिसते आहे तींतील धर्मशाळेंत आह्मीं उतरतों." असें ह्मणून त्यानें रथ पुढें हाकलला आणि **कमलिनी** दासी पाणीं आणावयास गेली. रथ बराच पुढें गेल्यावर **विलासिनी** त्यास ह्मणाली, "अरे, ती धर्मशाळा अजून येत नाहीं, किती लांब आहे कोण जाणं? मग ती दासी इतकी लांब कशीरे येईल? त्या ठिकाणापासून रथ तर बराच पुढं आला असं वाटतं.

**सेव**०—ही जी आपल्या पुढें झाडी दिसत आहे तींतच बाग आणि धर्मशाळा आहे, ती फार लांब नाहीं; रथ जरा हलकें चालला आहे ह्मणून ती आपल्यास लांब वाटते.

असें ह्मणून त्यानें रथ आड रस्त्यास वळवून तेथें जवळ एक दाट झाडी होती तींतील बागेंत नेला आणि **विलासिनीस** ह्मणाला, "बाईसाहेब, हीच ती धर्मशाळा."

**विला**०—सोई वगैरे तर बरी दिसत्ये आहे, **कमलिनी** मात्र केव्हां येईल ती येवो.

**सेव**०—ती लवकरच येईल, आपण खालीं उतरून माडीवर चलावें. खालीं कांहीं यात्रेकरू ब्राह्मण उतरले आहेत असें दिसतें. त्यांचें खटलें बिटलें बरेंच मोठें दिसतें आहे. वर एक चांगली खोली आहे. तींत अंथरूण पांघरुणाची चांगली सोय असते, तीच आपण आपल्यासाठीं रातोरात मागून घेऊं.

**विला**०—काय आतां अशा खोल्यांना करायचं आहे? कुठें तरीं पाय पसरण्यापुरती जागा मिळाली ह्मणजे झालं.

**सेव०**—अरे आपण वर तर चला.

**विला०**—नकोरे, खालींच कुठं जागा पहा.

**सेव०**—नाहीं हो बाईसाहेब, खालीं कोठें जागा दिसत नाहीं. असती तर माझें काय जात होतें, आपण वरच चला.

असें ह्मणून रथांतील सर्व सामान काढून तो सेवक **विलासिनीस** वर घेऊन गेला, आणि एका सुंदर खोलीचें दार उघडून त्यानें तें सर्व सामान आंत लाविलें आणि **विलासिनीस** ह्मणाला कीं, आपण ह्या खोलींत स्वस्थ बसा. खालीं ब्राह्मण उतरले आहेत त्यांचा स्वयंपाक चालला आहे, त्यांतच आपले डाळ तांदूळ नेऊन देतों.

**विला०**—(ती सुंदर खोली व तींतील मंचक, बिछाना बिछाईत पाहून) अरे, आपल्याला ही खोली कशाला हावी? आणि आतां स्वयंपाकाचा बेत कशाला करवतोस? आतां का जेवणाची वेळ राहिली आहे? रात्र कशी तरी फराळावर काढूं ह्मणजे झालं.

**सेव०**—सोय असून फराळ कां? नसेल तेव्हां असो.

असें ह्मणून त्यानें बाहेर पडून दार ओढून घेतलें आणि दारास कडी घालून तो खालीं गेला. **विलासिनी** तेथें एका सतरंजीवर विचार करीत पडली. **कमलिनी** लवकर न आल्यामुळें तिजविषयीं तिच्या मनांत अनेक कल्पना येऊं लागल्या. ती मनांत ह्मणूं लागली, " ही **कमलिनी** केव्हां येईल ती येवो. केव्हां तिथं उतरली, त्याला कितीवेळ झाला पण अद्यापि कां येत नाहीं? रात्रीची कुठं पडली बिडली तर नसलना? काय बापडीची वाट झाली

आहे आणि काय नाहीं कोण जाणं, पाय बिय घसरला नसला ह्मणजे बरा बिचारीचा." ह्याप्रमाणें ती विचार करीत पडली आहे तों तो सेवक एका ब्राह्मणास बरोबर घेऊन आला. त्या ब्राह्मणानें **विलासिनी**समोर एक भोजनाचें ताट आणून ठेविलें. तें पाहून ती ह्मणाली, "इतक्या रात्रीं एवढी खटपट कशाला केली? रात्र कशी तरी काढली असती ह्मणजे झालं." हें ऐकून तो ब्राह्मण ह्मणाला, "त्यांत खटपट ती कसली? आह्मा सर्वांना स्वयंपाक करायचा होता, त्यांत पावशेर तांदूळ अधिक उकडविले.

असें ह्मणून तो ब्राह्मण निघून गेला. **विलासिनीनें** भोजन करून कांहीं शीतोदक प्राशन केलें. त्यामुळें तिला कांहीं समाधान वाटलें. नंतर ती त्या सेवकास ह्मणाली, "अरे, तूं आपल्या पुरतें करविलं आहेस का नाहीं? करविलं असलं तर जा जेवून ये. **कमलिनीची** तर काय वाट झाली कोण जाणं!" तेव्हां सेवकानें उत्तर दिलें "बाईसाहेब, मी आपल्या पुरतें करविलें आहे, आतां खालीं जेवावयास जातों. आपण आतां जरा अंग टाकावें. रथाच्या खडखडीमुळें अंग फार दुखूं लागलें असेल. **कमलिनी**पुरतें देखील करविलें आहे, पण ती केव्हां येईल ती येवो; तिचीच जरा वाट पहात होतों."

**विला०**—तिला उगीचं धाडली, इथे सारी सोय तर होती.

**सेव०**—आज तें ब्राह्मणाचें खटलें उतरलें आहे ह्मणून, नाहीं तर पाणी नाहींच मिळतें, मग उगाच अडचण पडती ह्मणून धाडली होती.

**विला०**—आतां ती केव्हां येणार, रात्रीची वाट वीट तर चुकली नसलना? तूं तरी जाऊन पहा तिला.

**सेव०**—बरें जातों, आपण जरा अंग टाका. मी आणतों तिला पाहून.

असें ह्मणून तो त्या खोली बाहेर पडून खोलीच्या दारास पूर्ववत खीळ घालून खालीं गेला. **विलासिनीनें** सतरंजीवर जरा अंग टाकिलें परंतु सर्वकाळ तिच्या मनांत प्रियपतीविषयीं अनेक कल्पना येत होत्या. रथाच्या खडखडीमुळें त्या सुकुमार स्त्रीचें अंग एकसारखें ठणकूं लागलें. आपलें घर तरी दृष्टी कधीं पडतें असें तिला होऊन गेलें. **कमलिनी** लवकर न आल्यामुळें तिच्याविषयीं देखील अनेक विचार तिच्या मनांत येतच होते. ह्याप्रमाणें शरीर व मन दुःखानें व्याप्त असतां तिला निद्रा तरी कोठून सुख देणार! सर्व दुःखी जनास त्यांच्या दुःखापासून विश्रांती ह्मटली ह्मणजे "निद्रा," तिनेंच त्या बापडीस सोडलें, मग विचारीची काय दशा सांगावी? ह्याप्रमाणें विवंचनेंत असतां कोणी जिन्यानें दडदड चढून माडीवर येत आहे असें तिला वाटलें. तेव्हां ही **कमलिनीच** उशीर लागल्यामुळें मोठ्या त्वरेनें येत असावी असें तिच्या मनांत आलें, आणि मोठ्या उल्हासानें सतरंजीवर उठून बसली. परंतु एकदा जिना वाजल्यावर पुन्हां कांहीं वेळ पर्यंत खडखड मुळींच ऐकूं आली नाहीं ह्मणून तिनें विचारिलें, "कोण आहेरे बाहेर?" परंतु तिला कोणी उत्तरच दिलें नाहीं ह्मणून ती स्तब्ध पडली. पुन्हां लागलीच आणखी खडखड ऐकूं आली तेव्हां तिला वाटलें कीं **कमलिनीस** काळोखांत खोलीचें एकदा दार सांप-

डलें नसेल ह्मणून ती पुन्हां खालीं विचारून आली असा-वी. असें मनांत येऊन ती दारांत गेली आणि **कमलि-नीस** हांक मारून दार उघडण्याकरितां ओढूं लागली तों एक पुरुष खाडकन दारउघडून कांपत कांपत आंत आला. **सेवक** फारसा संघटनांतील नसल्यामुळें व अपरात्रीमुळें डोळ्यांवर झोंपेची किंचित्सी आढी पडल्यामुळें **विला-सिनीस** वाटलें कीं, ही दासी नव्हे, हा **सेवकच** भोजन आटोपून आला आहे. असें मनांत येऊन तिनें त्यास विचारिलें, "अरे, दासी अद्यापि नाहीं का आली?" तेव्हां तो पुरुष तीस ह्मणाला, "प्रिये, त्याच दासी वांचून तुझें काय अडलें आहे? तुला लागतील तेवढ्या दासी तुझ्या समोर उभ्या करीन."

हे शब्द ऐकून ती एकदम दचकली. तिला वाटूं लागलें कीं सेवक असे शब्द आपल्यास कसे बोलेल? मी स्वप्नांत तर नाहीं ना? अशा अचंब्यांत पडून ती कांहीं वेळ स्तब्ध असतां तो पुरुष पुनः तीस ह्मणाला, "प्रिये, तूं आतां अशा संशयसमुद्रांत कां निमग्न झाली आहेस? आतां माझ्या शिवाय तुला दुसरें कोण आहे? मी आनंद पर्वताच्या शिखरावर बसून तुला त्याही पेक्षां उंच स्थानीं बसविण्याचें जें मी वचन दिलें आहे तें, प्रिये, माझ्या चां-गलें लक्षांत आहे. तें मी विसरलों असें तूं समजूं नको.

हे शब्द ऐकतांच **विलासिनीनें** त्या पुरुषाच्या तों-डाकडे न्याहाळून पाहिलें. तेव्हां ही **दुर्मतीची** स्वारी आली आहे असें तीस वाटलें व तोच पुरुष पूर्वीं "आनं-दपर्वता" विषयीं एकदा बोललेली गोष्ट पुनः बोलला, ती ऐकून हा खळ **दुर्मतिच** मला छळण्यासाठीं एथें

आला आहे अशी तिची पक्की खातरी झाली. हा दुष्ट ह्या स्थानीं कसा प्राप्त झाला असावा? मी येथें आल्याची ह्या चांडाळास कोणी बातमी सांगितली असावी? हा माझ्या टपणीवरच बसला होता कीं काय? सेवक कोठें गेला असेल? तो तरी आतां त्वकर वर येतो कीं नाहीं? ह्याप्रमाणें तिच्या मनांत अनेक विचार येऊं लागले. एखादा मनुष्य व्याघ्राच्या गुहेंत विसाव्यास राहून तेथें मध्यरात्रीं भयंकर व्याघ्र प्राप्त झाला असतां ज्याप्रमाणें त्याची स्थिति होते त्यापेक्षांही तिची अवस्था फारच चमत्कारिक होऊन गेली. व्याघ्रानें प्राणहानि केली असतां इतकेंच होणार कीं इहलोकीच्या सर्व सुख दुःखापासून आणि मनांत राज्य करणाऱ्या अशा दुराशांपासून एकदम मुक्तता होणार; परंतु जी खरी पतिव्रता आहे तिच्या पातिव्रत्यास डाग लागणें ह्मटलें ह्मणजे झाडास किडा लागून त्याचा नाश होण्याप्रमाणें त्या साध्वीच्या मनास हृद्रोग लागून जन्मपर्यंत दुःख भोगणें होय. **विलासिनीस** असें होऊन गेलें कीं, हा दुष्ट आतां दुरून बोलतो आहे, परंतु कांहीं वेळानें अंगास तर येऊन झोंबणार नाहीं? ह्या दुष्टाच्या तावडींतून सुटण्यास जरी मरण येईल तरी बरें. आतां काय उपाय करावा? ह्यावेळीं कोण आपल्यास सोडवील? ह्याप्रमाणें तीं दुःखांत असतां तिच्या मनांत आलें कीं आपण मंचकाच्या खुरावर किंवा खिडकीवर एकदा मस्तक आपटावें आणि प्राणहानि करावी ह्मणजे मग ह्या शरीराचें कांहींकां होईना? विपत्ति तरी किती भोगावी? असें मनांत येऊन ती स्तब्ध उभी आहे, भयानें पाय थरथरां कांपत आहेत, दात खडखडां वाजत आहेत, अशी तिची

स्थिति होऊन गेली आहे तों तो खळ तीस ह्मणाला, "प्राणवल्लभे, मनरंजने, तूं आतां इतकें भय कोणाचें वाळगते आहेस? तूं जर मला वश झालीस तर तुझें कोण काय करणार आहे? उलटी तूं ह्या सर्व देशाची स्वामीण होऊन जी आज्ञा करशील ती पूर्ण करण्यास हा सेवक तुझ्या सेवेंत सदा तत्पर राहील. प्रिये, तुझ्या मुखाकडे पाहून माझा कामाग्नि जो प्रदीप्त होत आहे तो तुझ्या शीतलालिंगनाशिवाय कधींही शांत होणार नाहीं. ह्या कामाग्नीपासून हें सर्व शरीर जळत आहे, त्याची तुला कशीगे दया येत नाहीं. तुझें कोमल अंतःकरण ह्या कामरूप व्याधिग्रस्ताविषयीं इतकें गे कां निष्ठुर? तूं आपल्या कोमल शरीररूप औषधवल्लीचा ह्या व्याधिष्ठास स्पर्श करशील तर हा सर्व दुःखापासून मुक्त होईल. मनरंजने, कांगे अद्यापि बोलत नाहींस? आतां किती अंत पहाणार? पहा, आतां माझे प्राण जाऊं पहात आहेत. ह्या कामानें पहा मला काय वेडें करून सोडलें आहे? प्रिये, खरोखरी आतां हें सर्व शरीर दग्ध होणार. पहा, दयेची जरी तुझ्या मनांत प्रेरणा होत नाहीं तरी आतां हत्येच्या पापास तरी भिऊन ह्या निर्बलास तार. पहा, हा काम, शक्ति असून निर्बळ करितो, ज्ञान असून अज्ञान करितो; पुरुषासारखा बलाढ्य प्राणी ह्या कामानें वेडा होऊन अबलांची विनवणी करतो, तेव्हां तो अबलांपेक्षां निर्बळ नव्हे काय? मोठेमोठे पुण्यशील व विद्वान, अप्सरादि सुंदरींच्या नादीं लागून आपल्या पुण्य कर्मास मुकले नाहींत का? तेव्हां त्यांना ज्ञान असून ते अज्ञान नव्हेत काय? वः, काय मी मूर्ख आहें, पुण्यास जरी मुकले तरीं मनांत आलेल्या स्त्रिया

त्यांस प्राप्त झाल्या तेव्हां ते लहान का भाग्यशील !! प्रिये, तुझ्या कृपावलोकनानें मी त्यांच्यापेक्षां देखील नाहीं का भाग्यशील होणार? मनव्यापके, आतां तुला ह्या दीनाची दया येऊं दे. ज्या गोष्टीपासून परस्परांस सुख व परस्पराचें हित, ती गोष्ट तूं कधीं अमान्य करणार नाहींस असी आशा बाळगून तुझी विनवणी करीत आहें, तर आतां सर्व संशय दूर करून आपल्या पुष्पवत् मृदु हस्तांची सुखपर माळ ह्या कंठस्थानीं घाल. पहा, तुझ्यासाठीं मी किती काळजीनें व श्रमानें झुरत आहें? कितीएक दिवस निद्रा ही तर मला ठाऊकच नाहीं. तुझी अलभ्य प्राप्ति व्हावी ह्मणून मी किती श्रम घेतले आहेत. तूं आपल्या श्वशुरास धाडिलेलें पत्र व त्याचें परत आलेलें उत्तर परभारें वाचण्यासाठीं जासुदांचा शोध किती बारकाईनें केला? आणि सरतेशेवटीं सारथ्या बरोबर रथ धाडून मी तुला किती युक्तीनें येथें आणविली आहे! ह्या माझ्या सर्व श्रमावर लक्ष देऊन तुझ्या कोमल अंतःकरणास द्रव फुटूंदे. प्रिये, आतां मला एक शब्दही पुढें बोलवत नाहीं. काय मी आपल्या मनाची स्थिति तुला सांगूं? प्राणापेक्षां दुसरें कांहीं प्रिय नाहीं परंतु तोही मला नकोसा झाला आहे. तो तरी किती यातना सोसं. ! त्याची तरी तुला दया येऊंदे. प्रिये, आतां तुझ्या अंतःकरणांत निष्ठुरता हीं ढगें फुटून, दया ह्या विद्युल्लता चमकूंदे आणि तूं आपल्या कृपावलोकनाचा मेघ वर्षून ह्या कामाग्नीनें पीडित झालेल्या पुरुषास शांत कर.

हे दुर्मतीचे शब्द ऐकून **विलासिनीस** फारच संताप आला. नेत्र गुंजप्रमाणें लाल होऊन गेले. सर्वांगास घाम

सुटला, शरीरास कांहीं विलक्षण स्फुरण आलें. अशा भयंकर मुद्रेनें दुर्मतीकडे पाहून ती ह्मणाली, अरे अधमा, हे शब्द उच्चारण्यास तुला लाजरे कशी वाटत नाहीं ? अरे घातक्या, इतके दिवस स्नेहभाव दाखवून शेवटीं खाटिकासारखा तूं विश्वासघात केलास अशी आतां माझी पक्की खातरी झाली आहे. आमच्या सर्व दुःखास, दुष्टा, तूंच कारण आहेस. विश्वासघातानं मेल्या तूंच कैदेंत ठेवलं. स ह्यांत कांहीं संशय नाहीं. दुसरा काय अपराध होता? चांडाळा, हा सारा खेळ माझ्या साठीं केलास आणि आज जी मी पामर झालें आहें तिजवर हा कहार गुदरविला आहेस. तुझ्या ह्या अपराधास ईश्वर कोणतं तरी शासन करील ? तुझ्या मनाला तरी काय वाटतं. कांहीं मेल्या, जनाची लाज नाहीं, पण ईश्वराचें तरी भय धर. मेल्या ह्या पापाचे झाडे कुठं देशील आणि किती जन्म घेशील ? चांडाळा, आतां इथून लवकर काळं कर. तुझं आतां तोंड देखील दाखवूं नको."

असें ह्मणून तिनें आपलें तोंड फिरविलें. ही तिची कृति पाहून आणि तिणें उच्चारिलेले शब्द ऐकून दुर्मतीस फारच त्वेष आला. त्याचीही फारच भयंकर मुद्रा दिसूं लागली. तो मोठ्या क्रोधानें तिला ह्मणाला, "अगे साध्वी, आतां तुझं पातिव्रत्य कसें आहे तें पहातों. तुझी जितकी विनवणी केली तितकी एखादा पाषाणाची केली असती तरी त्यास देखील पाझर फुटल्या शिवाय राहाता ना, परंतु तुझ्या निष्ठुर अंतःकरणांत काडीमात्रही दया आली नाहीं. मला पक्कें माहीत आहे कीं तुह्मी स्त्रिया गोडीनें सांगितलेलें ऐकणाऱ्या नव्हेत. तुह्माला

"उठतां लात आणि बसतां बुक्कीच" पाहिजे. बरें आतां पहातों कशी ऐकत नाहींस ती. (जरा शांत होऊन) बरें अद्यापि तरी गोडीनें ऐक. आपला छळ आपल्याच हातीं करून घेऊं नको. पहा, तुला वाटत असेल कीं हा दुर्मति तुजपासून एकदा सुख प्राप्त झाल्यावर तुझा त्याग करील परंतु हा तुझा जन्माचा सेवक होणार आहे. तुझ्या, मनांत येत असेल कीं तूं आपली प्रीति जर लवकर कबूल केलीस तर मी तुला उतावळी ह्मणेन परंतु इतका अंत पहाणारी जी तूं त्या तुझ्यापेक्षां खोल मनाची कोण असणार आहे? तूं आतां जर मला गोडीनें मान्य होशील तर तुझ्याकडे कोणताही दोष येणार नाहीं आणि गोडीनें कबूल न होशील तर मला बलात्कार करण्यास फारसे श्रम लागतील असें नाहीं आणि मग होऊन व्हायाचें तें होऊन गोडीनें कबूल झाल्यानें जें पुढें होणारें सौख्य त्यास व्यर्थ मुकशील. एवढ्या साठीं अद्यापि तरी नीट विचार कर. विचारानें वळेल तर बरेंच आहे, नाहीं तर तुझी स्थिति आतां बरी नाहीं. व्यर्थ तूं आपल्या ह्या कोमल शरीराचे हाल करून घेशील.

हे शब्द ऐकून **विलासिनी**ची पांचावर धारण बसली तिला वाटूं लागलें कीं, हा पापी आतां अंगास येऊन झोंबतो. आपल्या दुर्भाषणानें ह्याला फार संताप आला आहे तेव्हां आतां हा पाहिजे तें करील, ह्यांत कांहीं संशय नाहीं. हा पापी अंगावर आला असतां आपण निर्बलेनें काय करावें, आपलें ह्याच्या पुढें काय चालणार आहे, ह्याप्रमाणें अनेक विचार मनांत येऊन ती दुःखानें अगदीं बेफाम होऊन गेली आणि निराशेच्या त्वेषानें ती त्यास

ठाणें



ह्मणाली, "अरे मूर्खा, बडबड करूं नको ह्मणून सांगितलं आणि एथून काळं करावयास सांगितलं तरी पुन्हां बडबड करून माझ्या दु:खी अंत:करणावर डाग देतोस. दुष्टा, एथून लवकर निघून जा. जातोस का नाहीं."

**विलासिनीचें** हें भाषण ऐकून दुर्मतीच्या क्रोधाग्नीस अधिकच ज्वाळा येऊं लागल्या आणि तिच्या पातिव्रत्याची त्याला आतां आहुती होते असें वाटूं लागलें. तो तीस ह्मणाला "तूं फुटक्या कपाळाचीच, त्याला उपाय काय? भोगणें आहे तें चुकावें अशी बुद्धि तुला कोठून उपजेल? मीं तरी आतां काय करावें? आपल्या कर्तव्याप्रमाणें सांगावें तितकें लाडीगोडीनें सांगून आतां दमलों, परंतु तुझें दुर्दैव तुला तुझें कल्याण कसें सुचूं देईल? जर तूं गोडीनें कबूल नाहींस तर आतां काय होतें आहे तें पहा." असें ह्मणून कामानें अगदीं वेडा होत्साता तिच्या पदरास हात घालण्यास तो पुढें सरसावला, आणि आतां तिच्या अंगावर हात टाकणार इतक्यांत तिच्या मनास मोठा त्वेष येऊन तिनें मोठ्यानें आरोळी फोडली आणि नेत्र वटारून मोठ्या क्रूर मुद्रेनें त्याजकडे पाहून ह्मणाली, "अरे चांडाळा, पाठीमागें सर, नाहीं तर ह्या मंचकाच्या खुरावर मस्तक अपटून चूर्ण करून घेईन, मग मेल्या ह्या शरीराचें हवें तें कर."

असें त्या पतिव्रतेच्या मुखांतून तीव्र बाण सुटतांच त्या दुष्टाच्या अंत:करणास मोठमोठीं भगेंद्रें पडून त्यांतून दुष्ट वासनेनें बाहेर पळ काढला. त्याचे हस्तपादादि अवयव अगदीं मंद पडले. दुष्ट कृत्यास पुढें केलेला हात अगदीं मोडून पडला. ह्याप्रमाणें त्याची फारच चमत्कारिक स्थिति



होऊन गेली. अहा हा! काय ह्या पातिव्रत्याची अपरीमित शक्ति!! अबला जी, तिलाही हें विलक्षण शक्तिमान करतें. दुष्टांनीं मनांत केलेले मोठमोठे बेत ह्यासमोर ठिकच्या ठिकाणींच रहातात. खरोखरीच ही गोष्ट सर्व स्त्रियांनीं पक्की लक्षांत ठेवण्याजोगी आहे. ज्यांना ह्या अपरिमित शक्तिमानाचें संरक्षण आहे त्यापुढें दुष्टांच्या दुष्ट बेतांचें काय चालणार आहे?

**दुर्मतीची** अशी स्थिति झाल्यानंतर हिरमुसल्या तोंडानें तो खोलीबाहेर पडला, परंतु जरा त्या साध्वीच्या दृष्टी आड झाला नाहीं, तोंच पुनः त्याच्या मनाला विलक्षण हुरूप आली. पुनः मोठा निश्चय करून तो **विलासिनी-च्या** अंगावर चाल करून गेला आणि तिच्या हातास हात घालणार तों ती मंचकाकडे एकदम धांवत गेली आणि मोठया क्रोधानें ह्मणाली, "अरे चांडाळा, मघाशीं ह्मणा-ल्याप्रमाणं मीं आतां मस्तक आपटून तुझ्या पायाशीं रक्ताचं शिंपणं करतें. मग मेल्या कर हवं तें." असें ह्मणून मस्तक जों आपटणार तों **दुर्मति** जरा मागें सरला. त्यास वाटलें कीं, ही खचीत प्राणहानि करील इतकी ही खवदळून गेली आहे. हिनें रागाच्या सपाट्यांत भलतें सलतेंच केलें तर आपला सर्वच बेत व्यर्थ जाईल. एवढ्यासाठीं आतां विषेश यत्न करून उपयोग नाहीं; सोई सोईनें साधेल तसें साधलें पाहिजे. सध्यां ही तर आपल्याच हातांत आहे; आतां जाते कोठें? आपला बेत केव्हां तरी सिद्धीस नेण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं. असें मनाचें समाधान करून तो परत जाण्यास निघाला आणि **विलासिनीस** ह्मणाला, अगे दुष्टे, तूं आज जरी कबूल होत नाहींस तरी आतां

कोठें जाशील? आतां तूं पूर्णपणें माझ्या तावडींत सांपडली आहेस. मी आपली कामना हव्या त्या वेळीं पूर्ण करीन हें पक्कें लक्षांत ठेव. गोडीनें वश होऊन अलभ्य सुखाची प्राप्ति करून घ्यावी हें तुझ्या नशीबींच नाहीं त्याला काय करावें? तुझ्या कपाळींच हाल, त्याला तूं काय करशील? बरें आतां आपल्या कर्माप्रमाणें भोग!!

असें ह्मणून तो त्या खोलीबाहेर पडून दारास खीळ घालून चालता झाला. तो गेल्यामुळें आजचें मरण उद्यावर जाऊन ज्याप्रमाणें क्षणिक सुख व्हावें त्याप्रमाणें **विलासिनीस** कांहींसें समाधान वाटून थोडा धीर आला आणि ती सतरंजीवर जरा बसली; परंतु अशा दुःखी प्राण्यास क्षणभर तरी स्वस्थ कोठून बसवतें! तिची दृष्टी खोलीच्या दाराकडे गेली आणि तो दुष्ट पुनः येईल कीं काय असें भय वाटूं लागलें. परंतु कांहीं वेळानें तिच्या मनांत एक विचार आला कीं, खोलीच्या दारास आंतून खीळ घालून घेतली ह्मणजे त्या दुष्टाचें कांहीं चालणार नाहीं; मग अन्न पाणी न मिळालें तर ह्या विपत्तीपासून सुटका होऊन परलोकींच्या तरी सौख्याची प्राप्ति होईल. असें मनांत येऊन तिणें खोलीच्या दारास आंतून खीळ घालून घेतली. नंतर कांहींशी निर्घोर होऊन तेथील एका सतरंजीवर तिणें आंग टाकलें. रात्र बरीच झाल्यामुळें तिचा किंचित्सा डोळा लागला. दुसऱ्या दिवशीं बराच वेळ झाल्यावर कांहीं सेवक तिला अन्न पाणी घेऊन आले, परंतु ती खोलीचें दार उघडीना. त्या सेवकांनीं पुष्कळ यत्न केला परंतु तो अगदीं निष्फळ झाल्यावर त्यांनीं ही बातमी **दुर्मतीस** कळविली. ती ऐकून **दुर्मति** जरा चिंताक्रांत

झाला; परंतु इतक्यांत एक सेवक त्यास ह्मणतो, "महाराज, आपण इतकी काळजी करण्याचें काय कारण आहे? पोटांत आग पडली ह्मणजे आपोआप दार उघडील आणि सर्व बेत सिद्धीस जातील, नच उघडील तर पाठीमागच्या खिडकीच्या फळ्या अद्यापि उघड्याच असतील, कारण त्या लावण्याचें कारण विशेषसें लक्षांत आलें नसेल. तेथें हलकेच शिडी लावून वर चढावें आणि खिडकीच्या फळ्याच काढून टाकाव्या ह्मणजे वर चढून जाण्याच्या नित्य क्रमास देखील अडचण येणार नाहीं. ह्याप्रमाणें तो सेवक ह्मणाल्यावर कांहींसा धीर येऊन **दुर्मतीनें** खिडकीस शिडी लावून **विलासिनीस** प्राण संरक्षणापुरतें अन्न पाणी नेऊन देण्यास सेवकांस सांगितलें. नंतर कांहीं सेवक त्या खिडकी खालीं गेले तों दैवयोगानें तिच्या फळ्या उघड्याच होत्या. खिडकीस शिडी लावून ते वर गेले. त्यांना पहातांच **विलासिनीस** फारच भय वाटलें, हे यमकिंकरच आले आहेत कीं काय असें तिला वाटूं लागलें. ती मनांत ह्मणूं लागली कीं, ही खिडकी लावून घेण्याचें मला माझ्या दुर्दैवानें कसें सुचूं दिलें नाहीं? आतां ह्या अरिष्टा पुढें काय करावें? असें जों ह्मणत आहे, तों त्यांत कोठें **दुर्मती** आला नाहीं असें पाहून तिला कांहीं समाधान झालें. तिला वाटलें कीं, हे सेवक मला अन्न पाणी देण्याकरितां आले आहेत. ह्यांपासून मला कांहीं इजा होणार नाहीं. हे एकदा अन्न पाणी ठेवून गेले ह्मणजे खिडकीस देखील खीळ घालून घ्यावी ह्मणजे त्या दुष्टाचें कांहीं चालणार नाहीं. असा जों विचार करते आहे तों ते सेवक अन्न पाणी ठेवून खिडकीच्या फळ्या काढून घेऊन चालते

झाले, तें पाहून **विलासिनीच्या** चित्तांत मोठा धक्का बसला. नवीन गुदरलेल्या अरिष्टापुढें कांहींच उपाय नाहीं असें पाहून ती फार भिऊन गेली. अन्न पाणी जरी पुढें आणून ठेविलें होतें आणि बराच वेळ झाल्यामुळें क्षुधेनें व तृषेने जरी पीडली होती तरी तें तिला ग्रहण करवेना. परंतु कांहीं वेळ ह्याप्रमाणें दुःखांत निमग्न असतां, तिच्या मनांत किंचितसें समाधान वाटण्याजोगा एक विचार आला. तो हा कीं दुर्मति जर येऊन दांडगाई करूं लागला तर ह्याच खिडकींतून खालीं उडी टाकावी ह्मणजे प्राणनाश होण्यास फारसे श्रम लागणार नाहींत, असें मनांत येऊन तिचें बरेंच समाधान झालें.

वाचकहो, ह्या गोष्टीपासून सुख दुःखाचा कसा निकट संबंध आहे, व त्याच्या कशा पाळ्या आहेत हें तुमच्या उघड दृष्टोत्पत्तीस येईल. ज्या ठिकाणीं सुख आहे त्या ठिकाणीं दुःख आपला खचीत प्रवेश करणार व दुःखा-पाठीं सुखाची पाळी खचीत येणार. ह्याप्रमाणें इह लोकींच्या सर्व पदार्थांस रहाटगाडग्याप्रमाणें फेरफार अथवा अदलाबदल आहे. आतां केव्हां केव्हां एक गोष्टीचा वास दुसऱ्या गोष्टीपेक्षां अधिक दिवस असेल; परंतु तिची अदलाबदल झाल्याशिवाय खचीत रहाणार नाहीं.

---

## भाग ७.

वाचकहो, **सोमकांताचे** पूर्वीं सांगितलेले हाल तुमच्या लक्षांत असतीलच. मानसिक दुःखानें व शारीर भोगांनीं त्याची प्रकृति इतकी क्षीण होऊन गेली होती कीं, जागच्या

जागेवर उठून बसण्याचें देखील त्याच्या अंगीं सामर्थ्य रा-
हिलें नव्हतें. जे त्यास अन्न पाणी आणून देत ते, बापड्या-
स, भाकरीचे तुकडे न खाववले ह्मणजे लत्तामुष्टींची पूजा
अर्पण करीत. ह्याप्रमाणें दिवसांदिवस त्याची फारच
कठीण अवस्था होत चालली. चिरगुट पांघरूण नसल्या-
मुळें डांस, पिसा, त्यास गांजून घेत. हंतरावयास कांहीं
नसल्यामुळें जमीनीचा गारठा लागून सर्व अंग तिडकत
असे. लत्तामुष्टींच्या प्रहारानें सर्वांगास सूज आली होती. अरे
रे! कोणरे हे हाल!! अशा प्राण्यास ह्याप्रकारचें दुःख
भोगण्यास ईश्वरानें जन्मास घातलें नसतें तरी बरें. किती
ह्मणून बिचाऱ्यानें दुःख भोगावें? काय बिचाऱ्याच्या पद-
रीं पाप होतें कोणजाणें. ह्याप्रमाणें **सोमकांत** आपल्या
आयुष्याचा क्षणक्षण मोजीत असतां त्या कारागृहावरील
भयंकर यमास अथवा ह्याच्या दुष्ट किंकरास त्याची तिळ-
मात्रही दया येत नसे. कारभाऱ्यानें होतील नितके हाल
करण्यास सेवकांस नित्य आज्ञा देत असावें. **दुर्मतीस** ह्या-
ची अशी स्थिति ऐकून अधिकाधिक आनंद होत असे.
त्यास वाटे कीं, आपलें सर्व मित्रमंडळ आपल्या अनाचार-
रूपी प्रकाशास उत्तेजन देत असतां हा दुष्ट आपल्यास रा-
हू प्रमाणें ग्रहणग्रस्त करीत असे. **वीरसेनाच्या** वेळीं तर
ह्यानें आपलें कांहींच चालूं दिलें नाहीं. आपल्या कोणत्या-
ही बेतास हा कधींच अनुकूळ झाला नाहीं. बरें, आतां
तर ह्याची प्रारब्धरेषा माझ्या पुर्ती हातीं आली आहेना?
आतां पाहिजे तशी ती वांकविण्यास मीं कां कमीं करावें!

ह्याप्रमाणें तो नित्य विचार करीत असतां एका दिव
शीं रात्रीं ह्मणजे ज्या दिवशीं आपण **वीरकांत** व **रूप**

वती ह्यांचा विनोद पाहिला त्याच रात्रीं **दुर्वीर्यादि** चांडाळ चौकडी पानसुपारी खात एकमेकांच्या अंगावर पिंक्या टाकीत **दुर्मति** आपल्या रंगमहालांत क्रीडा करीत बसला आहे, इतक्यांत तेथें कारागृहावरील कारभारी आला. त्यास पाहून **दुर्मति** ह्मणाला, "कां, आज वाट कोणीकडे चुकलां! भलेंबुवा तुह्मीं, पंधरा पंधरा दिवस तर तोंड देखील दाखवीत नाहीं.

**कारभारी**—आतांशी कामांची फार निकड असते; बंडाप्रकरणीं कैदीलोकांचें तर जहाजच फुटलें आहे. रोज नवे दोन चार आहेतच. केव्हां खपतील ते खपोत. बरें, तें असो, आज सरकारास एक बातमी कळविण्यास आलों होतों.

**दुर्मति**—कसली ती बातमी ?

**कारभारी**—महाराज, **सोमकांताचा** सेवक **रणधीरसिंग** ह्याला कारागृहांतलि यातना न सोसल्यामुळें त्याणें चार दिवसांपूर्वीं परलोकास गमन केलें.

**दुर्म०**—बरें, मग ह्यांत मोठी बातमी ती कसली! कारागृहांत आजपर्यंत हा पहिलाच का कैदी मरण पावला ?

**कार०**—नाहीं सरकार, तितकेंच नाहीं, त्याचे यजमान, सरकारचे मोठे विश्वासू, परम मित्र, **सोमकांत** ह्यानेंही आज त्याचा पाठलाग केला; बिचारा यातना सोसतो किती ?

**दुर्म०**—झालें, सोमकांतानेंही आपलें आटोपलें काय? आमचा हो स्नेह तो कसला? बरेंबुवा, तुह्मी न थट्टा कराल तर काय तुमचीं मुलें करतील? ( मोठा आनंदाचा श्वास टाकून) भलें झालें. कां **दुर्वीर्य**, साधलें कीं नाहीं अर्धें का-

र्थ, खरोखरीच ह्या कामांत तुझे जे आमच्यावर उपकार झाले आहेत, ते आमच्यानें अनेक जन्मपर्यंत फिटणार नाहींत. भारीभेटा, साऱ्याकामांत आपल्याला आडवा. बरें, आतां **विलासिनी** किती दिवस दम धरिये तें पहातों! धर्मापासून तर ती मुकत नाहींना? मजसारख्या शिवाय दुसऱ्या कोणावर ती आतां प्रीति करणार आहे? सर्व आशा तिनें **सोमकांतावर** ठेविली होती, आज तर ते खपले? भलें झालें बेटे.

**दुर्वीर्य**०—सरकार, आमचे ते आपल्यावर उपकार कसले? आह्मीं आपला सेवक धर्म तो केला, बरें त्यांत सरकारचें अर्धें कार्य साधलें ह्मणून बरें झालें. सरकार मात्र आमच्या सारख्याच्या कामना, पूर्ण करण्यांत गुंतले आहेत हें का आमचें लहान भाग्य?

**दुर्म**०—कां? तुह्मीं आमच्या कामास झटावें, आणि आह्मीं तुमची अगदींच का काळजी करूं नये? **दुर्वीर्या**, आतां सर्व सुखसोहळा लवकरच पहाशील हो! गोष्ट सारी एक दिवसावरच आली आहे. आतां अगदीं काळजी करूं नको. एक दोन दिवसांतच सुखाची रात्र येते आहे.

**दुर्वी**०—सरकारा सारखे ज्या कामांत झटत आहेत, त्या कामांत आह्मीं काळजी कशाला करावी?

**दुर्म**०—**दुर्वीर्या**, मग आमची आठवण होऊं देत जा हो. नाहीं तर अगदींच विसर पडेल. आमचें कामही तुझ्या सारखेंच आहे. त्यांत मदत करण्यास विसरूं नको.

**दुर्वी**०—सरकार, बरोबरच आहे. आपल्या सारखा मित्र जर चेष्टा न करिल तर ह्याच सुखाचें माहात्म्य कशानें

वाढणार आहे? नवीन ऋतु प्राप्त झालेल्या तरुणीची आणि तिच्या पतीची अनेक तरुण मुली आणि पुरुष थट्टा करतात तेव्हां त्यांना केवढा आनंद होत असेल! उघडच आहे, त्या सुखाचें माहात्म्य अशानेंच वाढतें.

दुर्म०—बरें चला, तें आतां असूंद्या. आतां एकदा **सोमकांतास** पाहून येऊं. कांहो, **कारभारी**, चलताना?

**कार**•—आतां रात्र बरीच झाली आहे, आपण कशाला येतां?

**दुर्म**•—रात्र आह्माला काय करते आहे? सहज मौजेनें फिरून येऊं.

**कार**•—बरें आहे, चलावें, मी ही बातमी सरकारास (**कुमित्रास**) कळवून येतों, आपण येथें असा.

**दुर्म**०—नको, तुह्मींच कळविण्यास कशास हवेत! आह्मींच परत आल्यावर कळवूं.

**कार**०—बरें आहे, चलावें.

असें ह्मणून तेथून सर्व मंडळी उठली आणि चार पांच मशाली बरोबर घेऊन कारागृहाकडे चालती झाली. त्या वेळेस रात्रीचे सुमारें अकरा वाजले होते. सर्व कैदी दिवसा अनेक कष्ट भोगून आपापल्या कोठड्यांतून पडले होते. कित्येक निरपराधी प्राण्यांस आपल्या बायका पोरांची, कित्येकांस मातापितरांची, कित्येकांस स्नेहमंडळीची आठवण येऊन ते शोकांत निमग्न झाले होते. कित्येक ह्या दुःखसागरांतून केव्हां मुक्तता होईल ह्या विवंचनेंत होते. कित्येक आपल्या जड शृंखळांपासून होणाऱ्या विपत्तीचा सूड उगविण्याविषयीं अनेक विचारांत निमग्न झाले होते. कित्येक शारीर भोगानें व्याकुळ झाले होते. हातांपायांतील

विड्या न सोसून कित्येकांच्या सर्व शरीरास सूज आली होती. कित्येकांचें अंगमास एकसारखें तिडकूं लागलें होतें. खरोखरीच यमलोकींच्या यातना ज्या ह्मणतात, त्या इह-लोकीं भोगण्याचें ठिकाण हेंच होय.

अशा वेळीं ही मंडळी कारागृहाचीं कुलुपें व दारें खडाखड उघडीत पुढें मशाली घेऊन जेव्हां आंत दणा-णत गेली, तेव्हां त्या बापड्या कैदी लोकांस असें वाटूं लागलें कीं, ही यमराजाचीच स्वारी मृत्युलोकीं आगमन करून आह्मांस गांजण्यासाठीं येत आहे कीं काय? असें मनांत येऊन ते मोठ्या श्रमानें उठून बसले. तों ही स्वारी नीट **सोमकांताच्या** कोठडीकडे गेली. कारभारी पुढें होऊन त्यानें दार उघडिलें. आंत पाहतात तों प्रेत पडलें आहे. त्याच्या अंगातोंडावर एक जुनेंसें जाड वस्त्र घातलें आहे. सर्व शरीर अतिशयित कृश होऊन गेलें आहे. मरणापूर्वीं पायांचे जरा खोटे वळले होते ते तसेच आहेत. मरणसमयीं पाणी मागण्यासाठीं हात जरा पुढें केला होता असें वाटतें तो हात तसाच आखडून पडला आहे. अरेरे, अशी दशा पाहून यमकिंकरास देखील दया आल्याशिवाय रहाणार नाहीं. परंतु **दुर्मतीस** त्याचें कांहींच न वाटतां त्यानें हातांतील काठीनें त्या प्रेतास हलविलें. प्रेतावर वस्त्र चांगलें गुंडाळून घातलें होतें. ह्मणून तें सरकलें नाहीं; नाहीं तर प्रेतावरील प्रेतकळा दृष्टी पडून सर्वांस रडूं कोसळल्याशिवाय राहतें ना. नंतर **दुर्मति** मोठ्या आनंदानें त्या दुष्ट मंडळासह परत गेला. पुढें त्या कारभाऱ्यानें चार असामीस बोलावून आणिलें आणि तें प्रेत त्यांजकडून नेवून एका खाचेंत पुरविलें, त्या प्रे-

ताची दशा पाहून त्या चार असामीस देखील वाईट वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. ते ह्मणूं लागले कीं, ह्या प्राण्यानें काय अपराध केला होता कोणजाणे. काय बापड्याचे हाल? अरे रे! ह्याचा अन्नापाण्यावांचून प्राण गेला आहे, ह्यापेक्षां एखादा पर्वत कोसळून त्याखालीं चुरा होऊन जरी मरता, तरी बरा. ह्याप्रमाणें त्यांस फारच वाईट वाटलें. परंतु बापडे करतात काय? त्यांनीं मोठ्या दुःखानें त्या प्रेताची विधिवाट लाविली आणि ते चालते झाले.

वाचकहो, आठव्या भागाच्या शेवटीं **वीरकांत व रूपवती** ह्यानां निद्रिस्थ ठेवून अशा भयंकर गोष्टी आपण पाहिल्या. आतां आपण त्या सत्पुरुषाविषयीं व त्या सद्गुणी स्त्रीविषयीं विचार करूं.

**सोमकांताच्या** मरणाची दुसऱ्या दिवशीं सर्व नगरींत बातमी पसरली. **वीरसेनाच्या** वेळचे जे कित्येक सद्गृहस्थ होते, त्यांना ही बातमी एकून फार वाईट वाटलें. बंडांत जे लोक गुंतले होते त्यांना तर फारच त्वेष आला. **वीरकांत** निजून उठतो आहे, इतक्यांत एक सेवक ही बातमी त्याला कळविण्या करितां दारांत उभाच होता. ही बातमी ऐकतांच **वीरकांताच्या** दुःखावर डाग बसल्याप्रमाणें झालें. त्याला वाटूं लागलें कीं आज तर गायगरीबांचें घरच बुडालें. कोणा शाहाण्यानें ह्या नगरींत रहाणें आतां अगदीं बरोबर नाहीं. दुःखानें त्याचें मन इतकें वेडें होऊन गेलें कीं, त्याला त्या नगरींत एक क्षणभर देखील रहावेंसें वाटेना. त्यानें निश्चय केला कीं, आपण आज येथून वेताप्रमाणें निघून गेलेंच पाहिजे. आतां नेमल्यावेळापेक्षां एक क्षणही अधिक लावून उपयोग

नाहीं. असा निश्चय करून त्यानें सर्व तयारी केली.

दोन प्रहरचें उन्ह टळतांच चुलत्याचा निरोप घेऊन आपल्या स्त्रीसहवर्तमान एका रथांत बसून बरोबरच्या सर्व मंडळीनिशीं तो निघाला. त्यावेळेस नगरींतील पुष्कळ सद्गृहस्थ त्याला पोहोंचविण्यासाठीं आले होते. तेही त्याच्या बरोबर नगराच्या सीमेपर्यंत गेले. **दुर्मति**ही आपल्या बंधूस पोहोंचविण्यासाठीं सर्व लोकांबरोबर नगराच्या सीमे पर्यंत गेला होता. त्या सर्व लोकांस भेटून आणि चांगल्या रीतीनें रहाण्याविषयीं चार गोष्टी सांगून **वीरकांतानें** त्यांना निरोप दिला. नंतर **दुर्मतीस** मोठ्या प्रेमानें भेटून परत जाण्यास सांगितलें. **वीरकांताच्या** व सर्व मंडळीच्या नेत्रांतून त्या वेळीं एकसारख्या अश्रुधारा चालल्या. एकमेकांचे कंठ इतके दाटून गेले कीं त्यांस मन मोकळें करून सुद्धां बोलवेना. **वीरकांत** सर्वांच्या तोंडाकडे व सर्व जण **वीरकांताच्या** तोंडाकडे टकमक पाहूं लागले. **दुर्मति** आपल्या मित्र मंडळी पैकीं **दुर्वीर्य** व दुसरे कांहीं लोक मोठ्या आग्रहानें बरोबर देऊन **वीरकांतास** लवकर परत येण्याविषयीं सांगून सर्व मंडळीसहवर्तमान परत आला. ती संध्याकाळची वेळ, आधींच उदास, त्यांत **वीरकांतास** पोहोंचवून जी मंडळी आली होती, त्यांत कित्येकांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या होत्या, कोणी डोळे पुसीत होते, कोणी मोठे दुःखाचे सुस्कारे टाकीत होते, ह्याप्रमाणें ती वेळ फारच उदास अशी वाटूं लागली.

**वीरकांताची** स्वारी जों नगरी बाहेर आली, तों सुमारें अर्धघटका दिवस राहिला. त्यावेळीं **सोमकांता** सारख्या

सत्पुरुषाच्या मरणाची वार्ता कळून जणूं सूर्य अगदीं क्रोधानें आरक्त होऊन गेला होता. त्याप्रमाणेंच सर्व आकाशासही रंग चढून त्याच्या छायेनें मैदानेंही तांबूस दिसत होतीं. तशांत वीरकांताबरोबरचे सर्व लोक मोठ्या सपाट्यानें चालले होते त्यामुळें धुरळा उडून अगदीं अंधकार होऊन गेला होता. त्यांत रथाच्या चाकाचा घडवडाट, घोड्यांच्या खुरांचा दणदणाट, वैशाख कृष्ण पक्षाचे ह्मणजे अगदीं अखेरीचे दिवस असल्या कारणानें मोठा प्रभंजन सुटून झाडापानांचा खळखळाट, स्वारींतील लोकांच्या खडखडति पोपाखाचा फडफडाट होऊं लागल्या मुळें एकच गर्दी उडून गेली होती. तशांत वीरकांतासारखे मोहरे, सोमकांता सारख्या सद्गुणी पुरुषाच्या भयंकर मरणानें फार उदास झाले होते. सारांश या वेळेस कांहीं चमत्कारिक उदासीनता आली होती.

अशा वेळीं ही स्वारी सुमारें सात आठ कोसांवर गेली, तों काळोख मिट्ट पडला. पुढें कांहीं दिसेनासें झालें, मग ते एका मैदानांत, जेथें कांहीं सेवक जनांनीं पुढें येऊन तंबू राहुट्या वगैरे दिल्या होत्या, तेथें उतरले. रात्रीचा विसावा घेतल्यानंतर ते पुढें चालते झाले. असे सुमारें आठ दहा मजला गेल्यावर, निरनिराळे प्रदेशाचे निरनिराळे चमत्कार, व निरानिराळ्या गावांच्या निरानिराळ्या रीतिभाती पाहून वीरकांतास बरेंच समाधान वाटलें. सर्व दिवसाच्या दगदगीनें रात्रीची त्याला उत्तम निद्रा येत असे, त्यामुळें अनेक विकल्पांपासून त्याचें मन मोकळें होई, आणि दुसरा दिवस फार आनंदानें जात असे. दहाव्या दिवशीं सायंकाळीं स्वारी एका

मोठ्या मैदानांत उतरली. तें मैदान फार विस्तीर्ण होतें व त्याच्या बाजूनें एक लहानशी नदी वहात होती. त्या मैदानाच्या मध्यभागीं **वीरकांताचा** मोठा भरजरी डेरा व त्याच्या सभोंवतीं इतर मंडळीच्या लहानसहान तंबू राहुट्या अशा दिल्या होत्या. मुक्कामास उतरल्या नंतर जिकडे तिकडे दिवे लाविले. स्वयंपाक्यांची व वाढप्यांची एकच गर्दी उडून गेली. कोठवळे आपल्या ताब्यांतील सामानाची एकसारखी नेआण करूं लागले. ह्याप्रमाणें कांहीं वेळ गेल्यावर सर्वांचीं भोजनें आटोपल्या-नंतर जो तो आपल्या तंबूंत निजावयास गेला; जिकडे तिकडे स्तब्धता होऊं लागली, कित्येक आपल्या दुसऱ्या दिवसाच्या तयारीविषयीं विचार करूं लागले. कित्येकां-च्या मनांत आपल्या घरा दारा विषयीं व बायका मुलांवि-षयीं विचार येत होते, कित्येक तरूणांच्या मनांत वियोगाचे उकाळे येत होते, प्रीतीचा व्यापार मोठ्या झपाट्यानें सुरू होता व अशा वेळीं **वीरकांत रूपवतीच्या** सुकुमार अंगावर हात टाकून आपल्या डेऱ्यांत स्वस्थ पडला होता.

वाचकहो, **वीरकांताचें** मन इतक्या दिवस फार उ-दास होतें, त्यामुळें **रूपवतीचा** व त्याचा जो विनोद झाला असेल तो लक्ष देण्यासारखा नव्हता. परंतु निर-निराळ्या प्रदेशाचे अनेक चमत्कार पाहून मागें सांगितल्या-प्रमाणें त्याच्या मनास जरा समाधान झाल्यावर त्यांची जी विनोदक्रीडा, ती पाहून दुःखी अंतःकरणास देखील समाधान झाल्या शिवाय खचीत राहणार नाहीं. **वीरकांत रूपवतीस** मोठ्या प्रेमानें ह्मणतो, "कां, कसें आहे प्रवा-साचें सुख तें समजलें ना?"

रूपवती—मला एकटीलाच समजलं असेल! आणि कमी तरी कोणतं पडलं आहे?

वीर०—दोन प्रहरचा बाग आणि रात्रीचा रंगमहाल आतां आहे का?

रूप०—तळ्यांत पाणी पुष्कळ आहे आणि सूर्याचा प्रकाश नाहीं तर कमलिनी विकसित होतील का?

हें रूपवतीचें भाषण ऐकून आपणास ह्यांत हिनें जिंकिलें असें वाटून त्याच्या मनास फारच उल्हास झाला. त्यानें तिच्या सुकुमार शरीरास दृढालिंगन दिलें. तिचें सुहास्य वदन अवलोकन करावें अशा हेतूनें तिच्या भाषणावरून आपण सूर्यच आहों असें मानून, आपल्या शब्दरूपी तेजस्वी किरणांचा त्या कमलिनीवर तो प्रकाश पाडूं लागला. तेव्हां कमलिनीप्रमाणें विकसित झालेल्या तिच्या सद्गदित हृदयापासून जो मधुर सुगंध सुटूं लागला तो, वाचणारहो, कित्येक स्त्रियांच्या घ्राणेंद्रियांस जे कठोरतेचे दडे बसलेले असतात ते काढल्यावांचून खचीत रहाणार नाहीं. ती वीरकांतास ह्मणाली, "मला आतां बरोबर घेतलें आहे तर काय काय अधिक लागतें? आणि एकटंच यायचं झालं असतं तर काय कमी लाग-ल असतं?

वीर०— आमच्या प्रियकांतेचा चार घटका वियोग (गाढ निद्रा) आणि दोन घटका तोंडाची पटली इतकें तरी अधीक लागतेंना?

तम रूप०—मनाच्या येण्याजाण्याला थोडं का लागलं असतं?
त्याचें पक्षीं या प्रियकांतेनें मनासच कायावाचेंकरून वरलं
दानें जा यापक्षीं तेंच वाट चालूं लागलं ह्मणजे ती भेटायला

तरी कोणाला येणार? मन आपल्या बरोबर आपल्या प्रियकांतेस नेल्यावांचून राहतं काय? कारण त्याच्या तर मनांत असतंच, पण त्याणं जरी विनोदपर आळेपिळे घेऊन दाखविले तरी ती कोठली ऐकायला?

रूपवतीचे हे टोचून बोललेले शब्द ऐकून **वीरकांतास** फारच आनंद झाला आणि त्याच्या मनांत तिजविषयीं कांहीं विलक्षण प्रीति उत्पन्न झाली. खरोखरीच सुशिक्षित स्त्रिया स्वरूपापेक्षां आपल्या निर्मळ अंतःकरणानें आणि मधुर शब्दांनीं पुरुषाचें मन फार लवकर जिंकितात. आपली प्रीति प्राणप्रियेस कोणत्या रीतीनें उघड करून दाखवावी आणि कोणत्या रीतीनें नाहीं असें त्यास होऊन गेलें. परंतु मनोधर्म शब्दांशिवाय दुसऱ्या कशानेंही चांगले उघड करून दाखवितां येत नाहीत असें त्यास वाटून तो पुन्हा तीस ह्मणूं लागला, "मनच जाऊं दिलें नसतें ह्मणजे होतेंना? बरें तें असो, आतां एकदां गाल पुढें करून एक गोडसा पाहूं बरें." हें ऐकून **रूपवती** ह्मणूं लागली, "एकटंच यायचं झालं असतं, मग कोठला गोडसा मिळता?

**वीर०**—मनानें घेतला असता.

**रूप०**—अशी! मन तर जाऊं द्यायचं नव्हतंना?

**वीर०**—पुरे बुवातें आतां, सांगितलें तें करायचें नाहीं आणि आपलेंच कांहीं पुढें करायचें. आज फार गुंगी आली आहे, कां कोणजाणे.

हें ऐकून **रूपवतीनें** आपलें मुखकमल पुढें केलें आणि **वीरकांतानें** आपल्या कोमल ओष्ठांनीं तिच्या मृदु गालाचें मधुर चुंबन घेतलें. येवढा प्रकार झाल्यानंतर

रूपवती—मला एकटीलाच समजलं असेल ! आणि कमी तरी कोणतं पडलं आहे ?

वीर०—दोन प्रहरचा बाग आणि रात्रीचा रंगमहाल आतां आहे का ?

रूप०—तळ्यांत पाणीं पुष्कळ आहे आणि सूर्याचा प्रकाश नाहीं तर कमलिनी विकसित होतील का ?

हें रूपवतीचें भाषण ऐकून आपणास ह्यांत हिनें जिंकिलें असें वाटून त्याच्या मनास फारच उल्हास झाला. त्यानें तिच्या सुकुमार शरीरास दृढालिंगन दिलें. तिचें सुहास्य वदन अवलोकन करावें अशा हेतूनें तिच्या भाषणावरून आपण सूर्यच आहों असें मानून, आपल्या शब्दरूपी तेजस्वी किरणांचा त्या कमलिनीवर तो प्रकाश पाडूं लागला. तेव्हां कमलिनीप्रमाणें विकसित झालेल्या तिच्या सद्गदित हृदयापासून जो मधुर सुगंध सुटूं लागला तो, वाचणारहो, कित्येक स्त्रियांच्या घ्राणेंद्रियांस जे कठोरतेचे दडे बसलेले असतात ते काढल्यावांचून खचीत म्हाणार नाहीं. ती वीरकांतास ह्मणाली, "मला आतां बरोबर घेतलें आहे तर काय काय अधिक लागतें ? आणि एकटंच यायचं झालं असतं तर काय कमी लागलं असतं ?

वीर०— आमच्या प्रियकांतेचा चार घटका वियोग (गाढ निद्रा) आणि दोन घटका तोंडाची पटळी इतकें तरी अधीक लागतेंना ?

रूप०—मनाच्या येण्याजाण्याला थोडं का लागलं असतं ? ज्यापक्षीं या प्रियकांतेनें मनासच कायावाचेंकरून वरलं आहे, त्यापक्षीं तेंच वाट चालूं लागलं ह्मणजे ती भेटायला

तरी कोणाला येणार? मन आपल्या बरोबर आपल्या प्रियकांतेस नेल्यावांचून राहतं काय? कारण त्याच्या तर मनांत असतंच, पण त्याणं जरी विनोदपर आळेपिळे घेऊन दाखविले तरी ती कोठली ऐकायला?

रूपवतीचे हे टोचून बोललेले शब्द ऐकून **वीरकांतास** फारच आनंद झाला आणि त्याच्या मनांत तिजविषयीं कांहीं विलक्षण प्रीति उत्पन्न झाली. खरोखरीच सुशिक्षित स्त्रिया स्वरूपापेक्षां आपल्या निर्मळ अंतःकरणानें आणि मधुर शब्दांनीं पुरुषाचें मन फार लवकर जिंकितात. आपली प्रीति प्राणप्रियेस कोणत्या रीतीनें उघड करून दाखवावी आणि कोणत्या रीतीनें नाहीं असें त्यास होऊन गेलें. परंतु मनोधर्म शब्दांशिवाय दुसऱ्या कशानेंही चांगले उघड करून दाखवितां येत नाहींत असें त्यास वाटून तो पुन्हा तीस ह्मणूं लागला, "मनच जाऊं दिलें नसतें ह्मणजे होतेंना? बरें तें असो, आतां एकदां गाल पुढें करून एक गोडसा पाहूं बरें." हें ऐकून **रूपवती** ह्मणूं लागली, "एकटंच यायचं झालं असतं, मग कोठला गोडसा मिळता?

**वीर०**—मनानें घेतला असता.

**रूप०**—अशी! मन तर जाऊं द्यायचं नव्हतंना?

**वीर०**—पुरे बुवातें आतां, सांगितलें तें करायचें नाहीं आणि आपलेंच कांहीं पुढें करायचें. आज फार गुंगी आली आहे, कां कोणजाणे.

हें ऐकून **रूपवतीनें** आपलें मुखकमल पुढें केलें आणि **वीरकांतानें** आपल्या कोमल ओष्ठांनीं तिच्या मृदु गालाचें मधुर चुंबन घेतलें. येवढा प्रकार झाल्यानंतर

रात्र त्रीच झाल्यामुळें तीं दोघें निद्रित झालीं. त्रोबरच्या सर्व मंडळीसही झोंपा लागल्या. ह्याप्रमाणें जिकडे तिकडे स्वस्थता आणि स्तब्धता होऊन गेली.

---

## भाग ८.

सारथ्यानें **विलासिनीस** हिराबागेंतील बंगल्यांत नेलें त्यावेळेस तिची **कमलिनी** दासी पाणी आणावयास गेली होती ह्मणून मागें सांगितलें आहे. आंब्याच्या झाडाखालीं त्या दासीनें जाऊन पाहिलें, तों तेथें विहीर नाहीं किंवा कांहीं नाहीं. तेव्हां सारथ्यानें सांगितलेल्या झाडाखालीं मी आल्यें नसेन, हें भलतेंच ठिकाण असेल असें वाटून तिनें त्या रात्रीच्या समयीं सुमारें शेंपन्नास झाडाखालीं जाऊन पाहिलें; परंतु तिला विहीर कोठेंच दिसेना. ह्मणून परत रस्त्यानें रथापाठीमागें जाण्याचा तिनें बेत केला, रात्रीच्या वेळीं रस्ता सोडून इकडे तिकडे फारच फिरल्यामुळें ती शेवटीं रस्ताही चुकली. जिकडे जाई तिकडे पायवाटा दृष्टीस पडत, मोठा रस्ता कोठेंच सांपडेना. ह्याप्रमाणें फिरतां फिरतां अर्धी रात्र उलटून गेली. चद्रानें आपल्या विश्रांतस्थानीं गमन केलें. जिकडे तिकडे मिट्ट काळोख झाला. पुढें कांहीं दिसेनासें झालें. वाटेनें ठेंचा लागत व पाय जरा रस्त्याआड पडला ह्मणजे कांटे मोडत. ह्याप्रमाणें फिरत आहे तों सुमारें चार वाजले. प्रातःकाळची वाऱ्याची गार झुळूक वाहूं लागली. नक्षत्रें एकापाठीमागून एक अदृश्य होऊं लागलीं. तेव्हां त्या दासीस कांहींसा धीर आला. जरा

विश्रांति घ्यावी ह्मणून तिनें एका झाडाखालीं आंग टा-किलें तों सर्व रात्र जागरण व श्रम झाल्यामुळें तिचा किंचित्सा डोळा लागला. सकाळीं उठून पाहत्ये तों चो-होंकडे सूर्यप्रभा फांकली होती, पक्ष्यांचा एकच किलकि-लाट होऊन गेला होता, वारा गार वाहत होता; आस-पासच्या डोंगरावर ऊन पडून त्यावरील झाडें पानें रत्न-जडित सुवर्णालंकाराप्रमाणें लखलखत होतीं. सारांश ती वेळ फारच मनोरंजक होऊन गेली होती. अशा वेळीं ती दासी रस्त्याचा शोध करीत करीत फिरत असतां तिला एक वाटसरू भेटला, त्यास तिनें विचारलें, "अरे बाबा, गाडीरस्ता कोठें आहे. व त्या रस्त्यावर धर्म-शाळा आहे ती किती लांब आहे? तिथे आमचीं कांहीं माणसं उतरण्यास गेलीं आहेत." तेव्हां त्यानें तिला गाडीरस्ता दाखविला. आणि ह्मणाला, "अगे बाई, ह्या रस्त्या-वर तर धर्मशाळा कोठें नाहीं, परंतु डाव्या हातास एक चिंचेचें झाड आहे त्या खालून जो रस्ता जातो त्यानें नीट जा ह्मणजे एक सरकारी बंगला तुला आढळेल. तेथें तुझीं मनुष्यें भेटलीं तर भेटतील." असें त्या वाट-सरानें सांगितल्यावर ती दासी चिंचेच्या झाडाची खूण पहात पहात पुढें चालती झाली. वाटेनें जातांना विहिर न सांपडल्यामुळें व धर्मशाळाहि कोठें नाहीं असें त्या वाटसरानें सांगितल्या मुळें तिच्या मनांत अनेक विकल्प येंऊं लागले; परंतु तशीच कांहीं पुढें गेल्यावर तो बाग व त्यांतील बंगला तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां ती मोठ्या उल्हासानें आंत गेली. आणि आपल्या पूर्वींच्या सारथ्यास पाहून ह्मणाली, "अरे, बाईसाहेब कुठे आहेत

बरें! मला रात्रीचे हेलपटे दिलेस हें ऐकून तो सारथी मोठ्या रागानें तिजकडे पाहून ह्मणाला, "धरारे हिला, ठेवा ह्या रांडेला कैदेंत." हे शब्द ऐकून ती मनांत फारच भ्याली. तिला वाटूं लागलें कीं मला येण्याला वेळ लागला ह्मणून तर हा असें बोलत नसेलना? परंतु एवढ्याच साठीं इतकें बोलायास कशाला पाहिजे? असें मनांत येऊन ती त्याला ह्मणाली, "अरे, अशा शिव्या एकदम कां देतोस? ज्याणं त्याणं आपल्या पायरीप्रमाणें असावं. बाईसाहेब कुठं आहेत?" हें ऐकून तो ह्मणाला, "फार रांड बडबड करिते आहे, पकडारे हिला. हिची बाईसाहेब झाली यजमानाला, ही होईल आपल्याला कोणाला." असें बोलतांच एक दोन असामीनीं त्या बापडीस धरून एका अंधारकोठडींत ठेविलें.

त्या कोठडींत अनेक तऱ्हेच्या विपत्ति भोगीत, आपली स्वामीण कोठें असेल? ज्या सारथ्यानें आपल्यास येथें आणिलें तो कोण असावा? त्यानें आपल्यास ह्या अंधारकोठडींत कां टाकिलें असावें? अशा अनेक विचारांत काळ क्रमण करीत असतां एके दिवशीं, जे सेवक तिला अन्न पाणी घेऊन येत ते, **सोमकांताच्या** मरणाविषयीं आपसांत गोष्टी सांगूं लागले. त्या ऐकून **कमलिनीस** अतिशय वाईट वाटलें. ती मनांत ह्मणूं लागली कीं, ज्याच्या पदरीं आपण इतके दिवस काढले त्याला ह्याप्रकारचें मरण आलेलें ऐकणें आज आपल्या कपाळीं आलें काय? आपली यजमानीन कोठें असेल? हें वर्तमान ऐकून बिचारीची काय दशा होईल? अशा विवंचनेंत ती दिवस लोटीत असतां एके दिवशीं दुर्मति त्या अंधार-

कोठडींत आला. आणि दासीस बाहेर काढून, तीस ह्मणूं लागला "**कमलिनी**, तूं जर माझें एक कार्य साधून देशील तर ह्या बंदींतून मुक्त करून तुझी हवी ती कामना पूर्ण करीन.

**क० दा०**—सरकार, मज गरिबाच्या हातून आपलं कसलं कार्य होणार ?

**दुर्म०**—तें कार्य तुझ्या हातूनच होण्याजोगें आहे, ह्मणून तुला सांगितलें.

**क० दा०**—सरकारची आज्ञा होईल तसं करण्यास ही बटीक तयार आहे.

**दुर्म०**—मी तुला तें सांगतों, परंतु तें मनापासून मात्र कर. करशील ना ?

**क० दा०**—काय तें समजलं ह्मणजे सांगयें.

**दुर्म०**—तसें नाहीं, आधीं करीन ह्मणून कबूल कर. त्यांत वास्तवीक तुझा तोटा नाहीं, कल्याणच होईल.

**क० दा०**—मी आपल्याकडून करीन.

**दुर्म०**—तूं मनापासून करशील तर तें खचीत होईल. तुला तें सांगतों ऐक. तुझी यजमानीन **विलासिनी** ह्या बंगल्याच्या माडीवर आहे. तुला ज्या दिवशीं येथें ठेविली, त्याच्या आधल्या दिवशीं तिला येथें आणून ठेविलें आहे. तूं तिच्या जवळ जाऊन माझी गोष्ट काढ आणि ती मला वश होईल असें कर. मज सारख्यास ती वश होण्यास अगदीं मागें पुढें करणार नाहीं; परंतु ती गोष्ट तुझ्या सारखीनें काढली पाहिजे.

हे शब्द ऐकतांच तिच्या अंगावर एकदम शहारे आले. सर्वांगास कंप सुटला. तिला वाटलें कीं, ह्याच

दुष्टानें आपल्या यजमानीचा सर्वस्वी घात घेतला. सारथी तो ह्याचाच मनुष्य होय. असें मनांत येऊन तिला फारच संताप आला. ती मनांत ह्मणूं लागली, "काय मेल्या त्या सारथ्यानं मला फसवलं, सारी रात्र हेलपटे दिले, शेवटीं मेल्यानं असा घात घेतला. मेल्या दुष्टांच्या नरडीचा आतांच घोट घ्यावा असा संताप आला आहे." परंतु जरा शांत होऊन तिनें असा विचार मनांत आणला कीं आपण जर हा बोलतो आहे तें कबूल केलें तर आपल्या यजमानीची तरी भेट होईल. आणि आपल्यास मुक्तता प्राप्त झाल्यावर आपली व आपल्या स्वामिणीची सुटका करून घेण्याची कांहीं तजवीज पहातां येईल, असें मनांत येऊन तिणें आपला राग मोठ्या चतुराईनें छपविला; आणि त्यास ह्मणाली, "सरकार, काम तर फारच बिकट दिसतं आहे; त्या बाईजवळ जाऊन अशी गोष्ट काढणं ह्मणजे फारच कठीण आहे. तरी आज्ञा होईल तर यत्न करून पहावें."

ती दासी थोड्याच यत्नानें कबूल झाली असें पाहून **दुर्मतीस** मोठा आनंद झाला. त्यानें तिला एकदम बंद-मुक्त करून सांगितलें कीं, 'तूं जर हें काम सिद्धीस नेशील तर तुझी हवी ती कामना पूर्ण करीन. कार्य मात्र साधून देण्यास मना पासून झट' असें ह्मणून त्यानें तिला माडी-वर पाठविलें. ती खोलीच्या दाराजवळ जाऊन ह्मणाली, "बाईसाहेब, दार उघडा, मी **कमलिनी** आल्यें आहें."

हे त्या दासीचे शब्द कांनीं येतांच **विलासिनीनें** झटकन उठून मोठ्या उल्हासानें त्या खोलीचें दार उघडिलें, आणि दासीस पहतांच तिच्या गळ्यास गहींवरून मिठी

घालून तिला ह्मणाली, "अग, तूं इतक्या दिवस कुठंग होतीस ? ह्या दिवसांत तूं देखील मला कसंग सोडलंस" असें ह्मणते आहे तों तिच्या नेत्रांतून ढळढळां अश्रु वाहूं लागले, कंठ अगदीं दाटून गेला, पुढें एक शब्दही बोलवेना. तिची अशी अवस्था पाहून **कमलिनीस**ही रडूं सावरेनासें झालें; तथापि आपल्या स्वामिणीचें दोन शब्दांनीं समाधान केलें पाहिजे असें मनांत येऊन ती **विलासिनीस** ह्मणूं लागली, "बाईसाहेब, असा शोक करूं नका. जे नशीबीं लिहिलं आहे तें भोगल्यावांचून कसं चुकतं? बाईसाहेब, कर्माच्या गतीपुढं कोण जाणार आहे? आपण शोक करून काय उपयोग ?"

**विलासिनी**— अग, तूं माझी समजावणी करत्ये आहेस खरी, पण तिकड काय अवस्था झाली असल ? ते मेले दुष्ट तर मला भलती सलतीच येऊन बातमी सांगतात ; जळोत मेल्यांचीं तोंडं !! ईश्वर आपलं सुखी राखो ह्मणजे झालं. मजवांचून एक क्षणभरही चैन पडत नसे, ह्या आतां नखाग्रोटांवर दिवस मोजणं होत असेल. मेलं माझ्या भेटीचं राहो, पण कारागृहांत कितीग हाल भोगावे लागत असतील, कायग दशा होऊन गेली असेल, (असें ह्मणून ढळढळां रडूं लागल्ये) तुला तरी कांहीं समाचार कळला असला तर सांग ; माझी भेट मेली राहो, ह्या वाघाच्या तोंडांतून सुटून आतां पुन: घरदार पाहीन ही तर आशाच उरली नाहीं, पण सुरक्षित असल्याचे दोन शब्द ऐकले ह्मणजे झालं. कांहीं तुला समजलं आहे काय !

हें **विलासिनीचें** भाषण ऐकून **कमलिनीस** अतिशय

वाईट वाटलें. ती मनांत ह्मणूं लागली कीं, ह्या मेल्या दुष्टांनीं हिला **सोमकांताच्या** मरणाची बातमी सांगितली आहे; परंतु आपला हेतु साधण्यासाठींच ते अशी बातमी सांगतात, असें हिला वाटतें आहे. **सोमकांताच्या** मरणाची बातमी समजून ती हिला खरी वाटत नाहीं व त्याविषयीं खातरी करणें आपल्याच नशीबीं आलें आहे असें मनांत येऊन तिला फार गहिंवर आला, कंठ अगदीं दाटून गेला, पुढें कांहींच बोलवेना.

असें पाहून **विलासिनीच्या** मनासहि एकदम धक्का बसला. तिला वाटलें कीं, आपण हिला आपल्या पतीची बातमी विचारीत असतां हिची अशी अवस्था झाली आहे तेव्हां ह्या दुष्टांच्या सांगण्यांत तर कांहीं खरेपणा नसेल ना ! असें मनांत येऊन ती फार घाबरून गेली, आणि मोठ्या करुणस्वरानें दासीस ह्मणूं लागली "अग, असं काय करत्येस, तुझी अशी कां अवस्था दिसते, काय तुला समजलं असल तें आतां ह्या पाषाणहृदयेस सांगण्यास कां भित्येस? काय समजलं असल तें सांग आतां." असें ह्मणते आहे तों पुन: तिला मोठा दु:खाचा उमळा आला. तें पाहून त्या दासीच्या हृदयांत तटतटां तुटूं लागलें. खरी बातमी कळविण्यास तिला एक शब्दही तोंडाबाहेर काढवेना. तरीं मोठा हिय्या करून ती ह्मणाली "बाईसाहेब, हें पण कळविण्याचं मज दुर्भाग्ये-च्याच कपाळीं आलं आहे काय ! असें ह्मणून तिच्या मनानें पुन: कच खाल्ली.

**कमलिनीच्या** तोंडचे हे शब्द ऐकतांच **विलासिनीनें** मोठ्यानें हंबरडा फोडून भूमीवर आंग टाकलें आणि

बेशुद्ध होऊन पडली. तोंडास फेण आला, डोळे पांढरे केले. अशी तिची अवस्था झालेली पाहून **कमलिनीची** काय दशा झाली असेल, ती सुज्ञ वाचकहो, सांगावयास देखील नको. तिचे तर हातपायच मोडून गेले. बसल्या ठिकाणचें उठवेनासें झालें. तिनें मोठ्या कष्टानें एका तांब्यांत पाणी आणून आपल्या हातानें तिच्या नेत्रांस लाविलें, आणि तोंडाचा फेण पुसून थोडेंसे तोंडांत घातलें. आपल्या अंगावरील पदर काढून त्यानें वारा घालूं लागली. अशा दोन घटका गेल्यानंतर जरा सावध होऊन **विलासिनीनें** पुनः हंबरडा फोडला. नेत्रांतून अश्रुपात होऊन पदर चिंब भिजून गेला. ती कपाळास हात लावून ह्मणूं लागली, "परमेश्वरा, ह्या कपाळीं तूं असं कां लिहून ठेवलं होतंस? ह्या पापिणीस आधींच कां मारून टाकलं नाहींस? अथवा असं दुः भोगण्यास जन्मास तरी कशाला घातलंस? अ तकी आतां मी कोणाच्या मुखाकडे पाहूं? आतां आणलास. तारक आहे? ह्या प्राणाचं आतां क धावरे धाव. असें आणि मी तरी हा प्राण कोण हे पाहून **कमलिनीची** मला एक दिवस देखील होऊन गेली. आपल्या भेटी- कांहीं दिवस माहेरीं जन व्हावें तें उलटें तिला ह्याप्रका- पोटभर जेवण झाले हें मनांत येऊन तिला फारच वाईट लागले तो मनांत ह्मणूं लागली कीं, अशा शोकानें हिची काय अवस्था होईल कोण जाणे. अशा अशक्त झालेल्या सुकुमार स्त्रीस ह्या दुःखानें वाईट बरें होण्यास फारसा वेळ लागणार नाहीं. तिनें **विलासिनीचें** डोकें आपल्या मांडीवर घेऊन वारा घातला आणि पुनः तिला

दिवस माझी प्रकृतिही अगदीं क्षीण होत चालली. माझी अशी अवस्था पाहून आईनें त्याचं कारण जाणलं, आणि मला आपलं लवकरच परत धाडून दिलं. पण ते दिवस विसरण्याचं या दुर्भाग्येच्या कपाळीं आज आलंना ? अग, चार दिवस चैन पडत नव्हतं, पण आतां सगळा जन्म कसाग लोटूं ? सखे; एक सुरी घेऊन तरी ह्या पापिणीच्या हृदयांत भोंसक ह्मणजे सर्वांतूनच सुटलें. परमेश्वरा, दीनदयाल ह्मणवितोस, आणि आज ह्या अनाथेवर कसारे घाला घातलास ! तूं सर्वांचा पिता होस, त्यांत तुला ह्या कन्येची कशीरे दया आली नाहीं ? आतां हिचा संरक्षणकर्ता कोणरे आहे ? देवा, तूं तर निदर्यच आहेस, अनेक अबलांवर तूं हाच प्रसंग आणला आहेस ! ण इतक्या दिवस मी तर काय पण सारी रत्नपुरनगरी ग्येचें भांडार मानीत होतीना ? मग माझीच कां काय ली नाहीं ? मला एकटीला ह्या दुष्टांच्या तावडींत समजलं अं कसं जावचलं ? माझ्या हातून काय अपराकां भिल्येस? काय का कां माझ्यावर राग? जाणून बुजून ह्मणते आहे तों पुनः केला नाहीं, पण एखादी चूकच आला. तें पाहून ह्या दासीच्या मा केली नाहीं ? अशा लागलें. खरी बातमी कळविण्यास नच मी, सज्ञानानें तोंडाबाहेर काढवेना. तरीं मोठा हिय्या हातून चुका ह्मणाली "बाईसाहेब, हें पण कळविण्याचं मज दुं काय च्याच कपाळीं आलं आहे काय ? असें ह्मणून तिच्यां मनानें पुनः कच खाल्ली.

**कमलिनी**च्या तोंडचे हे शब्द ऐकतांच **विलासिनी**नें मोठ्यानें हंबरडा फोडून भूमीवर आंग टाकलें आणि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

संसारासाठीं, सारी खटपट संसारासाठीं [illegible] कसं लक्षांत राहिलं नाहीं? इतक्या लवकर कसा विसर पडला? कांहींच का माझ्याविषयीं मनांत आलं नाहीं? माझं मेलं राहो, पण त्या वृद्ध मातापित्यांविषयीं तरी कांहीं मनांत येऊं द्यायचं होतं. त्यांना आतां कोणाचा आधार आहे? आतां म्हातारपणीं ही बातमी ऐकून त्यांची काय अवस्था होईल? त्यांच्याविषयीं तरी कांहीं मनांत आणायचं होतं. त्यांचा तरी असा त्याग कसा करवला? साऱ्याविषयींच अशी निष्ठुरता कशी केली? किती दयाळू अंतःकरण होतें? जरा कोणाला कांहीं झालं तर कसा जीव तिळतिळ तुटत असे, पण आतांच असं कसं झालं? कोणाविषयींच कांहीं मनांत कसं नाहीं आलं? अग, पण काय मी वेडी!! उगीच बोलून बोलून घेतलं. तें काय कोणाच्या हातचं आहे? हातीं असून का अशी निष्ठुरता झाली असती? माझा का त्याग करवता? देवा, तुलाचरे काडी इतकी सुद्धां दया नाहीं. कायरे आज हा प्रसंग आणलास. आतां ह्या अबलेनें काय करावें? देवा, धावरे धाव. असें ह्मणून ती पुन्हां बेशुद्ध पडली. हें पाहून **कमलिनीची** फारच चमत्कारीक स्थिति होऊन गेली. आपल्या भेटीपासून स्वामिणीचें रंजन व्हावें तें उलटें तिला ह्याप्रकारचें दुःख झालें हें मनांत येऊन तिला फारच वाईट वाटलें. ती मनांत ह्मणूं लागली कीं, अशा शोकानें हिची काय अवस्था होईल कोण जाणे. अशा अशक्त झालेल्या सुकुमार स्त्रीस ह्या दुःखानें वाईट बरें होण्यास फारसा वेळ लागणार नाहीं. तिनें **विलासिनी**चें डोकें आपल्या मांडीवर घेऊन वारा घातला आणि पुनः तिला

सावध केलें. तिच्या तोंडावरून हात फिरवून तिला ह्मणूं लागली, "बाईसाहेब, काय शोक हा ? अशानं आपलं आतां कसं होणार? प्रकृति पहा कशी क्षीण होऊन गेली आहे ती. बाईसाहेब, आतां उगी रहा, आपल्या जिवास आतां असे श्रम देऊं नका." हें ऐकून **विलासिनी** ह्मणूं लागली, "अग, आतां माझं काय व्हायचं आहे? ह्या जिवाला आतां काय करायचं आहे? जीव जावा ह्मणून वाट पहाते पण तो सोडतो आहे कुठं? कर्म पाठीं लागलं ह्मणजे मेलं हात धुवून पाठीं लागतं. मला आतां क्षणभर देखील जीव ठेवावा असं वाटत नाहीं. (असें ह्मणून कपाळास हात लावून पुनः रडूं लागते.)

**क० दा०**—(परिणाम वाईट होईल ह्मणून फार भयाभीत होऊन) बाईसाहेब, आतां आपल्या वृद्ध सासू सासऱ्यांवर तरी लक्ष द्या. यजमानाची बातमी कळली ह्मणजे त्यांची काय दशा होईल? तशांत आपण जर असं कराल तर त्यांच्या दुःखास पारावारच नाहींसा होणार. बाईसाहेब, त्यांच्याकडे आतां लक्ष द्या. त्या वृद्धांस आतां तुह्मांवाचून कोण आहे? बाईसाहेब, तुह्मी जर असं कराल तर तुह्मांवांचून आह्मा सेवक लोकांस तरी कोणाचा आधार आहे?

**विला०**—कसली ग सारखी "बाईसाहेब बाईसाहेब" करत्येस? ज्या जिवावर बाईसाहेबपणा मिरवीत होतें त्याच जिवानें आज सोडलं आणि आतां कशाची बाईसाहेब? जळो हें जिणं, जळो हा संसार; जितकं सुख त्याच्या दसपट मेलं दुःख. माझं कसंग होईल? कशाचंग

ह्या जिवाला आतां सुख आहे. मरण तरी मेलं येईल तर बरं.

क० दा०—बाईसाहेब, असा आतां शोक करून काय होतं? झाल्या गोष्टीस आतां काय उपाय? ती कोणाच्या हातची आहे? आपल्या जिवास आतां उगीच कष्ट का देतां? माझ्या गळ्याची आपल्यास शपत आहे, आतां उगीच रहा. आपल्या सुटकेविषयीं आतां कांहीं यत्न केला पाहिजे. शोक करून काय होतं?

ह्याप्रकारें तिनें तिचें बरेंच समाधान केलें आणि ह्मणाली, "बाईसाहेब, मी आतां आपल्यास रोज भेटत जाईन, कांहीं काळजी करूं नका." असें म्हणून ती खालीं चालती झाली. **विलासिनीच्या** शोकानें तिचं अंत:करण प्रथम दु:खानें नंतर त्वेषानें अगदीं व्याप्त होऊन गेलें. तिच्या मनांत आलें कीं, ज्या चांडाळांनीं ह्या सद्गुणी स्त्रीचा असा घात केला आहे. व अद्यापिही तिला छळीत आहेत त्यांचा आपल्याकडून घेववेल तितका समाचार घेतला पाहिजे. जो सपाट्यांत सांपडेल त्यास सोडून उपयोग नाहीं. हें सर्व अरण्य व्याघ्रांचेंच आहे. ह्यांत एक भला किंवा दुष्ट असें मनांत आणून उपयोग नाहीं. असा मनांत विचार करून ती खालीं आली.

दुर्मति तिची दोन दोन डोळ्यांनीं वाट पहात बसला होता. ती केव्हां खालीं येईल आणि काय तें केव्हां सांगेल असें त्यास होऊन गेलें होतें. एकदां त्यास वाटे कीं तिची दासी आतां तिची समजूत घालील आणि ती सहज कबूल होईल; पुन्हां त्याच्या मनांत येई कीं, आपण येवढा यत्न केला तरी ती कबूल झाली

नाहीं ती दासीचें कशाचें ऐकते. असें मनांत येऊन तो अगदीं निराश होऊन जाई. इतक्यांत कोणाचें पाऊल वाजलें ह्मणजे ती दासी आली असें त्यास वाटून पुन्हां ती काय बोलते तें ऐकण्यास तयार होई. ह्याप्रमाणें त्याच्या मनाची स्थिति झाली आहे तों इतक्यांत ती दासी त्याच्या दृष्टीस पडली. तिला पाहतांच मोठ्या हुरूपीनें तो तिजकडे धांवत गेला आणि म्हणाला, "कायगे झालें, कां कार्य सफळ? वेळ तर बराच लागला, तेव्हां कांहीं आहे असें दिसतें.

क० दा०—सरकारासाठीं किती श्रम घेतले तें आतां काय सांगूं? कोण बया ती खष्ट! तिच्याशीं माझी मीच बोलूं जाणं.

दुर्म०—(काम झालेंसें वाटून मोठ्या घाईनें) पण काम तर झालेंना?

क० दा०—तें सरकारास काय सांगूं? ती फारच दुराग्रही; काय बयाचे हाल झाले आहेत? कोणत्या स्थितींत मेली दिवस काढते आहे!! मेल्या भिकाऱ्याला ओंकारीच.

दुर्म०—(ती कबूल नसावी असें मनांत येऊन जरा खिन्न होऊन) पण सरत्या शेवटीं झालं काय तें तर सांगशील.

क० दा०—काय मेलीनीं अट सांगितली आहे. अशा खष्ट बायांना सोंगही बरींच आणतां येतात. मनांत तर मेलं असतंच, पण दुसरे देखील हेतु साधायचे.

हे शब्द ऐकतांच दुर्मतीस जो कांहीं आनंद झाला तो काय सांगावा? त्याच्या मनांत येऊं लागलें कीं विला

सिनीची कोणतीही अट पुरविण्यास आपल्यास काय अवघड आहे? ती जें सांगेल तें आपण तीस देऊन तिची पूर्ण मर्जी संपादन करूं. असा विचार मनांत येऊन तो मोठ्या हर्षानें तीस ह्मणाला, “काय तिची अट आहे? ती सांगेल तर आकाशींच्या नक्षत्रांची माळ करून तिच्या कंठस्थानीं अर्पण करीन. तिनें मात्र आपल्या सुकुमार हस्तानें माझा कंठ सुशोभित केला पाहिजे.

क० दा०—सरकार, जरा एकीकडे यावं.

दुर्म०—चल, सांगशील तेथें येण्यास तयार आहे?

असें ह्मणून तिनें दुर्मतीस एका खोलींत नेलें आणि ह्मणूं लागली, “सरकार, ती जें बोलली तें काय सांगूं? जें ती बोलली तें तीच बोलूं जाणं. माझ्यानें तर तें नाहीं सांगवत, माझं काळीजच थरथरा कापतं.

दुर्म०—ती असें काय ह्मणाली, तें सांग तर पाहूं. ती जें सांगेल तें करण्यास मी शपथपूर्वक कबूल आहें.

क०दा०—सरकार, तिच्याकडे गेल्यावर तिनें जो पाल्हाळ लावला होता तो काय सांगूं? पण तिची मर्जीच संभाळायची मग काय? ती बोलेल तसं बोललंच पाहिजे. पहिल्यानें मी तिचं बरंच समाधान केलं आणि मग मोठ्या युक्तीनें तिच्या जवळ सरकारची गोष्ट काढली. तेव्हां तर बाई ती जशी सर्पिणी सारखी माझ्या अंगावर उलटली. पण जरा उलूफुलू केल्यावर तिचा खरा मनोदय समजला.

दुर्म०—पण आहेना तिच्या मनांत, बस झालें ग, झालें, पुष्कळ झालें.

क० दा०—सरकार, ऐकाल तर खरं सारं.

दुर्म०—सांग हवें तर, पण आतां काय ऐकायचें आहे? मी ह्मणालों तसें तर आहेना?

क० दा०—सरकारास कायेवाचेंकरून वरावं असं तर तिच्या मनांत आहेच, पण आणखीही हेतु साधायाचा मतलब. तिच्या मनांत असं आहे कीं आपण ह्या साऱ्या देशाची स्वामीण होऊन बसावं. जंवपर्यंत वडील आपल्या डोक्यावर आहेत तंव पर्यंत तिचा तो हेतू शेवटास जात नाहीं आणि ह्यांत आपल्या वडलांचं तिला फार भय वाटतं असं तिचं ह्मणणं आहे. येवढ्या साठीं आपणच गादीवर विराजमान व्हाल आणि सर्व देशाचं अधिपत्य आपल्याच हातीं घ्याल तर आपल्या साऱ्या कामना पूर्ण करण्यास ती तयार आहे. सरकार, मी तिला पुष्कळ सांगून पाहिलं, पण मोठी कठीणच वया ती. हा प्रकार घडून आल्या खेरीज मी सरकारशीं एक शब्दही बोलणार नाहीं. अशी तिनें फटकन शपथच घेतली. आपण वडलां-पाठीं राज्य करावं ह्मणजे पितृवध करावा असे शब्द तिला कसे बोलवले असतील ते बोलवोत. खरी पाषाण हृदयी स्वष्ट वया. अशाच बायकांना मनांत येक आणि बाहेर एक असं दाखवितां येतं. माझ्यावर प्रथम कशी सर्पिणी सारखी उरफाटली, जणूं मोठी साध्वीच, आणि मनांत तर वयाच्या सारीच हौस.

दुर्म०—अरे, रे, ही अट कशी पूर्ण करतां येईल? हें कृत्य तर माझ्या हातून खचीत घडणार नाहीं. (जरा रागावून) लाडी गोडीवर आलें ह्मणजे सर्व अटी आणि कबुलायती, जातों आणि एकदन धरतोंच ह्मणजे काय करते तें पहातों.

असें ह्मणून तो **विलासिनी** कडे जाण्यास निघाला. **कमलिनीच्या** मनांत एकदम भीति उत्पन्न झाली, तिला वाटूं लागलें कीं हा दुष्ट आतां त्या साध्वीचा पुर्ता छळ करितो ह्यांत कांहीं संशय नाहीं. असें मनांत येऊन ती फार भ्याली. परंतु **दुर्मति** चार पावलें गेला नाहीं, तोंच त्याच्या मनांत आलें कीं, आपण असा निश्चय करून तिजकडे कितीदां गेलों, परंतु तें सर्व निष्फळ; तीच कबूल झाल्या शिवाय सर्व ठीक जमणार नाहीं. असें मनांत येऊन त्याची बुद्धि एकदम कशी फिरली असेल तो फिरो. त्यानें त्या दासीस हांक मारिली आणि ह्मणाला, "बरें, तिला सांग कीं तुझा हेतु तीन दिवसांत सिद्धीस नेतों. आजपासून तीन दिवसांच्या आंत येथें येईन, त्यावेळीं सर्व तयारी पाहिजे. असें ह्मणून तो एका घोड्यावर बसून येथून निघून गेला.

**कमलिनी** दासीनें **दुर्मतीस** असें सांगितलें त्यांत तिचा असा हेतु दिसतो कीं, **दुर्मति** अशा कामास प्रवृत्त झाला ह्मणजे त्याचा अपराध उघडकीस येऊन त्याच्या पित्याकडून त्यास योग्य शासन होईल. त्यास कैदेंत वगैरे टाकला तर आपली व आपल्या स्वामिणीची सुटका करून घेण्याची कांहीं तजवीज पाहतां येईल. अथवा त्यानें पितृवध केलाच तर दुष्ट राजाचा संहार होऊन, प्रधानादि मंडळीस त्याचें दुष्ट कृत्य समजल्यास त्यांकडून त्याचें पारिपत्य होईल.

वाचकहो, **हिराबागेंत** तुह्मी **कमलिनी दासीचें** चातुर्य पाहिलें परंतु कांहीं दिवस ह्या गोष्टी पूर्वी रत्नपूर नगरींत एक गोष्ट लक्ष देण्यासारखी झाली आहे तिकडे

आतां चला. **दुर्मतीची** स्त्री **रूपवती** येवढीच वयानें होती, रूपानेंही ती कमी होती असें नाहीं, परंतु स्त्रियांच्या स्वरूपास निम्में भूषण त्यांची चांगली वर्तणूक होय. पातिव्रत्यालंकारमंडित जी स्त्री तिची कांति तर इतकी तेजस्वी असते कीं, तरुणाचेही नेत्र दिपावून, तिजकडे अर्धी घटका पहाणें, हें त्याला होत नाहीं. परंतु पतीपेक्षां स्त्रीची वर्तणूक चांगली कोठून असणार? पुरुषाचा वर्तनक्रम हा पुष्कळ अंशीं स्त्रीस कित्ताच होय. **दुर्मतीची** स्त्री फारच दुराचारी होती. **दुर्मतीच्या** मित्रांपैकीं पुष्कळ हिचे जार होते. पुष्कळांनीं **दुर्मतीशीं** येवढ्या साठींच स्नेह ठेविला होता. त्यांत **दुराचार** ह्मणून एक **दुर्मतीचा** परम स्नेही होता. दुराचाराचे तर त्याच्या शरीरावर पुट्टेच बसले होते. तेव्हां अशा पुरुषापेक्षां तिची प्रीति दुसऱ्या कोणावर अधिक असणार आहे? तिचे पंचही प्राण ह्या पुरुषाजवळ गुंतलेले असत.

एके दिवशीं **दुर्मति विलासिनीचा** छळ करण्याकरितां **हिरा** बागेंत गेला असतां **दुराचार** चोर वाटेनें त्यांच्या रंगमहालांत गेला. त्यावेळीं **दुर्मतीची** स्त्री, अंगावरील पदरानें वारा घेत, मंचकावर बसली होती. **दुराचार** तिच्याच शेजारीं जाऊन बसला आणि तिच्या अंगावर हात टाकणार तों ती मोठ्या रागानें त्यास ह्मणाली, "अहो साळसूद, दुरूनच बोला, जवळ येण्याचें कारण नाहीं." तेव्हां तो विस्मित होऊन तिला ह्मणाला, "कां बाईसाहेब, येवढा आज रागहो कां? सांगितल्या वेळापेक्षां किंचित् उशीर लागला ह्मणून कां? कां आमची आह्माला

बायका पोरें नसतील? सारा येळ तुह्मालाच घेऊन बसलें ह्मणजे झालें वाटतें.?"

दु० स्त्री—बरं जा, आपल्या बायका पोरांनाच घेऊन बसा. मग इकडं आला तरी कशाला?

दुरा०—आज तर बुवा मोठा राग दिसतो. पण झालें तरी काय? येण्यास उशीर लागला येवढेंचना.

दु० स्त्री—काय, येऊन तरी काय करतां अहां तें ठाऊकच अहि.

दुरा०—(तिला आलिंगन देण्यास पुढें सरसावतो) कां, काय करावें असें मनांत आहे! यजमानाची चाकरी करावी तशी करीत आहें, आतां काय त्यांचे जोडे पुसा-वयास सांगणार? तेवढें कमी आहे तें सांगा ह्मणजे झालें.

दु० स्त्री—बरं दुरून बोला ह्मणून ह्मटलं ना (असें ह्मणून आंग मुरडल्ये) जोडे पुसलेत आणि पाहिजे तें केलत तरी मला काय त्याचं?

दुरा०—मग काय तुमचें करावें तें सांगाल तर खरें. नाहीं ह्मणेन तेव्हांना?

दु० स्त्री—सांगन तें कराल ना? माझ्या गळ्याची आण वहा.

दुरा०—तुमच्या गळ्याची शपत, सांगाल तें करीन.

दु० स्त्री—बरं कराल तेव्हांच जवळ या.

दुरा०—अहो, पण काय तें सांगाल तर खरें.

दु०स्त्री—(मोठ्या प्रेमानें) प्राणप्रिया, तुह्माला काय [illegible]? आज पंधरा दिवस कसं तें माझ्या खोलींत येणं सुद्धां होत नाहीं, आज दोन वर्षें पहाल्ये, वृत्ति कांहीं बावर-ल्यासारखी दिसते. याचं कारण काय असावं ह्मणून

पुष्कळ चवकशी केली पण कांहीं समजेना. परवांच्या दिवशीं रात्रीं जेव्हां बाहेर जायचं झालं तेव्हां मी एका दासीस पाठोपाठ धाडिली. ती दुसऱ्या दिवशीं परत येऊन सांगूं लागली कीं, पांच सहा कोसांवर एक बाग आहे. तिथं तेवढ्या रात्रीं जायचं झालं. इतक्या रात्रीं तिथं जाण्याचं कारण काय असावं ह्मणून तिनें बारकाईनें चवकशी केली तेव्हां तिला असं समजलं कीं, तिथं एक सुंदर तरुण स्त्री आणून ठेविली आहे, आणि तिनें वश व्हावं ह्मणून तिथं रोज जाऊन यत्न होत असतो. तिच्या नादीं लागून आज दोन वर्षं होत आलीं. ही त्या दासीनं सांगितलेली बातमी ऐकून माझ्या पायांची तिडीक मस्तकीं गेली, पण काय करूं?

दुरा०—बरें, पण मला आतां काय सांगणार?

दु० स्त्री—मला कसं तरी ह्या संकटांतून सोडवा.

दुरा०—पण करूं काय तें सांगा.

दु० स्त्री—तुह्मी कशी तरी त्या स्त्रीस मारून टाका. हें काम तुमच्या वांचून दुसरं कोणास साधणार नाहीं, असं वाटून तुह्मालाच सांगितलं तर आतां शपत घेऊन काय करतां तें पाहूं. पुरुषांना किती बायका असल्या तरी समाधान नाहींच. बायकांना मात्र मेली सारी बंदी प्रिया, ती स्त्री जर वश झाली तर माझ्याकडे ढुंकून पहाणं सुद्धां होणार नाहीं. 'आतां सारी काळजी तुह्मालाच असूं द्या, ह्मणजे झालं.

दुरा०—हें काम बुवा, आह्मी कसें करावें? करण्याला मार्ग तरी कोणता?

दु० स्त्री—तुमचा मोडता मला ठाऊकाच होता, बरं

तुमच्यानें हें काम होत नाहीं तर आजपासून माझ्याशीं बोलूं नका.

दुरा०—आज राग तर बुवा खूप आला आहे. आमच्यावर मर्जी अगदीं नाखूष दिसते.

दु० स्त्री—बरं, पुरे तुमचं, तुह्मी गोड बोलायच्या कामाचे, मला काय आजचे ठाऊक नाहींत.

दुरा०—अरे पण येवढा राग कशाला पाहिजे? कसें करावें ह्मटलें ह्मणजे लागलेंच नाहीं केलें ना?

दु० स्त्री—मग करीन ह्मणून ह्मणा तर.

दुरा०—बरें आहे बुवा, खचीत करीन. आतां तर झालेंना? पण कांहीं मुदत आहे का?

दु० स्त्री—माझ्यावांचून जितके दिवस काढवतील तितक्या दिवसांची मुदत.

दुरा०—मग येवढ्या रात्रीं येऊन फुकटच का? दोन गोड शब्द तर बोलाल?

दु० स्त्री—"त्या स्त्रीचा प्राण गेला" असं माझ्या कानीं आल्याशिवाय मी तुमच्या शेजारी बसणार सुद्धां नाहीं. आतां तुह्मी आपलें काय तें पहा.

असें ह्मणून ती स्त्री दुसऱ्या खोलींत उठून गेली. दुराचारही आलेल्या चोरवाटेनें परत गेला. हें कार्य सिद्धीस कसें नेतां येईल ह्याविषयीं त्याला मोठा विचार पडला. परंतु कांहीं युक्ति योजून हें काम सिद्धीस न्यावें आणि दुर्मतीच्या स्त्रीची पूर्ण मर्जी संपादन करावी असा त्यानें निश्चय केला. नंतर एकदिवशीं तो सहज दुर्मतीकडे गेला. पानसुपारी खाऊन थट्टा मस्करी झाल्यावर तो दुर्मतीस ह्मणाला "आतांशी आपण असे उदास कां दिसतां?"

**दुर्म०**–मी उदास दिसतों? छे बुवा, कारण तर काहीं नाहीं.

**दुरा०**–आपण जर कारण सांगत नाहीं तर आपली मर्जी, स्नेहधर्म म्हटला म्हणजे असा आहे कीं, एकमेकांनीं आपलीं सुखदुःखें एकमेकांस कळवावीं, त्यांत सुखाचा एकमेकांस आनंद व्हावा, आणि दुःखाचा परिहार होण्यासाठीं एकमेकानें एकमेकासाठीं झटावें. आज आपण जर उदास दिसतां तर आपल्या दुःखपरिहारार्थ आह्मीं यत्न करावा हें योग्य आहे, परंतु तें आपल्यासच आठवत नाहीं, मग काय उपाय?

हे **दुराचाराचे** कपटी शब्द ऐकून **दुर्मतीस** वाटलें कीं, आपल्या दुःखाची त्याला खरोखरी कळकळ येते आहे. ह्यासाठीं आपली सर्व हकीगत ह्याला सांगितली असतां हरकत नाहीं. असें मनांत येऊन **विलासिनी**-**चा** सर्व वृत्तांत त्यानें त्याला सांगितला. तो ऐकून **दुराचार** ह्मणाला येवढेंचना? ह्यासाठींच आपण इतके खिन्न? चला मी तुह्मांबरोबर त्या बागेंत येतों आणि तिला दोन हुलजी फुलजीच्या गोष्टी सांगून सहज वश करून देतों.

हें **दुराचाराचें** बोलणें ऐकून **दुर्मतीनें** त्यास **हिरा** बागेंत नेलें आणि **विलासिनी**कडे नित्य जाण्याची परवानगी दिली. **विलासिनी** कडे जाण्याची परवानगी मिळतांच आपलें अर्धें कार्य साधलें असें त्यास वाटूं लागलें. तो मनांत ह्मणूं लागला कीं, ज्या ठिकाणीं प्रवेश होणेंच कठीण होतें त्या ठिकाणीं सदोदीत जाण्याची परवानगी मिळाली, आतां हरयुक्तीनें त्या स्त्रीचा वश

करणें काय अवघड आहे! असें मनांत येऊन, विला-सिनीकडे नित्य जाऊन तिच्याकडे अर्धघटका अवलोकन करण्याचा क्रम त्यानें सुरू केला. आपला बेत सिद्धीस नेण्यास साधक बाधक कारणें किती आहेत, हीं तो दररोज वर जाऊन पाहात असे. असे कांहीं दिवस गेल्यानंतर पूर्वी सांगितल्याप्रमाणें दुर्मति दासीशीं संभाषण करून पितृहत्या करण्याकरितां रत्नपुरनगरींत गेला असतां आपलें कार्य साधण्यास ही संधी चांगली आहे असा विचार करून दुराचार त्याच दिवशीं मध्यरात्र उलटल्यानंतर वर चढून गेला. आणि आपला हेतु सिद्धीस नेऊन सुमारें दोन तासांनीं परत आला. तेव्हां त्याचा आनंद काय सांगावा! त्याला वाटूं लागलें कीं, दुर्मतीच्या स्त्रीचे पंचही प्राण आतां आपल्याजवळ गुंतून रहातील. संपत्ति तर आपल्या घरीं दासीप्रमाणें पाणी भरील. असे अनेक विचार मनांत येऊन तो आनंदसागरांत पोहूं लागला. तशांत आणखी कांहीं विशेष कल्पनेच्या लाटा येऊं लागल्या ह्मणजे, तो इतका वर उचंबळत असे कीं, जणूं आतां आकाशासच हात लावितो. हें सर्व वर्तमान कळविण्याकरितां मोठ्या हौसेनें एका घोड्यावर बसून तो तेव्हां रात्रीं चोरवाटेनें दुर्मतीच्या स्त्रीकडे गेला. पहाटेचा समय होत आल्यामुळें रंगमाहालांतील सर्व दीप अंधुक झाले होते. दुर्मतीची स्त्री डोळ्यांवरील झांप उडून मंचकावर इकडे तिकडे चळवळ करीत आंगावर एक शुभ्र वस्त्र घेऊन पडली होती. तिचे सर्व विचार दुर्मतीनें आणून ठेविलेल्या स्त्रीकडे गुंतले होते. इतक्यांत दुराचार तिच्यापुढें येऊन उभा राहिला. त्याला पाहून

तो एकदम उठून बसली. त्यावेळीं आशा आणि निराशा ह्या दोनी पाळी पाळीनें तिच्या मनावर अम्मल करूं लागल्या. तिला एकदां वाटे कीं, हा काम शेवटास नेऊन आला आहे; पुन्हां मनांत येई कीं, असें दुर्घट कृत्य ह्याच्या हातून कशाचें होतें? ह्याप्रमाणें घोटाळ्यांत पडून कांहीं वेळ स्तब्ध असतां दुराचार तीस ह्मणतो, "कां आज कां अशी मुकी? आज तर आतां तुमची भीति नाहींना? वाघाच्या तोंडांत मान देऊन परत घेऊन आलों आहे."

दु० स्त्री०—कां, झालं का कायॆ? गेलं एकदाचं शेवटास?

दुरा०—शेवटास नेल्याशिवाय जवळ बसावयाचें नव्हतें, मग काय? रिकामा येवढ्या रात्रीं इतका लांब कशाला येतों?

दु० स्त्री—कसं हो तें केलं?

दुरा०—तें तुह्माला कशाला पाहिजे? जें सांगितलें तें केलें; कसें केलें तें कशाला पाहिजे.

दु० स्त्री—पण सांगाल तर खरं.

दुरा०—काय सांगूं तुह्माला, जे श्रम झाले आहेत ते माझे मलाच माहीत! सरकाराबरोबर तेथें जाऊन रोज संधी पहात होतों, तों आज स्वारी नगरींत आली आहे असें पाहून, ज्या खोलींत त्या स्त्रीस ठेविलें आहे त्या खोलींत हलकेंच खिडकीवाटे गेलों आणि मग काय सांगूं? ती निद्रिस्थ असतां एकदम जाऊन नाक धरिलें. तों ती मोठ्यानें ओरडूं लागली, तेव्हां लागलाच तिच्या तोंडांत अंगवस्त्राचा बोळा कोंबून त्यावर पाय दिला आणि दुसरा पाय छातीवर मारिला. मग काय विचा-

रतां !! अशीच ती सुकुमार, त्यांतून खाण्यापिण्याचे हाल होऊन ऊस जसा चरकांतून काढावा तशी होऊन गेली होती, मग प्राण जाण्यास किती वेळ ? हूं किंवा चूं केल्याशिवाय डोळे मिटून पडली. अरे रे, तिचे हाल आणि हें भयंकर मरण लक्षांत आलें ह्मणजे अंगावर शहारेच येतात. परंतु (तिच्याकडे बोट दाखवून) सर्व ह्या जिवासाठीं हो.

असें ह्मणून तो तिला आलिंगन देण्यासाठीं पुढें सरवला. परंतु ती त्यास ह्मणाली, "अद्याप दुरूनच हो, हें सारं खरं कशावरून ?"

दुरा०—हे पहा, तिच्या अंगावरील सर्व दागिने, हा पाचूचा हार पहा, प्राण घेतल्यावर हे प्रेतावरील काढून आणले.

दु० स्त्री—छे, दाखवण्याकरतां दागिने का तुह्माला कुठं मिळणार नाहींत ? तिचा प्राण घेतलात तेव्हांच दागिने दाखवण्यास आणलेत असंच नको कांहीं ह्मणायाला !

दुरा०—आतां तर बुवा शिकस्तच झाली. आमच्या शब्दावर विश्वासच नाहींना ? येवढें करून शेवटीं निर्फळच ?

दु० स्त्री—निर्फळ कां ? खरी बातमी कळण्यास फार का उशीर लागणार आहे ? सकाळीं काय तें समजेल.

इतकें बोलणें होतें आहे तों बाहेर अगदीं फटफटीत होत आलें. तेव्हां दुराचार तिचा निरोप घेऊन लागलाच हिराबागेकडे चालता झाला.

दुर्मति दासीशीं संभाषण करून निघाला तो थेट

रत्नपुरींत आला. सुमारें मध्यरात्र उलटल्यानंतर, ह्मणजे दुराचारानें आपलें कार्य ज्यावेळीं साधलें, त्याच भयंकर वेळीं तो आपल्या पित्याच्या रंगमहालांत जाऊन त्याच्या पलंगा शेजारीं बसला; त्यावेळीं कुमित्रास गाढ निद्रा लागली होती. तरी आपला हेतु कसा शेवटास न्यावा, ह्याविषयीं त्याला मोठा विचार पडला. पित्याविषयीं त्याच्या मनांत कांहीं दया उत्पन्न झाली; परंतु इतक्यांत विलासिनीची सुंदर मूर्ति, कामानें पीडित झालेल्या त्याच्या मनासमोर उभी राहिली. त्याला असा भास झाला कीं, मी सिंहासनावर विराजमान झालों आहें, माझ्या डाव्या बाजूस विलासिनी बसली आहे, ती आपल्याशीं मोठ्या प्रेमानें गोष्टी सांगत आहे व आपणही तिचा विनोद करीत आहों, तिनें आपल्या सुकुमार हस्तानें आपल्या कंठस्थानास वेष्टन केलें आहे, ती मित हास्य करून आपल्या आंगावरील पदर सांवरीत सांवरीत मान खालीं घालून मोठ्या लज्जेनें आपल्याशीं कांहीं विनोदपर शब्द बोलत आहे, परंतु तिनें वर पहावें ह्मणून तो आपला हस्त तिच्या हनुवटीखालीं घालून तिला जों चुंबन देणार, तों तेथें कांहींच नाहीं, असें पाहून त्याला फारच संताप आला. तो निराशेनें अगदीं बेफाम होऊन गेला. आतां नुकतें स्वप्नवत् प्राप्त झालेलें सौख्य खरोखरी केव्हां प्राप्त होईल असें त्याला होऊन गेलें. परंतु जरा विचार करतो तों त्याला वाटलें कीं, आपण जें काम करण्या करतां येथें आलों आहों आणि ज्याविषयीं आपल्या मनांत संकोच आला आहे तेंच शेवटास नेल्याशिवाय सर्व हेतु सिद्धीस जाणार नाहींत, अशी मनाची

रात्री झाल्यावर, त्यानें त्या महालांत जीं हत्यारें ठेविलीं होतीं त्यांतील एक बरची घेतली आणि मोठ्या झपाट्या-नें **कुमित्राच्या** छातींत मारली. त्याबरोबर तो आपल्या सर्व अपराधांचें प्रायश्चित्त घेण्याकरितां यम लोकाप्रत गमन करता झाला.

अरे रे, काय ह्या दुष्टाचें हृदय? आपल्या वासनांची तृप्ति करण्याकरितां ज्यानें पितृवधही केला त्याला काय ह्मणावें? अशा पुरुषाविषयीं एक शब्दही पुढें लिहूं नये, परंतु अनेक निरपराधी प्राण्यांच्या गोष्टीशीं ह्याचा फारच निकट संबंध आहे, ह्मणून चालू गोष्टी मध्यें ह्याच्या-विषयींही दोन अक्षरें लिहिणें भाग आहेत.

पितृवध केल्यानंतर लागलाच, आपल्या कामाग्नीची शांति करण्याकरितां **दुर्मति विलासिनी**कडे चालता झाला. त्यावेळीं डोळ्यांवर खून आल्यामुळें त्याला पुढें कांहीं दिसत नाहींसें झालें. वाट चुकत चुकत प्रातः-काळचा सुमार होतो आहे तों तो त्या बागेंत पोंहोंचला. त्याच्या पूर्वीं **दुराचार** नुकताच तेथें गेला होता. **दुर्मती**ची कावरी बावरी मूर्ति पाहून त्याला वाटलें कीं कांहीं कार-णानें ह्याच्या कामवासनेस आज चेतना उत्पन्न होऊन हा वेड्याप्रमाणें होऊन गेला आहे. ह्यास आतां वर न जाऊं देतां **विलासिनी**च्या मरणाची बातमी येथेंच सां-गावी, नाहीं तर समयास आपलें कपट बाहेर पडेल. असा विचार करून तो **दुर्मतीस** ह्मणाला, आज तबीयत इतकी नाखुष कां दिसते! (असें ह्मणून दुःखाचा मोठा सुस्कारा टाकितो.)

दुर्म०—नाहीं नाहीं, विशेष कांहीं कारण नाहीं, ज्यासा

ठी नाहुंश तें आतांच साधितों, आतां कांहीं काळजी नाहीं.

असे ह्मणून तो वर जावयास निघाला. त्यावेळीं कमलिनीदासी तेथें जवळच होती. तिला वाटलें कीं, हा खळ मी सांगितल्याप्रमाणें पितृवध करून आला आहे असें ह्याच्या चर्येवरून उघड दिसतें. डोळ्यावरील खून अद्यापि उतरला नाहीं ह्मणूनच ह्याचे नेत्र इतके आरक्त व मुद्रा कावरी बावरी दिसते आहे. इतकें अघोर कृत्य ज्याणें केलें तो आतां आपल्या मनांतील वासना पुरवि-ल्याखेरीज खचीत रहाणार नाहीं. आतां हा बाईसाहि-बांच्या आंगावर वाघाप्रमाणें उडी घालील, ह्यांत कांहीं संशय नाहीं. आतां काय उपाय करावा, ह्मणून तिनेंही दुःखाचा सुस्कारा टाकिला. तोंड अगदीं म्लान होऊन गेलें. दुराचारही आपलें कृत्य लपविण्यासाठीं दुःखाचे मोठे सुस्कारे टाकूं लागला. तेव्हां दुर्मतीच्या मनांत संशय आला कीं, हे सर्वच आज इतके दुःखी कां? आपल्या दुष्ट कर्माबद्दल तर ह्यांस वाईट वाटत नसेल ना? आपण जें कृत्य केलें तें दासीस माहीत असलेंच पाहिजे; परंतु दुराचारास हें कोठून समजलें असेल? ह्याप्रमाणें तोही मोठ्या अचंब्यांत पडला. तिघांच्या मनांत तीन निरनिराळ्या कल्पना येऊं लागल्या. शेवटीं दुर्मतीनें दुराचारास विचारिलें, "आज तूं येव्हढा दुःखी कां दि-सतो आहेस?" तेव्हां दुराचार कपाळास हात लावून ह्मणतो, "अरे रे, हेंच कां आमच्या पदरच्या लोकांचें नशीब? (तो पुढें ह्मणणार होता कीं, मीच कां दुर्भा-ग्यानें ही बातमी आपल्यास कळवावी?) इतके शब्द बोलण्याबरोबर दुर्मति फार घाबरून गेला.

त्याच्या दोषी अंतःकरणास वाटलें कीं, माझें दुष्ट कृत्य खचीत उघडकीस आलें आहे. हें दुराचारास कसें समजलें असावें. बरें, हें एकट्या दुराचारासच समजलें असेल किंवा दुसरें कोणास समजलें असेल, हाही त्याला मोठा अचंबा पडला. परंतु पुनः मोठा हिय्या करून तो त्यास विचारूं लागला, "अरे, पण झालें आहे तरी काय?"

दुरा०—ह्या कपाळींच कळवावें असें आहे मग काय? तें टळतें कोठून? नित्य क्रमाप्रमाणें आज वर गेलों आणि वेलासिनी जवळ रोजच्या प्रमाणें गोष्ट काढणार तों ल्हो निजूनच उठली नव्हती. नित्य ती सुमारें चार जवाजतां उठते, परंतु आज इतका उशीर कां लागला ह्मणून हाका मारून पाहिल्या तरी ती उठेना. तेव्हां मला वाटलें कीं, आपल्याशीं न बोलवें ह्मणून ही रागानें निजली असावी.

दुर्म०—अरे, ती उठली नाहीं ह्मणून कांहीं हरकत नाहीं, आज पहा कशी गोडीनेंच कबूल होते ती.

दुरा०—अरे रे, आपल्याला अद्यापि इतकी आशा आहे, तिचा भंग मीच दुष्टानें करावा काय? ती रागानें निजली आहे, असें मनांत येऊन तिच्या अंगावरील वस्त्र काढलें आणि पहातों तों तिनें डोळे पांढरे केले आहेत. तोंड वासलें आहे, हातापायांचे खोरे वळले आहेत. असें पाहून एकदम घाबरून गेलों; उरस्थळीं हात लावून पहाणार तों पुन्हां मनांत शंका उत्पन्न झाली, परंतु अशा वेळीं अशी शंका मनांत आणून उपयोग नाहीं असें वाटून उरास हात लावून पाहिला, तों तेथें कांहींच नाहीं. असें पाहून तर हात पायच मोडून गेले. खालीं

देखील उतरवेना. शेवटीं ही बातमी सरकारास कळवि-ण्याकरितां कोणी जासुदास रवाना करावें ह्मणून खालीं आलों, तों स्वारी आली.

हे शब्द ऐकतांच **दुर्मति** धाडकन खालीं पडला. **दुराचारानें** त्याच्या तोंडांत थोडेंसें पाणी घालून अंगव-स्त्रानें वारा घातला, नंतर कांहीं वेळानें सावध होऊन तो एकसारखा हंबरडा फोडूं लागला.

इकडे ही बातमी ऐकून **कमलिनीची** काय दशा झाली असेल हें सांगावयास देखील नको. तिला वाटूं लागलें कीं आपल्यास एक संकटाची भीति होती, तेथें हें भलतेंच उत्पन्न झालें. तिचा जीव खुशाल असता तर आपण तिची कशी तरी सुटका केली असती, पण बापडीची ईश्वरानेंच सुटका केली. जिला कधीं सूर्याचें कोमळ उन्ह ठाऊक नाहीं तिला हा केवळ अरण्यवास प्राप्त होऊन भुकेतान्हेसाठीं प्राण सोडावा लागला, असें मनांत येऊन तिला फारच दुःख वाटलें.

**दुर्मति** मोठ्या दुःखानें उठून **दुराचारास** ह्मणाला, "मित्रा, मी आतां एकदां तिचें सरतेशेवटीं मुख पाहून येतों, ह्मणजे तेंच मनांत आणून समाधान करून घेत जाईन." तेव्हां **दुराचार** त्याला ह्मणाला, "सरकार, असा शोक करूं नका, त्या सुंदर शरीरावर चढलेली प्रेतकळा पाहून अधिकच दुःख होईल. आपण आतां **स्वस्थ** व्हावें. सरकार, जिवास व्यर्थ श्रम देण्यांत कांहीं अर्थ नाहीं, आपण खुशाल तर सर्व ठीक. "शीर सलामत तर पगडी पन्नास." आपण जर खुशाल अहां तर **विलासिनीसार-ख्या** शेकडों स्त्रिया मिळवितां येतील. तेव्हां **दुर्मति** ह्मणूं

लागला, "मित्रा, तूं माझी समजावणी करतोस खरी, तथापि विलासिनी सारखी सुंदर स्त्री ह्या जगांत मिळणें फार कठीण आहे. जरी एखादी अढळलीच तरी ती एकदां प्रीतीस पात्र झाली तिची बरोबरी तिला कधींही येणार नाहीं. अरे, आतां तिचें मुखकमल मला सरते शेवटीं एकदां पाहूदे."

## पद.

( सखया रामा विश्रांति० या चालीवर. )

हा दुर्भाग्या दुःखशालि अंतःकरणा, या दुःखाहुन वांच्छिलें न का बा मरणा ॥ ध्रु० ॥ जी लोलाक्षी बालार्क किरणें तापे, प्रातःकालीं ग्रीष्मींही शीतें कांपे, मृदु भूमीवर चालतां टाकी धापे ॥ तिची करिसी निज सौख्यालागीं छळणा ॥ हा० ॥ १ ॥ प्राणप्रिये गे सुकुमारे मन्मथशस्त्रे, कां दीनासी सांडिसी शोभवनक्षे, मागतसें मी कर क्षमेस कोमल गात्रे ॥ बहु चुकलों मी जोडितसें करचरणा ॥ हा दुर्भाग्या० ॥ २ ॥ नाहीं केलें साध्वीचें पदसेवन, नाहीं वदलों गोडसे शब्दही दोन, बहुविध छळिलें दुर्मतिसी अवलंबून, आतां कोठें पाहुं त्या सुहास्य वदना ॥ हा दुर्भाग्या० ॥ ३ ॥ हाय विधेरे काय हें भालीं लिहीसी, पापमतीसा करुनीया मज बुडवीसी, आतां कोठें जाऊं मी करूं गति कैसी ॥ आतां देई वृक्षांवर हें जगदाभरणा ॥ हा दुर्भाग्या० ॥ असा भास

असा विरह करून तो माडीवर धावत गेला. **दुराचा-रही** त्याला, आवरण्याच्या निमित्तानें त्याबरोबर वर गेला. परंतु आपल्या कर्माचा परिणाम काय होतो ही त्याला मोठी भीति उत्पन्न झाली. **दुर्मतीस** हातांत धरून तो दुराचारा च्या पाठोपाठ वर गेला. **दुर्मति** वर जाऊन त्या प्रेतास बिलगणार तों **दुराचारानें** त्याला गच्च धरून ठेविलें आणि पुष्कळ रीतीनें त्याचें शांतवन करूं लागला. शांतवनापासून तर **दुर्मतीस** कांहींच झालें नाहीं. परंतु **दुराचारानें** गच्च दाबून धरल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. त्यावेळीं प्रेताच्या अंगावर एक जाडसें वस्त्र गुरगटून घातलें होतें. **दुराचारानें** कांहीं सेवक लोकांस हाका मारून त्या प्रेताची विधीवाट लावायास सांगितली. त्या सेवकांस त्यानें आणखी इतकी सूचना केली कीं, प्रेतास तसेंच झाकून न्या, नाहीं तर त्या प्रेतकळा पाहून सरकारास अधीकच दुःख होईल. नंतर त्या सेवकांनीं तें प्रेत तसेंच झाकून एका पेटींत घातलें आणि बागेबाहेर एक खाडा खणून त्यांत नेऊन पुरिलें. प्रेताचे भयंकर अवयव कोणाच्या दृष्टी पडूं नयेत म्हणून **दुराचारानें** त्या वेळीं बरेच श्रम घेतले व बरीच कुशलता खर्च केली.

---

## भाग ९.

ग्रीष्म ऋतु प्राप्त झाला असतां वसंत ऋतूंतील शोभा जाऊन सर्व पदार्थांस कांहीं विलक्षण प्रखरता आली त्या शोकें वाटूं लागतें. ह्या ऋतूंतील एके दिवशीं दोन प्रहर सूर्यानें आपल्या प्रखर किरणांचा चोहोंकडे

ठाणे.

विस्तार केला होता. वारा बंद झाल्यामुळे झाडें पानें अगदीं स्तब्ध झालीं होतीं. दूरदूरच्या डोंगरावर आणि मैदानांत पाहिलें ह्मणजे मृगजलांचे ओघ वहात आहेत असें दिसत होतें. तृषाक्रांत झालेल्या मृगांचे कळप तें जल प्राशन करण्याच्या इच्छेनें इकडून तिकडे आणि तिकडून इकडे एक सारखे धापा टाकीत धावत होते, ,शा वेळीं, एका उंचवट्यावरील मैदानांत जेथें अनेक गगनचुंबित वृक्षांचे दाट रान होतें व त्याच्या मध्यस्थानीं लहान लहान झाडाझुडपांनीं वेष्टित अशी लहानशी मोकळी जागा होती तेथें फारच सुंदर देखावा दिसत होता. दोन प्रहरच्या उन्हानें जरी सर्व पदार्थांस प्रखरता आली होती, तरी गगनचुंबित वृक्षांच्या दाट छायेनें त्या ठिकाणास फार गारवा आला होता. ज्या सुंदर वस्तूविषयीं आतां पुढें लिहिणार ती वस्तू त्या ठिकाणच्या मध्यस्थानीं असतां तिच्या अवलोकनार्थ सूर्य आपल्या किरणरूप नेत्रांनीं त्या वृक्षांच्या फांद्यांतून चोरदृष्टीनें डोकावून पहात होता. त्या जागेच्या एका बाजूनें एक लहानसा नार पाण्याचा सुंदर झरा वाहत होता. त्यांत किरणांचें परावर्तन होऊन त्यांचा प्रकाश वृक्षांच्या टवटवीत पानांवर पडून त्यांची फारच सुंदर शोभा दिसत होती. सूर्याच्या किरणांच्या तप्ततेंत वृक्षांच्या पानांच्या गारव्याचें मिश्रण होऊन असा कांहीं देखावा दिसत असे कीं जणू आतां नुकतेंच उजाडलें आहे. तशांत चारा वगैरे आणण्याकरितां जे पक्षी दूरदूरच्या मैदानांत गेले होते ते दोन प्रहरीं विसावा घेण्याकरितां त्या शीतल स्थलांतील वृक्षांवर येऊन बसले होते. त्यांच्या चिवचिवाटानें असा भास

होई कीं, आतां हे नुकतेच आपआपल्या घरोट्यांतून बाहेर पडले आहेत.

अशा वेळीं एक स्त्री, त्या ठिकाणीं धडपडत उठली, आणि इकडे तिकडे पाहूं लागली, तों ज्या स्थळीं तिनें शयन केलें होतें, त्या स्थळापैकीं कांहींच दिसेना, असें पाहून तिला फारच आश्चर्य वाटलें. आधले दिवशीं रात्रीं आपले पति आपले शेजारीं निजले होते ते कोठें आहेत, ह्मणून मागें पुढें पाहते तों ते तर कोठेंच दिसेनात, परंतु एका बाजूस एका सांडणीवरील सामान व त्यांतच तिनें अंगावर घेतलेली शाल पडलेली तिच्या दृष्टीं पडली. ती पाहून तिला वाटलें कीं, मला ह्या ठिकाणीं कोणी सांडणी-वर बसवून आणलें असावें. परंतु पुनः तिच्या मनांत विचार आला कीं, ज्या वेळीं मला कोणी सांडणीवर बसविलें त्यावेळीं मी जागी कशी झाल्ये नसेन ? तेव्हां ही पिशाच्याची करणी असावी किंवा काय असा तिला संशय पडला. माझे प्रिय पति कोठें असतील, मी जवळ नाहीं असें पाहून त्यांस काय वाटेल? मजविषयीं त्यांच्या मनांत काय येईल? अशा अनेक कल्पना तिच्या मनांत येऊं लागल्या. इतक्यांत क्षुधेनेंही तिला फार व्याकुळ केलें. तेव्हां इतक्या सकाळीं क्षुधा कां लागली असावी असा तिला मोठाच विचार पडला. हे सर्व पिशाचाचेच खेळ असावेत, अशी तिची खातरी झाली. सांडणीवरील सामान पुन्हां पाहते तों त्यांत एक फराळाचा डबा दृष्टीं पडला. त्यांत सात आठ दिवस पुरे इतकी सामग्री होती. परंतु अशा वेळीं तिला फराळ कशाचा सुचतो? पतिवियोगानें तिचें मन अगदीं वेडें होऊन गेलें, तिच्या

प्रीतीचें जें भांडार तेंच नाहींसें झालें, मग तिची अवस्था काय विचारावी ! !

वाचणारहो, पतिवियोग म्हणजे प्रीतीचा भंग ह्या रोगानें स्त्रियांची फारच चमत्कारिक स्थिति होत असते. ह्या रोगानें पुरुषांस सोडलें आहे असें नाहीं, तथापि ह्याची विशेष बाधा स्त्रियानांच होते. ह्याचीं कारणें दोन असावींत असें वाटतें. त्यांतील पहिलें असें कीं त्यांचीं मनें पुरुषांपेक्षां फार कोमल; तेव्हां कोमल मनास ह्याची विषेश बाधा व्हावी हें उघडच आहे.

दुसरें असें कीं, पुरुषाचें मन मनुष्य जातींत वर्चस्व मिळवावें, आपल्याकडून होईल तितका प्राणीमात्रावर आपला अम्मल चालावावा, जा गोष्टींत आपलें हित करून घ्यावें, त्याच गोष्टीनें दुसऱ्याचें कल्याण केल्याचें आपण वैभव भोगावें, अशा अनेक विचारांत गुंतलेलें असतें. ह्या विचाररूप त्याच्या मानसिक अलंकारांतील "प्रीति" हा एक त्याचा अलंकार होय आणि ह्या अलंकाराचा वियोग जरी त्याला पुष्कळ अंशीं दुःखकारक आहे; तथापि दुसरे जे वर सांगितलेले अलंकार, त्यांनीं ह्याचें मन सदोदित भूषित असतें; त्यामुळें ह्या अलंकारवियोगरूपी दुष्ट रोगाची त्याचे मनास फारशी बाधा होत नाहीं. परंतु स्त्रियांची स्थिति फारच भिन्न आहे. त्यांच्या सर्व आयुष्याचा इतिहास हा प्रीतीच्या गोष्टींनीं मंडित असतो. अंतःकरण हें त्यांचें सर्व जग होय. पतीच्या मनावर-आपल्या प्रीतीच्या सौम्य आणि सुखपर अशा अमलाच्या संपादणुकीचें त्यांना तेंच स्थळ होय. ह्या जगांत त्या प्रत्यक्ष शरीरानें जरी वास करितात तरी त्यांचे सर्व विचार

ज्या ठिकाणीं प्रीतीचें राज्य आहे अशा अंतःकरणरूपी जगांत गुंतलेले असतात. पतीस कोणतेंही दुःख झालें असतां त्याबद्दल जो त्यांच्या अंतःकरणांत कन्हवळा उत्पन्न होतो तोच राज्यांतील मोठमोठीं कामें शेवटास नेण्यास साहस कर्ये करितो. तिचा सर्व प्राण ह्या प्रीतीच्या फलदायक व्यापारांत गुंतलेला असतो. आणि त्याच व्यापाराचें जहाज ह्या भवसागरांत फुटलें ह्मणजे मग काय सांगावें! तिची सर्व प्रकारें निराशा होऊन शरीर रोगांस चेतवून देतें, नंतर ते क्रूर सावकाराप्रमाणें त्या बापडीस गांजून गांजून शेवटीं यम लोकींच्या कारागृहांत घालून देतात.

आणखी असें आहे कीं ज्या स्थळीं एकदां दुःख प्राप्त होतें, त्या स्थलाच्या पुनरावलोकनानें मनुष्याच्या मनास विनाकारण फार त्रास होत असतो. परंतु तें स्थळ सोडून जाणें हें पुरुषाच्या शरीर संपत्तीनें आणि स्वातंत्र्यानें स्वाधीन असतें, स्त्रियांच्या तेंही स्वाधीन नसतें. ह्याप्रमाणें दुःखानें कालक्रमण करीत असतां ती स्त्री एक दिवशीं दोनप्रहराच्या सुमारास एका वृक्षा खालीं बसली आहे तों पलिकडच्या झाडींत कोणी फिरतें आहे असें तिला वाटलें. त्रेच्च दिवस एकांत रानांत काढल्यामुळें ती माणसासाठीं फार भुकेली होती, ह्यामुळें मोठ्या उत्कंठेनें कोण येतें आहे ह्मणून ती पहाते तों एक स्त्री तिजसमोर येऊन उभी राहिली. तिची दीन मुद्रा पाहून हिच्या मनांत एकदम गाहिंवर आला. त्या स्त्रीजवळ जाऊन तिनें तिच्या गळ्यास मिठी घातली आणि ह्मणाली, "बाई विलासिनी, तुह्मी इकडे हो

कुणीकडे आलां? रत्नपुरींत मीं तुमचा शोध करवला पण तुह्मीं आपल्या घरीं गेलां ह्मणून समजलं होतं."

विला०—बाई, ती दशा आतां विचारूंच नका, (असें ह्मणून रडूं लागते ) बाई, माझं दुर्भाग्यच. असो, तें कुणी विचारूं नये आणि मी सांगूं नये. पण ह्या अघोर स्थानीं आपलं येणं कसं झालं?

प० स्त्री०—तें तर बाई मला सांगतांच येत नाहीं. देवाची करणी देव जाणं.

असें ती स्त्री बोलते आहे तों **विलासिनी** एकदम दचकून उठली आणि घाबऱ्या घाबऱ्या इकडे तिकडे धावूं लागली; तेव्हां त्या स्त्रीनें तिचा हात धरला आणि ह्मणूं लागली, "बाई **विलासिनी**, असं हो काय करतां? इतक्यांत माझ्याशीं नीट बोलत होतां आणि इतक्यांत असं काय करूं लागलां?" परंतु हें तिचें बोलणें **विलासिनीनें** न ऐकतां तिच्या हातास मोठ्यानें झटका मारला आणि ह्मणूं लागली, "अरे दुष्टा, सोड माझा हात, नाहीं तर मेल्या तुझ्याच पायांशीं जीव देईन."

असे क्रोधयुक्त शब्द बोलून **विलासिनी** धावऱ्या धावऱ्या तेथून निघून एका झाडींत गेली. ती दिसत नाहींशी झाल्यावर कपाळास हात लावून ती स्त्री ह्मणूं लागली, "अरे दैवा, माझ्या जिवाची सोबतीण ह्या दिवसांत मला भेटली ती देखील तुला पहावली नाहीं काय?" (असें ह्मणून रडूं लागते ) असा कांहीं वेळ विलाप करीत आहे तों **विलासिनी** पुनः तिच्या जवळ येऊन बसली. तिला पाहून त्या स्त्रीस साल्हाद आश्चर्य वाटलें. ती **विलासिनीस** ह्मणाली, "बाई, तुह्मीं असंहो काय

केलंत? तुमची अशी अवस्था तरी कशानें झाली; माझ्याशीं बोलतां बोलतां माझ्यावर इतकी रागावून पळून गेलां काय? आणि पुन्हां परत आलां काय? तुह्मीं ह्या ठिकाणीं आलां तरी कशी?"

तेव्हां दुर्मतीनें तीस हिराबागेत नेऊन ठेवी पर्यंतचा सर्व इतिहास तिनें त्या स्त्रीस सांगितला. तो ऐकून तिला विलक्षण दुःख झालें. पुन्हां तिनें विचारिलें, "पण बाई, तुह्मीं तिथून इथं कशी आलां? तेव्हां विलासिनी ह्मणूं लागली, "काय बाई सांगूं? नशीब फिरलें ह्मणजे सारं पाठीं लागतं. एके दिवशीं मध्यरात्र उलटल्यावर एक काळ पुरुष मी निजल्ये होत्यें तेथें आला. तेव्हां तो चांडाळ दुर्मतिच आला असावा, असं मनांत येऊन अगदीं भयाभीत होऊन एकदम उठलें. पण तो मेला आल्याबरोबर आधीं माझ्या पायां पडला आणि ह्मणाला, "बाई तुझं दुःख पाहून फार कळवळा येतो; पण काय करूं? इतके दिवस इलाज चालला नाहीं. आज मोठ्या श्रमानें इथे, तुझी ह्या दुःखापासून सुटका करावी ह्मणून आलों आहें. तुला जर घरीं जावं अशी इच्छा असेल तर आतां माझ्या बरोबर चल." त्याचं नांव मी विचारलं तेव्हां त्यानें "दुराचार" ह्मणून सांगितलं. त्यावेळेस मेल्यानें अशा शपथा वाहिल्या, असा गोड बोलला का कुणी साधूच आहे असं वाटतं. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून, त्यानें खिडकीला शिडी लाविली होती तिने उतरून त्याच्या बरोबर ह्या ठिकाणीं आलें. इथे घेऊन आल्यावर तो मेला बोलला, "तुझं घर एथून फार लांब आहे, इतकं लांब आपल्यास पायीं जावबणार

नाहीं, ह्मणून मी नगरींत जाऊन एक रथ घेऊन येतों, तवपर्यंत तूं इथें स्वस्थ अस, इथें चोराचिलट्याचं भय फार आहे, येवढ्यासाठीं तुझे सारे दागिने माझ्या स्वाधीन कर." असं ह्मणून माझ्या पाचूच्या हारासकट सारे दागिने घेऊन गेला. त्यादिवशीं मी त्याची वाट पाहून दमलें, पण मेला आलाच नाहीं. दुसऱ्या दिवशीं एक घोड्यावर जसा शिलेदार सजून आला आणि बाई मी जाण्याची गोष्ट काढली ती एकीकडंच टेवून जो माझा त्यानें छळ केला तो काय सांगूं? त्यावेळीं असं वाटूं लागलं कीं, चुलींतून सुटलें आणि वहिलांत येऊन पडलें. काय बाई सांगूं, तेव्हांपासून हाल भोगतें आहे तें !! तो मेला नित्य नेमानें येऊन मला छळीत असतो. काय करूं बाई, कुठे तरी जावं, नाहीं तर कुठें तरी लपून राहवं ह्मणून आजच चहूंकडे फिरूं लागलें. तों नशीब थोर ह्मणून आपली गांठ पडली.

**प० स्त्री**—बाई, इतक्यांत माझ्या हातास झटका मारून जी धावत गेलां ती कां ?

**विला०**— तोच चांडाळ आला असं मला वाटलं ह्मणून घाबरून उठलें पण तुह्मीं हात धरला तेव्हां भीतीनें आणि संतापानें अगदीं बेफाम झाल्यामुळें मला वाटलं कीं त्यानेंच माझा हात धरला.

असें **विलासिनीनें** सांगतांच त्या स्त्रीस फार भय वाटलें. तिला वाटूं लागलें कीं अशाच उद्देशानें तर कोणी आपल्यास येथें आणलें नसेलना? **विलासिनीवर** जो भयंकर प्रसंग गुदरला आहे तो तर आपल्यावर गुदरणार नाहींना? आपलें तारुण्य आणि सुस्वरूप पाहून कोणाला

कशी बुद्धि उपजेल आणि कशी नाहीं. जें सुखास कारण तेंच दुःखास कारण होतें.

खरोखरी, सुस्वरूप हें स्त्रियांना जरी भूषणास्पद आहे तरी तेंच केव्हां केव्हां त्यांना घातुक होत असतें. येवढ्यासाठीं ज्या सुस्वरूपी आहेत त्यांनीं आपल्या भूषणाचा जरी आनंद मानिला तरी ज्यांना ह्या भूषणाची कमताई आहे त्यांनीं, आपण अशा घोर अनर्थापासून दूर आहों असें मानून आनंदी असावें. सारांश ईश्वरानें जी स्थिति दिली आहे तीच सुखदायक असें मानीत असावें.

वर सांगितल्या प्रमाणें त्या दोघी बोलत असतां त्यांच्या दृष्टी दोन पुरुष पडले. त्यांतील एकानें त्या स्त्रीच्या पायाशीं एकदम साष्टांगनमस्कार घातला आणि हात जोडून तिच्या पुढें उभा राहिला. त्या स्त्रीनें त्याच्या तोंडाकडे न्यहाळून पाहिलें आणि त्यास ओळखून ह्मणाली, "दुर्वीर्या, तूं इकडे कुणीकडे आलास? आतां कुठे रे असायचं? तिकडील वृत्तांत तरी काय आहे?"

दुर्वी०—बाईसाहेब, आठ दिवसांपूर्वी सरकारची स्वारी येथून पन्नास कोसांवर एक नगर आहे तेथें होती. सरकार खुशाल आहेत.

प० स्त्री—मग तूं इकड कुणीकडे आलास? हा देश तरी कोण आणि मला एथें कोणी आणून टाकलं? (असें ह्मणून रडूं लागते.)

दुर्वी०—(कपाळास हात लावून मोठ्या करुणा स्वरानें) काय? आह्मा सेवकांचें नशीबच फुटकें काय? तोंडानें सांगूं तरी काय?

प० स्त्री—अरे, असं काय ह्मणालास? (मनांत ह्मणते) काय काय मेलं पुढं होणार आहे कोण जाणे? जें जें ऐकावं तें अधिकच.

दुर्वी०—काय सांगूं बाईसाहेब!! नाहीं, तोंडानें एक शब्दही त्यांतील उच्चारवत नाहीं. आपल्या सारखीची ह्या दिवसांत अशी अवस्था व्हावी!! कसे आपण आतां दिवस काढाल?

हे शब्द ऐकून त्या स्त्रीस वाटलें कीं, हा जें बोलला तें आपल्या पतीविषयींच आहे, असें मनांत येऊन ती धाडकन खालीं पडली. परंतु कांहीं वेळानें जरा सावध होऊन ह्मणूं लागली, "अरे, काय तें सांग आतां, नशीब माझं, खरंच तूं तरी अधिक काय बोलशील?" असें ह्मणून पुन: जमीनीवर पडली आणि ह्मणूं लागली, "अरे दैवा, आजपर्यंत मीं आपलीच काळजी करीत होतें, पण नाहीं, सात आठ दिवसांत मेल्या वाघानेंही येऊन मला ह्या रानांत खाल्लं नाहीं, पण आज हा कायरे घाला घातलास? अरे, आतां मी कायरे करावं? परमेश्वरा, तुझ्या ह्या कन्येनें काय अपराध केला होता? आज कसा तूं कोपलास? देवा, तुला कशीरे ह्या कन्येची दया आली नाहीं? तिची काय ही अवस्था केलीस? परमेश्वरा, आतां कायरे करूं?" असें ह्मणून जरा शोक आवरून ती दुर्वीर्यास विचारूं लागली, "अरे पण दुर्वीर्या, खुशाल असायचं असं आतांच तूं ह्मणालास?" परंतु पुन: तिच्या मनांत आलें कीं असें ह्मणायची रीतच आहे; असें मनांत येऊन ह्मणूं लागली, "होय, परमेश्वरानें कुऱ्हाड उचलली पण तूं तरी कोयता कसा उचलशील? देवा, धावरे धाव.

आतां मी कायरे करूं."

हा तिचा शोक ऐकून दुर्वीर्य ह्मणाला, "बाईसाहेब, आपण काय समजलां? असा शोक एकदम काय करूं लागलां? मी आपल्यास आतांच्या आतां दोन तीन हांका मारिल्या पण आपण तिकडे लक्षच दिलें नाहीं. बाईसाहेब, यजमान अगदीं सुरक्षित आहेत. त्यांच्याविषयीं मी कांहीं बोललों नाहीं. आपण काय समजलां कोण जाणे.

हे शब्द ऐकून त्या स्त्रीस एकदम धीर आला आणि दुर्वीर्य बोलला त्याचा अर्थ आपल्यास भलताच वाटला असें मनांत येऊन ती त्यास ह्मणाली, "काय, काय तर तें सांग पाहूं, मला भलतंच मेलं वाटलं, मनच मेलं वाईट. तूं सोन्याचे शब्द बोलत असतां असं कां मेलं मला वाटावं?

दुर्वी०—बाईसाहेब, आपल्यास जें सांगणार तें आपल्यास जें वाटलें त्यापेक्षां कमी वाईट आहे असें नाहीं. सरकार तर खुशाल आहेत.

प० स्त्री.—एक खुशाल असायचं झालं ह्मणजे त्यांत सारं आलं. त्यासारखं दुसरं मला कांहीं गोड वाटत नाहीं. मग दुसरं वाईट काय असणार आहे? सांग तर खरं, फार झालं तर माझा प्राण जाणार असल, इतकंच ना?

दुर्वी०—प्राण जाण्याची गोष्ट बोललां ती तर पाळी आतां चुकली. ह्या सेवकाच्या हातून इतकी तरी चाकरी घडली.

प० स्त्री.—असं काय म्हणालास? ह्यांतलं कांहींच मला समजलं नाहीं.

दुर्वी०—सांगणें नशीबींच आलें मग काय? बाईसाहेब, आठ दिवसापूर्वीं आपण एका नदीच्या तिरीं एका मोठ्या विस्तीर्ण मैदानांत उतरलों होतों. त्या दिवशीं रात्रीं, अर्धी रात्र उलटल्यावर, सरकार माझ्या तंबूंत आले आणि आपल्याला एका सांडणीवर बांधून एखाद्या घोर वनांत नेऊन ठार मारण्यास मला सांगितलें. तेव्हां असें क्रूर कर्म करण्याचें कारण काय असावें म्हणून सरकारची पुष्कळ विनवणी करून मी विचारिलें परंतु त्यावेळीं ते असें म्हणाले कीं, तूं आधीं हिला मारून टाक, नंतर काय कारण तें मी तुला सांगेन. मग आपण जागी होऊन गोंगाट वगैरे कराल म्हणून मी सरकारास ह्मणालों, परंतु त्या गोष्टींचा मी चांगला बंदोबस्त केला आहे ह्मणून ते ह्मणाले. सेवकानें यजमानाची आज्ञा मानणें भाग, काय करावें? मग मी आपल्यास एका सांडणीवर घट्ट बांधिलें आणि ह्या ठिकाणीं आणून टाकून सरकारास सांगितलें कीं आपला प्राणनाश केला.

हें ऐकून त्या स्त्रीची काय अवस्था झाली असेल हें लिहून कळविणें फार अवघड आहे. तिला वाटूं लागलें कीं ज्या पतीची आपल्यावर प्राणापेक्षां अधिक ममता, त्यानें आपला वध करावयास सांगितला, ह्याचें काय कारण असावें? आपल्या हातून तर एखादा इतका मोठा अपराध झाला आहे असें वाटत नाहीं. कोणा दुष्टानें तर कांहीं खोटें नाटें सांगितलें नसेलना? ह्याप्रमाणें अनेक विचारांनीं तिच्या मनाचा अगदीं घोटाळा करून सोडला. ती **दुर्वीर्यास** मोठ्या दुःखानें व करुणास्वरानें ह्मणाली, "अरे **दुर्वीर्या**, माझ्या हातून असा कसला

अपराध घडला आहे? एकदम माझ्या जिवावरच कां पाळी आली ?"

दुर्बो०—कशाचा बाईसाहेब अपराध आणि कशाची चुक, अशा थोर मनुष्यानें हलक्या गोष्टीसाठीं असें साहस कर्म करावें? अरे रे! फार वाईट ! !

प० स्त्री—कांहीं अपराध नाहीं, चूक नाहीं. तर मग असं तरी काय झालं आहे.

दुर्बो०—काय सांगूं, मला सांगण्यास देखील लाज वाटते. आपला फारच आग्रह दिसतो आहे ह्मणून सांगणें भाग आहे? नदीच्या तीरीं शेवटच्या मुकामास आपण उतरलों होतों त्या स्थळापासून सुमारें पांच सहा कोसांवर एक नगर आहे. त्या नगरांत एक सावकार रहात असतो. त्याला अतिरूपवान अशी एक तेरा चवदा वर्षांची कन्या आहे. तिच्या लावण्याची, बाईसाहेब, देशोदेशीं कीर्ती पसरली आहे. ती ऐकून सरकारानें कांहीं दिसांपूर्वीं तिची तसबीर आणविली होती आणि ती पाहून त्यांचें मन आतांशीं सर्व गोष्टींवरून उडालें होतें. पुढें त्यानें आपले कांहीं लोक बोलणें लावण्याकरितां त्या सावकाराकडे धाडिले. परंतु अशी सुंदर कन्या सवतीवर देण्याचें त्यानें नाकबूल केलें तेव्हां आमची पहिली स्त्री नुकतीच वारली ह्मणून सरकारानीं त्यास निरोप धाडिला. त्यावेळेस सावकारानें त्याचें मागणें कबूल केलें. नंतर लग्नास आह्मी तिकडेच येतों ह्मणून सरकारानीं त्यास सांगून धाडलें. आणि गुप्तरीतीनें वैशाख वद्य १४ ही तिथि ठरवून देशपर्यटनाच्या निमित्तानें तिकडे जाण्यास निघालों. पुढें आपल्यास त्या मुकामापर्यंत नेऊन शेवटीं असा प्रकार करविला आणि

त्या नगरांत निघून गेले. अरे, रे, काय हें पुरुषाचें मन आसक्त.!!

हें दुर्वीर्याचें भाषण ऐकून त्या स्त्रीस फार दुःख झालें इतकेंच नाहीं, तिच्या मनाचा अगदीं घोटाळाही होऊन गेला. तिला वाटूं लागलें कीं, आपले पति असें खचीत करणार नाहींत. मज अनाथेचा वध करण्यास ते खचीत प्रवृत्त होणार नाहींत. कोणा गरीबास जरा दुःख झालें तर त्यांच्या मनांत जसें तटतटां तुटे. तर आजपर्यंत जिजवर प्राणाप्रमाणें प्रीति केली, तिचा वध करावा अशी बुद्धि त्यांना होईल काय? पुन्हां तिच्या मनांत येई कीं, दुर्वीर्य जें सर्व सांगतो तेंहीं सर्वांशीं सुयुक्त दिसतें. आपल्या पतीचें मन आतांशीं फार उदास असे व अखेरीच्या दिवसांत मौजेनें देशपर्यटनास कांहीं हेतूवांचून निघणें हेंही विरुद्धच दिसतें खरें. मला बरोबर न न्यावें असेंही त्यांच्या मनांत होतें. परंतु मी हट्टानेंच बरोबर गेलें तेव्हां असें कपट केलें असावें हें-ही सुयुक्तिकच दिसतें आहे खरें. कारण असें नसतें तर ह्या स्थळीं मी येऊन कशी पडतें? तथापि येवढ्या-नेंच तिचें समाधान होईना. पतिप्रीतीमुळें तिला वाटूं लागलें कीं, समयास हें दुसरें कोणाचेंही कपट असेल.

वाचकहो, ही स्त्री कोण ती गोष्टीच्या संबंधानें तुमच्या लक्षांत आलीच असेल. कारण वीरकांत व रूपवती ह्यांच्याविषयीं पूर्वीची हकीगत तुम्हांस माहीत आहेच.

रूपवती मोठ्या दुःखानें दुर्वीर्यास पुन्हां ह्मणाली, "आतां पुढं काय करायचं?" हें ऐकून दुर्वीर्य ह्मणाला, "बाईसाहेब, सध्या तर आपण येथें स्वस्थ असावें. नग-

रांत नेईन तर तिकडूनही पंचाईतच आहे. कोणा दुष्टानें चहाडी केली तर माझी लबाडी मला भवेल, आणि आपल्याही जिवास एखादा धोका बसेल. पुढें काय करावयाचें तें आपल्यास सात आठ दिवसांनीं कळवीन. आतां यजमानाकडे जाऊन आपल्या बऱ्याविषयीं होईल तितका यत्न करितों".

असें ह्मणून **दुर्वीर्य** आपल्या सेवकासह तेथून निघून गेला. **रूपवती** या स्थळीं करुणास्वरानें ईश्वराचा धावा करीत बसली. **विलासिनी** एका वृक्षा आड लपून हा प्रकार पाहत बसली होती. ती हें पाहून **रूपवती**-जवळ आली आणि तिला ह्मणूं लागली, "बाई, आपण अशी शोकाक्रांत कां झाला? आतांच दोघे येऊन गेले ते कोण?"

**रूप०**—काय बाई तें सांगूं? नशीब माझं इतकंच.

**विला०**—काय जें असल तें ह्यावेळीं मला सांगण्यास बाई, कांहीं हरकत आहे असें नाहीं. ह्यास्थळीं सुख दुःखाच्या आपण सारख्याच वाटेदारिणी आहों.

**रूप०**—काय बाई सांगूं? तुह्मांला त्याचं काय वाटेल आणि काय नाहीं, माझं मलाच कायसं वाटतं आहे, मग तुमचं कशाला हवं?

**विला०**—आतां तर बाई, शिकस्तच झाली.

**रूप०**—सांगतें तर बाई, तुमचा येवढा दुराग्रह आहे तर.

असें ह्मणून **दुर्वीर्यानें** सांगितलेला सर्व मजकूर **विला-सिनीस** सांगितला. तो ऐकून तिला फारच आश्चर्य वाटलें. ती **रूपवतीस** ह्मणाली, "बाई, ह्यांत कांहीं खचीत

कपट आहे. असा प्रकार करावा असें सरकारच्या खचीत मनांत येणार नाहीं. मग काय असल तें असो. ह्या जागेच्या भयंकरपणामुळें तर ह्या गोष्टीवर अगदींच विश्वास ठेववत नाहीं.

' विलासिनी असें ह्मणाल्यावर रूपवतीसही मोठा संशय पडला. अशा संशयांत तिनें व विलासिनीनें एक दोन दिवस काढून तिसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं त्या मुखमार्जनादि विधी आटोपून एका वृक्षाखालीं बसल्या आहेत, एकमेकी एकमेकीस आपल्या सुख दुःखाच्या गोष्टी सांगत आहेत, विलासिनी आपल्या पतीसाठीं शोक करिते आहे, रूपवती आपल्या पतीच्या कृतीविषयीं संशय घेत आहे, नानातऱ्हेच्या तिच्या मनांत कल्पना येत आहेत, विलासिनी तिचें निराकरण करीत आहे, तों अगदीं दोन प्रहर झाली. क्षुधेनें व्याकुळ झाल्यावर कांहीं खाण्याकरितां त्या उठत आहेत तों इतक्यांत दुर्वीर्य आपल्या पूर्वीच्या सेवकास घेऊन तेथें आला आणि त्या दोघींच्या दृष्टीआड एका झुडपाखालीं बसून त्या सेवकास ह्मणाला, "जा आतां तूं पुढें, मी येथेंच लपून बसतों. ही फराळाची सामग्री नेण्याच्या निमित्तानें जाऊन एकदा काढ पाहूं, कशी गोष्ट काढतोस ती! कार्य करीन तर मीच करीन असें ह्मणत असतोस, आतां पाहूं काय करतोस तें!!"

सेव०—आपण येथेंच स्वस्थ बसा. एक तासानें आपल्यास हांक मारावयास येतों, तर माझी मौज पहा! अहो, आपल्या सारख्याची गोष्ट काढण्याची खोटी, एक शब्द तर तेथें जाऊन बोलूं द्या कीं पहा त्या सुंदर प्रदेशापासून

प्रेमाचा प्रवाह आपल्याकडे कसा वहात येतो तो ! ! बरें; पण मग यजमानास आमची आठवण तरी येत जाईल ना?

दुर्वी०—जारे जुवा, ही थट्टेची वेळ नाहीं, काय होतें आहे तें होऊंदे एकदां.

सेव०—बरें आहे, जातों तर आतां.

असें ह्मणून तो सेवक, फराळाचा डबा हातांत घेऊन त्या दोघींजवळ गेला आणि तो डबा त्यांच्या पुढें ठेवून ह्मणाला, "बाईसाहेब" हें दुर्वीर्य महाराजानीं फराळाचें धाडिलें आहे.

असें ह्मणतो आहे तों कोणी पाठीमागून आलेंसें त्याला वाटलें ह्मणून तो झाडींतून डोकावून पाहूं लागला; तेव्हां रूपवती त्याला ह्मणाली, "अरे, काय पहातो आहेसरे? कोण आहे तिकडे? असें जों ती ह्मणते आहे तों, तो सेवक आल्या वाटेनें एकदम पळाला, आणि एका झुडपांत जाऊन लपून बसला, तेव्हां रूपवतीस व विलासिनीस फार आश्चर्य आणि भयही वाटलें. विलासिनीस वाटलें कीं, येथें खचीत दुराचार आला असावा. वीरकांताशीं केलेल्या लबाडींत आपलें अंग आहे असें त्यास दिसूं नये ह्मणून तो सेवक पळाला असावा. असा विचार मनांत येऊन ती फारच घाबरून गेली. पळावें तर तो खचीत पाठलाग करील? ह्या भीतीनें तिला जागेवरूनही उठवेना. पुढें होणाऱ्या गोष्टीविषयीं मनांत विचार येऊन नेत्रांतून एकसारख्या अश्रुधारा चालल्या. विलासिनीची अशी दशा पाहून रूपवती ही अगदीं वेड्यासारखी होऊन गेली आणि इकडे तिकडे धावूं लागली; तों इतक्यांत कोणी एकानें एका

वृक्षापाठीमागून येऊन तिला एकदम धरिलें. आणि मोठ्या प्रेमानें तिचें सर्वांग कवळिलें. त्यावेळीं ती मोठ्यानें किंकाळी फोडून ह्मणाली, "अरे, चांडाळा, सोड; कोणाच्या आंगास शोंवतोस? सोड सोड दुष्टा."

इकडे दुर्वीर्यास आपला सेवक पळाल्यामुळें मोठें आश्चर्य आणि भयही वाटलें. सेवक कां पळाला असावा ह्मणून जों विचार करतो आहे तों रूपवतीची किंकाळी त्याच्या कानीं आली. तेव्हां हा काय प्रकार असावा हें पाहण्यासाठीं तो एका निबिड वृक्षावर चढून बसला.

रूपवतीनें मागें सांगितल्याप्रमाणें किंकाळी फोडली आणि त्या पुरुषाच्या हातास हिसके देऊं लागली. परंतु अबलेचें बल कितीं? पुरुषापुढें ती काय करणार? पातिव्रत्यच तिचें संरक्षण कराल तर करील. तिनें या पुरुषाच्या हातास झटके मारिले; परंतु तो ऐकतो कोठें? त्यानें तिला अधिकच गच्च आवळून धरलें तेव्हां ती अधिकाधिक ओरडून ह्मणूं लागली, "अरे दुष्टा, सोडतोस कीं नाहीं मला? कां आतां तुझ्या नरडीचा घोट घेऊं? अथवा मी आपलाच तुझ्या पायांशीं प्राण देऊं? अरे ईश्वरा, धाव ह्यावेळीं. अरे आतां तुझा धावा करण्यास तरी वेळ कोठें आहे? ह्या वेळेस तरी अंत नको पाहूं. असें ती ह्मणते आहे तों इतक्यांत या पुरुषानें तिचें चुंबन घेतलें, आणि तिला ह्मणाला, "प्रिये हें आहे काय?"

रूप०—अरे अधमा, कोणाला प्रिये ह्मणतोस? सोड सोड मला चांडाळा!

पुरु०—अगे, मला ओळखिलें तरी का पण?

रूप०—अरे पाप्या, परस्त्रीला शोंवून आणखी बडबड

करितो आहेस, मेल्या सोड मला लवकर, सोडतोस का नाहीं? [illegible] ऐकतेच झाली, अगे, पण तूं आहे कोण हें तर नीट डोळे उघडून पहाशील? मग पापी आहें किंवा दुष्ट आहें तें समजेल. प्रिये, मजकडे एकदा पहा तर खरी. (असें ह्मणतो आहे तों त्याचा कंठ दुःखानें अगदीं दाटतो.)

हे त्या पुरुषाच्या गहींवरलेल्या अंतःकरणापासून आलेले शब्द ऐकून रूपवतीनें त्याच्या तोंडाकडे न्यहाळून पाहिलें, आणि लाजून तोंड एकदम खालीं घातलें. नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. कंठ अगदीं सद्गदित झाला. प्रेमाचे एकसारखे उद्गार येऊं लागले. प्रातःकाळीं सूर्याच्या प्रकाशानें कमलिनी जशा विकसित होऊन प्रफुल्लित होतात, त्याप्रमाणें तिची मुखश्री एकदम टवटवीत झाली. चंद्राच्या आकर्षणानें सागरास भरती येऊन ओसाड भाटीवर जसें पाणीं येतें, त्याप्रमाणें त्या पुरुषाच्या चंद्ररूप मुखाच्या प्रेमरूपी आकर्षणानें तिच्या दुःखानें ओसाड भाटीप्रमाणें झालेल्या विशाळ नेत्रांस पाणी येऊन ते फारच तेजःपुंज दिसूं लागले. तो पुरुष मोठ्या प्रेमानें तिला ह्मणूं लागला "कां? कोण चांडाळ आहे किंवा पापी आहे तें ओळखिलें ना नीट?

तो असें बोलला तरी रूपवतीचें अंतःकरण इतकें गहींवरून गेलें होतें कीं, तिच्यानें परत एक शब्दही बोलवेना. तेव्हां तो पुरुष पुन्हां तीस ह्मणाला, कां अद्यापि देखील बोलायचें नाहीं कां? स्त्रियांची जातच अशी. पुरुषास कितीही दुःख भोगावें लागलें तरी त्याची त्या विचार पूस तरी करितात काय?

रूप०—बोलेल आतां ती सुंदर स्त्री मिळाली आहे ती. माझं बोलणं गोड लागतं तर माझ्यावर मरणाची पाळी कां आली असती ?

पुरु०—हें काय ? हें काय तें मला मुळींच समजलें नाहीं बुवा.

रूप०—ती शूर्पनखा काय समजूं देते आहे ?

पुरु०—सुंदर स्त्री कोठली आणि शूर्पनखा कोठली ? हें आहे तरी काय ? आपल्याला तर बुवा कांहींच समजत नाहीं.

रूप०—नाहींच ती समजूं देणार ह्मणून मी ह्मटलंच.

पुरु०—पण ती कोण? आहे तरी काय?

रूप०—पुरे आतां. तोंडावर पदर घेतला ह्मणजे लोकांना तें जसें सोंग वाटत असल ?

पुरु०—पण मी सोंग आणलें आहे कसलें ?

रूप०—लोकांच्या अशा पोरी फसवल्या ह्मणजे झालें. हा पण पहिली मेली ह्मणजे दुसरी कशानें फसते? चुकलें मी. ( असें ह्मणून कंठ फार सद्गदित होऊन डोळ्यांस पाणी आणिते. )

पुरुष—जर मला कांहींच माहीत नाहीं तर दुसऱ्याची पोर आणि पहिलीचें मरण हें काय समजणार आहे? माझ्या मला जखमा आणि सात आठ दिवसांचे श्रम एक सारखे गांजीत आहेत. तशांत प्रिये, नशीब थोर ह्मणून तुझी ह्या वेळीं गांठ पडली; परंतु तूंही आपल्या शब्दरूपी तीव्र बाणांनीं ह्या दुर्भाग्याला टोंचित आहेस, असो, या वेळीं होईल तें थोडेंच आहे. काळ फिरला ह्मणजे बायको फिरते, पोरें फिरतात; सर्व कांहीं फिरतें.

असो, ईश्वराची इच्छा, (असे ह्मणून डोळ्यांत पाणी आणतो ).

हा पुरुष कोण तो, वाचकहो, तुमच्या लक्षांत आलाच असेल.

हे **वीरकांताचे** करुणायुक्त शब्द ऐकून **रूपवतीस** फारच दुःख झालें. त्याच्या हातांवर मान टाकून ती एक सारखें रुदन करूं लागली. हें पाहून **वीरकांतासही** अतिशय वाईट वाटलें. तो तिला ह्मणूं लागला, "प्रिये, तूं ह्या ठिकाणीं कशी आलीस? तुला ह्या ठिकाणीं कोणीं आणिलें? दुसऱ्याची पोर आणि पहिलीचें मरण तें काय ह्मणालीस?

**रूप०**—काय सांगूं? मला समजलें आहे तें फारच चमत्कारिक, तरी त्याच्या खरेपणाविषयीं मला फार भ्रांती होती, पण मन पहावें ह्मणून उगीच बोललें.

**वीर०**—तुला काय समजलें आहे तें सांग तर खरें.

हें ऐकून **रूपवतीनें** ती ह्या स्थळीं येऊन पडल्याचा व **दुर्वीर्यानें** सावकार कन्येशीं विवाहाविषयीं सांगितलेला सर्व मजकूर **वीरकांतास** सांगितला; आणि ह्मणाली, "दुर्वीर्याच्या सांगण्यांत मला संशय वाटत होता खरा, पण काय नेम? (किंचित्सें हसत मुख करून, बारीक स्वरानें लाजत ) जाईल समयास दुसरीवर मन!

**वीर०**—प्रिये, सांगशील त्याची शपत वाहून सांगतों कीं हें सर्व अगदीं खोटें आहे. दुसरीवर मन जाऊन तुझा वध करावा ही इच्छा मला स्वप्नांत तरी उत्पन्न होईल काय? प्रिये, काय सांगूं मीं आपलीं दुःखें. तुझ्यापेक्षां मला कमी भोगावें लागलें आहे असें नाहीं. माझी दशा

मलाच ठाऊक, तूं ज्या दिवशीं ह्या ठिकाणीं येऊन पडलें ह्मणून ह्मणतेस त्या.चदिवशीं दोनप्रहरीं उठून पहातों तों एका पर्वताच्या मध्यावर कांहीं झाडाझुडपांत अडकून पडलों होतों, प्रथम ही सर्व स्वप्नावस्थाच असावी असें वाटलें. परंतु कांटेझाडांचे तीव्र कांटे जेव्हां आंगास टोंचून सर्वांग रक्तबंबाळ झालें, दोनप्रहरच्या कडक उन्हानें सर्वांग तापून गेलें, कंठ सुकून अगदीं कोरडा पडला, तेव्हां ही सर्व स्वप्न स्थिती नव्हे अशी खातरी झाली. मग उठून इकडे तिकडे पहातों तों झाडपान ह्या खेरीज कांहींच दृष्टीस पडेना. सर्वांग दगडास आपटून आपटून अगदीं ठेचून गेलें होतें. ह्यावरून मला कोणी तरी पर्वताच्या शिखरावरून लोटून दिलें असावें अशी खातरी झाली. मग तसाच उठून आतां पुढें कोठें जावें व काय करावें ह्याविषयीं विचार करूं लागलों. आणि पर्वतांतून सुटका होण्यासारख्या कांहीं वाटा असतील तर पाहूं लागलों. परंतु खालीं पहातों तों मोठा थोरला कडा तुटलेला व वरतीं उभें सुळकें शिखर, असें त्या पर्वताचें स्वरूप दिसलें. मग सुटका होण्याची आशा तरीं कशाला? एकदां मोठा हिय्या करून खालीं उतरण्याचा यत्न करूं लागलों, परंतु प्रिये, काय सांगूं? एका झुडपाखालीं जमीन आहे ह्मणून पाय टाकतों तों पाय एकदम खालीं घसरला. खालीं नजर न पोहोंचे असा भयंकर कडा तुटलेला होता. त्यावेळेस थोड्यांत चुकलें, वर एका झुडपास हातानें गच्च धरलें होतें तें कां धरलें नसतें ह्मणजे पाताल दैवतांच्या पूजनास खालीं गेलों असतों. नंतर पाऊल इकडे तिकडे टाकण्यास देखील भय वाटूं लागलें. परंतु यत्न करून

पहाण्यास तीच वेळ आणि तेंच स्थळ हीं योग्य होत. मध्यंतरीं तीव्र उन्हांत तापून अन्नपाण्यावांचून प्राण सो- डावा त्यापेक्षां यत्न करून मरावें हें बरें, अशी खतरी झा- ल्यावर एका झुडपास धरून वर चढूं लागलों. त्यावेळीं प्रथम तर यत्न सफळ झाला. मग कांहीं हिम्मत येऊन झाडाझुडपास धरून वर चढूं लागलों. अर्धी मजल गेलों नाहीं तों हात पाय अगदीं थकून गेले. पुढें तसेंच चढावें तर हात सुटून एकदमच सर्व शरीराचा चुराडा होईल अशी भीति वाटूं लागली; परंतु पुन्हा मध्यंतरीं मरणाची आठवण होतांच, झाडाचा पाला झडून त्या स्थानानें जसे नवे कोमल अंकूर फुटतात, त्याप्रमाणें निराशेपासून पुन: हिम्मत आली. आणि मोठ्या यत्नानें व युक्तीनें वर चढूं लागलों. असें करतां करतां शेवटीं त्या पर्वताच्या शिखरावर तर पोंहोंचलों. तेव्हां जिवास कांहीं समाधान वाटलें, वर पोंहोंचण्या पूर्वी असें वाटत होतें कीं, हें शिखर एक आनंदाचें शिखर होईल किंवा दु:खाच्या ज्योतीचें अग्र होईल, परंतु दुसरी भीति लवकरच नाहीं- शी झाली. प्रथम असें वाटत होतें कीं त्या शिखराच्या पलीकडच्या आंगास एखादा कडा तुटलेला असला ह्मणजे मोठीच पंचाईत पडेल. परंतु शिखरावर पोंहोंच- तांच पलीकडे उतरण्यास चांगला मार्ग आहे असें दृष्टी पडलें. मग काय सांगूं प्रिये! मृत्यूच्या दाढेंतूनच सुटलों असें वाटूं लागलें. त्या शिखरावरून उतरून पलीकडच्या आंगास गेलों आणि हातांतील आंगठ्या, सल्ले विकून कांहीं अन्न सामग्री वगैरे विकत घेतली आणि तेव्हां- पासून उन्ह तान्ह कांहीं एक मनांत न आणतां तुझ्या

शोधार्थ एकसारख्या भटक्या मारीत फिरतों आहें. आज दैववशानें ही झाडी फार रमणीय दिसूं लागली ह्मणून दोन प्रहरचें उन्ह येथेंच टाळावें अशा बेतानें फिरत फिरत आंत आलों, तों येथें कोणी मनुष्य असावें अशी चाहूल वाटली, ह्मणून जों आंत येऊन एका वृक्षामागें उभा रहातों, तों तूं मोठ्या झपाट्यानें पळतांना माझ्या नजरे पडलीस. मग चित्तास जो आनंद झाला तो काय सांगूं. ?

हा **वीरकांताचा** इतिहास ऐकून **रूपवतीची** काय दशा झाली असेल ती सांगावयास देखील नको. ती मोठ्या दुःखानें **वीरकांतास** ह्मणूं लागली, " तर मग हा सारा प्रकार कसा घडला असावा ? मला ह्या ठिकाणीं कुणी आणलं असावं ? आणि मेल्या कोणा दुष्टानें त्या पर्वतावर नेऊन टाकलं असावं ? "

वीर०—हा सर्व खेळ **दुर्वीर्याचाच** असावा असें तुझ्या जवळ जें तो बोलला त्यावरून स्पष्ट दिसतें.

रूप०—असं करण्यांत **दुर्वीर्याचा** काय मतलब असेल? त्यानं मला इकडे आणलं आणि तिकडे पर्वतावर नेऊन टाकलं, तेव्हां त्याची ही कृति आपल्याला कशी समजली नाहीं ?

वीर०—माझ्या प्राणाची हानी करण्याच्या उद्देशानें मला पर्वतावरून लोटून दिलें आणि तुला ह्या स्थळीं सुरक्षित आणून ठेविलें, तेव्हा तुजविषयींच त्याचा कांहीं हेतु असावा, असें वाटतें. ज्या दिवशीं त्या दुष्टानें आपली ताटातूट केली त्याच्या आधल्या दिवशीं रात्रीं " मला फार गुंगी आली आहे " ह्मणून मी तुला बोलून

दाखविलेंच होतें. त्यावरून, त्यानें स्वयंपाक्यांशीं सामील होऊन आपल्याला कांहीं अमली पदार्थ घातला असावा, असें वाटतें आणि त्यामुळेंच त्यांचे सर्व खेळ आपल्या समजण्यांत आले नसावेत.

रूप०—खरंच, असचं असलसं वाटतं. त्या रात्रीं असं ह्मणायाचं झालं होतं खरं. काय मेल्याचं हृदय हें!! मोठ्या नशीबानें सुटलें चांडाळाच्या तडाक्यांतून. आतां मेल्यानं एका मनुष्याच्या हातीं फराळाचं धाडून दिलं, त्या मनुष्यानें इथें फराळाचं ठेविलें. आणि चांडाळ पळून गेला, तेव्हां कोण आलं असावं? तो इतक्या भयानं कां पळाला असावा? अशी भीती उत्पन्न होऊन मीही पळाल्यें.तों इतक्यांत हात धरायाचा झाला.

वीर०—प्रिये, तुझ्या जवळ दुसरी कोणी स्त्री बसलेली दिसली ती कोण? ती आतांच कोठें उठून गेली असें वाटतें.

रूप०—ती **सोमकांताची** बायको **विलासिनी**, ती ही बापडी अशाच तडाक्यांत सांपडली आहे.

वीर०—कोणत्या सपाट्यांत सांपडली आहे? ती तर आपल्या घरीं गेली होती. **वीरकांताचा** हा प्रश्न ऐकून **रूपवतीनें विलासिनीचा** सर्व इतिहास त्याला सांगितला. तो ऐकून **वीरकांतास** फारच दुःख झालें. परंतु बापडा करतो काय? कांहीं वेळ तिच्या साठीं हळहळून तो व **रूपवती** तिच्या कडे जावयास निघाली. इतक्यांत **विलासिनी** एका वृक्षा आड लपून ह्या दोघांचें संभाषण ऐकत होती ती बाहेर आली आणि **वीरकांताच्या** पायां पडून ह्मणाली, "आतां काय ते

 ठाणे.

मायबाप आपणच अहां. सर्व [illegible] ह्या अनाथ कन्येचं संरक्षण करणें आपल्याकडेच आहे." हें ऐकून वीरकांत तीस ह्मणाला, "बाई, कांहीं काळजी करूं नका, तुह्मीं मला माझ्या भगिनीप्रमाणें आहां. आतां तुह्मीं आधीं आह्मा-बरोबर रत्नपुरीस चला, नंतर तेथून तुमची तुमच्या घरीं रवानगी करूं." असें ह्मणून तीं तिघें तेथून निघालीं. कांहीं अंतरावर गेलीं नाहींत तों इतक्यांत एक मनुष्य भीतीनें अगदीं वेडा झालेला धापा टाकीत टाकीत तेथून पळतांना त्यांच्या दृष्टी पडला. त्याला पाहून रूपव-ती ह्मणाली, "हाच तो मेला चांडाळ दुर्वीर्याचा मनु-ष्य, आतां नुकतेंच फराळाचें घेऊन आला होता तो." ती असें ह्मणतांच वीरकांत त्यास धरण्यास मोठ्या आवेशानें पुढें धांवला, आणि आतां त्यास पकडणार इत-क्यांत झाडी पलीकडे कांहीं मनुष्यांचा गोंगाट होतो आहे असें त्यांच्या कानीं आलें. तेव्हां येथें कांहीं तरी दगा आहे असें वाटून ज्या ठिकाणीं त्या दोन स्त्रिया होत्या त्या ठिकाणीं परत आला. त्यांच्या जवळ जाऊन त्यांना जों ही गोष्ट सांगतो आहे इतक्यांत वीस पंचवीस दांडगे पुरुष, हातांत मोठमोठे सोटे घेऊन "दीन दीन" शब्द करीत आपल्याकडे धांवत येत आहेत असें त्यांच्या दृष्टी पडलें, मग त्या बापड्यांची दशा काय विचारावी?? गरीब गाई त्याघ्राची उडी पडली असतां ती शिंगें तरी हलवितें. पण बापडीं हीं काय करतात? वाचणारहो, त्यांच्या त्या वेळींच्या स्थितीचें वर्णन करूं लागलों असतां खरोखरी ग्रंथच लिहिले जातील. त्या तिघांच्या मनांत निरनिराळे विचार येऊं लागले. विलासिनीस ज्या गोष्टीची

धास्ती बसून गेली होती, त्या गोष्टीविषयींच अनेक कल्पना तिच्या मनांत येऊं लागल्या. **दुर्मतीच्या** आणि **दुराचाराच्या** अनेक भयंकर कृत्यांची तिला आठवण झाली. तोच प्रसंग येतो कीं काय असें तिला वाटूं लागलें. तिच्या मनांत आलें कीं, **दुर्मति आणि दुराचार** ह्यांच्यानीं जरी कांहीं आविचार करवला नाहीं, तरी हे रानटी दांडगे काय करतील आणि काय नाहीं ह्याचा अगदीं नेम नाहीं.

**रूपवतीची** आणि तिच्या प्रियकांताची तुटातूट झाल्या पासून तिचे विचार रात्रादिवस त्याच्या ठायीं गुंतले होते त्यामुळें तिच्या मनांत **वीरकांता**विषयींच अनेक कल्पना येऊ लागल्या. तिला वाटूं लागलें कीं, चोरटे बहुधा बलवानाचा द्वेष करतात तेव्हां ते आधीं **वीरकांतावर** घाला घालतील. असें मनांत येऊन तिचीही अगदीं वेड्याप्रमाणें अवस्था होऊन गेली. नेत्रांतून एकसारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या व मुख अगदीं म्लान होऊन गेलें.

**वीरकांत** सुमारें आठ दहा दिवस **रूपवतीच्या** शोधांत फिरत होता, त्यामुळें त्याचे सर्व विचार तिच्या ठिकाणीं गुंतले होते. तशांत ती नुकतीच भेटल्यामुळें त्याच्या मनांत मूर्तिमंतच वसत होती. मग तिची अशी अवस्था पाहून त्याला काय वाटलें असेल ह्याची सहज कल्पना करतां येईल. त्याच्या मनांत येऊं लागलें कीं, स्त्रियांचें सर्वस्वी संरक्षण करणें हें पुरुषाकडे आहे. परंतु ह्या वेळीं आपण जवळ असतां ह्या स्त्रीची काय दशा होईल!

कोण जाणे! चोरटे तिला पिडूं लागले ह्मणजे ती संरक्षणार्थ आपल्याकडे दीन वदनानें पाहील. परंतु आपल्या हातून आतां काय होणार आहे? ह्याप्रमाणें **वीरकांताच्या** मनांत तिसऱ्या प्रकारचे विचार येऊं लागले.

वाचकहो, ह्या गोष्टीपासून हें उघड दिसतें कीं, कोणत्याहि संकटाचे अनेक भयंकर परिणाम असले तरी व्यक्तिमात्राच्या मनांत जे विचार असतात त्या विचारांस अनुलक्षून ज्या गोष्टी घडून येणार त्याच त्यांच्या मनांत येत असतात. ह्यामुळें मनुष्यमात्राची अशी स्थिति होते कीं, एखाद्या संकटाचे अनेक परिणाम असतात, त्यांपैकीं कांहीं विषयीं त्यांच्या मनांत कल्पना येऊन त्यापासून आपलें संरक्षण करण्यासाठीं ते कडेकोट तयारी करतात; परंतु ज्याविषयीं त्यांच्या मनांत कल्पनाही येत नाहीं तेच एकदम त्याचा चुराडा करून टाकतात.

आतां ह्या तिघांविषयीं ह्मणाल तर मनांत अनेक विचार आणावे ह्याशिवाय दुसरें त्यांच्या हातीं कांहींच नव्हतें. लांडग्याची उडी पडली असतां गरीब कोकरानें जसें स्तब्ध रहावें अशी त्यांची दशा होऊन गेली. त्या चोरट्यांनीं धांवत "दीन दीन" शब्द करीत त्या तिघांवर एकदम हल्ला केला. त्यांतील कित्येकांनीं **वीरकांतास** सोटे मारून जमीन दोस्त करून टाकलें. एकजण त्यास लाथा मारूं लागला, एकजण बुक्क्या मारूं लागला, एक हात पिळूं लागला, एक हातापायांचीं बोटें मोडूं लागला, ह्याप्रमाणें त्याचे हाल हाल करून "आन् आन् आन्" ह्मणून ते त्याला ह्मणत, पण आपडा द्रव्य

दाखवतो कोठलें ? तो दीन वदनानें त्यास ह्मणे, " अरे माझ्याजवळ कांहीं नाहीं, मी कोठें कांहीं लपविलें नाहीं, अरे उगींच अनाथास कां छळितां ?" ह्याप्रमाणें तो करुणा भाकीत असतां त्या चोरट्यांचे दोन यजमान होते ते ह्मणूं लागले, " अरे ह्यो त लइ कावबाज दिसतोया, दोन हात दावल्यावगर आपल कायबी वळत नही. ह्ये समुकच्या रामकाटीप बांदुनशी चिंचाच फ्टाक वडा, तवा आपसुक दावील."

ह्याप्रमाणें यजमानाचे शब्द कानीं येतांच मग काय विचारावें ? वीरकांत जिवंत तरी सुटतो किंवा नाहीं ह्याचाच संशय. वीरकांतास मारून मोकळें केल्यावर त्या अबलांची ओढाताण मांडली. एक वस्त्र ओढूं लागला, दुसरा दागिन्यासाठीं हात ओढूं लागला, परंतु त्यांच्या जवळ कांहीं नाहीं असें पाहून तिसरा क्रोधानें लाथा बुक्या मारूं लागला. ह्याप्रमाणें चोरटे त्या बापड्यांस छळीत असतां त्यांतील एक असामी आपल्या यजमाना जवळ गेला आणि त्यांस ह्मणूं लागला, "नाइक माब, (वीरकांताकडे बोट दाखवून.) ह्यो त आपल्या रतनपुरच्या राजाचा कुनी लागतुय जनु ! मी यकदां ह्येला राजवाड्यामंदीं बगतला व्हता आस वाटतय.

हें ऐकून दुसरा यजमान ह्मणतो, "व्हय, आसल खरं! येरी अशल्या बिजल्या आवा दिसऱ्या कुनाच्या आसनार हाय ती ! आन् तो तरी बगा कसा फाकडा हाय तो ! जनु सुर्व्ये नाराय्येनच. समद आसुद्या. पन आता ह्यो इचार लइ नादान हाये. ह्ये बगा. आता ह्यो जर मोकळा झाला, तर समद्याची रांडकी केल्याव गर



म्हाइल काय? आनत्ये झाडां खालच भूतशी ह्येच कुनी तरी आसाव.

हें ऐकून पहिला यजमान ह्मणतो "अँः त्या मंदीं काय? ध्या देवाच नाव न टाका खरवून, मजी समदाच खटला उरकला. दोगांच्याशी मोटा बांदुनशन सोम्याप येक आन तो दिसरा नवा आला हाय त्याप दिसरी देऊन त्ये रामकाटीप ढोआमंदीं शेटून दोगाचशे हात दावाय आनाय सांगा मजी समद झाल.

दु० य०—हो! नामी विगत, पन त्या आवाच काय करनार?

प० य०—लइ बुवा तुमची चत्राई? दोगानी दोन वाटून शन घ्येऊ, मजी झाल.

दु० य०—नुकोरे बुवा त्ये पाप! ह्ये फंदान कारशारीन भाकरशी देनार नाय!

प० य०—दादा, तू तर लईच इद्यावान हायेस. आर भइ.., अशा फटाकड्या आपल्या झोपडी मंदीं का न्येनार? त्या आपल्या दरीमंदी ठिवल्या मजी परशाराच्या परबारा, बोभाट नाय न हाकाटी नाय!

असें ह्मणून त्या चोरट्यानी **वीरकांत** व दुसरा सापडलेला मनुष्य ह्यांच्या दोन मोटा बांधिल्या आणि त्या सो, म्या व नवा असामी ह्यांच्या स्वाधीन केल्या. त्यांतील **वीरकांताची** मोट नव्या असामीनें उचलली आणि ते दोघे त्यांचा वध करण्याकरितां एरंडोल ओढ्याकडे चालते झाले.

अशा वेळीं **रूपवतीची** काय दशा झाली असेल ती सांगावयास देखील नको. पतीचा आतां खचीत घात-

होतो हें समजल्यावर तिनें जो आकांत केला त्याचें काय वर्णन करावें? तीनें मोठ्यानें हंबरडा फोडून त्या चोरट्यांच्या यजमानांच्या पायांशीं लोळण घेतली आणि मोठ्या करुणास्वरानें त्यांची विनवणी करून ह्मणूं लागली, अहो मायबाप, ह्या वेळीं ह्या अनाथ कन्येचा असा घात करूं नका. तुह्मी जें सांगाल तें मी करीन, ह्या अनाथेला चुडे दान मात्र द्या. (मोठ्यानें रडून) माराहो मारा, त्यांना परत हांक मारा, अहो, ते जातील आतां, मारा लवकर हाक.

**पहिला यजमान**—आन खे कायम व्हायल्यावर आमी सांगू त्ये कस करनार तूं?

**रूप०**—अहो, तुह्मी जें सांगाल तें आह्मी खचीत करूं, त्यांना परत हाक मारा ह्मणजे झालें.

**दुस० य०**—काय येडी हाय, त्येच्या परीस त आह्मी मजबुत जवान हाव.

**रूप०**—अरे अरे, असें भलतंच काय बोलता? मी तुमची कन्या ह्मणून ना ह्मटलें? अहो माराहो कुणी त्यांना परत हाक. मारा, अर्धी त्यांना हांक मारा, मग हावें तें करा, पण आधीं हाक मारा (मोठया घाईनें) अहो गेले हो, ते लांब गेले. बोलावा कोणी त्यांना लवकर, अरे बोलावा! बोलावा!!

**प० य०**—व्हय, व्हय! तू आगदी कष्टी व्हउ नुको. जराशान त्येचा तुटका हात तुजा दिष्टी पडल. उगीच का गोंगाट लावलया.

**रूप०**—(चोरट्यांच्या यजमानांचे पाय धरून) नका हो नका असं करूं, माझा प्राण हवा तर घ्या, पण हाक

मारा त्यांना लवकर परत. ( दोघांकडे पाहून ) अहो, दिसत नाहींसे झालेहो ते, अहो, माराहो लवकर हांक.

दु० य०–आन् आपलच फिरून. त्योच काय एक मरद! आमी बग कस फकड हावो त्ये. तुझ्या मनास वाटल तो घ्ये ! क्वान व्हावा ? मप येती ?

रूप०–( मोठया संतापानें ) अरे चांडाळांनो, अझून मेल्या पाषाण हृदयहो, तुह्मांला दया येत नाहीं? जळोत मेल्यांनो तुमची तोंडं, काय शब्द तोंडांतून काढता ?

असें ह्मणून निराशेनें अगदीं वेडी होऊन ती त्या दोन चोरट्या पाठीं धांवूं लागली, परंतु कांहीं चोरट्यांनीं उठून तिला एका वृक्षास बांधून ठेविलें. मग बापडीची काय दशा विचारावी!! मन मोकळें धावणें तेही बंद झालें. एक रडण्याचें हातीं होतें तेवढें मात्र मन मोकळें करूं लागली, परंतु त्यांतही ती फार मोठयानें रडूं लागली ह्मणजे ते तिचा आणखी छळ करीत. ह्याप्रमाणें तिचे हाल करीत आहेत तों एक चोरटा त्या दोघां पैकीं एकाचा एक हात तोडून घेऊन आला, तेव्हां त्याला ते यजमान ह्मणूं लागले " आर तो दिसरा नाय कुट दिसत ! त्येचच त समद भय !

चोरटा–इक्त्यांत येल. तो खालच्या ढोआवर ग्येलता.

असें तो ह्मणतो आहे, इतक्यांत तो दुसरा असामी आला आणि दोघांनीं रक्तानें भरलेले दोन हात यजमानां पुढें ठेविले. ते निरखून पाहून त्यांतलि पहिला यजमान ह्मणतो " लइ पष्ट निट ? येकान आंतला डावा आन दिसऱ्यान आंतला उजवा! आतां त्येचा एक पुतळा बनवून हान् त्या बयाला दावा. "

वाचकहो, रूपवतीची आतां जी अवस्था झाली असेल तो काय सांगावी ! ! सर्व दुःखाचा येथें कळसच झाला. आतां अधीक कांहीं होणें उरलें आहे असें नाहींच. त्या चोरट्यांनीं आणलेले हात पाहतांच तिनें मोठ्यानें किंकाळी फोडून झाडावर एकदम मस्तक आपटलें आणि मोठा आक्रोश करून ईश्वरास करुणा स्वरानें ह्मणूं लागली, "देवा, तुला दिनाचा वत्सल असं ह्मणतात, साऱ्या अनाथावर तुझी कृपा सारखी असावी, पण ह्या पामरिवर हा कायरे घाला घातलास ? आतां ह्या अबलेनं काय करावं ? आतां हिचं संरक्षण कोणाच्या हातून व्हावं ? हिनं आतां कोणाकडे पाहवं ? असा हिचा सर्वस्वीं घात व्हावा असं जर तुझ्या मनांत होतं तर हा जन्म तरी कशाला दिलास? अरे रे, आतां मी कायरे करावं ? आधीं जं संकट आणलं होतंस त्यांतून पार पाडून भेट तरी कशाला केलीस ? एकमेकांच्या दृष्टी आड पाहिजे तें करायचं होतंस ! देवा, त्या दुष्टानं निर्दयपणीं प्राणास हात घातला असेल तेव्हां जीव कायरे बोलला असेल? अद्यापि तर माझ्या साठीं प्राण गुंतुन राहिला नसलना ? माझ्यासाठीं किती विपत्ति भोगाव्या लागल्या ? माझ्यासाठीं किती कष्ट झाले? उन्ह नाहीं पाहिलं का तान्ह नाहीं पाहिली, आज आठ दहा दिवस एकसारखे श्रम होऊन कायरे दशा होऊन गेली होती ! इतके कष्ट, इतकीं दुःखं ह्या पापिणीसाठीं भोगावीं लागून असा का शेवट केलास? अरे, मग येवढे जिवास कष्ट तरी कशाला दिलेस ? परमेश्वरा, दीनदयाळा, धावरे धाव. पहा अद्यापि तुझा कांहीं उपाय असेल तर, परमेश्वरा, धाव ( कपाळास हात लावून ) क-

शाचा आतां परमेश्वर धावतो! आणि कसला आतां त्याचा उपाय!! धावण्याची वेळ गेली तेव्हां नाहीं धावला तर आतां कुठून धावतो? अरे, रे, ह्या जिवाचं आतां मी काय करूं? कोणासाठीं आतां हा ठेवूं? पण तो तरी आतां कुठे सोडतो आहे?" असा विलाप कर. ये आहे तों पहिला यजमान ह्मणतो "कार, इन त लइच त्वांड सोल्ड. त्यामंदीं यक बोळा कोंबून शेन् चला समदे. आपनासनी त लइ लांब जान हाय.

दु० य०—हो, इच्या रडन्या न भेकन्याला काय करता? बिगीबिगी रस्ता सुदरावा ह्येच चुकट!

प० य०—ह्येतर खर, पन (दोघींकडे बोट दाखवून) याचां न्याव काय करनार?

दु० य०—त्यामंदीं व्ह काय? कोनूती तरी एक तुमी आटपा, मजी न्हायलली मीं घ्येतो.

प० य०—हुं! त करा वाटनी!

दु० य०—नहि, तो वल्डांचाच मान हाये.

प० य०—(विलासिनीकडे) ही ब्येस हाय, पन घान्यामंदून काल्डेल्या उसावानीं वकटी दिसती, दिसरी आपली मदमच हाय, पन जरा टुमटुमीत हाय. आपन आपली मदम पतकरतो, नक्कितर ते तुमासनी.

दु० य०—वा: आन् ही आक्शी हाड आमी कह्यापायी घ्येवी?

प० य०—हायरे मर्दा, दुतोंड्या माहांडुळ्यावानी काय बोलतो! वाटणी करन्याची परवानगी कुनी दिल्ती!

दु० य०—हा! ह्मनशेन् अपुन असा गळा धरल्डा काय?

प० य०—न्हाऊद्या. हावी त तूमी करा.

दु० य०—तुमी करा आन आमी करा. हाये काय त्या मंदी. दोगानीबी येकसार व्हाव.

प० य०—बर, व्हाउद्या आता यो वादांग! तुमची पोठ दुकी काडुनशी टाकतो. ( रूपवतीकडे ) ही आपली तुकतुकित तुमी घ्या आन् ( विलासिनीकडे ) ह्ये उसाच चिपाट आमी पतकरतो. आदिक उन खाउ घातल मजी हीच बगा कशी सुर्यावानी दिसल ती !

असें ह्मणून चोरट्यांनीं त्या दोघींस एका भयंकर गुहेंत नेलें तेथें त्यांना सोडून सर्व जावयास निघाले, इतक्यांत ज्या चोरट्याच्या स्वाधीन वीरकांतास केलें होतें, तो चोरटा ह्मणूं लागला, "यजमान, आज माझे हात पाय अगदीं मोडून गेले आहेत. बावखंडे तर अंगदीं चूरून गेलीं आहेत, मला आजचा दिवस रजा द्या.

प० य०—हा वकट्या, यका फेसोळीवानीं मानसाला खांद्यावर घेऊनशीं गेला त हीदशा! शिपीमंदीं पानी घेऊन ह्यान जीव तरी दे!

दु० य०—आसुद्या, आसुद्या! नवाच हाय? व्हलाव्हता व्हइल पष्ट.

असें तो यजमान ह्मणाल्यावर त्यांतील कित्येकांनीं त्या चोरट्यास एका शिळेस गच्च बांधिलें आणि त्याच गुहेच्या पलिकडच्या एका विवरांतील निरनिराळ्या भागांत त्या दोन स्त्रियांस ठेवून गुहेच्या तोंडास एक मोठी शीळ लावून सर्व चालते झाले.

ज्या सुखाच्या प्राप्तीची मुळीं आशा देखील नसते तें सुख प्राप्त झालें असतां जो आनंद होतो तो काय सांगावा ?? परंतु त्याच सुखाचा एकदम भंग झाला ह्मणजे जें

दु:ख होतें तें फारच कठीण आहे. पतिभेटीची अगदीं दुराशा झाली असतां त्याच्या अकस्मात भेटीनें **रूपवतीस** जो आनंद झाला असेल तो काय सांगावा ??? **रूपवती** आणि **वीरकांत** ह्यांच्या भेटीमुळें आजपर्यंत जीं आपल्यावर संकटें गुदरलीं आहेत त्यांचा शेवट होतो असें मनांत येऊन **विलासिनीस** तरी थोडका आनंद झाला असेल? परंतु ह्या सर्व आनंदाचा एकदम शेवट होऊन दु:खाचा कळसच झाला. मग बापड्या **रूपवतीची** व **विलासिनीची** काय दशा झाली असेल ??? पतिमरणापेक्षां **रूपवतीस** अधिक दु:ख तें कोणतें ? ज्या संकटास भिऊन भिऊन अगदीं जर्जर होऊन गेली होती, व ज्यापासून मुक्तता होण्याची कांहींशीं संधी आली आहे असें वाटत होतें तेंच संकट प्राप्त झालें, मग बापड्या **विलासिनीची** तरी काय दशा झाली असेल??? परंतु करितात काय? बराच वेळ धाय माय मोकून रडून रडून कंठ मोकळा झाल्यावर आपली आतां ह्या ठिकाणा पासून सुटका कशी होते ह्याविषयीं **रूपवतीच्या** मनांत विचार येऊं लागले. बसल्या ठिकाणीं बसून राहिलें तर आतां कांहीं होणें नाहीं, व ते चोरटे परत आले ह्मणजे भलतेंच संकट प्राप्त होईल, येवढ्यासाठीं आतां गुहेंत फिरून पळून जाण्यास एकाद्या मार्गाचा शोध करावा. येवढ्यासाठीं ती त्या आंधारगुहेंत इकडे तिकडे फिरूं लागली. ती गुहा फार ठेंगणी असल्यामुळें तिच्या सुकुमार मस्तकास वारंवार दगडाच्या कपारीचे टोले बसत. आंधारांत पायांखालीं अगदीं दिसत नसल्यामुळें पाय एखाद्या खाचेंत अथवा उंचवट्यावर पडावा आणि तिनें धाडकन

जमीनीवर आपटावें. ह्याप्रमाणें फिरतां फिरतां एकदा एक मोठ्या कपारीचा तिच्या डोक्यांत तडाका बसला, आणि ती मूर्छा येऊन धाडकन खालीं पडली. डोक्यांतून भळभळां रक्त वाहूं लागलें. कांहीं वेळानें मूर्छा गेल्यावर पुढें जाऊन पहाते तों एक दार तिच्या दृष्टीस पडलें. त्या दारास चोरट्यांनीं एक मोठा दगड बसविला होता. तो दगड एकीकडे लोटावा ह्मणून तिनें बराच यत्न केला. परंतु जिला एक चौफुल्यांसहित पानसुपारीच्या तबकाशिवाय दुसरा जड पदार्थ उचलण्याचाच माहीत नाहीं, तिला असा दगड कोठून लोटणार!! त्या दगडाशीं बराच वेळ झञ्चा पञ्चा खाऊन तो अगदीं हलत नाहीं असें पाहून ती निराश होऊन गेली. आणि दुसरें एखादें तसेंच दार असेल तर पहावें ह्मणून मागें परतून पुन्हां इकडे तिकडे फिरूं लागली. परंतु बराच वेळ ठेंचा खातखात तिनें ती गुहा शोधिली, तथापि दुसरा मार्ग कोठेंच दिसेना असें पाहून अगदीं निराश होऊन आपल्या पूर्व स्थळीं येऊन बसली. पुढें चोरटे रात्रीचे परत आल्यावर त्यांनीं **रूपवतीस** व **विलासिनीस** अन्न पाणी, एक अंथरावयास वस्त्र व एक पांघरावयास वस्त्र आणून दिलें. आणि ज्या चोरट्यास शिळेस बांधून ठेविलें होतें त्यास सोडून घेऊन गेले. दुसऱ्या दिवशीं ते सर्व ज्या वेळीं लुटीसाठीं जाऊं लागले तेव्हां त्या चोरट्यानें पुन्हा ढोंग केलें आणि त्याचोरट्यांनीं पुन्हां त्याला शिळेला बांधून ठेविलें आणि सर्व चालते झाले. ह्याप्रमाणेंच चोरटे रोज त्या स्त्रियांस अन्न पाणी आणून देत, तो चोरटा रोज अजारीपणाचें ढोंग करून तेथें राही आणि **रूपवती** त्या गुहेंत इकडे तिकडे फिरे.

ह्याप्रमाणे सुमारे पंधरा दिवस गेल्यावर **रूपवती** इकडे तिकडे फिरत असतां तो शिळेस बांधून ठेविलेला चोरटा तिच्या दृष्टी पडला. त्याला पहातांच तो तिला केवळ यमस्वरूपीच भासूं लागला. हा चोरटा मोठा सभ्य व नम्र होता, परंतु आपल्या पतीचा ह्यानेंच घात केला असा **रूपवतीच्या** मनाचा ग्रह झाल्याकारणानें तो तिला मोठा दुष्ट अधम असा वाटूं लागला. त्याला पहातांच ती मागें परतणार इतक्यांत त्यानें मोठ्या नम्रतेनें तिला "**विलासिनी** बाईसाहेब," ह्मणून हाक मारिली, आणि ह्मणूं लागला, "बाईसाहेब, मी आपला विश्वासू चाकर आहे." हे शब्द ऐकून **रूपवतीस** मोठा विस्मय प्राप्त झाला. हा कोण असावा? जर हा चोरटा असेल तर ह्यास **विलासिनी** हें कोठून माहीत असेल? ह्याविषयीं तिला मोठा संशय पडला. जवळ जाऊन पहावें तरी मनांत अनेक कल्पना येऊं लागल्या. इतक्यांत तो पुन्हां बोलूं लागला, "बाईसाहेब, आपण देखील ह्या सेवकास ओळखीत नाहींशा झालां काय? एका प्राणाचें संरक्षण करून, जिचें आजपर्यंत अन्नपाणी खाल्लें, तिची ह्या संकटापासून मुक्तता करावी ह्मणून इतकी खटपट केली, परंतु दैवा, तिनें देखील कां ओळख टाकावी? नाहीं, नाहीं, बाईसाहेब, आपण ओळख टाकिली अशी गोष्ट कल्पांतीं घडणार नाहीं. आपण भयाभीत झाल्यामुळें मी कोण आहें तो आपल्यास संशय प्राप्त झाला असेल. परंतु मी आपला विश्वासू सेवक **रणधीरसिंग** आहें बाईसाहेब." हे शब्द ऐकून, हा खचीत चोरटा नव्हे, कोणी तरी भला मनुष्य असावा अशी **रूपवतीची** पक्की खातरी झाली. तो

एक जीव वाचवून आलों ह्मणून ह्मणाला त्याचा अर्थ काय असावा? ह्याचा तिला मोठा संशय पडला. आपल्या प्रिय पतीस ह्याच्याच स्वाधीन केलें होतें, त्यास तर ह्यानें वाचविलें नसेलना? असें मनांत येऊन जो तिला एकदम हर्ष झाला तो काय सांगावा? परंतु त्यानें हात तोडून आणल्याचें पुन्हां तिला स्मरण होतांच तिनें एकदम आंग धरणीवर टाकून एकसारखा शोक करण्यास प्रारंभ केला. तो ऐकून **रणधीरसींगास** वाटलें कीं, ही आपली स्वामीण **विलासिनी** नव्हे, ही **वीरकांताची स्त्री रूपवती** होय. हिच्या पतीचा मी वध केला असें हिला वाटून ही शोक करीत आहे. आतां तिला जवळ हाक मारून तिच्या प्रिय पतीच्या सुरक्षिततेविषयीं तीस बातमी सांगावी. असें मनांत येऊन तो तिला ह्मणूं लागला, "बाईसाहेब, आपण **विलासिनी** नव्हेत, हें मीं ओळखिलें, परंतु आपण मला त्यांच्यापेक्षां कमी आहां. असें नाहीं. आपले प्रियपति, **वीरकांत** महाराज, सुरक्षित आहेत." हे शब्द कर्णीं पडतांच ती तटकन उठून उभी राहिली, आणि **रणधीरसिंगाजवळ** जाऊन त्याला साष्टांग नमस्कार घालून ह्मणूं लागली, "मायबाप, तुह्मी काय बोललां तेंच पुन्हा बोलून ह्या कन्येस जिवंत करा. खरोखरी, आपलें बोलणें मला अमृतापेक्षां अधिक वाटत आहे. काय सुरक्षित असायचं काय? सांगा पाहू मला काय तें." हें ऐकून तो तिला ह्मणू लागला, "बाईसाहेब, मी ह्या येथें बंधनामुळें बलहीन होऊन पडलों आहें, ज्या दोऱ्यांनीं बद्ध आहें त्या सोडून आधीं माझी मुक्तता करा. पुढें मी आपल्यास सर्व हकीकत कळवीन." असें तो बोलतांच रूपव-

**तीनें** त्या शिळेजवळ जाऊन त्या दोऱ्यांच्या गांठी सोडल्या आणि त्यास मुक्त केलें. पुढें **विलासिनी** बाईसाहेब कोठें आहेत ह्मणून त्यानें विचारिलें. परंतु ती मला मुळींच भेटली नाहीं असें तिनें सांगितल्यावर तो तिच्या शो-धास निघाला. बराच वेळ इकडे तिकडे फिरला परंतु त्या अंधारगुहेंत **विलासिनी** त्याला कोठेंच सांपडेना, ह्मणून अगदीं निराश होऊन तो **रूपवती**जवळ परत आला. त्याला पहातांच तिनें विचारिलें,"**विलासिनी** बाई सांपडली काय?" तेव्हां त्यानें मोठा दुःखाचा सुसकारा टाकून उत्तर दिलें, "ती तर, बाईसाहेब, कोठें सापडत नाहीं. येथें जर अधिक वेळ मोडावा तर ते यमकिंकर आतां लवकरच परत येतील. बाईसाहेब, आपल्यास **वीरकांत** महाराजाजवळ नेऊन पोंहोंचवितों. नंतर **विलासिनी** बाईच्या शोधार्थ परत येईन. आपल्यास नेऊन पोंहोंचविलें ह्मणजे एक जीव तरी निर्घोर होईल. मग आमची काय वाट होईल ती होवो.

पतीजवळ नेण्याची गोष्ट काढतांच **रूपवतीचा** आ-नंद काय सांगावा!! तिला आकाशही ठेंगणें होऊन गेलें. **विलासिनी** न सांपडल्यामुळें तिला कांहीं दुःख झालें खरें, परंतु **रणधीरसिंग** तिच्या शोधार्थ परत येतों ह्मणून ह्मणाल्यामुळें तेंही नाहींसें झालें.

**रणधीरसिंगानें** फार बळ करून गुहेच्या दाराचा दगड जरासा सरकविला आणि त्या वाटे **रूपवतीस** घेऊन बाहेर पडला. कांहीं वाट चालून गेल्यावर **रूप-वतीनें** त्याला प्रश्न केला, "तुह्मी कोण व ह्या ठिकाणीं येऊन कसे पडलां?" तेव्हां **रणधीरसिंगानें** उत्तर दिलें,

" बाईसाहेब, इतक्या दिवस मीं **सोमकांताजवळ** चाकरीस होतों. परंतु नशीब फिरल्यामुळें त्यांवर व त्यांच्या बरोबर माझ्यावर कारागृहाची पाळी आली. तेथें जीं संकटें भोगिलीं तीं काय सांगू ! ! परंतु ईश्वरास दया, तेथें एक माझ्या ओळखीचा दुय्यम कारभारी होता त्यानें मला तेथून मुक्त करून, मी मेलों अशी बातमी उठविली, व मला दूर देशांतरास जाण्यास सांगितलें, आणि माझ्या पाठीं **सोमकांताचीही** लवकरच मुक्तता करतों ह्मणून मला बोलला होता; मग काय झालें असेल कोण जाणे ! !

रूप०—तें तुह्मांला नाहींच कां कळलं ? (असें ह्मणून जीभ चावते )

**रण०**—नाहीं नाहीं, काय तें मला कळलें नाहीं, काय झालें ?

**रूप०**—या कारभाऱ्यानें मुक्त करण्यापूर्वी बापड्यास ईश्वरानंच मुक्त केलें.

हें ऐकून **रणधीरसिंगास** किती वाईट वाटलें असेल हें सांगावयास देखील नको. परंतु बापडा करतो काय? त्याच्या मनांत आलें कीं ही वेळ झाल्या दुःखाचा शोक करण्याची नव्हे, येणाऱ्या अरिष्टाची तजवीज केली पाहिजे. असें मनांत येऊन **रूपवतीस** बरोबर घेऊन मोठ्या दुःखानें पुढें चालला तों पुन्हां तिनें त्याला विचारिलें, "तिथून सुटल्यावर तुह्मी इथे कसे आलां ? आणि मग:-शीं प्राण कसा वांचवलात ?

हें ऐकून **रणधीरसिंग** बोलूं लागला, " बाईसाहेब, तेथून मुक्त झाल्यावर मीं आपल्या गावीं जाऊं लागलों तों

वाटेंत ह्या चोरट्यानीं मला गांठलें आणि माझ्याजवळ कांहीं नाहीं असें पाहून माझे हालहाल करून मला मारूं लागले. परंतु आतां प्राणसंरक्षणासाठीं कांहींतरी उपाय केला पाहिजे असें मनांत येऊन मी त्यांना थाप मारिली कीं, मी एक चोर आहे; मला बरेच दिवस शिकार न सांपडल्यामुळें आज माझ्या जवळ कांहीं नाहीं, परंतु कांहीं दिवस जर तुह्मी आपल्या टोळींत मला ठेवाल तर मी तुमचें लवकरच कांहीं तरी साधून देईन व मी आपलें-ही कल्याण करून घेईन. असें ह्मणाल्यावर त्यानें आपल्याजवळ मला ठेऊन घेतलें, परंतु कोठें बाहेर वगैरे जाऊं लागले आणि मला बरोबर न्यावयाचें नसलें ह्मणजे ते मला त्या शिडीस बांधून ठेवितात. परंतु तेथून सुटण्यास आजपर्यंत सवड सांपडली नाहीं." हें ऐकून रूपवतीनें मोठ्या उतावळीनें विचारलें, "पण आतां असाम्रचं कुठें?" तेव्हां तो ह्मणूं लागला, "त्या चोरट्यांनीं जेव्हां सरकाराना माझ्या हवालीं केलें त्यावेळीं त्या दुसऱ्या चोरट्यांस झुकांडी देऊन सरकारास एका लांब झाडींत नेऊन सोडिलें, आणि शेजारच्या खेड्यांत जाऊन रहावयास सांगितलें. पुढें त्या दुसऱ्या चोरट्यानें ज्या अनाथाचा प्राण घेतला त्याचाच दुसरा हात तोडून घेऊन आलों. आपली व **विलासिनी** बाईसाहेबांची सुटका करावी ह्मणून ढोंग करून त्या चोरट्यांबरोबर जात नसें."

**रणधीरसिंगानें** इतकें वर्तमान सांगतांच **रूपवतीस** जो आनंद झाला असेल तो काय सांगावा!! त्यास पारावारच नाहींसा झाला. तीं दोघें मोठ्या आनंदानें बोलत चाललीं आहेत तों इतक्यांत त्यांच्या कानीं कांहीं

" बाईसाहेब, इतक्या दिवस मीं **सोमकांता**जवळ चाकरीस होतों. परंतु नशीब फिरल्यामुळें त्यांवर व त्यांच्या बरोबर माझ्यावर कारागृहाची पाळी आली. तेथें जीं संकटें भोगिलीं तीं काय सांगूं !! परंतु ईश्वरास दया, तेथें एक माझ्या ओळखीचा दुय्यम कारभारी होता त्यानें मला तेथून मुक्त करून, मी मेलों अशी बातमी उठविली, व मला दूर देशांतरास जाण्यास सांगितलें, आणि माझ्या पाठीं **सोमकांताचीही** लवकरच मुक्तता करतों ह्मणून मला बोलला होता; मग काय झालें असेल कोण जाणे !!

**रूप०**—तें तुह्मांला नाहींच कां कळलं ? (असें ह्मणून जीभ चावते)

**रण०**—नाहीं नाहीं, काय तें मला कळलें नाहीं, काय झालें ?

**रूप०**—त्या कारभाऱ्यानें मुक्त करण्यापूर्वीं बापड्यास ईश्वरानंच मुक्त केलें.

हें ऐकून **रणधीरसिंगास** किती वाईट वाटलें असेल हें सांगावयास देखील नको. परंतु बापडा करतो काय? त्याच्या मनांत आलें कीं ही वेळ झाल्या दुःखाचा शोक करण्याची नव्हे, येणाऱ्या अरिष्टाची तजवीज केली पाहिजे. असें मनांत येऊन **रूपवतीस** बरोबर घेऊन मोठ्या दुःखानें पुढें चालला तों पुन्हां तिनें त्याला विचारिलें, "तिथून सुटल्यावर तुह्मी इथे कसे आलां ? आणि मघांशीं प्राण कसा वांचवलात ?

हें ऐकून **रणधीरसिंग** बोलूं लागला, " बाईसाहेब, तेथून मुक्त झाल्यावर मीं आपल्या गांवीं जाऊं लागलों तों

खडखडाट आला. तो ऐकून तीं दोघेंही अगदीं भया-भीत होऊन गेलीं. त्यांना वाटलें कीं, हे चोरटेच परत आले. **रणधीरसिंगास** वाटूं लागलें कीं, आज हे आपल्या प्राणाचा खचीत नाश करितात. **रूपवतीस** वाटूं लागलें कीं, आपल्या पतीची आणि आपली आतां खचीत गांठ पडत नाहीं, इतकेंच नाहीं, परंतु आतां आणखी कोणतें अरिष्ट गुदरतें कोण जाणे. ह्याप्रमाणें तीं दोघें मोठ्या विवंचनेंत असतां पाठीमागून एक घो-ड्याचा रथ मोठ्या झपाट्यानें आला. त्यांतील एका मोठ्या धडेल पुरुषानें एकदम खालीं उडी टाकली आणि **रणधीरसिंगाच्या** पाठींत मोठ्यानें लात मारून त्यास जमीनीवर पाडलें आणि **रूपवतीस** पटकन उचलून रथांत टाकिलें, आणि रथ मोठ्या झपाट्यानें पळवीत नेला.

ज्या दिवशीं **रणधीरसिंग रूपवतीस** घेऊन गुहेच्या बाहेर पडला, त्याच दिवशीं रात्रीं चोरट्यांच्या ज्या यज-मानानें **रूपवतीस** घेतलें होतें त्यास तिजकडे जावें अशी इच्छा उत्पन्न झाली. तिचें सुस्वरूप मनांत येऊन तो कामानें अगदीं वेडा होऊन गेला; आणि मोठ्या त्वरेनें त्या गुहेकडे आला. गुहेच्या दाराचा दगड सरकलेला पाहून त्याच्या मनांत जरा संशय उत्पन्न झाला. परंतु तसाच आंत जाऊन पहातो तों तेथें बांधून ठेविलेला चोरटा नाहीं असें पाहून फार खिन्न होऊन ज्या दरींत **रूपवतीस** ठेविलें होतें त्या दरींत तो गेला; तों तीही तेथें नाहीं, असें पाहून तर तो अगदीं निराश होऊन गेला. त्याच्या कामानें त्यास अधिकच वेडें करून सोडिलें.

खरोखरीच, जी वस्तू प्राप्त व्हावी ह्मणून मनांत उत्कंठा उत्पन्न होते, ती वस्तू प्राप्त होईल असें वाटल्यावर ती उत्कंठा फार कमी होते. परंतु तिच्या प्राप्तीची जसजशी दुराशा होत जाते तसतशी ती उत्कंठा अधिकच प्रज्वलित होत जाते.

रूपवती ठेविल्याजागीं नाहीं असें पाहून त्याच्या मनांत आलें कीं, ती दुसरी स्त्री तरी आहे किंवा नाहीं तें पाहून यावें असें मनांत येऊन तो तिच्याकडे गेला. तिचेंही सुस्वरूप पाहून त्याचें मन अगदीं वेडें होऊन गेलें आणि आपला सोबती येथें नसतां आपली कामना पूर्ण करून घेण्यास कांहीं हरकत नाहीं असें मनांत येऊन तो तिच्या जवळ गेला आणि तिला ह्मणूं लागला, "का दैवा, आता करताना झेरवानी, तुमी खुप समजुनशी असा. तुज नशिब लइ थ्वा, म्हुनसी ह्यो असा पव्या तुज मिळला."

असें ह्मणून तिच्या अगदी संनिध जाऊन तिच्या अंगावर हात टाकणार तों ती एखाद्या नागिणी प्रमाणें मोठ्यानें फुंकारून त्याला ह्मणाली, "अरे मेल्या, हो पाठीमागें, कोणाला शिवण्यास पुढें येतोस? असे शब्द ती बोलतांच तो क्रोधानें अगदीं संतप्त होऊन गेला आणि तिला ह्मणूं लागला, "हा खाप्ये, गोडिगुलाबीने ह्मनत व्हतूं से नही आल मनास. नशिब तुज! बग आतां इंगा." असें ह्मणून तो अडाणी पशू सारखा तिच्या अंगावर चाल करून गेला. मग बापडीची काय दशा विचारावी? आतां आपल्या पातिव्रत्याची खचीत आहुती होते असें तिला वाटून ती अगदीं मरणोन्मुख होऊन गेली. परंतु निसीम पातिव्रत्याचें संरक्षण कर्ता परमेश्वरच होय. तो

दांडगा तिला स्पर्श करणार, इतक्यांत कोणी पाठीमागू-न येतो आहे असें त्याला वाटलें. पाठी मागें जरा जा-ऊन पहातों तों आपलाच सोबती, ज्याणें विलासिनीस घेतलें होतें तो येतो आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्या-चा सोबती त्याच्याप्रमाणेंच कामानें पीडित होत्साता तेथें पहिल्यानेंच आला होता. तेथें आपल्या सोबत्यास पाहून त्याला फारच संताप आला आणि तो त्यास ह्मणाला, " आरये हरामखोरा, कोनरे तो हाये? " हे शब्द ऐकून तो पहिला चोरटा अगदीं ओशाळा होऊन गेला. इतक्यां त तो दुसरा चोरटा अगदीं जवळ जाऊन ह्मणाला, " काय राव, तुमची त सोद्याचीच अवलाद जनु! कह्या पायीं विथ तुमी आलता"? तें ऐकून पहिला ह्मणतो, "आन तूंरे कुनाची अवलाद! येक फडाकडी काडूनशेन नेली आन आतां इकडबी डोळा हायेच. अशा गोष्टीनच बर-कात नायती!"

दुस० य०—आन् कुनी नेली तुमची? तुमी आपल जाना तिकड!

प० य०—हाहाय भड्या, उठबूनबी न्येतो आन जा ह्मनबी सांगतो.

दु० य०—आर, ह्मनतु तरी काय? दारूगिरू त न्हई प्याला!

प० य०—आतां आपल त्वांड न्हाउद्या. च्वारत च्वार आन शिरज्वार!

दु० य०—मी का लटक ह्मनतु. दान्याच्यान आपुन नाहि बगतली.

प० य०—चला त मंग दावा कुट हाय ती!

दु० य०—चला त बिगी चला! तुमची तुमास दाऊन शेन येतों.

असें ह्मणून ते दोघेही ज्या ठिकाणीं रूपवतीस ठेविली होती त्या ठिकाणीं आले; आणि ती तेथें नाहीं असें पाहून दुसरा यजमान बोलूं लागला " खरीच रांडकी गमावली, बर तो नवा चाकर ठिकानीं हाये का बगा!

प० य०—तोबी नाहि!

दु० य०—ब्रेचच्ये गड्या, ह्येच्च काम! आता मारा हाका!

प० य०—कां? आमी कह्या पायी?

दु० य०—नहि त काय करनार?

प० य०—का? योक हाये, तीच आळीपाळीन वाटुन घेउ मजी झाल.

दु० य०—काय काय? फिरूनशी बोल बगू! बायलच्या पाळपाकरनारा लइच साळसूद! माक्तयान अस बोलशील त याद राक.

प०य०—आर ह्यिबग, द्येन्या नाघेन्या बिना भांडाघका? चाल आपन समद्याना इचारू. आन ह्ये सांगतील तस दोगबी करू.

दु० य०—चल चल! जातीप सांगून तुहि गुरगुडीच बंद करतो बग!

असें ह्मणून ते चोरटे विलासिनीस तेथेंच ठेवून मोठ्या निकरानें भांडत भांडत आपल्या समाजांत गेले आणि आपल्या गोष्टीचा निर्णय करावयास सांगूं लागले. परंतु ते सर्व लुटीवरून जाऊन आल्यामुळें अगदीं थकून गेले होते, ह्मणून "ह्या गोष्टीचा निर्णय आह्मीं उद्यां करू"

ह्मणून ते ह्मणाले. पुढें ते यजमान बरीच रात्र झाल्यावर आपआपल्या घरीं जाऊन निजले. नंतर ह्या भांडणाचा प्रकार फार वाईट होईल असें बाकीच्या सर्व चोरट्यांस वाटून ते एका जागीं जमले आणि आपसांत ह्या गोष्टीचा निर्णय ठरवूं लागले. एक ह्मणूं लागला "आर ह्ये बगा, ह्ये दोगांच भांडान, ह्यो आकाबाईचा फ्येरा हाये. या मं-दीच समदा येळ जाऊन तंट मातर वाहाडतील.

दुसरा ह्मणूं लागला "जावद्याकीं, रांडपायी समद भांडान, द्या दोगांच्यावी गळया बांदून, आन् व्हा मोकळ ! रिकामा आट कुनाला हावा.

तिसरा ह्मणूं लागला " आर, ह्ये समद खर, पन आ-स नक्शेतर येकाच्या हाती लागल, मजी तो दिसन्याचा बारा तरी पडून द्येल काय ? समद याड !

चवथा ह्मणतो "आपुन त तरसून ग्यलो. टाका रांड-ला रातोरात खपवून मजी समद झालं."

पांचवा ह्मणतो, "काय बिऱ्या, बोलतो काय, हाये काय इचार तरी ! अशेल्या चांन्नीला मारनारा कवान आ-सल तो आसो. दगडबी तिच्यापायीं इगरून जायील. मंग आमीत मानसच हावू.

असा वाद होतां होतां शेवटीं त्यांत एक वृध्द झातारा मनुष्य होता, त्यानें मसलत काढली कीं, आपण तिला या गहेंतून लांब नेऊन सोडून द्यावी, ह्मणजे सारीच कट-कट चुकेल. एक पळून गेली त्याप्रमाणेंच हीही पळाली असें ह्मणावें, ह्मणजे आपल्यावर कांहीं येणार नाहीं. ही मसलत सर्वांस पसंत झाली. पहाटेचा सुमार होतो आहे तों त्यांतील एक चोरटा त्या गुहेंत गेला. त्यावेळीं बिला-

सिनी एका कोपऱ्यांत निश्चित पडली होती. तिला हांक मारून, कांहीं शिवीगाळ करून, तिला गुहेपासून सुमारें अर्धकोसावर नेऊन एका निबिड रानांत त्यानें तिला सोडून दिलें.

---

## भाग १० वा.

पूर्वी, **कुमित्राच्या** मरणाचा वृत्तांत सांगितला आहे, तो सर्वांच्या लक्षांत असेलच. प्रातःकाळ होऊन बराच वेळ झाला तथापि राजा उठत नाहीं, असें पाहून अनेकांच्या अनेक कोटया चालूं लागल्या. कोणी ह्मणूं लागले कीं, रात्रीं गाणें बजावण होऊन राजास जागरण झालें असेल ह्मणून राजा उठला नसावा, कोणी ह्मणत राजानें कांहीं अम्मल केला असेल त्याच्या गुंगींत धुंद होऊन पडल्यामुळें राजा उठला नसेल. ह्याप्रमाणें कल्पना चालल्या आहेत तों बराच वेळ झाला. राजाच्या चैनबाजीची मंडळी धूम खेपा घालून परत जाऊं लागली. शेवटीं कांहीं मनुष्यें राजाच्या रंगमहालांत गेलीं आणि पहातात तों राजाच्या उरांत कोणी कट्यार मारलेली उभीच आहे, तोंड वासलेलें आहे, जखमेंतून रक्ताचे लोटच्यालोट वाहून सर्व चिरगुटें पांघरूणें लाल होऊन गेलीं आहेत, हा भयंकर देखावा पाहून हाहाकार उडून गेला. आंत गेलेलीं मनुष्यें मोठ्या आक्रोशानें ओरडत बाहेर आलीं. सर्व राजघराणें एकत्र होऊन एकच आकांत उडून गेला. प्रधानादि कारभारी जमले. त्यांनीं हा प्रकार पाहून राजवाड्यांतील सर्व पाहरेकऱ्यांस व इतर

शिपाई लोकांस एकदम कैद करविलें आणि ह्या गोष्टी-ची मोठ्या ज्ञपाट्यानें चौकशी सुरू केली. शहरांत कित्येक लोकांस मोठा आनंद आणि कित्येक लोकांस मोठें दुःख झालें. ज्यांना आनंद झाला त्यांना हें भय पडलें कीं, राजवधाचा आरोप आतां कोणावर येतो आणि कोणावर नाहीं. नगरींत जे कोणी राजाच्या विरुद्ध आहेत, असें प्रधानादि मंडळीस वाटत होतें, त्यांना एकदम कैद करण्याचा हुकूम झाला. जिकडे तिकडे धरावर आणि पळापळ सुरू झाली. कित्येक आपलें घर, आपलें दार, आपल्या बायका, आपलीं पोरें सोडून धूम पळ काढूं लागले. कित्येक हिम्मतवान् होते ते मोठ्या हिमतीनें, ह्या गोष्टीचा नीट शोध करा, ह्मणून आपण होऊन शिपायांच्या स्वाधीन होऊं लागले. ह्याप्रमाणें एकच गडबड उडून गेली असतां कोणी कोणी दुर्मति कोठें आहे ह्मणून चौकशी करूं लागले. तो कोठें सांपडत नाहीं असें पाहून कित्येक आपसांत कुजबुजूं लागले. असें करतां करतां शेवटीं ही बातमी प्रधानादि मंडळीच्या कानावर गेली.

ते दुर्मतीची चौकशी करीत असतां, राजवाड्यावरील पहारेकरी सांगूं लागले कीं, ते मध्यरात्र उलटल्यानंतर राजमहालांत गेले होते आणि तीन चार घटकांनीं परत निघून कोठें बाहेर गेले. एवढ्यावरून पुष्कळांच्या मनांत दुर्मतीविषयीं फार संशय येऊं लागला. परंतु कोणाच्यानें काहींच उघड बोलवेना. जो तो आपसांत कुजबुजूं लाग-ला. इतक्यांत एक दोन वाटसरू येऊन सांगूं लागले कीं, पहांटेच्या सुमारास आह्मी वाटेनें येत असतां, दुर्मती-सारखा कोणी मनुष्य कावराबावरा होऊन हिरा बागेक-

डे जातांना आह्मीं पाहिला. तेव्हां हें कृत्य समयास राज्य-प्राप्तीच्या लोभानें दुर्मतीनेंच केलें असावें अशी पुष्कळांची खातरी होत चालली. पुढें सर्व मंडळी त्याच्या शोधार्थ मोठ्या झपाट्यानें त्या बागेंत गेली. कित्येक गाड्यांत बसले होते, कित्येक घोड्यांवर बसले होते, कित्येक पायांनींच धूम पळत चालले होते. ह्याप्रमाणें ते सर्व दोन प्रहर टळून चार पांच घटका होत आहेत इतक्यांत त्या बागेंत जाऊन पोंहोंचले. पुढें त्यांतील मोठमोठी मंडळी आंत जाऊन पहात्ये तों दुर्मति शोक करीत बसला आहे, दुराचार त्याचें समाधान करित आहे. त्या बागेंतील सर्व सेवकलोक उदास झाले आहेत, हें पाहून त्यांना वाटूं लागलें कीं, दुर्मतीनें कांहीं अम्मल करून पितृवध केला असावा, व त्याचा आतां पश्चात्ताप होऊन शोक करीत आहे. सेवकांस हें वर्तमान समजूनच ते इतके उदास झाले असावेत.

ह्या सर्व मंडळीस पाहून, दुर्मतीची अगदीं त्रेधा उडून गेली. आपलें दुष्ट कृत्य उघाडीस येऊन, ही मंडली आपला पाठलाग करीत आली आहे अशी त्याची खातरी झाली. परंतु वेळ आतां मोठ्या चतुराईनें व हिमतीनें मारून नेली पाहिजे असें मनांत येऊन तो निमूटपणें तेथेंच बसला. पुढें त्या मंडळीनें त्यास प्रश्न केला, "स्वारी आज अशी शोकाक्रांत कां?" तेव्हां त्यानें उत्तर दिलें, "काय सांगूं? आजपर्यंत जिला जिवाची सखी मानली होती, तिनेंच आज मला फसविलें. मी दूर देशांतून एक अतिरूपवान कलावंतीण आणली होती. माता पित्यांच्या मर्यादेस्तव तिला येथें आणून ठेवणें भाग पडलें

होतें. ती, आज सुमारें आठदहा दिवस अजारी पडली होती, त्यामुळें मला इतके दिवस नगरींत यावयास सुद्धां झालें नाहीं. तिची प्रकृति आज पहाटेच्या सुमारास अतिशय बिघडून शेवट झाला." हें ऐकून त्या मंडळीच्या मनाचा अगदीं घोटाळा होऊन गेला. पहारेकरी सांगतात कीं आज हा रंगमहालांत गेला होता, वाटसरू सांगतात कीं, आज हा हिराबागेकडे जाताना आह्मी पाहिला, हा सांगतो कीं, मी पंधरा दिवस नगरांत सुद्धां आलों नाहीं. तेव्हां ह्यांतील खरें कोणाचें मानावें आणि खोटें कोणाचें ह्मणावें, हें त्यांना अगदीं समजेना. अनेकांच्या मनांत अनेक कल्पनांचे तरंग उठूं लागले. परंतु ही वेळ आतां विचार करण्याची नव्हे असें मनांत येऊन प्रधानांनीं त्यास प्रश्न केला, " सरकार, आपल्याला आज कांहीं नगरांतील कमजास्ती समजलें आहे काय," हें ऐकून **दुर्मति** ह्मणाला, "नाहीं बुवा, काय नवल विशेष आहे?" तेव्हां ते ह्मणाले, " कशाचें नवल आणि कशाचें विशेष. आपल्यास राजवधाची बातमी समजली नाहीं काय ?" हे शब्द ऐकतांच, मोठें सोंग आणून **दुर्मतीनें** धाडकन आंग खालीं टाकलें आणि मोठ्यानें आक्रोश करूं लागला. परंतु त्यावेळीं, कित्येकांनीं खऱ्या भावानें, कित्येकांनीं जबरदस्तीनें त्याचें समाधान करून त्यास नगरांत नेलें, आणि राजाचा सर्व प्रेतसंस्कार करविला.

दुःखाचे कांहीं दिवस गेल्यावर, ह्या गोष्टीची चौकशी करण्याचें जर आपण सोडून दिलें तर लोकांस आपला संशय येईल असें **दुर्मतीच्या** दोषी अंतःकरणास वाटून, त्यानें ह्या गोष्टीची चौकशी मोठ्या झपाट्यानें सुरू केली.

हा आरोप कोणावर ढकलावा व तो कसा स्थापित करितां येईल ह्याविषयीं त्यानें पुष्कळ विचार केला, परंतु सरते शेवटीं त्याच्या मनांत असें आलें कीं, हें सर्व कृत्य वीरकांतानेंच केलें म्हणून आपण कंडी उठवावी.

ह्या गोष्टीचा आरोप **वीरकांतावर** घालण्यास **दुर्मतीस** कोणतीं साधक कारणें झालीं हें समजण्यासाठीं **वीरकांत** व **रूपवती** ह्यांची तुटातुट झाल्यापासून **रत्नपुर** नगरींत काय प्रकार झाला तो सांगितला पाहिजे. **वीरकांतास** वाटल्याप्रमाणें व त्यानें **रूपवतीस** सांगितल्याप्रमाणें **दुर्वीर्यानेंच** अमली पदार्थ देऊन त्यांची तुटातुट केली होती. वाचणारहो, **दुर्वीर्य** तुमच्या लक्षांत असेलच कीं हा **सोमकांताचा** कारकून होता. **दुर्मतीच्या** भिडेस्तव असा कारकून ठेवणें **सोमकांतास** भाग पडलें होतें. पुढें, हा **दुर्मतीकडे** जात येत असतां **रूपवतीस** पाहून अगदीं वेडा होऊन गेला होता. परंतु **दुर्मतीसारख्याच्या** मदतीशिवाय ती प्राप्त होणें नाहीं असें त्यास वाटून त्यानें **दुर्मतीची** पूर्ण कृपा संपादन केली होती; आणि त्यास **विलासिनी** प्राप्त करून देण्याच्या यत्न करूं लागला होता. त्यानेंच **सोमकांताच्या** सहीचें **रूपवतीच्या** नांवाचें बनावट पत्र तयार करून तें **कामिन्यास** दाखविण्या करितां **दुर्मतीच्या** स्वाधीन केलें होतें. त्यांत **दुर्मतीचें** व आपलेंही कार्य साधावें असा याचा हेतु होता. **रूपवतीस** कोठडींत वगैरे कोंडून ठेविली तर ती सहज साध्य करून घेतां येईल असें त्यास वाटत होतें. **दुर्मतीही**, त्यास **रूपवती** प्राप्त करून द्यावी ह्या कामीं फार झटत होता. **वीरकांत** देश पर्यटनास ना-

णार असें जेव्हां त्याला समजलें तेव्हां त्याच्यापाठीं **रूपवती** **दुर्वीर्याच्या** स्वाधीन करावी असा त्यानें बेत केला होता. **वीरकांतानें** **रूपवतीस** बरोबर घेतल्यामुळें तो त्याचा बेत फसला. पुढें त्यानें **दुर्वीर्यास** कपटानें **वीरकांताबरोबर** दिलें आणि **रूपवतीची** व त्याची तुटातूट करून तीस प्राप्त करून घेण्यास सांगितलें. पुढें **वीरकांतास** पर्वतावरून लोटून आणि **रूपवतीस** पूर्वीं सांगितलेल्या झाडींत नेऊन ठेवून **दुर्वीर्य** रत्नपुरीस परत आला; आणि त्यानें बातमी उठविली कीं, **वीरकांत** आणि **रूपवती** हीं अमुक मुक्कामावरून नाहींशीं झालीं. **वीरकांताचे** जे कित्येक विश्वासू मनुष्य बरोबर होते, त्यांना **दुर्वीर्यानें** केलेलें कपट न समजून त्यांनींही नगरींत हीच हाकाहाक केली.

पुढें **वीरकांत** व **रूपवती** ह्यांसाठीं अनेक गांवीं शोधण्या पाठविल्या होत्या, परंतु जीं रानांत पडलीं होतीं तीं गावांतून कोठें सांपडतात? पर्वतावरून लोटल्यामुळें **वीरकांत** खचीत मेला असेल, आणि गादीस आतां आपणच वारस आहों, असें **दुर्मतीस** वाटून **विलासिनीच्या** प्राप्तीसाठीं पितृवधासारखें साहस कर्म करण्यास त्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं. आतां **वीरकांत** कोठें नाहींसा झाला आहे, हा लोकांचा पूर्ण ग्रह झाला असतां राजवधाचें कर्म त्यानेंच केलें, असा आरोप त्याच्यावर स्थापन करण्यास फारसें अवघड नाहीं असें **दुर्मतीस** वाटून त्यानें, हें कृत्य **वीरकांता** वांचून खचीत झालें नाहीं, अशी नगरींत कंडी उठविली. आणि सर्व लोकांची अनेक रीतिनें खातरी करूं लागला. तो सर्वांस ह्मणे कीं, या अखेरीच्या दिवसांत

वीरकांतास फिरावयास जाण्याचें काय कारण? बरें, फिरावयास गेला तरी आज तो दहापंधरा दिवस नाहींसा झाला आहे याचें कारण काय असावें? नगरींत राहून अपराध केला असतां लोक संशय घेतल्याशिवाय राहाणार नाहींत, येवढ्यासाठीं फिरावयास जाण्याचें मिष करून तो नगरीच्या बाहेर पडला आणि तेथून गुप्त रीतीनें परत येऊन त्यानें हें दुष्ट कृत्य केलें. ह्याप्रमाणें दुर्मतीनें सुयुक्तिक कारणें दाखविल्यावर कोणाच्यानें कांहीं बोलवेना. पुष्कळांची अशी खातरी होती कीं, असें कृत्य वीरकांताच्या हातून खचीत घडणार नाहीं, परंतु उघड रीतीनें त्यांना कांहींच बोलतां येत नाहींसें झालें.

वीरकांतावर हा अपराध ह्या रीतीनें स्थापन झाला हें पाहून दुर्मतीच्या मित्र मंडळास जें स्फुरण आलें तें काय सांगावें? त्यांतील कित्येकांस वीरकांत खचीत मरण पावला असें जरी पक्कें माहीत होतें, तरी लोकांस मोठा आविर्भाव आणून दाखविण्यासाठीं त्यांनीं दुर्मतीकडून सर्व प्रधानादि अधिकाऱ्यांच्या संमतीनें असा ठराव करविला कीं, "वीरकांत सांपडल्याबरोबर त्यास सुळीं द्यावा. व जो त्यास धरून देईल त्यास पांच हजार मोहरा बक्षिस द्याव्या."

हा ठराव ऐकून पुष्कळांस फार वाईट वाटलें; परंतु बापडे करतात काय? एक तर हातांत अधिकार नाहीं. दुसरें दुर्मतीनें रचलेला व्यूह इतका दृढ दिसूं लागला कीं, तो भेदणें फारच कठीण असें सर्वांस वाटूं लागलें. वीरकांताच्या हातून असा अपराध कल्पांतीं देखील घडणार नाहीं असें त्यांस वाटे, परंतु त्याच्या तर्फेनें ही

कोणास बोलतां येईना. तोंडांत बोळा कोंबून मारल्याप्रमाणें त्यांस होऊन गेलें. हा वर सांगितलेला सर्व प्रकार **विलासिनीची** व **रूपवतीची** भेट होण्यापूर्वी घडून आला. **विलासिनीची** आणि **रूपवतीची** भेट झाल्यानंतर त्यांची व **वीरकांताची** गांठ पडून झालेला सर्व प्रकार **दुर्वीर्यानें** वृक्षावर बसून पाहिलाच होता. तो तेथून परतून **दुर्मतीकडे** आला आणि त्याला ह्मणूं लागला, "सरकार, शिकार साधावी,ह्मणून शेकडों यत्न केले परंतु ते सर्व निर्फळ. काय सांगूं!! ज्या ज्या प्रमाणें साधावें, त्या त्या प्रमाणे साधलें असें वाटले होतें, परंतु सर्व व्यर्थ गेलें. **वीरकांताचा** नाश व्हावा ह्मणून त्याला पर्वतावरून लोटून दिलें, तथापि पहा, त्याला परमेश्वरानें कसें राखलें !! तो पुन: **रूपवतीस** येऊन भेटला." हें ऐकून **दुर्मति** अगदीं भयाभीत होऊन गेला. आपलें सर्व कपट आतां बाहेर पडतें असें त्यास वाटलें. तो **दुर्वीर्यास** ह्मणूं लागला, "काय **वीरकांत** **रूपवतीस** पुन: भेटला? तो अद्यापि जिवंत आहे काय? नशीब तर तुझें आणि माझें. पहा, तो जिवंत असला तर त्यावर स्थापन केलेला अपराध खचीत उघडकीस येईल. तूं त्याचा जो विश्वासघात केलास तोही आतां बाहेर पडेल. एकंदरींत आपली स्थिति आतां बरी दिसत नाहीं." हें ऐकून **दुर्वीर्यानें** उत्तर दिलें, "सरकारांनीं भीति आतां मनांत आणावयास नको. एक ठिकाणाहून जरी सुटलें तरी स्वारीची दुसऱ्या ठिकाणीं चांदी आलीच. सरकार, **रूपवतीस** मी एका दाट झाडींत आणून ठेविलें होतें. तेथें तिच्याकडे एकदां जाऊन मी तिची भेटही घेतली होती. परंतु दुसऱ्यानें जो भेटीस

गेलों तों तेथें **वीरकांत** आला. हें मोठेंच संकट येऊन गुदरलें असें त्यावेळेस वाटलें. इतक्यांत, देवास काळजी, तों चोरांची मोठी टोळी आली, त्यांनीं त्याला व **रूपवती**-कडे मी एक सेवक धाडिला होता त्याला ठार मारून टाकिलें."

**दुर्म०**—भलें झालें, अरे, पण **रूपवती** आतां कोठें आहे ?

**दुर्वी०**—गेलें हो, सर्व व्यर्थ गेलें. त्या चोरट्यांनीं त्या दोघींनाही नेल्या.

**दुर्म०**—दुसरी कोणती ह्मणालास ?

**दुर्वी०**—हो, तें तर सांगावयास विसरलोच. **वीरकांत** मेला ह्मणून वाटून पुन: सजीव **रूपवतीस** भेटला. तशीच सरकार, **विलासिनी** मेली ह्मणून आपल्यास वाटली तीही तेथें सजीव असतां मी पाहिली. हा शब्द ऐकतांच **दुर्मतीचा** हर्ष काय सांगावा ! जीच्या मरणानें आपला सर्व जन्म व्यर्थ गेला, असें तो मानीत होता ती जिवंत आहे असें समजल्यावर त्याला जो आनंद झाला असेल त्याजविषयीं कल्पना तरी करतां येईल काय ? तो आनंदानें इतका कोंदून गेला कीं त्यास पुढें एक शब्दही बोलवेना. कंठ अगदीं दाटून गेल्यामुळें आतां हा आनंद हृदय फोडूनच बाहेर निघतो कीं काय असें होऊन गेलें. कांहीं वेळ गेल्यावर ओंठ थरथरां कांपत कांपत तो अडखळत त्यास विचारूं लागला, "काय माझी **विलासिनी** अद्यापि जिवंत आहे काय ? चल, चल. ती पाहूं कोठें आहे तेथें मला घेऊन चल, **दुर्वीर्या**, हें खरेंच का बोललास. सांग, सांग मला एकदां खरें काय आहे

तें." हें ऐकून **दुर्वीर्य** बोलूं लागला, "सरकार, ती जिवंत आहे ह्मणून मी ह्मणालों खरा, तथापि मेल्यापासून तिच्या प्राप्तीची जी दुराशा तीच ती जिवंत असल्यापासून आहे." ह्यानंतर **दुर्मति** ह्मणूं लागला, "अरे, पण पुढें काय झालें तें सांगशील तर खरें. ती जर जिवंत आहे तर आपण तिला पाहिजे त्या ठिकाणाहून आणूं. **दुर्वीर्या,** जरी तिला शेषानें पाताळीं नेलें असेल अथवा अप्सरांच्या सुखास कंटाळून इंद्रानें तिला जरी स्वर्गांत नेलें असेल तरी तेथून आणण्यास मजसारख्यास कठीण आहे कायरे? ती आहे कोठें? तिची काय वाट आहे हें तर मला एकदां सांग, मग पुढें पाहूं काय ती तजवीज." हें ऐकून **दुर्वीर्यानें** उत्तर दिलें, "सरकार, ज्या चोरट्यांनीं **वीरकांताचा** व माझ्या सेवकाचा वध केला त्यांनीं त्या दोघींस कोठें लांबविल्या. त्यांनीं तेथेंच त्या दोघींच्या वांटण्या केल्या आणि कोणत्याशा गुहेंत ठेवण्या साठीं त्यांना घेऊन गेले."

हे शब्द कानीं पडतांच तृणांत अग्नि पडून जशा ज्वाळा निघूं लागतात त्याप्रमाणें **दुर्मतीचें** हृदय क्रोधानें पेटून त्यांतून शब्दरूपी ज्वाळा निघूं लागल्या. तो ह्मणूं लागला, "अरे, त्या दुष्टांनीं **रूपवतीस** आणि **विलासिनीस** वांटून घेतलें काय? जी मजसारख्यास दुर्लभ, ती त्या हलकट चोरट्यांना श्रमाशिवाय प्राप्त झाली काय? अरे, ते दुष्ट जर सांपडतील तर सर्वांचा एका क्षणांत नाश करून टाकीन. **दुर्वीर्या,** आपल्या जवळचें सर्व सैन्य आणि सर्व कारभारी आतां त्यांच्या शोधार्थ अनेक अरण्यांत पाठवून दिले पाहिजेत. त्यांनीं अनेक अरण्यें शो-

धर्लीं ह्मणजे ती गुहा आणि ते चोरटे सांपडणें कठीण आहे काय? चल, चल, सर्वांस हुकूम आतांच देऊंदे." हें ऐकून **दुर्वीर्य** त्यास ह्मणूं लागला, "सरकार, हें आहे काय? आपण रागाच्या सपाट्यांत हें काय करणार, सर्व सैन्यास व कारभाऱ्यांस आपण काय सांगणार, **विलासिनी**विषयीं आपल्या मित्रमंडळा शिवाय दुसरे कोणास काय माहीत आहे? **रूपवती**च्या शोधाची गोष्ट काढतां तरी कशी येईल? सर्वांस कोणाचा शोध करण्यास आपण सांगाल, ह्या सर्व गोष्टी फार गुप्त असल्या पाहिजेत. गुप्त ठेवून जें साधेल तें साधेल." हें **दुर्वीर्या**चें भाषण **दुर्मतीस** खरें वाटलें. त्यास वाटूं लागलें कीं, आपण रागाच्या सपाट्यांत जें बोलून गेलों तें करणें ह्मणजे आपला सर्वस्वी घात करून घेणें होय. परंतु आतां पुढें काय करावें, त्यांचा शोध कसा लागतो, हें त्यास अगदीं सुचेनासें झालें. तो **दुर्वीर्यास** ह्मणूं लागला, "मित्रा, आतां पुढें काय करावें? त्यांचा शोध कसा लागतो? माझी अक्कल तर अगदीं गुंग होऊन गेली आहे. तुला कांहीं सुचत असेल तर सांग." हें ऐकून **दुर्वीर्यानें** उत्तर दिलें, "सरकार, शिकारीच्या निमित्तानें आपण मोजकीच मंडळी-शीं निघून त्या अरण्यांत जाऊं, आणि प्रत्येक जण निरानिराळ्या भागांत जाऊन त्या गुहेचा शोध करूं. ती गुहा आणि ते चोरटे एकदा सांपडले ह्मणजे मग हवी ती तजवीज करितां येईल." ही **दुर्वीर्याची** मसलत **दुर्मतीस** बरी वाटून त्यानें आपल्या मित्र मंडळासह शिकारीस जाण्याचा बेत केला आणि सर्व लोकांस सांगितलें कीं, येवतीच्या मरणामुळें मला अगदीं चैन पडत नाहीं, येव-

ण्यासाठीं मी मनोरंजनार्थ **शिकारीस** जातों. ह्याप्रमाणें सर्वांची समजूत करून **दुर्मति** आपली मित्रमंडळी बरोबर घेऊन शिकारीस गेला.

हे शिकारीस गेल्यानंतर रूपवती आणि **विलासिनी** ह्यांची काय वाट झाली ती पूर्वीं सांगितलीच आहे.

**विलासिनीस** एका चोरट्यानें त्या भयंकर गुहेंतून एका मैदानांत नेऊन सोडिलें ह्मणून पूर्वीं सांगितलें तें सर्वांच्या लक्षांत असेलच. बाहेर पडतांच शरीरास मोकळी हवा लागल्यामुळें तिला जरा समाधान वाटलें. परंतु त्या वेळीं बराच अंधार असल्यामुळें त्या मैदानांत पुढें कोठें जावें हें तिला समजेना. तथापि त्या व्याघ्रमुखांतून आपली सुटका झाली असें पाहून तिला जें समाधान वाटलें त्याचें वर्णन करणें खरोखरीच फार कठीण आहे. तिला वाटूं लागलें कीं, जें संकट अगदीं अनिवार्य ह्मणून आपल्यास वाटत होतें त्यांतून देखील दयाळू परमेश्वरानें आपल्यास सोडविलें, तेव्हां आतां पुढें आपलें रक्षणकर्त्ता तोच आहे. पूर्व जन्मीच्या अघोर पापामुळें जरी हे शेंकडों प्रसंग मजवर गुजरले आहेत, तथापि ह्या जन्मीचें तें माझें पातिव्रत्य, त्याचें सर्वस्वी संरक्षणकर्त्ता तोच आहे. असे अनेक विचार मनांत येऊन तिला फार समाधान वाटलें. कांहीं वेळ होऊन सूर्य जरा वर डोकें करूं लागला, तेव्हां ती त्या मैदानांत एका पायवाटेनें पुढें जाऊं लागली. कांहीं वाट चालून गेली तों सूर्यप्रभा जिकडे तिकडे फांकली. पर्जन्यकाळ नुकताच सुरू झाल्यामुळें मैदानांतील लहान लहान झऱ्यांतून पाण्याचे थोडथोडे ओघ वहात होते. त्यांवर सूर्याचीं कोमल किरणें पडल्यामुळें, पृथ्वीनें हे

रत्नजडित अलंकार परिधान केले आहेत असें भासत होतें. जमीनीवर हिरवें चार गवत उगवून त्यांवर आधल्या दिवशीं पडलेल्या पावसाच्या पाण्याचे थेंब चकाकत होते. वारा गार वाहूं लागला होता. अनेक सुंदर पक्षी सुस्वरानें दोन दयाळू परमेश्वराची, ह्या सुंदर स्त्रीची अनेक संकटां-पासून मुक्त करण्याविषयीं प्रार्थना करीत होते. त्यांत चंडोलादि पक्षी तर प्रत्यक्ष परमेश्वराची भेट घेण्यासाठींच स्वर्गाकडे गमन करीत आहेत कीं काय, असें वाटत होतें. अशा मनोरंजक वेळीं ती बरीच वाट चालून गेली; परंतु आसपास, एखादें खेडें पाडें तिच्या दृष्टीस पडेना. पुढें पाहावें तर क्षितिज आणि मागें पाहावें तर तो भयंकर पर्वत. ह्याप्रमाणें चालतां चालतां दोन प्रहर होऊन गेली. पोटांत क्षुधा आपला अम्मल मोठ्या झपाट्यानें चालवूं लागली. तथापि एखादें गांव किंवा एखादें खोपट वगैरे कांहींच दृष्टीस पडेना. या मैदानाच्या अफाट विस्तारांत अनेक पायवाटा नागाप्रमाणें वांकड्या तिकड्या पसरलेल्या दिसत होत्या, त्यांत कोणत्या वाटेनें पुढें जावें ? कोणती वाट कोठें जाते, हें तिला कांहींच कळेना.

ह्याप्रमाणें स्थिति झाल्यावर क्षुधेनें अगदीं व्याकुळ होत्साती दोनप्रहरचें ऊन्ह टाळण्यासाठीं, ती एका वृक्षाखालीं जरा पडली. वाटेच्या श्रमानें आणि वृक्षाच्या गारठ्यानें तिचा जरा डोळा लागला. कांहीं वेळ निद्रा विश्रांति देते आहे, तों तिच्या कानीं एक मोठा भयंकर कडकडाट आला. तो ऐकून ती एकदम दचकून उठली आणि इकडे तिकडे पाहाते आहे तों कोठें कांहीं नाहीं. तेव्हां हा भयंकर आवाज कसला असावा ह्मणून मोठ्यानें

विचारांत पडली आणि भयाभीत होऊन कावऱ्याबावऱ्या इकडे तिकडे पाहूं लागली, तों सर्व आकाश ढगांनीं अगदीं व्याप्त होऊन गेलें आहे असें तिच्या दृष्टी पडलें. इतक्यांत मोठ्यानें मेघगर्जना झाली, ती ऐकून तिला वाटलें कीं, पूर्वीं जो आवाज झाला तोही ह्या मेघगर्जनेचाच असावा. इतक्यांत मोठा भयंकर प्रभंजन सुटला. अनेक मोठे मोठे वृक्ष समूळ उपटून जाऊन मैदानांत इकडून तिकडे तिकडून इकडे धडाधड पडूं लागले. जिकडे तिकडे विद्युल्लता चमकूं लागल्या. मेघगर्जनांचा एकच कडकडाट उडून गेला. पर्जन्यानें मोठी गर्दी करून दिली. मोठमोठ्या गारांनीं सर्व मैदान भरून जाऊन अगदीं पांढरें शुभ्र झालें. पर्जन्यानें **विलासिनीचें** सर्वांग भिजून चिंब झालें. गारा दगडाप्रमाणें सडासड अंगावर बसूं लागल्या.

अशा भयंकर वेळीं ती त्या मैदानांत दीन होऊन फिरते आहे तों पाठीमागून कोणी येते आहे असें तिला वाटलें. पाठीं परतून हापाहे तों **दुर्मतीची** भयंकर मूर्ति तिच्या दृष्टीस पडली. मग बापडीची काय दशा विचारावी! त्या भयंकर वेळीं **यमराजाची** स्वारी आली असती तरी तिला इतकें दुःख वाटतें ना. व्याघ्र पाठीं लागला असतां ज्याप्रमाणें कुरंगी घाबरून धापा टाकीत टाकीत इकडे तिकडे धावूं लागते त्याप्रमाणें ती मोठ्या लगबगीनें बेफाम होऊन चोहोंकडे धावूं लागली. भीतीनें मन इतकें वेडें होऊन गेलें कीं त्या वेळीं एक परमेश्वरा शिवाय दुसरें तिच्या मनांत कांहींच येईनासें झालें. ती मोठ्या करुणास्वरानें ईश्वराचा धावा करूं लागली.—

# पद.

( वल्कल वेष्टित काया असतां आनंदात उपवनीं. या चालीवर. )

हे प्रभुराया दीनोद्धारा अंता पाहासि किती ॥ दीना दासी दुःखित झाली हीच काय वा रिती ॥ ध्रु० ॥ स्त्रीजन्मासीं येउन नाहीं स्त्रीव्रत मी भंगिलें, कोण्या पापें आजि छळानें विश्वेशा मांडिलें ॥ स्त्री पुरुषाच्या मध्यें वियोगा नाहीं मी करियलें, नाहीं नाहीं दुरुक्ति वदनीं कोणासी बोलिल्यें ॥ अनाथ सहाय तें करण्या नाहीं मी चूकल्यें, तूझ्या आणि पतिच्या पायां नाहीं वा विसरल्यें ॥ चाल ॥ निर्मलें मनें वागुन, अपराध क्षमा मागुन, पायांसि तुझ्या लागुन ॥ भोगितसें मी फल हें पाहुन वाखाणीति सन्मती॥ दीनादासी० ॥ १ ॥ अनाथरक्षक असें तुसी वा वर्णितात कविजन, आजि कसा वा निष्ठुर होसी बिरुद लाज सोडुन ॥ बहु पाप्यातें तुवां आजवरी भगवंता तारिलें, शरण आलिया नाव्हेरिसिसें बिरुद जगीं गाजलें ॥ गजगणिका भिल्लिणी संकटिं तुजला आठवितां, म्हणी जाउनी जगत्पालका होसि तयां तारिता ॥ चा० ॥ बाहल्यें दीन होऊन, वणव्याते मृगी गाउन, बसलासि कुठे जाउन ॥ धाव धावरे आतां धावें व्रत नासे निश्चिती ॥ दीना० ॥ २ ॥ भगवन् करुणाघना उगिच मी रागें तुजलागुन, वदल्ये देवा करी क्षमेसी राखी मद्गुतधन ॥ पापाच्यांचुनि कसा छळिसी तूं नघडे हें सर्वथा, संचित माझें

**निश्चयरूपें त्याचीचीहि कथा ॥ तव नाम अघा जाळितें, घेतलें असे मीहि तें, नासलीं अघांवि दुष्कृतें॥शरण शरण मी असे शरण्या शरणागत तुजप्रती ॥ दीना दासी दुःखित झालो० ॥३॥**

ती ह्याप्रमाणें करुणा भाकीत फिरत आहे तों **दुर्म-नीची** दृष्टी तिच्यावर जाऊन, ज्याप्रमाणें मोठा बलाढ्य वाघ लहान कोंकरावर उडी टाकितो, त्याप्रमाणें तिच्या अंगावर त्यानें मोठ्या आवेशानें झांप टाकिली. तिला तो ह्मणूं लागला, "प्रिये, तुझ्यासाठीं आज किती दिवस कष्टी झालों आहें तों पहा ! ! आज आठ दिवस शिकारीच्या निमित्तानें, अन्न टाकिलें, पाणी वर्ज केलें, आणि तुझ्या-साठीं एकसारखा अरण्यांत फिरतों आहें. प्रिये, तूं सांगि-तल्याप्रमाणें पित्याचा वध करण्यासही मीं मागें पुढें पा-हिलें नाहीं. प्रिये, तुझ्यासाठीं अशीं साहस कर्में करीत असतां तूं ह्या दीनाचा त्याग करून हा दुःसह अरण्यवास सेवन केला आहेस. काय हे तुझे हाल ! ! कसें सर्वांग पावसानें चिंब भिजून गेलें आहे ! ह्या सुकुमार शरीरास ह्या दुष्ट गारा पहा किती निर्दयपणें पीडा करीत आहेत! तुझ्यासाठीं माझे तरी काय हाल झाले आहेत पहा.! ह्या अघोर ठिकाणीं तूं येऊन तरी कशी पडलीस ! कोणा दुष्टानें त्या सुस्थळांतून तुला काढून आणलें? त्याचें प्रिये, नांव तर सांग ह्मणजे त्याच्या नरडीचा अर्धा घोट घेतों. सांग सखे, सर्व हकीकत सांग पाहूं. नको नको, ही वेळ हकीगत ऐकत बसण्याची नाहीं. चल, चल आधीं सुरक्षित ठिकाणीं. प्रिये, घाल पाहूं माझ्या गळ्यांत तुझा सुकुमार हात. सखे, वडिलांसाठीं आजपर्यंत जर

कठीण वाटत होतें, परंतु तुझें हें चंद्राप्रमाणें मुख पाहून, तूं ज्याप्रमाणें सांगितलेंस त्याप्रमाणें केलें, ह्यांत आतां कांहींच वाटत नाहीं. फार तर काय परंतु तूं एकदां कामना पूर्ण करशील आणि मग हा प्राण अर्पण करण्यास सांगशील, तर मी मोठ्या सुखानें तुझी कामना पूर्ण करीन.

हें **दुर्मतीचें** भाषण ऐकून तिला अतिशय संताप आला आणि फार आश्चर्यही वाटलें. "तूं सांगितल्याप्रमाणें मीं पितृवध केला" ह्मणून तो हा ह्मणतो त्याचा काय अर्थ असावा? मीं ह्याला पितृवध करावयास कधीं सांगितला? हा ह्मणतो आहे ह्याचा अर्थ काय असावा? हें तिला कांहींच समजेना. भयानें आणि आश्चर्यानें तिचा अगदीं घोटाळा होऊन गेला. ती कांहीं बोलत नाहीं असें पाहून **दुर्मति** तिला ह्मणतो, "प्रिये, अद्यापि देखील तूं ह्या दीनाशीं बोलत नाहींस काय? ये, प्रिये ये, माझ्या जवळ ये. नको पण ह्या चिखलांत आणि पावसांत तूं कशाची माझ्याजवळ बोलत बसत्येस? चल आधीं त्या बंगल्यांत, आणि मग आपलें वचन खरें कर." असें ह्मणून तो तिचा हात धरावयास पुढें सरसावला; परंतु तिणें मोठ्या त्वेषानें त्याला उत्तर दिलें, "अरे मेल्या, सर मागं. पुढं कुठे चाललास?" हें ऐकून **दुर्मति** तिला ह्मणाला, "प्रिये, तूं सांगितलेंस तसें केलें तथापि असे निष्ठुर शब्द बोलत्ये आहेसना?" हे शब्द ऐकून **विलासिनीनें** त्याला उत्तर दिलें, "मेल्या, मी तुला काय सांगितलं? आणि मला उगीचं कां छळ करितोस मेल्या, एकदा कर इथून काळं."

हे तिचे निष्ठूर शब्द ऐकून, **दुर्मतीस** फार संताप आला. तो ह्मणूं लागला, "अरे, हिच्या साठीं मी पितृवध देखील करण्यास चुकलों नाहीं, तथापि ही अद्यापि इतकी बडबड करत्ये आहे काय? बरें, आतां पहातों कशी बड. बड करत्ये आहे ती." असें ह्मणून त्यानें एका सेवकास हाक मारिली आणि ह्मणाला, "आणरे कोठें तो रथ आहे तो." असें तो ह्मणतांच एका सेवकानें एक घोड्या. चा रथ आणला आणि **दुर्मतीनें** तिला त्यांत उचलून टाकून रथ पुढें चालविला. त्या चिखलांतून हळू हळू रथ रात्रीच्या सुमारास एका खेड्यांत नेला आणि दुसरे दिवशीं प्रात:काळीं उठून रथ पुढें चालविला. ते दोन प्रहरच्या सुमारास, ज्या बागेंत पूर्वीं **विलासिनीस** ठेविलें होतें तेथें पोहोंचले. तेथें गेल्यानंतर **दुर्मतीनें विलासि-नीस**, त्या बागेंतील बंगल्याच्या खालच्या मजल्यांतील एका अंधार कोठडींत कोंडून ठेविलें. तेथं तिला पुरें इतकें अन्न पाणी ठेवून सर्व दारांस स्वत: मोठ मोठीं कुलुपें मारून त्यावर मोहरा करून चालता झाला. पुढें दररोज तो स्वत: येऊन तिला अन्न पाणी देई आणि कुलुपा मोहरांचा बंदोबस्त करी. कोणतेंही काम तो दुसऱ्यावर अगदीं विसंबत नाहींसा झाला. याप्रमाणें त्या बागेचा त्यानें पूर्ण बंदोबस्त केला.

---

## भाग ११ वा.

**वीरकांतास रणधीरसिंगानें** कसें वांचविलें, हें, त्यानें **रूपवतीस** जी हकीगत सांगितली त्यावरून आपणास सम-

जलेंच आहे. **रणधीरसिंगानें** सांगितल्या प्रमाणें तो एका शेजारच्या खेड्यांत जाऊन त्याची वाट पहात राहिला होता. प्रथम त्याच्या मनांत आलें कीं, आपण **रत्नपुरीस** जावें आणि तेथून पुष्कळ लोकांनिशीं परत येऊन त्या चोरट्यांचा शोध लावावा, आणि त्यास योग्य शासन करावें. परंतु पुनः त्याला वाटूं लागलें कीं, आपण जरी पुष्कळ लोक आणले तरी, त्या चोरट्यांचा शोध लागतो हा काय नेम आहे? **रणधीरसिंग, रूपवती** व **विलासिनी** ह्यांना घेऊन आला आणि आपला शोध त्यास न लागला तर तो अगदीं निराश होऊन जाईल. आपल्या शोधार्थ पुनः त्या अरण्यांत गेला तर कदाचित्, त्या चोरट्यांच्या तावडींत सांपडेल. असे अनेक विचार मनांत येऊन त्यांस वाटलें कीं, कांहीं दिवस येथेंच त्यांची वाट पाहावी. मग होणें जाणें असेल तसें होईल.

खरोखरीच, आप्तजनाची प्रीति आणि निर्बलांची दया हीं सुविचारी व दयाळू अंतःकरणास आपल्या सान्निध्यापासून सहसा दूर होऊं देत नाहींत.

ह्याप्रमाणें त्यानें तेथें सुमारें पंधरा दिवस काढिले, तथापि **रणधीरसिंग** येत नाहीं असें पाहून त्याची अगदीं हिम्मत खचून गेली. आपल्या प्राणसखीची, त्या सद्गुणी **विलासिनीची** आणि आपला प्राणदाता जो **रणधीरसिंग**, ह्यांची काय वाट झाली असेल? तो त्या चोरट्यांपासून पळून पुनः त्यांच्या हातीं तर सांपडला नसेल ना? **रूपवती** व **विलासिनी**, ह्या आपल्या बेतास कबूल होत नाहींत असें पाहून त्या चोरट्यांनीं त्यांची प्राणहानि तर

केली नसेलना? अथवा आपल्या पातिव्रत्यास आतां धक्का बसतो ह्मणून त्यांनींच तर आपला प्राणनाश केला नसेलना? ह्याप्रमाणें अनेक विचार मनांत येऊन त्यास अगदीं वेड्याप्रमाणें होऊन गेलें. पुढें काय करावें? आतां रत्नपुरीस जावें किंवा कांहीं दिवस येथेंच काढावें? हें त्यास अगदीं सुचेना. ह्याप्रमाणें मनाच्या चमत्कारिक स्थितींत त्यानें एक दोन दिवस घालविले. तथापि रणधीरसिंग येत नाहीं असें पाहून त्याची फारच चमत्कारिक स्थिति होऊन गेली. आतां येथें राहून अगदीं उपयोग नाहीं अशी त्याची खातरी झाली. फार दिवस लागल्यामुळें, समयास त्या शोध लागण्याची आशा आहे तीही नाहींशी होईल. हें तर एक आहेच परंतु आणखी विशेष, लोकांस हें वर्तमान कळविल्यावर, आपण ही गोष्ट इतक्या दिवस त्यांना कळविली नाहीं ह्मणून ते जें दूषण देतील तें सोसावें लागेल. असें त्याच्या मनांत येऊन तो रत्नपुरीस जाण्यास निघाला. सुमारें, एक दोन कोसांवर जों जातो आहे तों कोणी मनुष्य लंगडत लंगडत आपल्याकडे येत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां हा कोण असावा? ह्मणून त्याच्याकडे जरा टक लावून पहातो आहे तों, हा रणधीरसिंगच येत आहे असें त्यास वाटलें.

वाचणारहो, रणधीरसिंगास पाहिल्याबरोबर त्यास फार आनंद झाला असेल असें तुमच्या मनांत आलें असेल. परंतु त्याच्या दुःखाचें काय वर्णन करावें!! आजपर्यंत जीं अनेक संकटें भोगावीं लागलीं त्यापासून त्याला जें दुःख झालें असेल, त्याच्या शतपट दुःख रणधीरसिंगास पाहिल्याबरोबर त्यास झालें. त्याचे डोळे जे रणधीरसिं-

**गाऱ्हाणे**ड लागले होते ते फक्त **रणधीरसिंगा**साठींच लागले नव्हते. “ माया ” आणि “ दया ” ह्या दोन नेत्रांनीं तो त्याची वाट पहात होता. परंतु ह्यांपैकीं एक नेत्राचें देखील **रणधीरसिंगास** पाहून समाधान झालें नाहीं. **रूपवतीचें** मुखकमळ पाहून त्याच्या मायारूप नेत्राची आणि तिचीच त्या मृत्यूच्या मुखांतून सुटका झाली. व **विलासिनी** आणि **रणधीरसिंग** ह्यांच्या वरचें तें संकट टळलें. असें पाहून त्याच्या दयारूप नेत्राचें समाधान झालें असतें, परंतु एकट्या **रणधीरसिंगास** पाहून त्याच्या सर्व आशेचा भंग होऊन गेला. त्यास वाटलें कीं, **रणधीरसिंग रूपवती व विलासिनी** ह्यांना बरोबर घेऊन पळाला असतां पुन: त्या चोरट्यांच्या खचीत हातीं सांपडला व त्यांनीं त्या दोघींस ठेवून ह्यास जखमी करून हाकलून दिलें आहे. ह्याप्रमाणें मनांत येऊन त्याची अगदीं हिम्मत खचून गेली. पुढें एक पाऊलही टाकवेना. नेत्रांतून एकसारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या. ह्याप्रमाणें अवस्था होऊन तो त्याचठिकाणीं उभा आहे इतक्यांत **रणधीरसिंग** त्याच्या जवळ आला. तो जवळ येतांच आतां हा काय वर्तमान सांगतो, ह्या उत्कंठेनें त्याच्या मनास घेरलें. परंतु “ उत्कंठा ” ही नेहेमीं दु:ख आणि निराशा ह्यांस दूर करून आपला अम्मल करीत असते. असें जर न होतें तर, दु:ख, निराशा आणि उत्कंठा ह्या तिहींचें वेष्टण पडून **वीरकांता** सारख्याच्या कोमल मनाचा एकदम चुरा होऊन गेला असता. त्याचें मन उत्कंठेनें इतकें व्याप्त झालें कीं, पूर्वींचे सर्व विचार तो एकदम विसरून गेला. आतां **रणधीरसिंगाच्या** तोंडांतून काय अक्षरें येतात ह्याकडे

एकसारखें त्याचें चित्त लागलें. **रणधीरसिंग** जरी अगदीं जवळ आला तरी त्याच्याशीं एक शब्दही बोलवेना. **वीरकांतानें** विचारल्याशिवाय **रणधीरसिंगास**ही आपल्या दुःखी हकीकतीचें कांहीं सांगवेना. ह्याप्रमाणें दोघेही स्तब्ध होत्साते एकमेकांच्या तोंडाकडे टकमक पाहूं लागले. **वीरकांतास** कांहीं विचारवेना व **रणधीरसिंगास** कांहीं सांगवेना. ह्याप्रमाणें कांहीं वेळ गेल्यावर **वीरकांतानें** मोठा हिय्या करून **रणधीरसिंगास** विचारिलें, "कायरे बुवा झालें? असा दुःखी कां दिसतोस? त्या दोन अबला कोठें आहेत." हें ऐकून **रणधीरसिंग** ह्मणूं लागला, "सरकार, काय ह्या दुर्दैव्यानें सांगावें? जें देवानें दिलें तें कर्मानें नेलें ह्मटलें तरी चालेल. ह्या दुर्भाग्याच्या हातून सरकारची सेवा घडावी हें कोठून होणार?" असें ह्मणून त्यानें पूर्वीं झालेली सर्व हकीगत **वीरकांतास** सांगितली. ती ऐकून बापड्याची काय दशा झाली असेल ती सांगावयास देखील नको. तो **रणधीरसिंगास** मोठ्या दुःखानें ह्मणाला, "**रणधीरसिंगा**, पहा आपलें कसें नशीब फिरलें आहे.? कायरे हे प्रकार घडून येतात ? सुखाचा घरच्याघरीं होतों तो प्रवासास निघण्याची कां हौस यावी? ज्यावेळीं निघण्याची तयारी केली त्यावेळीं सर्वांनीं मला नाना तऱ्हेनें सांगितलें, परंतु मी त्यांचें ऐकलें नाहीं. आतां ते दूषण कोणास देतील? विपत्तीपरी विपत्ति भोगून शेवटीं मूर्ख मीच ठरणार. असो. तेवढें तरी कां न व्हावें ? मीच सर्वांच्या मर्जीविरुद्ध कां वागावें ? नाहीं, पण तसेंही ह्मणतां येत नाहीं. असे प्रकार घडून आले ह्मणूनच मी आपल्यास दूषण

देत आहे. हाच प्रवास जर सुखावह झाला असता तर असें कधींही मनांत येतेंना. कोणत्याही गोष्टीस वैभव अथवा दूषण येणें, हें सदोदित तिच्या परिणामावर अवलंबून असतें. येवढ्यासाठीं प्रवासास निघालों हाच मूर्खपणा केला असें ह्मणतां येत नाहीं. आपलें दैवच आपल्यास प्रतिकूळ आहे, इतकें ह्मणून समाधान करून घ्यावें. कां तर मी प्रवासास निघालों ह्मणून आह्मांवर हीं संकटें गुदरलीं, असें ह्मणतां येईल, परंतु तुझ्यावर व **विलासिनीवर** हींच संकटें कां गुदरावीत? येवढ्यावरून हें आपलें सर्वांचें दुर्दैवच खरें कीं नाहीं?"

असें ह्मणतो आहे तों त्याच्या नेत्रांतून एकसारखे अश्रु वाहूं लागले. कंठ अगदीं दाटून गेला. अशी त्याची अवस्था झालेली पाहून **रणधीरसिंग** त्यास ह्मणू लागला, "सरकार, आपल्या सारख्यानें जर हिम्मत सोडिली तर पुढें कसें होईल? दुर्दैवानें जरी हा प्रसंग आपल्यावर गुदरला आहे, तथापि आपल्याकडून यत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे. आतां पुढें काय करावें ह्याचा विचार केला पाहिजे." हें ऐकून **वीरकांत** त्यास ह्मणूं लागला, "**रणधीरसिंगा**, तूं सांगतोस हें सर्व खरें आहे. परंतु आतां पुढें काय करावें हेंच मला सुचत नाहीं. कायरे ह्या बापड्या **विलासिनीची** तरी दशा झाली असेल! चल, आपण प्रथम तिच्याच शोधास जाऊं."

**रण०**—सरकार, आपण ह्या व्याघ्रमुखांत कशाची उडी टाकितां! आपण आतां **रत्नपुरीस** चलावें. मी तेथें परत जाऊन **विलासिनी** बाईचा शोध लावितों. कसा शोध लागेल तो लागो. एकदा तर शोधून शोधून दमलों.

वीर०—तूं एकट्यानें जाऊन प्राण द्यावा त्यापेक्षां जें कांहीं होणें जाणें असेल, तें आपले दोघांचेंच व्हावें हें योग्य आहे. तूं आणि मी तेथें जाऊं, मग जें होईल तें दोघांचेंही होईल, किंवा चल आपण प्रथम **रत्नपुरीस** जाऊं, आणि तेथून कांहीं मनुष्यें घेऊन परत येऊं आणि त्या अबलांचा शोध करूं.

रण०—सरकार, ही मसलतही बरीच दिसत्ये आहे. आपण प्रथम **रत्नपुरीसच** जावें आणि तेथून लवकर परत यावें.

असें ह्मणून ते वाटेनें पुढें चालते झाले. अनेक दुःखें भोगून त्यांची अशी स्थिति होऊन गेली होती कीं, एक दिवसांत त्यांना तीन चार कोस सुद्धां जमीन चालवेना. ह्याप्रमाणें मोठ्या श्रमानें वाट खेटीत खेटीत ते सातवे आठवे दिवशीं एका खेड्यांत गेले. त्यावेळीं सुमारें पांच सहा घटका रात्र झाली होती. खेड्यांतील कित्येक लोक भाकर तुकडा खाऊन चावडीवर एक धकोटी करून तिच्या भोंवती गोष्टी सांगत बसले होते. त्यांच्या बायका घरकामांत गुंतल्या होत्या. अशा वेळीं ते त्या ठिकाणीं रात्रीच्यारात्र उतरण्यासाठीं कोठें सोईवार जागा पाहूं लागले. परंतु सर्व खेड्यांत कोठेंच चांगली जागा सांपडेना. सरते शेवटीं, त्या खेड्याच्या अगदीं शेवटास एक ब्राह्मणाचें घर होतें, तेथें ते जाऊन उतरले. घरवाल्या भटजीस दोन आणे दिल्यामुळें, त्याची जी एक चांगली निवाऱ्याची खोली होती तीच त्यानें त्यांना दिली. त्या ठिकाणीं कांहीं फराळाचें खाऊन व पाणी पिऊन, **वीरकांत रणधीरसिंगाशीं** गोष्टी सांगत आहे, तों बारीक

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



स्वरानें कोणी दाराशीं हाका मारीत आहे, असें त्याला वाटलें. इतक्यांत घरवाले भटजी दारांत जाऊन पहातात तों, दोन स्त्रिया त्यांच्या दृष्टीस पडल्या. त्यांतील एकजण भटजी बुवास पाहून ह्मणूं लागली, "घरवाले, आजची रात्र उतरण्यास आह्मांला इथे जागा मिळेल काय?" तें ऐकून घरवाले ह्मणाले "नाहीं नाहीं, येथें जागा नाहीं. ही कां धर्मशाळा आहे? ह्मणून सर्वांस जागा मिळेल? चला, आपल्या पुढें, वाटेनें चला" घरवाल्याचें हें उत्तर ऐकून ती पुन: मोठ्या करुणा स्वरानें ह्मणूं लागली, "आजची रात्र तर कशी तरी सोय लावाल तर फार उपकार होतील. आह्मांला दुसरें कांहीं करायाचें नाहीं, रात्रीच्यारात्र निजायचं ह्मणजे झालं. पावसा पाण्याचं बाहिर कुठे पडावं? त्यांतून आमच्याजवळ एक चिरगूट नाहीं कां एक पांघरूण नाहीं." हें करुणायुक्त भाषण ऐकून भटजी बुवास कांहींशी दया आली, आणि ते ह्मणाले, "बायानो, आज माझ्या घरीं जागा नाहीं, दोन असामी आधींच येऊन उतरले आहेत; नाहीं तर मीं तुह्मांस जागा दिली असती."

ह्यांचें हें बाहेर झालेलें भाषण वीरकांतानें ऐकलें त्या स्त्रीचें करुणायुक्त भाषण ऐकून त्याच्या पोटांत फार दया उत्पन्न झाली. तो त्या भटजी बुवांस ह्मणाला, "घरवाले, तुह्मी त्यांना जागा देत असाल तर आह्मी एकीकडे सरून निजतों. त्यांना जागा द्याल तर, तुह्मालाही दोन चार पैसे मिळतील आणि त्यांचेंही काम होईल. आमच्या कडून कांहीं अडचण नाहीं.

हें ऐकून घरवाल्यानें त्यांना आंत येण्यास सांगितलें,

आणि त्याच खोलींत थोडीशी जागा करून दिली. आंत आल्यानंतर एकजण दुसरीस ह्मणते, "अग, इथें कुणी परके पुरुष उतरले आहेत आणि आपण ग् इथेंच कसं उतरावं." हें ऐकून दुसरी ह्मणते, "बाईसाहेब, हें मनांत आणून काय उपयोग? आतां रात्रीची कुठें जातां? आपल्याला त्यांच्याशीं काय करावयाचं आहे? एकीकडे पडून कशीतरी रात्र काढूं ह्मणजे झालें."

**वीरकांत** तेथें जवळच होता, त्यानें हें सर्व भाषण ऐकलें. त्यांतील पहिल्या स्त्रीचें बोलणें त्याला ओळखीचेंसें वाटून तो **रणधीरसिंगास** हलकेच ह्मणूं लागला, "**रणधीरसिंगा,** ह्या कोण स्त्रिया आहेत? तूं ओळखिल्या काय? पहिल्यानें जी बोलली ती ओळखीची असावी असें वाटतें. घरवाल्यास जरा दिवा आणावयास सांग." हें **वीरकांताचें** भाषण ऐकून **रणधीरसिंग** त्याला थट्टेनें ह्मणूं लागला, "सरकार, आतां येथें ओळखी पटवीत बसून उपयोग नाहीं. **रत्नपुरीस** लवकरच गेलें पाहिजे. इकडे ओळख पटली ह्मणजे **रत्नपुरीची** आठवण कशास येते?" हें **रणधीरसिंगाचें** विनोदपर भाषण ऐकून **वीरकांत** ह्मणतो, "**रणधीरसिंगा,** भलतीच थट्टा करितोस? तुला खरोखरीच सांगतों, परस्त्रिया आजपर्यंत तर **मातेसमान** मानिल्या आहेत. पुढें ईश्वर काय बुद्धि देईल **ती देवो.**" हें ऐकून **रणधीरसिंग** ह्मणूं लागला, "सरकार, अधिक प्रसंग केला ह्याची माफी असावी, मला देखील तिचें बोलणें ओळखीचेंसें वाटलें खरें. दिवा आणवून कोण आहेत त्या पाहूं." असें ह्मणून त्यानें घरवाल्या भटजीस हांक मारिली आणि ह्मणूं लाग-

ला, "घरवाले, जरा आह्मांस दिवा दाखवाल तर आह्मी आपलें सामान सुमान एका बाजूस लावितों आणि त्यांना नीट जागा करून देऊं."

हें ऐकून घरवाल्यानें त्यांस दिवा दाखविला. दिव्याच्या उजेडांत, चिरगूट पांघरूणाची आटोपाआटोप करण्याच्या निमित्तानें उठून **वीरकांत**, त्या स्त्रिया कोण आहेत ह्मणून हलकें पाहूं लागला. परंतु पहिल्यानें जी स्त्री बोलली तिनें, दिव्याचा उजेड येतांच तोंड पाठीमागें केलें, ह्यामुळें ती कोण आहे हें त्याला एकदम समजलें नाहीं. परंतु आप्तजनाची माया ही तोंड पाहिल्यानेंच ओळख पटविते असें नाहीं. त्या स्त्रीस न्यहाळून पहातांच त्यानें एकदम जाऊन तिला आलिंगन दिलें, आणि मोठ्या करुणायुक्त स्वरानें ह्मणाला, "प्रिये, आजपर्यंत ह्या अभाग्याचा त्याग करून कोण्या ठिकाणीं वास केला होतास?" **वीरकांताचे** हे शब्द ऐकून तिनें त्याच्या हातांत मान टाकिली आणि मोठ्या दीन वदनानें रुदनास आरंभ केला. हें पाहून **वीरकांत** तिला ह्मणाला, "प्रिये, अशी शोकाक्रांत होऊन माझ्या दु:खी अंत:करणास अधिक इजा होईल असें करूं नको. पहा, हें तुझें दीनवदन पाहून माझ्या जिवांत जसें तटतटा तुटतें आहे. प्रिये, **रणधीरसिंगानें** त्या गुहेतून सोडविल्यावर तुला कोणीं नेलें होतें? आणि तूं ह्या ठिकाणीं कशी आलीस?"

**वीरकांताचें** व त्या स्त्रीचें जों हें भाषण चाललें आहे तों, **रणधीरसिंगानें** त्या दुसऱ्या स्त्रीस ओळखिलें. तो तिला ह्मणाला, "**कमलिनी** बाई, तुह्मी हो येथें कोठें आलां?" हें ऐकून तिनें उत्तर दिलें "मी इथे कशी आले

तें तुला काय सांगू ? खरोखरीच ईश्वरानें मला इथें आणलं. बरं माझं मेलं असू दे, बाईसाहेब कुठें आहेत ? त्यांचा तू शोध लावलास काय ? काय त्यांची वाट आहे कोण जाणं ? बरं झालं, ह्या बाईची (त्या स्त्रीकडे बोट दाखवून) आणि सरकारची तरी भेट झाली ह्मणून."

**कमलिनीचें** व **रणधीरसिंगाचें** बोलणें चाललें आहे इतक्यांत **वीरकांतानें रणधीरसिंगास** हाक मारिली आणि ह्मणाला, "**रणधीरसिंगा,** पाहिलीसना कोणाची ओळख पटली ती ? बरें, आतां हिची हकीगत ऐक. प्रिये, सांग पाहूं तुला कोणीं नेलें होतें ? आणि तूं आतां येथें कशी आलीस ?" हें ऐकून **रूपवती** फार मंजूळ व दीन स्वरानें सांगूं लागली, "हे माझे चुडेदान करणार व प्राण दाते, ( **रणधीरसिंगाकडे** बोट दाखवून ) मला घेऊन त्या व्याघ्रमुखांतून बाहेर पडले आणि इकडे घेऊन येत होते, इतक्यांत त्या मेल्या **दुर्वीर्यानें** मला एका रथांत घातलें आणि रथ मोठ्या झपाट्यानें हाकलून मेल्यानं मला आपल्या गांवीं नेलें आणि एका वाड्यांत नेऊन ठेवलं. त्या ठिकाणीं आज सात आठ दिवस नित्य नेमानं येऊन माझा छळ करीत असे. त्या देवास काळजी ह्मणून त्यानंच संरक्षण केलं. मेला काय करील आणि काय नाहीं अशी रोज धास्ती वाटत होती, पण नशीब थोर ह्मणून ह्या **कमलिनीची** भेट झाली. ती पूर्वीं **विलासिनीजवळ** चाकरीस होती. **विलासिनीला** जेव्हां **दुर्मति भाऊजींनीं** हिरा बागंत नेऊन ठेवलं होतं तेव्हां हिलाही त्यानीं एका कोठडींत कोंडून ठेवलं होतं. पुढं **दुराचारानं** जेव्हां **विलासिनीला** रानांत आणून ठेवलं तेव्हां **दुर्मति**

भाऊजींनीं हिला हाकलून दिली. पुढं ती दुर्बोधाकडे चाकरीला राहिली होती. माला त्या दुष्टानं आपल्या घरीं नेऊन ठेवल्यावर हिला माझ्याकडे ठेविली होती, आणि मी त्याच्या दुष्ट बेतास कबूल व्हावं ह्मणून हिला यत्न करायला सांगितला होता. पण ती माझी धर्म मायच; तिनं माला काल रात्रीं त्या वाड्यांतून मोठ्या युक्तीनें सोडवलं आणि आतां माला माझ्या माहेरीं घेऊन जात होती, पण इथे गाठ पडून आज हा दिवस दृष्टी पडला."

हा तिचा वृत्तांत ऐकून वीरकांतास फार वाईट वाटलें. परंतु कांहीं वेळ गेल्यावर रूपवती भेटल्यानें जो आनंद झाला त्यामध्यें तो तें दुःख विसरून गेला, आणि तिच्याशीं मोठ्या प्रेमानें गोष्टी सांगूं लागला. तीही आपल्यावर जीं संकटें गुदरलीं होतीं त्याविषयीं त्याच्या जवळ मोठ्या प्रेमानें व दुःखानें हकीगत सांगूं लागली.

ह्या सर्वांचा हा शोक व आनंद ऐकून, घरवाल्याची एक वृद्ध मातोश्री होती, तिला मोठें आश्चर्य वाटलें. हे दोन पुरुष कोण आहेत? पाठीमागून ज्या दोन स्त्रिया आल्या त्या कोण, व त्यांची ह्यांची ओळख पटून एक जण एकीला आपली प्रिया ह्मणतो हा काय प्रकार आहे? ह्या गोष्टीची चौकशी करण्याकरितां ती त्यांच्यांत जाऊन बसली आणि इकडील तिकडील गोष्टी सांगूं लागली. बोलतां बोलतां तुह्मी कोण व कोठले ह्मणून तिनें त्यास प्रश्न केला. ही वृद्ध स्त्री आपल्यावर ममता करून आपला वृत्तांत विचारीत आहे, असें जाणून त्यांनीही तिला सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकून आपल्यास फार वाईट

वाटल्याची तिनें ह्यास चिन्हें दाखविलीं, आणि ममतेचे दोन गोड शब्द बोलून ती उठून गेली.

पहाटेस उठून **रत्नपुरीस** जाण्याचा बेत, **वीरकांतानें** **रूपवतीस** सांगून रात्र बरीच झाल्यामुळें सर्व निद्रिस्त झालीं. पहाटेचे सुमारें पांच वाजतां **रणधीरसिंग** जागा होऊन त्यानें सर्वांस उठविलें. आणि सर्व तेथून जाण्यास निघाले. **वीरकांतानें** घरवाल्या भटजीस हाक मारून त्याचा निरोप घेतला, **रूपवतीनें** त्याच्या मातोश्रीस नमस्कार केला आणि सर्व जाण्यास निघालीं. तीं घराच्या बाहेर पडतात तों घरवाला आणि त्याची मातोश्री हीं आपसांत कुजबुजूं लागलीं. हें पाहून **वीरकांतास** वाटलें कीं आपण ह्यास द्यावें तितकें दिलें नाहीं ह्मणून तीं कुरकुर करीत आहेत. असें मनांत येऊन जरा त्यास खेद वाटला. परंतु करितो काय? त्यावेळीं, भटजीबुवास देण्यासारखें आणखी त्यांच्या जवळ कांहीं नव्हतें. ते सुमारें पांच दहा पावलें गेले इतक्यांत पाठी-मागून कांहीं लोक गडबड करीत मोठ्या झपाट्यानें आ-पल्याकडे येत आहेत असें त्यांस वाटलें. ते कोण असावे ह्मणून मागें वळून जों पाहातात तों त्यांनीं मोठ्या त्वरेनें धाव मारून ह्या सर्वांस एकदम पकडिलें. **वीरकांताच्या** व **रणधीरसिंगाच्या** एकदम मुसक्या बांधिल्या. हा प्रकार पाहून सर्व एकदम चकित झालीं. हे लोक कोण, व ह्यांनीं आपल्यास कशाकरितां पकडलें, हें त्यांनां अगदीं समजेना. **वीरकांतानें** त्यांस मोठ्या हिमतीनें विचारलें, "अहो, तु-ह्मीं आह्मांस कशाकरितां धरलें? लुटण्याच्या उद्देशानें धरलें असेल तर आमच्याजवळ एक छत्रपतीही नाहीं."

हे शब्द ऐकून त्या मंडळांत एक दोंदील धट पुष्ट बुवा होता. त्याला फार राग येऊन तो ह्मणाला, "हरामखोर, राजाला मारून शीं आतां मानभावी कावा लडवतोस काय ? त्याची मजा वगा मंजी झाल. लइ भटक्या मारित व्हतास नहीं ? लइ उत्येम ? चला आता राजेसरी आपुन ! राजाला मारन्याच सुक कस असतं त्येचा घ्या परिचव ! !

त्याच्या ह्या बोलण्याचा अर्थ न कळल्यामुळें **वीरकांनास** फारच आश्चर्य वाटलें. राजाचा वध केला ह्मणून जें हा ह्मणाला तें काय,? राजा कोणता,? त्याचा वध केला कोणी,? हें त्याला कांहींच समजेना. तो मोठ्या नम्रतेनें त्या दोंदील बुवास ह्मणाला, " राजा, कोणता व त्याचा वध कोणी केला" हे मला कांहींच माहीत नाहीं. आज दोन महिने आह्मीं रानावनांत हिंडतों आहों; हें ऐकून दुसरे कांहीं लोक ह्मणू लागले कीं, पाटीलबुवा, आतां ह्याच्याशीं बडबड करून काय उपयोग ? चला, ह्यांना आतांच **रत्नपुरीस** घेऊन. असें ह्मणून ते सर्व त्यांना दुष्टा प्रमाणें मार हाण करीत घेऊन चालले. **रत्नपुरी** जवळच असल्यामुळें संध्याकाळचा सुमार होत आहे तों ते तेथें पोंहोचले. ती गुजरीची वेळ असल्यामुळें जिकडे तिकडे एकच गडबड उडून गेली होती. लोकांचे थवेच्याथवे इकडून तिकडे तिकडून इकडे फिरत होते. रस्त्यांत अनेक प्रकारच्या लोकांची गर्दी झाली होती. अशा वेळीं **दोंदील** बुवाच्या लोकांनीं **वीरकांत, रणधीरसिंग, रूपवती** आणि **कमलिनी** ह्यांस भर बाजारांतून चालविलें.

ज्या **वीरकांनास** मोठ्या सुंदर घोड्यावर वसून पांच

पन्नास मंडळीनिशीं त्या नगरींत फिरण्याची संवय, त्या-लाच ह्या अवस्थेंत अशा गर्दींतून जाणें ह्मणजे किती बरें दुःखदायक झालें असेल!! ज्याच्या तोंडाकडे पहा-ण्याची देखील कोणास मगदूर नव्हती, त्यालाच त्या गर्दींतून धक्क्या बुक्क्या खात वाट चालावी लागली ह्मणजे किती बरें वाईट वाटलें असेल! ज्याचा घोडा पाहिल्या-बरोबर रस्त्यांत लोकांची पळापळ होऊन त्यास मोकळा रस्ता मिळत असे, त्याच्याच अंगावर लोकांची गर्दी येऊन पडूं लागली ह्मणजे त्याच्या मनाची काय बरें स्थिति झाली असेल! त्याचप्रमाणें ज्या रूपवतीचें मुख सूर्याच्या दृष्टी पडणें देखील कठीण, भूमीच्या काठिण्यानें जिच्या सुकुमार पावलांस कधींही इजा केली नाहीं, अशी तिची स्थिति ज्या नगरींत होती, त्याच नगरींत लोकांच्या धक्क्या बुक्क्या खात पायांनीं वाट खेटावी लागली असतां तिला काय बरें वाटलें असेल!! मरण का अधिक दुः खदायक होणार आहे!! तीं सर्व मोठ्या दुःखानें तों-डावर पदर घेऊन वाट चालत असतां अनेक लोक त्यां-च्या तोंडाकडे टकमक पाहूं लागले. **वीरकांताच्या** सद्गु-णाविषयीं ज्यांची खातरी होती त्यांच्या जिवांत, ह्यांची अशी अवस्था पाहून तर तटतटां तुटूं लागलें. जो तो, ह्यांना पहाण्यास रस्त्यानीं धावूं लागला. अशा गर्दींतून त्या **दोंदील** पाटलाच्या लोकांनीं त्यांस राजवाड्यांत नेलें आणि **दुर्मती** समोर हजर केलें. **दोंदील** पाटलानें **दुर्म-तीस** मुजरा केला आणि ह्मणाला, "सरकार, जाहीरनाम्या-वरन दीग म्हेनत करूनशी ह्ये परतापी गिरस्त पक-डल्ये, आतां धण्याची विच्चा.

**वीरकांत** व **रूपवती** ह्यांस पहातांच **दुर्मती**च्या पोटांत मोठी भीति उत्पन्न झाली. आतां आपलें सर्व कपट बाहेर पडतें कीं काय ही त्याला मोठी धास्ती पडली. परंतु ही भीति मोठ्या युक्तीनें छपवून त्यानें शिपाई लोकांस, **वीरकांत**, **रूपवती**, **रणवीरसिंग**, आणि **कमलिनी** ह्यांस एकदम कारागृहांत नेऊन ठेवण्यास सांगितलें. तेव्हां **वीरकांत** मोठ्या दयायुक्त स्वरानें त्यास ह्मणाला, " अरे बा **दुर्मती**, माझ्यावर हा कायरे प्रसंग गुदरला आहे? मला वाटलें होतें कीं, ह्या कोणी अडाणी लोकांनीं आह्मांस व्यर्थ धरलें असावें, तुझ्या पुढें आह्मीं आलों ह्मणजे तूं त्यांस योग्य शासन करून आमची मुक्तता करशील. परंतु तूं देखील असे निष्ठुर शब्द बोलून माझ्या दुःखी अंतःकरणास टोंचितोस काय? असो, काय होईल तेवढें थोडें आहे. काळ फिरला ह्मणजे सारें फिरतें. भाऊ फिरतात, पुत्र फिरतात. कोण कोणाचें आणि कोण कोणाचें. साऱ्या ताज्या घोड्यावरील गोमाशा. पहा, ज्या वेळेस वडिलांचें राज्य होतें त्या वेळेस हाच **दुर्मति** मला किती नमून असे आणि आज पहा, अपराधा शिवाय कसा मला व्यर्थ गांजितो आहे. असो, ईश्वरेच्छा." ! ! हें ऐकून **दुर्मती** मोठ्या क्रोधानें त्याच्या अंगावर येऊन ह्मणाला, "दुष्टा, माझ्या वडिलांचा घात करून असे गोड शब्द बोलून मला दया आणूं पहातो आहेस काय? बरें, आतां उद्यां काय दशा होते आहे ती पहाशील." हें ऐकून **वीरकांत** त्यास ह्मणतो, "अरे, तुझ्या वडिलांचा मी घात केला? काय काय? काकांना कोणी इजा केली काय? काय झालें आहे तें सांग

पाहूं." हें ऐकून **दुर्मती** ह्मणतो, "भलारे भला, काय सोंग आणलें आहेस ! दुष्टा, आतां असे गोड शब्द बोलत आहेस, परंतु ज्या वेळीं माझ्या वडिलांच्या उरांत कट्यार मारिलीस त्यावेळीं दुष्टा, तुला कशीरे दया आली नाहीं? राज्यप्राप्ती साठीं असें साहस कसेंरे तुझ्यानें करवलें? तुझा हात तरी कसारे पुढें सरसावला ?" असें ह्मणून नेत्रांतून अश्रू गाळूं लागला.

आपल्या चुलत्याचा कोणीं वध केला असें **वीरकांतास** वाटून तोही फार शोक करूं लागला. परंतु इतक्यांत **दुर्मतीनें** सेवकांस, त्यास लवकर कारागृहांत नेण्यास सांगितलें. तेव्हां लागलेंच सेवकांनीं त्यांना कारागृहाच्या एका अंधार कोठडींत नेऊन ठेविलें. त्यास कारागृहांत नेल्यावर, **दुर्मतीनें दोंदील** पाटलास विचारिलें, "तूं कोठें असतोस? आणि ह्यांना कसें पकडिलेंस? तेव्हां त्यानें उत्तर दिलें, " सरकार, हितून धा कोसांवर हाडप ख्येडा ह्मनूनशी येक गांव आहे, तितला मी पाटील. माजा गावामदी येक ब्राह्मनाच घर आहे, तित ह्ये सरव्ये उतरल्ये व्हत्ये. ही गोष्ट त्या ब्राह्मनाच्या म्हतारीन मला कळवली, आन मंग काय इचारता, सरकारचा हुकूम व्हीर्यांमंदी व्हताच, चित्यावांनीं झडप घालूनशी सर्व्यांला पकडून कैद करून पयाप हाजर केल्येती. त्या म्हतारीला मातर पाच हजार रूपाये दिले पायजेत. माज काय, सरकारच्या कुरपेमंदी संमद आहे. मातर सुमरन."

हें ऐकून **दुर्मती** ह्मणाला, "वः तूं तर खूप कामगिरी बजाविलीस; तुला कांहीं इनाम दिलें पाहिजे. त्या ब्राह्मणाच्या आईस इकडेच धाडून दे ह्मणजे तिचें इनाम

तिला येथेंच देऊं." असें ह्मणून त्यानें एक हुजऱ्यास हाक मारून दोंदील पाटलास एक शेला पागोटें द्यावयास सांगितलें.

इकडे **वीरकांत** व **रूपवती** ह्यांस **दुर्मतीच्या** सेवकांनीं कारागृहांत नेऊन ठेविल्यावर त्या बापड्यांस काय वाटलें असेल याचा विचार आतां वाचणारांनींच करावा. **वीरकांत** मोठ्या दुःखानें **रूपवतीस** ह्मणतो, "प्रिये, पहा, हे आपल्यावर काय प्रसंग येत आहेत ते!! एक विघ्नांतून सुटलों नाहीं तों दुसरें उभें आहेच. जन्मांतरचा गुण! त्याला कोण काय करणार!! पहा, मजवर आज ही काय तोहोमत गुदरली आहे! काकांचा कोणा दुष्टानें घात केला असेल तो करो. **दुर्मतीस** वाटतें आहे कीं, हें माझ्या हातूनच घडलें. आतां पुढें कोणते प्रसंग येतील आणि कोणते नाहीं. काय काय होत आहे तें आतां एक **परमेश्वरावर** भार ठेवून पहावें." असें ह्मणतो आहे तों त्याच्या नेत्रांतून ढळढळा अश्रु वाहूं लागले. त्याची अशी अवस्था पाहून **रूपवतीच्या** हृदयांत जसें तटतटां तुटूं लागलें. नेत्रांतून अश्रुपात होऊन तो दुःखानें तप्त झालेल्या हृदयास न्हाणूं लागला. मुख अगदीं म्लान होऊन गेलें. **वीरकांत** तिच्या मुखाकडे व ती **वीरकांताच्या** मुखाकडे पाहून हमसाहुमशी रडूं लागली. त्यावेळीं **रणधीरसिंगानें वीरकांताचें** व **कमलिनीनें रूपवतीचें** बरेंच समाधान केलें. ह्याप्रमाणें एकमेकाचा विलाप चालला आहे तों प्रातःकाळ झाला.

प्रातःकाळीं **दुर्मतीनें** प्रधान, कारभारी, स्नेहिवर्ग व नगरींतील शिष्ट मंडळी ह्यांस अमंत्रणें करून मोठी कचेरी

भरली. जमलेल्या मंडळीस, वीरकांतानें केलेला अपराध पुन: सांगून, त्यास धरून आणल्याचा मजकूर कळविला. आणि पुढें आतां काय विचार करावयाचा ह्मणून प्रश्न केला. तेव्हां दुर्मतीच्या स्नेहिमंडळापैकीं कित्येक उठून ह्मणूं लागले, "आतां विचार कशाचा? विचार पूर्वीच झाला आहे. अशा पातकी मनुष्याविषयीं सातदा विचार करणें हे शिष्टांस मोठें लांछन आहे. जो विचार ठरला आहे तो एकदम अमलांत आणला पाहिजे. ह्याचप्रमाणें प्रधानादि कारभाऱ्यांचें मत पडलें. मग काय विचारावें!! इतर मंडळीस कोण विचारितो? त्या कचेरीचा असा ठराव झाला कीं, आज सायंकाळीं चार वाजतां वीरकांतास सर्वांसमक्ष सुळीं द्यावा. ह्याप्रमाणें विचार करून कचेरी बरखास्त झाली. पुन: सर्वांनीं त्याच ठिकाणीं सायंकाळीं चार वाजतां जमावें ह्मणून दुर्मतीनें सर्वांस हुकूम फरमाविला.

सायंकाळीं चार वाजतां सर्व कचेरी भरली. सरकारवाड्याजवळ रस्त्यांत जो मोठा चौक होता तेथें सेवकांनीं सुळाची तयारी केली. पुढें होणारा भयंकर देखावा पहाण्यासाठीं चौकास जे चार रस्ते मिळत होते ते लोकांच्या गर्दीनें इतके भरून गेले कीं तेथें पाऊल फिरकविण्यास देखील जागा नाहींशी झाली. लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन धडकूं लागल्या. अशी गर्दी उडाली आहे तों इतक्यांत राजाचे घोडेस्वार, पायदळ येऊन त्या चौकांत जमले. सर्वांपाठीं घोडेस्वार उभे राहून पुढें नागव्या तलवारीनिशीं पायदळ येऊन उभे राहिले. इतक्यांत राजाच्या कचेरीची सर्व मंडळी मोठया थाटानें

येऊन ठेपली. ही मंडळी येतांच सर्वांनीं त्यांना वाट दिली आणि ते सर्व, चौकाच्या मध्यस्थानीं गेले. इतका थाट जमल्यावर **दुर्मतीनें वीरकांत, रूपवती, रणधीरसिंग** आणि **कमलिनी** ह्यांस कारागृहांतून आणावयास सेवकांस आज्ञा दिली. नंतर कांहीं सेवक जाऊन त्यांनीं त्या चार कैदींस मोठ्या त्वरेनें तेथें आणलें. **वीरकांताच्या** व **रणधीरसिंगाच्या** मुसक्या बांधल्या होत्या. मळकीशीं चिरगुटें परिधान करावयास दिलीं होतीं. **रूपवती** व **कमलिनी** ह्यांचे निर्दयपणें हात जखडले होते.

ह्याप्रमाणें तीं सर्व तेथें प्राप्त झाल्यावर राजकचेरीच्या मंडळींतील **दुर्वीर्य** पुढें होऊन बोलूं लागला—

"तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, आपले पूर्वी **वीरसेन** ह्मणून जे सद्गुणी, सुखदाते, लोकप्रिय राजे होऊन गेले, त्यांच्या पोटीं मानवरूपधारी जो हा दैत्य जन्मून (**वीरकांताकडे** बोट दाखवून) त्यानें आपल्या सरकारचे जे वडील, ह्मणजे ह्यांच्या पूर्वीचे राजे **कुमित्र महाराज**, त्यांचा राज्यप्राप्तीसाठीं निर्दयपणें घात केला तो सर्वांस माहितच आहे. त्या अपराधाबद्दल त्यास योग्य शासन व्हावें, परंतु इतक्या दिवस त्यांचा शोध लागला नाहीं. तरी ईश्वर दुष्टास योग्य शासन दिल्याशिवाय रहात नाहीं. आतां हे पहा, सर्व फारा दिवसांनीं सांपडून, त्यांस योग्य शासन होण्याची आज वेळ आली आहे. आपल्या सरकारच्या मनांत ह्यास शासन करावें असें नव्हतें तथापि अपराध्यास योग्य शासन झालें पाहिजे ह्मणून सर्व मंडळीचा आग्रह पडल्यामुळें त्यांनीं ह्यास सुळावर देण्याचा ठराव केला आहे. त्याप्रमाणें सर्वांसमक्ष आतां ह्यास सुळावर

दिलें जाईल. ह्याची स्त्री जी आज येथें उभी आहे, तिचा प्रकार जर ह्मणाल तर तिच्या वाईट वर्तणुकीबद्दल **सोमकांतास** कारागृह प्राप्त होऊन शेवटीं मरणासारखा परिणाम भोगावा लागला. **सोमकांतास** कैद करण्याचें कारण आजपर्यंत कोणांत प्रसिद्ध केलें नव्हतें. तें आतां सर्वांस कळविलें आहे. सर्वांनीं आज **वीरकांताचा** परिणाम पाहून सन्मार्गानें वागण्याचा कित्ता घ्यावा."

**वीरकांतास** सुळावर देणार हें ऐकून बापड्या **रूपवतीची** काय अवस्था झाली असेल ती सांगावयास देखील नको. ह्या अक्षरांपेक्षां दुसरें तिला काय अधिक दुःख दायक असणार आहे ! ! ती एक सारखा हंबरडा फोडून ईश्वराचा धावा करूं लागली—

## पद.

( बहुता दिवसीं मज दुबळीवर० या चालीवर )

**हरहर देवा पुराणपुरुषा दीनोद्धरणा प्रभो, कसारे निजलासी तूं विभो ॥ध्रु०॥ कठोर शब्दीं जन्मा पासुनि नाहिं जयें दुखविलें, नाहिं कीं दीना अव्हेरिलें ॥ दीना दुष्टीं, छळितां, जेणें नाहिं कीं पाहिलें, करूनी मध्यस्थी सोडिलें ॥ सेवक जन वा पशुपक्ष्यातें नाहिं कधीं दुखविलें, पराचें मर्म न उच्चारिलें॥चा०॥तोचि बा वीरकांत हा सुधी, जातसे मरण भूमिके मधी, आचरे दोष हा कधी, ॥ सांग सांगरे जगःप्रकाशा दृष्टी उघडुन बघी, नातरीं कीर्ति पळे आवघी ॥ १ ॥ 'जीवनाश' हें अक्षर ऐकुन काळिज उपाचे चिरे,**

तयें नृपवध केला हें खरें? नवनीतानें खर्ग तोडिलें
सत्य मानि बुध जन,हीच बात्वन्माया किंचन?॥
न्याय तुझ्या घरीं जरीं असल तरि शोधी यादु-
र्नया, कोणिबा मारिलें राजया? ॥वनवासी आ-
ह्मी दुःखित फिरतां धरुनीयां आणिलें,कायहें ना-
हिं तुवां जाणिलें? ॥ दुष्ट खलानीं स्वार्थ साधना
अपराधी ठरविलें, शुलावर द्याया आज्ञापिलें ॥
चा० शोषला सौभाग्यादीधि अजी, धावबा नै-
धूर्याते त्यजी ॥ शरण मी दासी त्वत्पदकजी ॥
अता नकोरे पाहुं अंतहा सज्जन पाला हरे,
नातरी बिरुद बुडे पाहरे ॥ ३ ॥

सुळावर देण्याचा ठराव ऐकून बापड्या वीरकांताची तरी काय दशा झाली असेल? मृत्यूसारखें दुसरें काय दुःख दायक, आहे? तशांत असा विलक्षण आरोप येऊन लोकांत दुर्लौकिक होऊन मरण येणें ह्मणजे वीरकांता सारख्याच्या मनास किती दुःखदायक झालें असेल बरें? त्यास वाटूं लागलें कीं असें मरण येण्यापेक्षां कोणी सर्व शरीरास जरी खिळे टोंचून प्राण घेतला असता तरी बरें होतें. तो मोठ्या करुणा स्वरानें ह्मणूं लागला, "परमेश्वरा, आज मजवर हा काय प्रसंग आणला आहेस? अनेक संकटांतून सुटून शेवटीं हा परिणाम भोगावा असें ह्या दुर्दैव्याच्या नशीबीं लिहून ठेविलें होतेंस काय? परमात्म्या, ज्यावेळीं त्या दुष्टांनीं मला पर्वतावरून लोटून दिलें, चोरांनीं वध करण्यासाठीं रणधीरसिंगाच्या स्वाधीन केलें, अरण्यांत अनेक संकटें भोगिलीं, अशावेळीं देखील सत्यास जय देऊन मला मृत्यूच्या दाढेंतून सोडविलेस, आ-

णि आज हा विनाकारण प्रसंग कां आणला आहेस? परमेश्वरा, दीनदयाला, मला मरणाचें ह्मणशील तर खरोखरी कांहीं वाटत नाहीं, कारण अशा निरपराधी मरणा अतीं तुझ्या पायाचीच प्राप्ति आहे हें मला पक्कें माहीत आहे, परंतु आजपर्यंत नीतीनें वागण्यासाठीं प्राण तोडून दिवस काढिले आणि शेवटीं जनांत हा डाग लागला, हे माझ्या हृदयावर केवळ डाग दिल्याप्रमाणें वाटतें. देवाधिदेवा, आतां अंत पाहूं नको. भक्त वत्सला, लवकर धावून येवढा डाग दूर कर आणि मग हवें तें कर. शरणाचा शरण्य हें ब्रीद खोटें करूं नको. परमेश्वरा, मजसारख्या निरापराध्याचा व्यर्थ प्राण घेऊन कोणाचेंही कल्याण होण्यासारखें नाहीं. प्राण जाऊन हा देह कांहीं कामीं लागेल तर असो, पण व्यर्थ अनाथावर कां धाड घालतोस? माझ्या पाठीं ह्या प्राणप्रियेची तरी काय अवस्था होईल? त्या पतिव्रते विषयीं आतां हा दुर्वीर्य काय ह्मणाला? व्यर्थ त्या कुरंगीस हे व्याघ्र पिडतील. हिची तरी देवा तुला दया येऊं दे!! पहा, त्या अबलेवर लक्ष दे!!! तिनें आजपर्यंत आपला काळ माझ्यावर लक्ष ठेवून घालविला, अनेक संकटें आलीं असतां एक निष्ठेनें पातिव्रत्याचें रक्षण करून मजवर आशा ठेविली आणि तिला आज सर्वांसमक्ष मी सोडून जाऊं काय? ईश्वरा, ह्याचा दोष तुझ्यावर आहे. माझा दोष दूर करण्यासाठीं, नाहीं तर तूं आपला करण्यासाठीं तरी धाव." असें ह्मणतो आहे तों त्याच्या नेत्रांतून ढळढळा अश्रु वाहूं लागले. कंठ अगदीं दाटून पुढें बोलत नाहींसें झालें. हें पाहून रूपवतीनें त्याच्या गळ्यास एकदम मिठी मारिली आणि मो-

हें पाहून चौकांत जमलेल्या सर्व लोकांनीं आरोळ्या फोडण्यास प्रारंभ केला. **रूपवतीनें** धाडकन जमीनीवर आंग टाकिलें. अशीं सर्वच दुःखानें व्याप्त झालीं आहेत, इतक्यांत दोन चार असामी मोठ्या धांदलीनें गर्दींतून लोकांस ढकलीत ढकलीत वाट करून **दुर्मती** जवळ आले, आणि मोठ्या लगबगीनें ह्मणाले, "सरकार, धावा हो धावा, चला लवकर हिराबागेंतील बंगला जळून खाक होत आला. खालची खोली उघडण्याचा आम्ही आपल्या कडून होता तेवढा यत्न केला परंतु दारें व कुलुपें कांहीं केल्यानें उघडत नाहींत अथवा फुटत नाहींत. सरकार, त्वरा करा, गरीब बिचारा प्राणी व्यर्थ जळून जाईल." असें ते ह्मणतांच, **दुर्मति** एका घोड्यावर बसला आणि **दुर्वीर्यास** सांगितलें, "मी आतां जातों, येथें तूं सर्व तजवीज पाहा, सांभाळ हो. मी तर चाललों." असें ह्मणून पांच पन्नास असामी बरोबर घेऊन तो मोठ्या त्वरेनें **हिरा-बागेकडे** गेला.

तो तेथून गेल्याबरोबर **दुर्वीर्यानें** सेवकांस जलदी करण्यास सांगितली. सेवकांनीं **वीरकांतास** सुळाजवळ नेऊन उभें केलें. तेव्हां तो सर्व लोकांस हात जोडून ह्मणूं लागला, " मित्रहो, माझ्याबद्दल तुह्मीं कोणी दुःखी होऊं नका. माझा निरपराधीपणा मनांत घेऊन मला पूर्तें-पणीं वाटत आहे कीं, इहलोकींच्या ह्या सर्व दुःखा-पासून मुक्तता व्हावी ह्मणूनच ईश्वरानें आज मला बोलाविलें आहे. आतां सर्व दुःखापासून मुक्तता होऊन मी मोठ्या सुखानें ह्या जगाचा जो नियंता, दीन दयाळ त्याच्या पायांशीं वास करीन. मला येवढेंच पाहिजे कीं माझ्या

कृतीपासून व वर्तणुकीपासून ज्याप्रमाणें तुह्मीं आनंदी असा त्याचप्रमाणें माझ्या मरणापासून मला उत्तम स्थिति प्राप्त होणार असें मानून आनंदी व्हा. आतां मी आपला निरोप घेतों. माझ्या जवळून जे अपराध झाले असतील त्यांची मात्र क्षमा करा, ही हात जोडून तुह्मां सर्वांपाशीं माझी विनवणी आहे." असें ह्मणून त्यानें सर्वांचा निरोप घेतला. त्याचे हे शब्द ऐकून लोकांच्या हृदयांत तटतटां तुटूं लागलें. **वीरकांता** बरोबर आपल्यासही मरण येईल तर बरें असें त्यांस वाटूं लागलें. पण बापडे करतात काय ? सत्तेपुढें कोणाचें काय चालतें ? **रूपवती** पडल्या-जागची उठून **वीरकांताच्या** पायांशीं धडाधड आंग टाकूं लागली.

असें चाललें आहे तों **दुर्वीर्यानें** पुन: जलदी करण्यास सांगितल्यावरून सेवकांनीं **वीरकांतास** सुळावर देण्यास उचललें. हें पाहून सर्व, ईश्वरास मोठ्या आक्रोशानें हांका मारूं लागले. ह्याप्रमाणें एकच हाहाकार उडून गेला आहे आणि सेवक आतां त्यास सुळावर चढविणार इतक्यांत मोठा गलका ऐकूं येऊं लागला, आणि सर्व लोक धूम एकसारखे पळूं लागले. जिकडे तिकडे एकच गडबड उडून गेली. ही गर्दी कशाची ह्मणून राजाचें सैन्य मार्गेमागें पाहूं लागलें तों एका अफाट सैन्याचा त्यांच्या अंगावर एकदम मार येऊन पडला. त्या सैन्याचा जो सरदार होता तो एका मोठ्या लढाऊ पांढऱ्या घोड्यावर बसलेला असून एकसारखा पट्ट्याचा हात फिरवूं लागला. त्याच्या सपाट्यांत सुमारें शें दोनशें असामी जमीनदोस्त झाले. सैन्याची जों निकरानें चकमक उडत

आहे तों त्या सरदारानें घोड्यावरून एकदम त्या सभा-जांतून चौकांत उडी टाकिली, आणि मोठ्या झपाट्यानें पट्टा फिरवून **वीरकांतास** सुळावर देणाऱ्या सर्व सेवकांस जमीनदोस्त करून टाकिलें. सैन्याची बरीच चकमक झाल्यावर **दुर्मतीच्या** निर्बल सैन्यानें एकदम पळ काढि-ला. त्या सरदारानें, तेथें जमलेल्या कचेरींतील सर्व मंडळीस आपल्या सैन्याकडून कैद करविलें, आणि **वीर-कांताचे** हात सोडून आपल्या अंगावरील सर्व पोशाख त्यास दिला. **वीरकांतानें** त्याच्या गळ्यास एकदम मिठी मारली आणि ह्मणाला, "मित्रा **सोमकांता,** आज कोठूनरे प्राप्त झालास? का ईश्वरानेंच तुला आ-ह्मां दीनांची दया येऊन धाडिलें? मित्रा, तुझा सर्व वृत्तांत आधीं सांग. पहा, **परमेश्वरास** आह्मां दीनांची दया येऊन ज्या मनुष्यानें आह्मांस अगदीं सोडिलें ह्मणून आह्मांस वाटत होतें, त्यासही सजीव करून आमच्या रक्षणास धाडिलें. दीन दयाळच तो, आमचें किती सत्व पहातो? मित्रा, तूं जर ह्या वेळीं सुटका न करतास तर आमची बरी गत नव्हती. तुझे हे उपकार फेडण्यास आह्मास किती जन्म घ्यावे लागतील कोण जाणें? मित्रा, हा तुझा **रणधीरसिंग,** मजदीनाचा प्राणदाता पाहिला सना?" असें तो ह्मणतो आहे तों **रणधीरसिंगानें** व **कमलिनी** दासीनें **सोमकताचे** गच्च पाय धरिले; आणि प्रेमाचा हुंदका येऊन तीं दोघेंही रुदन करूं लागलीं. तेव्हां **सोमकातानें** त्यांचें बरेंच समाधान केलें आणि त्यांस ह्मणाला, "आपण कांहीं वेळानें स्वस्थपणें भेटूं. आतां आधीं त्या **दुर्मतीचा** समाचार घेतला पाहिजे."

असें ह्मणून **वीरकांतास** मोठ्या नम्रतेनें बरोबर घेऊन तो आपल्या सैन्यांत जाऊन मिळाला. रूपवती व **कमलिनी** ह्यांस चांगलीं वस्त्रें देऊन एका रथांत बसविलें आणि एका वाड्यांत नेऊन ठेविलें; आणि आपण **वीर-कांतासह हिराबागेकडे** चालता झाला. **हिराबागे** जवळ जाऊन पोहोंचतात तों तेथील बंगला जळून खाक झालेला त्यांच्या दृष्टी पडला. **दुर्मती** एक सारखा शोक करीत बसला होता. **दुराचार** त्याचें शांतवन करीत होता. इतक्यांत **सोमकांतानें** जाऊन **दुर्मति** व **दुराचार** ह्यांस पकडिलें, आणि कैद करून आपल्या लोकांच्या स्वा-धीन केलें. पुढें **दुर्मति** येथें शोक कां करीत बसला होता ह्मणून त्यानें **हिराबागेंतील** बाकीच्या लोकांस कैद करून विचारलें. तेव्हां त्यानीं सांगितलें कीं, **दुर्मतीनें** एक सुंदर स्त्री या वाड्यांत ठेविली होती; ती जळून गेली ह्मणून हा शोक करीत होता. **सुंदर स्त्रीचें** नांव घेत-ल्याबरोबर **सोमकांतास विलासिनीची** आठवण होऊन त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्यापाहून **वीर-कांत** त्याच्या दुःखाचें कारण समजला आणि त्यास ह्मणाला, " मित्रा, असा शोकाक्रांत कां होतोस? ज्या परमेश्वरानें तुला प्राणदान केलें, तोच तुझ्या प्रियेची आणि तुझी भेट करील. **विलासिनी** विषयीं तुला कांहीं समजलें आहे काय मित्रा ? " हें ऐकून **सोमकांत** फार कष्टी होत्साता ह्मणतो, " सरकार, आतां तिची कशाची भेट, इतक्या दिवस तिचा शोध करून करून दमलों, परंतु तिचा कोठें पत्ता लागत नाहीं. " हें ऐकून, **विलासिनीस** चोरट्यांनीं गुहेंत नेऊन ठेवीपर्यंतचा सर्व मजकूर **वीरकां-**

तानें **सोमकांतास** कळविला. तो ऐकून **सोमकांतास** किती वाईट वाटलें असेल तें सांगावयास देखील नको. परंतु **सोमकांतानें** त्यावेळीं फारसा शोक नकरतां **दुर्मति, दुराचार,** व बागेंतील इतर मंडळी ह्यांस आपल्या सैन्या कडून कैद करविलें आणि त्यांस घेऊन तो **वीरकांता**सह **रत्नपुरीस** परत आला. त्यादिवशीं सर्व कैदी आपल्या सैन्याच्या **स्वाधीन** करून तो **वीरकांता**सह ज्या वाड्यांत **रूपवती** व **कमलिनी** ह्यांस ठेविलें होतें त्या वाड्यांत गेला. तेथें भोजन वगैरे आटोपल्या नंतर एकमेकांस एकमेकांच्या सुखदुःखाच्या गोष्टी सांगूं लागले. **वीरकांता-स** त्या दिवसाप्रमाणें उत्तम भोजन आणि त्या वाड्या सारखी उत्तम जागा फार दिवसांनीं प्राप्त झाल्यामुळें फार समाधान वाटलें. तशांत त्या दिवसासारखा भयंकर प्रसंग टळल्यावर त्यास किती समाधान वाटलें असेल तें सांगाव-यासच नको. तो मोठ्या आनंदानें **सोमकांताशीं** गोष्टी सांगत असतां त्यानें त्यास ह्याचा सर्व वृत्तांत विचारिला. त्यावरून **वीरकांतानें** आपली सर्व हकीकत **सोमकांतास** सांगितली, ती ऐकून त्याला फार वाईट वाटलें. नंतर **वीरकांतानें सोमकांतास** त्याचा वृत्तांत विचारला, त्याव-रून तो सांगूं लागला.

"मला कैदेंत नेऊन ठेवीपर्यंतचा सर्व मजकूर आप-ल्यास माहीत आहेच. कैदेंत टाकण्याचें कारण काय तें आजपर्यंत मला कळलें नाहीं. त्या कारागृहांत कांहीं दिवस मोठ्या दुःखानें काढल्यावर, तेथें **घाशीराम** ह्मणून एक दुय्यम कारभारी आहे, त्यानें मला एके दिव-सीं रात्रीं शिपायाचा पोशाख देऊन त्या कारागृहांतून

मुक्त केलें. त्यादिवशीं कारागृहांत कोणी कैदी मेला होता, त्यास त्यानें माझ्या कोठडींत नेऊन ठेविलें, आणि मी मेलों ह्मणून अफवा उठवितों ह्मणून त्यानें मला सांगितलें. तेथून सुटल्यानंतर शिपायाच्या मिषानेंच घरीं गेलों आणि पहातों तों दारास कुलूप होतें ह्मणून ती ( इतकें जरा लाजतो, तेव्हां **वीरकांत** त्यास ह्मणतो, "सांगा आतां नका लाजूं." हे ऐकून तो पुढें ह्मणतो) वडिलांकडे गेली असेल असें वाटून आपल्या गांवीं गेलों, परंतु तेथेंही आह्मा दोघा-साठीं एकसारखा शोक चालला होता. पुढें वडिलांचें व मातोश्रीचें समाधान करून तिच्या शोधार्थ परत निघालों. **रत्नपुरीच्या** आसपासच्या गांवांतून बंडाची तयारी मोठ्या झपाट्यानें चालली होती. त्या लोकांच्या जेव्हां मी दृष्टी पडलों तेव्हां त्यांनीं अतिशय आग्रह करून मला सर्व सैन्या-चें आधिपत्य दिलें. प्रथम त्यांचें ह्मणणें कबूल करावें असें वाटेना, कारण, असें मनांत येईकीं राजद्रोहानें वागणें हें फार वाईट आहे. त्यांनीं जरी आपलें वाईट केलें तरी तेवढ्यासाठीं ज्याचा माझ्या सारख्या शेंकडों लोकांवर अधिकार आहे, अनेक लोकांचें वाईट बरें ज्याच्या हातीं आहे, त्याच्या घातास प्रवृत्त होणें फार वाईट आहे. परंतु कांहीं वेळ विचार केल्यानंतर वाटलें कीं, राजा ह्मणजे काय ? त्याचा आणि प्रजेचा काय संबंध आहे? त्यानें प्रजेस कसें वागविलें पाहिजे ? आणि तसा प्रकार आतां घडत आहे कीं काय ? इत्यादि गोष्टींचा विचार केल्यावर असें मनांत आलें कीं, हजारों लोकांवर जो आर्ज जुलूम होत आहे तो जर दूर केला तर एक राजाच्या ना-शास प्रवृत्त झाल्यानें जो दोष येणार आहे तो नाहींसा

होऊन शतपट अधिक पुण्य लागेल ह्यांत संशय नाहीं. असें मनांत येऊन आणि त्यांचा फारच आग्रह पडल्यामुळें मी सैन्याचें आधिपत्य पत्करिलें. काल आपल्यास पकडल्याचा आह्मांस मजकूर कळला. तेव्हां सर्व सैन्याची तयारी करूं लागलों. आज सायंकाळीं आपल्यास सुळावर देणार असें ऐकतांच सर्व सामग्री तयार करून आपल्या सुटकेसाठीं यत्न करण्यास येथें आलों, तों ईश्वरानें जय दिला."

**सोमकांतास** जे हाल भोगावे लागले ते ऐकून **वीरकांतास** फार वाईट वाटलें. परंतु सर्व संकटापासून त्याची मुक्तता झाली हें पाहून त्यास विलक्षण आनंदही झाला. **वीरकांताच्या** भेटीनें व त्याचीही अनेक संकटांपासून मुक्तता झाली हें पाहून **सोमकांतास**ही फार आनंद झाला. परंतु त्या सर्वांच्या आनंदांत एक कमी झालें होतें. **विलासिनीचा** शोध लागला असता ह्मणजे त्यांच्या आनंदास पारावारच नाहीं असें झालें असतें. उद्या प्रातःकाळीं तिच्या शोधार्थ आपण कांहीं लोकांनिशीं निघावें असा **सोमकांतानें** व **वीरकांतानें** बेत केला आणि त्या वेळीं बरीच रात्र झाल्यामुळें सर्व निद्रित झालीं.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं **रूपवती** व **कमलिनी** ह्यांच्या भोंवतीं चांगला बंदोबस्त ठेवून **वीरकांतासह** **सोमकांत** कांहीं लोक बरोबर घेऊन **विलासिनीच्या** शोधार्थ निघाला. हिराबागेच्या पुढें सुमारें हाकभर गेले तों, तेथें एक लहानसें खोंपट त्यांच्या दृष्टी पडलें. त्या खोंपटाच्या बाजूनें जातात तों **वीरकांत सोमकांतास** ह्मणतो, "**सोमकांत**, येथें कोणाचें कण्हणें ऐकू येतें

आहे हें काय बरें असेल!" तेव्हां सोमकां.ही कान देऊन ऐकूं लागला. त्यालाही कोणी अशक्त मनुष्य फार हलकें कण्हतें आहे असें वाटलें; तेव्हां तो वीरकांतास ह्मणतो, "आपण ऐकलें तें खरेंच, कोणा अशक्त मनुष्य कण्हणें ऐकूं येतें आहे खरें, चला आपण तेथें कोण आहे तें पाहूं." असें ह्मणून ते दोघे त्या खोपटांत गेले आणि आंत पहातात तों एक मोठी खाच आहे, एका स्त्रीचे कोणी हात बांधून तिला आंत टाकिलें आहे, ती व्याकुळ होऊन कण्हत पडली आहे. तिनें लहानसें वस्त्र परिधान केलें आहे. तिचें सर्वांग मातीनें माखलें आहे. अशी तिची अवस्था पाहून त्यांच्या पोटांत फार दया उत्पन्न झाली. आणि ती स्त्री कोण आहे ती पहावयास ते त्या खाचेंत उतरले. आंत जाऊन पहातात तों ती मोठ्या करुणायुक्त स्वरानें कण्हत कण्हत हलकेंच ह्मणाली, "कोण आहे तें! माझे हात सोडा. थंडीनं आंग काकडलं, माला सोडा." हे शब्द ऐकून त्यांच्या पोटांत मोठे दुःखाचे उद्गार उठूं लागले. सोमकांत तिला सोडावयास गेला तों, त्याच्या नेत्रांतून ढळढळा अश्रु वाहूं लागले. तें पाहून वीरकांत त्यास विचारितो, "सोमकांत, कोणहो ती आहे?" तेव्हां सोमकांतानें उत्तर दिलें, "आपण ही कोण आहे ती नाहीं कां ओळखिली?" असें तो ह्मणतांच, वीरकांतानें तिच्याकडे न्यहाळून पाहून एकदम टाळी वाजविली आणि ह्मणाला, "सोमकांत, आतां तुह्माला वाईट वाटूं देऊं नका. जें फार दुर्घट होतें तें साधलें. तुमच्या स्त्रीचा शोध कसा लागतो हाच संशय होता, परंतु ईश्वरकृपेनें तिची आज भेट झाली. आतां सर्व

दुःख विसरा." याप्रमाणें तो ह्मणत आहे तों ती पुनः कणत कणत ह्मणाली, " कोण तें आहे ? सोडा माला." तेव्हां **वीरकांत** तिला ह्मणाला, "**विलासिनी** बाई, अहो हे कोण आहेत ते तुह्मीं नाहीं कां ओळखिलें ?" असें तो ह्मणाल्यावर, तिनें जरा डोळे उघडून **सोमकांताच्या** तोंडाकडे पाहिलें आणि हात जरा वर करून नेत्रांतून अश्रु गाळिले. पुढें त्यांनीं तिला तेथून काढून एका रथांत बसवून **रत्नपुरीस** नेलें आणि औषधोपचार करूं लागले.

**विलासिनीची** प्रकृति चांगली सुधारेपर्यंत चार पांच दिवस राज्यप्रकरणीं काम त्यांना अगदीं पहावयास सांपडलें नाहीं. तिची प्रकृति कांहीं बेतावर आल्यावर **वीरकांतानें** तिला विचारिलें, " **विलासिनी** बाई, तुह्मीं त्या गुहेंतून सुटून खोंपटांत जाऊन कशा पडलां होतां ?" तेव्हां **दमंतीनें** तिला धरून, **हिराबागेंतील** बंगल्यांत नेऊन ठेवीपर्यंतचा सर्व मजकूर सांगून ती ह्मणाली, " या खाचेंत मी आपल्यास सांपडल्यें, त्याच्या आधल्या दिवशीं याबागेंतील खोलींत बसल्येंअसतां, एकदम कसला अवाज ऐकूं आला. इतक्यांत पहात्यें तों तो मेला दुरा- **चार** त्या खोलीच्या भुईंतून एकदम बाहेर पडला आणि माझे हातपाय बांधून माझा पुरचेंडा करून ज्या खाचेंतून बाहेर पडला. त्याच खाचेंत मला टाकून दिलं. आंत पा- हिलं तर चाळीस पन्नास मनुष्यं होतीं. त्या साऱ्यांच्या हातां- त कुदळ पावडं अशीं हत्यारं होतीं. त्यांनीं त्या खोलींत नि- घणारं एक भूयार खणलं होतं. त्या भूयारांतून नेऊन माला त्या खाचेंत टाकलें आणि सारे निघून गेले. एक रात्र थंडी

न्यांत त्या खाचेंतच पडल्यें होतें. दुसऱ्या दिवशीं आपण येऊन मला काढलें" हें ऐकून त्याच दिवशीं हिराबागेंतील बंगला जळाल्याची **वीरकांतास** व **सोमकांतास** आठवण झाली आणि ते ह्मणूं लागले, " बरें झालें, थोडक्यांत चुकलें, नाहीं तर हीहि त्या बंगल्यांत जळाली असती. **दुर्मतीस** वाटलेंच होतें कीं ही त्या बंगल्यांत जळाली." असें ह्मणून तो बंगला त्याच दिवशीं कसा जळाला असावा ह्याविषयीं ते संशय घेऊं लागले परंतु कोणास कांहींच कल्पना बांधतां येईना. त्यांनीं तें भुयार वगैरे जाऊन पाहिलें तों तें **विलासिनीनें** सांगितल्याप्रमाणेंच होतें, परंतु तो बंगला कसा जळाला ह्या विषयीं कांहीं कल्पना बांधतां येईना.

**विलासिनीची** प्रकृति चांगली सुधारल्यावर **सोमकांतानें** अनेक संस्थानच्या मांडलीक राजांस व नगरींतील सर्व सभ्य गृहस्थांस आमंत्रण करून मोठी कचेरी भरली. **वीरकांत** ह्यास उंचस्थानीं बसविलें. कचेरीच्या वरच्या माडींत चिकाचे पडदे लावून नगरींतील मोठमोठ्या लोकांच्या व मांडलिक राजांच्या स्त्रियांसहवर्तमान **रूपवती** व **विलासिनी** ह्यांस बसविलें. नंतर **दुर्मति**, **दुर्वीर्य**, **दुराचार**, **दोंदील** पाटील, त्याच्या गांवची ती भटीण व घरवाला, ह्या सर्वांच्या मुसक्या बांधून त्यांस सर्वांसमोर आणिलें. **सोमकांतानें** उठून त्या सर्वांचीं दुष्ट कृत्यें व आपले सर्वांचे हाल त्या कचेरींतील सर्व समाजास कळविलें. तें ऐकून सर्वांच्या नेत्रांतून अश्रु गळूं लागलीं आणि ह्या दुष्टास कधीं योग्य शासन होईल असें त्यांस होऊन गेलें. **सोमकांतानें**, **विलासिनीचा** त्या खोपटांतील खाचेंत



शोध लागेपर्यंतचा सर्व मजकूर सांगून, हिराबागेतील बंगला त्याच दिवशीं, त्याच वेळीं कसा जळाला हें आह्मास समजलें नाहीं ह्मणून सांगितलें. तेव्हां त्या समाजांतून एकजण पुढें येऊन ह्मणूं लागला, "तो बंगला कसा जळाला हें मला माहीत आहे. ज्या लोकांनीं ह्या दुष्ट राजापासून राज्य हिसकून घेतलें त्यांनीं सर्व नगरींत कोठें काय चालतें हें पहाण्यासाठीं ठिक-ठिकाणीं हेर ठेविले होते. त्यापैकीं मी एक हेर आहें. मी **दुर्मतीच्या** रंगमहालांत आज पंधरा दिवस लपून काढिले. तेथें जो अनाचार चाललेला असतो तो तोंडानें येथें सांगवणार सुद्धां नाहीं. **दुर्मतीची** स्त्री फारच दुराचारी आहे. रात्रीं तिच्याकडे कोण कोण येतात ते खरोखरी लक्षांत देखील ठेवतां येत नाहींत. तरी ह्या **दुराचाराचें** [ त्याच्याकडे बोट दाखवून ] तेथें फारच जाणें येणें आहे. दहाबारा दिसांपूर्वीं, एके दिवशीं रात्रीं तो तिच्याकडे आला होता त्यावेळीं ती त्याला ह्मणाली कीं, "मागें तुह्मीं ज्या स्त्रीस मारिलें ह्मणून सांगितलें ती स्त्री जिवंत आहे व तिला **दुर्मतीनें** पुनः त्या बागेंत आ-णून ठेविली आहे. तुह्मीं माझ्याशीं एकदा कपट केलें तें केलें; परंतु आतां तिला कसं करून तरीं मारून टाका." तेव्हां तो ह्मणाला, आतां तिला मारण्याचें अगदीं साधा-रण नाहीं, कारण **दुर्मतीनें** तिचा फारच बंदोबस्त ठेवि-ला आहे. आतां तेथें कोणासच जावयास सांपडत नाहीं. तेव्हां तिनें ह्याला सांगितलें कीं, तुह्मीं त्या बंगल्यास संधी पाहून आग लावून द्या ह्मणजे ती आंतल्या आंत जळून जाईल. हें त्यानें कबूल केलें व पांच दिवसांची

मुदत मागून घेतली. त्याप्रमाणें तो गडबडीचा दिवस पाहून ह्यानें आपलें काम साधून त्या बंगल्यास आग लाविली असावी. हें वर्तमान मी **सोमकांत** महाराजांस केव्हांच कळविणार होतों; परंतु **विलासिनी** बाईची प्रकृति नीट नसल्यामुळें ते गडबडींत होते त्यामुळें त्यांच्या जवळ मी हें वर्तमान बोललों नाहीं. तें आतां सर्वांस कळविलें आहे."

हेरानें सांगितलेलें वर्तमान व **सोमकांतानें** कळविलेला सर्व मजकूर ऐकून कचेरींतील सर्व समाजाची त्या दुष्टांच्या अघोर कर्माविषयीं खातरी झाली आणि सर्वानुमतें त्यांनीं असा ठराव केला कीं, **दुर्मतीस** आमरण पर्यंत सक्त राजकीय कैदेंत ठेवावें. **दुर्वार्य** व **दुराचार** ह्यांस एकदम सुळीं द्यावें. **दुर्मतीच्या** स्त्रीस जन्मपर्यंत अंधार कोठडींत ठेवावें. **दोंदील** पाटील, भटीण व घरवाले ह्यानीं क्षमा मागितल्यावरून त्यांना सोडून दिलें. अशी व्यवस्था करून कचेरी बरखास्त झाली.

पुढें लवकरच एक सुदिन पाहून नगरींतील लोकांनीं व मांडलीक राजांनीं **वीरकांतास** राज्याभिषेक केला. **सोमकांतास** प्रधानाचीं वस्त्रें दिलीं. **रणधीरसिंग** ह्यास सेनाधिपती नेमिलें. **कमलिनीस** राजाच्या अंतरगृहांतील मुख्य दासीचें काम दिलें. **कुमित्राच्या** व **दुर्मतीच्या** वेळच्या सर्व दुराचारी कारभाऱ्यांस योग्य शासनें देऊन त्यांच्या जागा नगरींतील सद्गृहस्थांस दिल्या. ह्याप्रमाणें व्यवस्था झाल्यानंतर **वीरसेनाच्या** वेळचें सर्वांस सुख प्राप्त होऊन ते आनंदानें काळक्रमण करूं लागले.

**समाप्त.**